# अनुक्रमणिका


4 अध्यक्षीय- जयंत पाटील- घाबरलेले राज्य सरकार चंद्र-तारे देऊ म्हणेल

5 संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे- हत्ती चाले आपली चाल!

10 सरकार मधील लोकांची विधाने समाजात तेढ निर्माण करणारी- शरद पवार

14 मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची पत्रकार परिषद
१) दोन वर्षांत भ्रष्टाचारात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर- जयंत पाटील-१४
२) माझ्या स्वप्नातला महाराष्ट्र स्पर्धेत सर्वांनी सहभागी व्हावे- डॉ.अमोल कोल्हे-२०
3) भविष्यातला महाराष्ट्र जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा-सुनील गव्हाणे-२१

22 सरकार वाचविण्याची हमी किंमत- अनंत बागाईतकर

30 एबीपी माझावरील शरद पवार व सुप्रिया सुळे यांची मुलाखत

41 तरूणांच्या सामुहिक शक्तीतून महाराष्ट्राचे राजकारण बदलू- शरद पवार

44 मर्यादित अर्थ आणि चाचपडता संकल्प- अभय टिळक

52 मोदी सरकार आगीतून फुफाट्यात- व्यंकटेश केसरी

58 पीठासीन अधिकाऱ्यांच्या निःपक्षतेवर प्रश्नचिन्ह- विरुपाक्ष दास

62 नवीन पिढी कर्तृत्ववान बनविण्यावर लक्ष देऊया- शरद पवार

66 बांगलादेशातील आरक्षणविरोधी आंदोलन- जतिन देसाई

70 भ्रष्टाचाराच्या आरोपांवर महायुतीने उत्तर दिले पाहिजे- सुप्रिया सुळे

76 रक्तलांछित अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक- प्रभाकर खोले

82 समाजकारणाच्या उभारणीत शेषराव चव्हाण यांच्या ग्रंथांचे योगदान- शरद पवार

86 भाजपविरोधी हिंदू नाहीत!- जाता जाता (फिरस्ता)

92 कानोकानी- घंटाकर्ण (हलके-फुलके राजकीय किस्से)

102 शेवटचे पान- हेमन्त टकले- गर्जा जय जयकार क्रांतीचा!



**संचालक**
हेमन्त टकले
---
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
**फोटो**
मयूर बोराडे
---
**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी 'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.' च्या वतीने मीडिया आर अॅण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३, आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय

# घाबरलेले राज्य सरकार चंद्र-तारे देऊ म्हणेल



घाबरलेले सरकार सवंग लोकप्रियतेसाठी घोषणाबाजी करत असून येत्या दोन-तीन महिन्यांत चंद्र-तारे देवू म्हणतील. काय करू, कसं करू आणि मतं मिळवू, अशी परिस्थिती त्यांची झाली आहे. लाडकी बहीण, भाऊ अशा योजना त्यांनी आणल्या आहेत. आता लाडकी बायको, अशी योजना आणा. आमचे सरकार आले तरच योजना मिळेल, असे म्हणतात. पण त्यांना सांगतो आम्ही आहे ना खंबीर. हिसका दाखवला म्हणून हे वटणीवर आले. म्हणून या योजना आणताय. शरद पवारांना भ्रष्टाचाराचे सरदार म्हणताय, पण आमच्यातले सर्व तुम्ही घेतले आहेत. राज्यातील अनेक उद्योग तुम्ही गुजरातला नेलेत. राज्याची अधोगती करण्याचे काम तुम्ही केले.

ओव्हर कॉन्फिडन्समध्ये राहू नका, चुकीचे विधान होतील असे वागू नका. संयुक्त बैठक होईल तेव्हा कोण कुठे लढणार ते ठरवले जाईल. जो उमेदवार येईल त्याला निवडून आणण्यासाठी प्रयत्न करा. आपण उभे राहण्यासाठी नाही तर जिंकण्यासाठी निवडणूक आहे. निवडणूक लढण्याची अपेक्षा प्रत्येकाने व्यक्त करा, पण ज्याची शक्यता आहे त्यालाच आम्ही अभ्यास करून उमेदवारी देऊ. युवक शहर आणि जिल्हा अध्यक्ष यांनी बाहेर पडा. आपल्याकडे २० ऑक्टोबरपर्यंतच वेळ आहे. घाबरलेले सरकार थोडे दिवस मागे पुढे करतील. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी पहाटेची शपथ घेतली त्या तारखेपर्यंत फार फार तर निवडणूक हे पुढे ढकलू शकतात.

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जुलै महिन्यात आपल्या महाराष्ट्र दौऱ्या दरम्यान पत्रकार परिषद तसेच प्रसार माध्यमांना विविध मुद्यांवर प्रतिक्रिया देताना राज्य सरकारवर कडाडून हल्ला चढविला, त्याचा हा संक्षिप्त वृत्तांत...**

आपले महाविकास आघाडीचे सरकार असताना आपण असंघटीत कामगारांच्यासाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन केले. कष्ट करणाऱ्या कुटुंबांना विविध लाभ देताना ऐन संकटात मदतीचा हात देता यावा हा हेतू होता. सध्या हे महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम असून बांधकाम आणि इतर क्षेत्रात कष्ट करणाऱ्या कुटुंबांना स्थिरता व सुरक्षितता देण्याचे काम मंडळ करीत आहे. हे पाहून समाधान वाटते. भविष्यात जे सहकार्य लागेल, ते देत राहू.

छत्रपती शिवरायांची म्हणून शासनाने लंडनहून आणलेली वाघनखे खरी नाहीत तर नकली आहेत, असा इतिहास संशोधकांचा दावा आहे. याच पार्श्वभूमीवर ही वाघनखे गुप्ततेत का आणली, असा प्रश्न पडतो. ही वाघनखे काही मिळविलेली नाहीत तर ती काही दिवसांपुरती भाड्याने आणली गेली आहेत.

छत्रपती शिवरायांच्या वाघनखांबद्दल सर्वांनाच आदर आहे. यात वाद नाही. परंतु ही वाघनखे खरी नसून नकली आहेत. खरी वाघनखे तर साताराच्या जलमंदिरातच आहेत, असा दावा इतिहास संशोधक प्रा. इंद्रजित सावंत यांनी केला आहे. शिवरायांची वाघनखे लंडनहून एवढ्या गुप्ततेत आणायचे कारण नव्हते. मुंबईहून साताऱ्यापर्यंत वाजत-गाजत स्वागत करीत वाघनखे आणायला हवी होती. ही वाघनखे काही मिळविलेली नाहीत, तर ती भाड्याने आणली गेली आहेत.

राज्यातील महायुतीचे सध्याचे हे शेवटचे सरकार आहे. हे सरकार पुन्हा स्थापन होणार नाही. म्हणूनच विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मंत्रिमंडळाचे सुतोवाच केले जात आहे. बहुसंख्य असंतुष्टांना संतुष्ट करण्याचा महायुतीचा हा शेवटचा प्रयत्न आहे. पुन्हा सरकार कायम राहील, याची खात्री नाही. किमान उरलेल्या दोन महिन्यांपुरते तरी मंत्री होण्याचे स्वप्न पुरे करा, असा महायुतीच्या बहुसंख्य आमदारांचा आग्रह आहे.

मराठा आरक्षण देण्यासाठी ज्या ज्यावेळी आंदोलन झाले, त्या त्यावेळी महायुती सरकारने आरक्षणाची पूर्तता करण्याची नुसती आश्वासनेच दिली. प्रत्येकवेळी चर्चेचे गुऱ्हाळ चालविले. अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी सरकारची आहे. ती पार पाडावी. त्यासाठी विरोधी पक्षांशीही चर्चा करावी. पण तसे काही होताना दिसत नाही.

आरक्षणाच्या बाबतीत विरोधी पक्षाला कधी विश्वासात घेतलेलं नाही. आता निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. आता निर्णय घ्या. राज्यात आमदारांना निधी वाटप झाला. वेगवेगळे कार्यक्रम झाले तेव्हा तुम्हाला विरोधी पक्ष आठवला नाही. विरोधी पक्षनेते म्हणून (पान ९८ वर)

## संपादकीय



# हत्ती चाले आपली चाल!

**..........हत्ती चाले आपली चाल!**

खरं तर हिंदीतला हा वाक्प्रचार आहे. हत्ती हा शक्तिमान प्राणी असतो. त्याला पाहून किंवा त्याच्या अजस्त्र आकारामुळे भिऊन वाटेतले किरकोळ प्राणी त्याच्याकडे पाहून ओरडत असतात. परंतु गजराज आपल्याच धुंदीत असतात आणि हे किरकोळ मच्छर किंवा छटाक प्राणी फुकट ओरडत राहतात. त्यांच्या ओरडण्याचा हत्तीवर काहीच परिणाम होत नाही आणि तो डौलात आपल्याच धुंदीत चालत राहतो. सध्या गुजरातमधील काही छटाक मंडळी केवळ त्यांना दिल्लीचे कवच प्राप्त झाल्यामुळे महाराष्ट्रात येऊन फुकाचा कालवा करताना दिसत आहेत. पण लोकसभेच्या निवडणुकीत मराठी मतदारांनी त्यांना धडा शिकवलेला आहे तो ते विसरलेले असावेत. त्यामुळेच अजुनही बाष्कळ बडबड ते करीत सुटले आहेत. बहुधा विधानसभेतही मार खाण्याची इच्छा त्यांना झाली असावी. त्यामुळेच ते भान सुटून वायफळ भंकस करीत सुटले आहेत. करु द्यात त्यांना. फार दखल घेण्याची त्यांची पात्रता नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे कधीही चांगले आणि वर म्हटले त्याप्रमाणे हत्ती आपल्या धुंदीत चालत असतो तो किरकोळ रस्त्यावरच्या प्राण्यांच्या ओरडण्याची दखलही घेत नसतो.

अलीकडेच पुण्यात भाजपच्या महाराष्ट्र शाखेची बैठक झाली. लोकसभा निवडणुकीत ज्यांच्या चाणक्यपणाचा बुरखा चांगलाच फाटला आणि ज्यांचे अंदाज मतदारांनी पूर्णपणे छिन्नविच्छिन्न केले ते भाजपचे तथाकथित चाणक्य उर्फ केंद्रीय गृहमंत्री उर्फ प्रतिसरदार पटेल, उर्फ प्रति पोलादी पुरुष वगैरे वगैरे असलेले अमित शहा त्यासाठी पुण्यनगरीत आले होते. भाजपचे सर्वोच्च नेते अवतारी पुरुष आहेत. त्यांच्या खालोखाल हे प्रतिचाणक्य आहेत. त्यामुळे ते पुण्यात येऊन भाजपच्या महाराष्ट्रातील स्वयंसेवकांना कोणते ब्रह्मज्ञान देणार याची उत्सुकता सर्वांना होतीच. विशेषतः लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मतदारांनी तोंड रंगविल्यानंतर यांच्या श्रीमुखातून कोणते शब्दमौक्तिक बाहेर पडतील याबद्दलही उत्कंठा होतीच. पण एवढा मार खाल्ल्यानंतरही कोडगेपणा गेलेला नाही हे या पक्षाने व या पक्षाच्या नेत्यांनी यानिमित्ताने दाखवून दिले. त्यांच्या मुखातून मुखारबिंदूऐवजी विखारबिंदू निघाले. विखार, तिरस्कार, घृणा, तुच्छता हे भाजप-संघ परिवाराच्या राजकीय संस्कृतीचे मूलभूत पैलू आहेत आणि तेच संस्कार त्यांच्या स्वयंसेवकांवर केले जात असतात. त्यामुळेच आपल्या प्रतिस्पर्ध्यांना अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन त्यांची हीन शब्दात निंदा करण्याचे संस्कार किंवा बाळकडू या भाजप-संघपरिवारातील लोकांना मिळालेले असते. अमित शहा यांनी हे संस्कार खरे ठरविले व त्या संस्कारांना जागून त्यांना साजेसे विखारबिंदू त्यांच्या मुखातून बाहेर पडले. अमित शहा, देवेंद्र फडणवीस आणि इतरही जी मंडळी या शिबिरात उपस्थित होती त्यांनीही त्यांच्यावरील या संस्कारांना जागून विरोधी पक्षांच्या नेत्यांवर म्हणजेच त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर वारेमाप तोंडसुख घेतले. मतदारांनी लोकसभा निवडणुकीत नाकारल्याने भाजप-संघपरिवाराची मंडळी जी पिसाळलेल्या अवस्थेत आहेत त्याचेच दर्शन या शिबिराच्या निमित्ताने घडले. बोगस राष्ट्रीय चाणक्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर तोंडसुख घेतले. तर त्यांची लघुआवृत्ती म्हणजेच महाराष्ट्रातील स्थानिक चाणक्य देवेंद्र फडणवीस यांनी तर विरोधी पक्षांना ठोकून काढा म्हणून भाजप-संघ स्वयंसेवकांना जाहीर आदेश दिला आहे. पराभवामुळे ताळतंत्र सुटलेला हा संघ परिवार व भाजप आहे. त्यामुळेच ते बेताल पध्दतीने बोलू लागले आहेत. अर्थात ही मंडळी जेवढी असे बोलत सुटतील तेवढा फायदा मविआ म्हणजेच महाराष्ट्र विकास आघाडीचाच होणार आहे.

एक जुनी आठवण येथे सांगायला लागेल. विदर्भातील एक नेते दत्ता मेघे यांची ही आठवण आहे. मेघे पहिल्यांदाच लोकसभेवर निवडून आले होते तेव्हाचा हा किस्सा आहे. मेघे यांच्या महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्था आहेत. त्यामुळे दिल्लीत त्यांना अनेक आणि सर्वच पक्षांचे खासदार भेटून त्यांच्या सग्यासोयऱ्यांना, परिचितांच्या मुलांना या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी गळ घालत असत. एकदा लोकसभेचे कामकाज चालू असताना भाजपच्या आक्रमक व उग्र (तेव्हा होत्या) खासदार उमा भारती त्यांच्या आसनापाशी गेल्या. त्यावेळी उमा भारती या अयोध्या विषयामुळे चांगल्याच प्रकाशझोतात होत्या. त्यामुळे उमा भारती या मेघे यांच्याशी जाऊन बोलताना आम्ही पत्रकारांनी पत्रकार कक्षातून पाहिले. मागाहून मेघे यांना गाठून उमा भारती तुम्हाला कशासाठी भेटल्या असे विचारल्यावर त्यांनी जो किस्सा सांगितला त्याने आम्ही सर्वचजण खळाळून हसलो. उमा भारती यांनाही त्यांच्या कुणा ओळखीच्या व्यक्तीच्या मुलासाठी मेघेंच्या शिक्षणसंस्थेत प्रवेश हवा होता. त्यासाठी त्या मेघेंना सभागृहातच भेटायला गेल्या होत्या. मेघे यांनीही त्यांना प्रवेशाचे आश्वासन दिले आणि त्यांना त्यासाठी एक अट सांगितली. उमा भारती

यांना वाटले मेघे देणगीची वगैरे मागणी करतील. परंतु मेघे यांनी मिष्किलपणे त्यांना म्हटले की या प्रवेशाच्या बदल्यात तुम्हाला एक काम करावे लागेल. जेव्हाजेव्हा मी निवडणूक लढवीन तेव्हातेव्हा तुम्ही तेथे तुमच्या म्हणजे भाजपच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी या. तेथे आमच्या विरोधात वाटेल तशी भाषणे करा. कारण तुमच्या त्या प्रत्येक जहाल आणि टोकाच्या भाषणांमुळे माझ्या मताधिक्यात वाढ होत जाते आणि मला निवडणुकीत विजय मिळविणे सोपे होऊन जाते.  उमा भारती या जहाल असल्या तरी त्यांच्यातही विनोदबुध्दी होती व त्यांनीही खिलाडूपणे मेघे यांची टिप्पणी घेतली.  हा किस्सा सांगण्याचा हेतु हाच की अमित शहा, त्यांचे महाराष्ट्रातले लघुरुप फडणवीस आणि इतरही भाजपच्या छटाकांनी पवारांवर, उध्दव ठाकरे यांच्यावर बेताल टीका करीत सुटावे. यामुळे त्यांच्या मतांमध्ये वाढच होत जाणार आहे. म्हणूनच लोकसभा निवडणुकीत मराठी मतदारांनी मारलेली चपराक भाजप संघ परिवाराची मंडळी विसरली असावीत. पण त्यांनी असेच बोलत रहावे अशी अपेक्षा आम्ही यानिमित्ताने व्यक्त करतो.

अमित शहा यांच्या श्रीमुखातून विखार बाहेर आला नसता तर आम्ही देखील सार्वजनिक जीवनातील शुचिता, पावित्र्य, प्रतिष्ठितपणा, सभ्यता, सुसंस्कृतपणा सोडला नसता. परंतु अमित शहांनी तो सोडल्याने नाईलाजास्तव आम्हालाही काही गोष्टींचा जाहीर पुनरुच्चार करणे भाग पडत आहे. आम्ही आपण होऊन कधीही सभ्यतेची मर्यादा सोडलेली नव्हती. परंतु समोरच्या मंडळींनी असभ्यपणा करुन तो मुकाटपणे सहन करणारे आम्ही नाही. आम्ही फक्त आतापर्यंत जाहीर व सार्वजनिक असलेल्या विषयांचाच उल्लेख करणार आहोत. तर शरद पवार यांच्यावर आरोप करणारे हे अमित शहा कोण आहेत आणि त्यांची पार्श्वभूमि काय आहे याबद्दलची माहिती प्रथम देतो. केंद्रात म्हणजेच दिल्लीत मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालचे युपीए सरकार सत्तेत असतानाची ही आठवण यावेळी येथे लिहिण्याचा मोह आम्हाला आवरत नसल्याने ती आपल्यापुढे सादर करीत आहोत.

३० ऑक्टोबर २०१० रोजी सर्वोच्च न्यायालयाने अमित शहा यांना गुजरात सोडून तत्काळ बाहेर जाण्याचा आदेश दिला. याला तडीपार करणे म्हणतात. यावेळी अमित शहा आमदार होते. याआधी त्यांनी गुजरातचे गृहराज्यमंत्री म्हणून काम पाहिले होते. त्यांच्यात कारकिर्दीत गुजरातमध्ये विशिष्ट समूह किंवा समाजाच्या व्यक्तींच्या बनावट चकमकींच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात हत्या झाल्या होत्या असा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. यावेळी देखील सोहराबुद्दिन शेख नावाच्या व्यक्तीची बनावट चकमकीत हत्या झाल्याच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात त्यांच्या असलेल्या कथित सहभागावरुन आरोप ठेवण्यात आले होते. त्यांच्याकरवी प्रकरणाच्या तपासात ढवळाढवळ होईल आणि पुरावे देखील नष्ट करण्याचा प्रकार होऊ शकतो असा त्यांच्याविरुध्द आरोप होता. त्या प्रकरणीच सर्वोच्च न्यायालयाने त्यांना गुजरातमधून तडीपार केले होते. मंत्रीपद गमावलेले पण आमदारकी शाबूत असलेले अमित शहा तडक गुजरात सोडून दिल्लीला आले होते. त्यावेळी संसदेत आणि संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये आमदारांना प्रवेश दिला जात असे. त्यामुळे गुजरातमधून तडीपार झालेले अमित शहा हे दिल्लीत मुक्कामाला आले होते. मग ते रोज संसदेत येऊन सेंट्रल हॉलमध्ये एका कोपऱ्यात बसून रहात. तेथेच खाणेपिणे, चहापाणी घेत असत. कधीकधी त्यांच्या पत्नीही त्यांच्या सोबत असत. या काळात त्यांच्याशी सेंट्रल हॉलमध्ये कुणीही बोलत नसे. ते एकटेच कोपऱ्यात बसून रहात. दिवसभर ते सेंट्रल हॉलमध्ये बसत आणि सायंकाळी सहा वाजता हॉल बंद झाल्यावर निघून जात असत. त्यांच्या या दिनक्रमाचे अनेकजण साक्षीदार होते. २०१२ मध्ये अमित शहा यांच्यातर्फे ही तडीपारी रद्द करण्यासाठी कोर्टात अर्ज करण्यात आला होता.

सोहराबुद्दिन शेख हा एक गुंड होता. परंतु त्याचे गुजरातमधील भाजपनेत्यांशीही संबंध होते अशी माहिती या प्रकरणातून प्रकाशात आली होती. राजस्थानातील संगमरवराच्या व्यापाऱ्यांकडून प्रोटेक्शन मनीच्या नावाखाली सोहराबुद्दिनने खंडणी उकळण्यास सुरुवात केली होती. त्यासंदर्भात त्या व्यापाऱ्यांनी गुजरात पोलिसांकडे तक्रार केली होती. यानंतर सोहराबुद्दिन याच्याविरुध्द कारवाई करण्यात आली. सीबीआयने या प्रकरणाचा तपास केल्यानंतर या संगमरवराच्या व्यापाऱ्यांनी शहा यांना सोहराबुद्दिनच्या विरोधात कारवाई करण्यासाठी पैसे दिल्याचा दावा केला होता. सोहराबुद्दिन, त्याची बायको कौसरबी आणि त्याचा एक साथीदार तुलसी प्रजापति यांची एका चकमकीत हत्या करण्यात आली होती. हे प्रकरण बनावट चकमकीच्या आरोपाने वादग्रस्त ठरले होते. यापाठोपाठच इशरत जहान नावाच्या एकातरुण मुलीची देखील ती दहशतवादी असल्याच्या संशयावरुन हत्या झाली होती. या दोन्ही प्रकरणात डीजी वंजारा नावाचा पोलिस अधिकारी सहभागी होता व त्याच्या विरोधात पुरावे प्राप्त झाल्यानंतर त्याला शिक्षाही झाली होती. या बनावट चकमकींच्या वेळी वंजारा व शहा हे परस्परांच्या सतत संपर्कात होते असे पुरावेही सीबीआयने सादर केले होते. परंतु शहा यांनी हे प्रकरण राजकीय हेतुने प्रेरित असल्याचे सांगितले होते. मात्र वंजारा, तसेच राजकुमार पांडियन नावाचा आणखी एक पोलिस अधिकारी व शहा यांच्या संभाषणाच्या टेप्स सीबीआयने पुराव्यादाखल कोर्टाला सादर केलेल्या होत्या.

शहा यांना थेट गोवणारे आणखी एक प्रकरणही प्रकाशझोतात आले होते. या प्रकरणात शहा यांनी ते गृहराज्यमंत्री असताना एका तरुण महिलेवर गुप्तचरांमार्फत पाळत ठेवल्याचा आरोप होता. यासंबंधी एक स्टिंग ऑपरेशन झाले होते. त्यात शहा यांनी ही पाळत त्यांच्या साहेबांच्या सांगण्यावरुन ठेवल्याची बाब समोर आली होती. हे साहेब कोण होते हे वेगळे सांगण्याची

गरज नाही. हे प्रकरण तर शहा यांच्या अंगाशीच आले असते. परंतु शहा यांच्या सुदैवाने केंद्रात सत्ताबदल झाला आणि शहा यांच्याविरुध्दची ही प्रकरणे तत्काळ निकालात काढण्यात आली. या प्रकरणात शहा आणि त्यांच्या गृहखात्यांच्या गुप्तचरांमधील संभाषणाच्या टेप्स देखील सार्वजनिक झाल्या होत्या. या प्रकरणात शहा हे पूर्णत्वाने सामील असल्याचे हे पुरावे होते. परंतु सत्ताबदलानंतर शहांना या प्रकरणातही क्लीनचिट देण्यात आली. शहा यांच्याविरुध्दचे सोहराबुद्दिन हत्येचे प्रकरण किंवा इशरत जहान प्रकरण किंवा न्यायाधीश लोया यांच्या हत्येचे प्रकरण ही सर्व प्रकरणे गुजरातमध्ये चालू शकली नाहीत. सर्वोच्च न्यायालयानेच ही प्रकरणे गुजरातबाहेर चालवली जावीत असा आदेश दिला होता म्हणजेच गुजरातमधील भाजप राज्यकर्त्यांचा या गुन्हेगारी प्रकरणांमध्ये किती टोकाचा हस्तक्षेप होता हे यावरुन सिध्द होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरुनच सोहराबुद्दिन शेख हत्या प्रकरण मुंबईला न्यायाधीश बीएच लोया यांच्यापुढे सुनावणीसाठी वर्ग करण्यात आले होते. लोया यांनी या प्रकरणाची निःपक्षपणे सुनावणी चालू केली होती. त्यावेळी अमित शहा हे राष्ट्रीय राजकारणात येऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले होते. लोया यांनी या प्रकरणात फार गडबड करु नये यासाठी त्यांना मुंबई उच्च न्यायालयाच्याच सहकारी न्यायाधीशांनी त्यांना लाच देण्याचा प्रयत्न केला होता अशी माहितीही या प्रकरणात उघडकीस आली होती. परंतु त्याबाबत सोयीस्करपणे तपास करण्यात आला नाही. लोया यांनी सोहराबुद्दिन प्रकरणात घेतलेल्या निःपक्ष भूमिकेमुळेच त्यांचा बळी घेतला गेला असे मानले गेले आणि आजतागायत त्यांची हत्या हे एक गूढ कोडे बनून राहिले आहे. लोया हे सोहराबुद्दिन हत्या प्रकरणातील अमित शहा यांच्या भूमिकेची शहनिशा करीत होते हे येथे लक्षात ठेवावे लागेल. लोया यांच्या संशयास्पद मृत्युनंतर त्यांच्या जागी आलेल्या न्यायाधीशाने शहा यांची सुटका केली हेही येथे नमूद करणे योग्य ठरेल. लोया यांच्या कथित हत्या किंवा अकाली मृत्युप्रकरणाचे गूढ आजही कायम आहे. यासंदर्भात वरिष्ठ शोधपत्रकार निरंजन टकले यांनी मोलाची शोधपत्रकारिता करुन या प्रकरणातील अमित शहा यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारे



तडीपार गुंड देशाचा गृहमंत्री

एक पुस्तकच लिहिले आहे. यामध्ये लोया यांच्या कुटुंबियांना गप्प राहण्यासाठी कसे दबाव टाकले गेले याचे तपशीलवार वर्णन आहे. त्याचप्रमाणे लोया यांचा मृत्यु हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याची बाब कशी खोटी होती आणि त्यांच्या अंगावरील कपड्यांवर रक्ताचे डाग कसे होते याबद्दलची माहिती, त्यांच्या शवविच्छेदनाच्या अहवालातील विसंगती अशा अनेक मुद्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. लोया हे न्यायाधीश होते आणि अत्यंत संवेदनशील असे प्रकरण त्यांच्यासमोर सुनावणीसाठी होते. त्यामुळे त्यांचा अकाली झालेला मृत्यु संशयास्पद होताच परंतु हे प्रकरण ज्या पध्दतीने दाबण्यात आले ते पाहता ते दाबणारी व्यक्ती ही साधीसुधी किंवा सामान्य नसणार हे स्पष्ट झाले. कुणीतरी बडी आणि हे एवढे संवेदनशील प्रकरण दाबून टाकण्याची किंवा दडपण्याची क्षमता व ताकद असणाऱ्या उच्चपदःस्थाचेच हे काम असले पाहिजे हे टकले यांच्या पुस्तकातून स्पष्ट होते.

ही झाली अपराधी किंवा गुन्हेगारी प्रकरणे. आर्थिक गैरव्यवहारांची म्हणजेच आर्थिक भ्रष्टाचाराचीही काही प्रकरणे आहेत. गुजरातमध्ये एक बँक होती. माधवपुरा सहकारी बँक म्हणून ती प्रसिध्द होती. अमित शहा यांचा या बँकेशी निकटचा संबंध होता. या बँकेच्या संचालक मंडळावरही त्यांनी संचालक म्हणून काम पाहिलेले होते. १९६८ मध्ये ही बँक स्थापन झालेली होती आणि प्रामुख्याने व्यापाऱ्यांना सुविधा म्हणून ही बँक काम करीत असे. १९९९-२००० मध्ये या बँकेने शेअर बाजारातील दलालांना मोठमोठ्या रकमा कर्जाऊ देण्यास सुरुवात केली. हे पूर्णपणे नियमबाह्य व बेकायदेशीर होते. १५ कोटि रुपयांपर्यंत कर्ज देण्याचा नियम असताना तो डावलून बँकेने शेअर दलालांना म्हणजेच सट्टेबाजांना मोठ्या रकमा कर्जाऊ देण्यास सुरुवात केली. रिझर्व बँकेचे नियम व बंधने धाब्यावर बसवून बँकेने हे धंदे सुरु केले होते. यातच केतन पारीख नावाच्या दलाल किंवा सट्टेबाजास बँकेने १२०० कोटि रुपयांचे कर्ज दिले. या काळात शेअर बाजारातील तेजीचा फायदा या सट्टेबाजांना होत होता. परंतु २००१ मध्ये हा शेअर बाजाराचा बुडबुडा फुटला कारण कृत्रिमरीत्या शेअरबाजाराला तेजी आणणे म्हणजेच विशिष्ट कंपन्यांच्या शेअरच्या किमती वाढविणे आणि

मग त्याद्वारे पैसे कमावण्याचा धंदा त्यावेळी जोरात होता. केतन पारीखने हाच प्रकार केला. त्याच्या दुर्दैवाने २००१ मध्ये हा बुडबुडा फुटला आणि केतन पारीखही बुडाला. यामुळे त्याने जे १२०० कोटि रुपये या बँकेकडून कर्जाऊ घेतले होते तेही डुबले. बँक कंगाल झाली. या बातमीनंतर ठेवीदारांनी आपल्या ठेवी काढून घेण्यास सुरुवात केली होती. परंतु बँकेकडे पैसेच नसल्याने असंख्य ठेवीदारांचे पैसे बुडाले. अखेर या बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. सीबीआयची चौकशीही सुरु करण्यात आली आणि २०११ मध्ये रिझर्व बँकेने बँक मोडीत काढली. तिचा परवानाही रद्द केला. केतन पारीखविरुध्द खटला भरण्यात आला. या प्रकरणात केतन पारीखला जामीन मिळावा आणि त्याला या खटल्यात मदत व्हावी यासाठी पारीखने अमित शहा यांना अडीच कोटि रुपयांची लाच दिल्याचा आरोप गुजरात सीआयडीचे महासंचालक कुलदीप शर्मा यांनी एका पत्राद्वारे केला होता. हे पत्र शर्मा यांनी त्यावेळचे गुजरातचे मुख्य सचिव सुधीर मांकड यांना लिहिले होते. गिरिश दाणी नावाच्या मध्यस्थामार्फत पारीख व शहा यांच्यात हा सौदा ठरला होता. हे प्रकरण सीबीआयच्या मुंबई न्यायालयाकडे पाठविण्यात आले. याचे कारण उघड होते. गुजरातमधील पोलिस, न्याय आणि सर्वच यंत्रणा एवढ्या पोखरल्या गेल्या आहेत की तेथे न्याय होणे अशक्य झाले आहे. त्यामुळेच शहा यांची सोहराबुद्दिन संबंधीची केस देखील मुंबईलाच लोया यांच्याकडे वर्ग करण्यात आली होती. माधवपुरा बँकेने केतन पारीखच्या जामीनाविरुध्द केलेली विशेष याचिका मागे घेण्याच्या बदल्यात शहा यांना ही लाच देऊ केली गेली असे शर्मा यांचे म्हणणे होते. शहा हे या बँकेचे संचालक राहिलेले असल्याने व मोदींचे निकटवर्ति राजकीय नेते असल्याने त्यांचा सर्वत्र दबदबा होता आणि त्याचाच वापर ते करीत होते. बँकेने त्यांची याचिका मागे घेतली आणि पारीख यांचा मार्ग सुकर झाला. शर्मा यांनी गुजरातच्या मुख्य सचिवांना लिहिलेले पत्र गायब झाले. नरेंद्र मोदी त्यावेळी मुख्यमंत्री होते. या पत्रालाच मूठमाती देण्यात आल्यानंतर हे प्रकरण पुढे जाऊ शकले नाही. शर्मा यांनी बाणेदारपणा दाखविल्याने त्यांची तत्काळ बदली करण्यात आली. येथे हे लक्षात ठेवावे लागेल की हे सर्व घडत होते त्यावेळी आताचे पंतप्रधान, अवतारी पुरुष हे गुजरातचे मुख्यमंत्री होते. अमित शहा यांच्याविरुध्द चौकशा असल्याने (सोहराबुद्दिन व प्रकरणांमध्ये) ते मंत्रीपदावर नव्हते. परंतु मोदींच्या निकटतेमुळे त्यांचा विलक्षण दबदबा होता. ते जेव्हा गृहराज्यमंत्री होते तेव्हा त्यांच्याकडे सहकार खातेही होते. गुजरातमध्येही महाराष्ट्राप्रमाणेच सहकार चळवळ ही सशक्त आहे. त्यामुळेच आता केंद्र सरकारच्या पातळीवर देखील सहकार खाते निर्माण करुन अमित शहा त्याचे मंत्री झाले आहेत. शहा यांचा सहकारातील हा रस किती आहे यासाठी ही माहिती देण्यात आलेली आहे. खरेतर सहकार हा विषय राज्यांच्या अधिकारातील आहे. राज्यांच्या कक्षेतील आहे. तरीही केंद्र सरकारच्या पातळीवर हे खाते निर्माण करण्यात आले आहे. यावरुनच या मंडळींना सहकाराच्या क्षेत्रातही काय धुमाकूळ घालायचा आहे हे लक्षात यावे.

नोटबंदीच्या काळातही हे आर्थिक गैरव्यवहार झाले. नोटबंदीच्या काळात सहकारी बँकांना ५०० आणि १००० कोटि रुपयांच्या नोटा बदलून देण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता. म्हणजेच सहकारी बँकांना नोटा बदलण्याचा अधिकार नव्हता. परंतु अमित शहा संचालक असलेल्या अहमदाबाद जिल्हा सहकारी बँकेने ७४५ कोटि रुपये बदलले. तर भाजपचे एक अन्य मंत्री राडादिया प्रमुख असलेल्या राजकोट जिल्हा सहकारी बँकेने ६९३ कोटि रुपये बदलून दिले अशी माहिती निरंजन टकले यांनी त्यांच्या एका यूट्यूबवरील चित्रफितीत दिली आहे.हे सर्व बेकायदेशीर होते. परंतु सत्ताधीशांचा वरदहस्त प्राप्त झालेल्या बँकांनी मात्र सर्रास हे गैरव्यवहार केले गेले. नोटाबंदीच्या काळात नोटा बदलण्यासाठी विशिष्ट मुदत ठेवण्यात आली होती. परंतु ही मुदत उलटल्यानंतर गुजरातला जाण्याची संधी मिळाली होती. अहमदाबाद विमानतळावरुन बडोद्याला टॅक्सीने जाताना विमानतळाजवळच्याच पेट्रोलपंपावर त्याने पेट्रोल भरुन घेतले. तेव्हा पेट्रोल भरणारा कर्मचारी आणि त्या ड्रायव्हारमध्ये झालेला संवाद ऐकण्यासारखा होता. या ड्रायव्हरने त्याच्या शेठचे काही लाख रुपये बदलून हवे असल्याचे सांगितल्यावर त्या पेट्रोल कर्मचाऱ्याने आणून द्या, बदलून देतो म्हणून सांगितले. हे प्रकार सर्रासपणे चालू असल्याचे मागाहून ड्रायव्हरने सांगितले आणि गुजरातमध्ये नोटा कधीही बदलून दिल्या जाऊ शकतील असेही सांगितले. यानंतर त्याने अहमदाबाद व आसपासच्या भागातल्या जमिनींचे व्यवहार, त्या खरेदी करणारे केंद्रात बसलेले महाभाग यांची माहिती दिली. यांची चौकशी कधीकाळी झाली तर ही मंडळी थेट तुरुंगात जातील अशी टिप्पणीही त्याने केली. जमिनीवरच्या माणसाकडून मिळालेली ती माहिती अवाक करणारी होती. परंतु जेथे आग असते तेथेच धूर असतो किंवा उलटे म्हणायचे झाल्यास जेथे धूर असतो तेथे खाली आग असते. त्यामुळेच कदाचित या सामान्य ड्रायव्हरच्या बोलण्यात अतिशयोक्ति असली तरी गुजरातमधील परिस्थिती कशा प्रकारची आहे याची कल्पना येत होती. मोदी-शहा जोडगोळीचे गुजरात मॉडेल बहुधा हेच असावे. या मॉडेलमध्ये सत्याला मूठमाती दिली जाते आणि असत्य हेच सत्य असल्याचे भासवून त्याआधारे राज्यकारभार करण्याचे हे मॉडेल आहे. या मॉडेलमध्ये जनतेला बेवकूफ, व मूर्ख बनविणे, त्यासाठी कुप्रचाराचे ढोलताशे पिटणे आणि विरोधकांविरुध्द कुभांड रचणे हे प्रमुख पैलू आहेत. मात्र जनतेला फारकाळ मूर्ख बनवता येत नाही हे लोकसभेच्या ताज्या निवडणुकीवरुन स्पष्ट झाले आहे आणि त्यामुळेच मतदारांनी घायाळ केलेल्या या भाजपच्या या सर्वोच्च जोडगोळीचा तिळपापड झाला आहे आणि

म्हणून त्यांनी आता पिसाळून हे थैमान घालायला सुरुवात केली आहे. अमित शहा यांनी शरद पवारांवर जी टीका केली त्यावेळी ते एक प्रमुख गोष्ट विसरले होते की त्यांच्याच सरकारने पवार यांना देशातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण देऊन त्यांचा सन्मान केला आहे. मोदी यांनी अनेक वेळेस पवार यांचा त्यांनी अनेक वेळेस सल्ला घेतल्याचे जाहीरपणे सांगितले आहे. परंतु रागाने भान सुटलेल्या अमित शहांचा ताळतंत्र सुटला असेच म्हणावे लागेल.


पवार यांच्यावर आरोप करणाऱ्या अमित शहांना आता त्यांच्याच भाषेत हे सांगावे लागेल की अपराध व गुन्हेगारी आणि त्याच्याच बरोबरीने भ्रष्टाचाराचे मोठे सरदार तुम्ही आहात. अपराध, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार या तिन्ही गोष्टींना संस्थात्मक स्वरुप तुम्ही दिले आहेच परंतु या तिन्ही गोष्टींचे तुम्ही मूर्तिमंत प्रतीक आहात. खरोखर या देशाचे हे दुर्दैव म्हणावे लागेल की देशाची कायदा व सुव्यवस्था राखण्याची प्रमुख जबाबदारी असलेल्या गृहखात्याची जबाबदारी एकेकाळी तडीपार झालेल्या व्यक्तीच्या हाती असावी. पण याबद्दल केवळ अमित शहांना दोषी मानता येणार नाही. शहांना ही जबाबदारी देणारा अवतारी पुरुषही त्यासाठी समान प्रमाणात जबाबदार आहे. सार्वजनिक जीवनात सभ्यतेचे काही संकेत पाळले जातात. परंतु त्या संकेतांची राखरांगोळी करुन निगरगट्ट व कोडगेपणाने अशा व्यक्तींकडे महत्वाच्या जबाबदाऱ्या देण्यामागील मनोवृत्ती व प्रवृत्ती ही गुन्हेगारी स्वरुपाचीच मानावी लागेल. २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर देशाचे शिक्षणखाते ज्या व्यक्तीची शैक्षणिक पात्रता विवादास्पद आहे अशी व्यक्तीकडे देण्यामागील मनोवृत्ती देखील हीच राजकीय विकृती स्पष्ट करते. अटलबिहारी वाजपेयी यांचेही सरकार भाजपचे होते आणि त्यांच्यावेळी शिक्षणखाते हे मुरलीमनोहर जोशी यांच्याकडे देण्यात आले होते. जोशी यांच्याशी वैचारिक मतभेद असू शकतात परंतु त्यांची शैक्षणिक पात्रता किंवा विद्वत्ता ही निर्विवाद होती. विज्ञानाचे ते डॉक्टरेट होते. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या हिणकस असलेल्या व्यक्तीकडे मुद्दाम शिक्षणखाते देणे ही विकृती तर आहेच परंतु शिक्षणासारख्या मूलभूत महत्वाच्या विषय व क्षेत्राबद्दलची तुच्छता त्यातून प्रकट होताना दिसते. याचे कारण जो नेता स्वतः सुशिक्षित नसतो त्यामुळे त्याच्या मनात निर्माण झालेल्या सुमारबुध्दी व न्यूनगंडातून ही विकृती निर्माण होते हा मानसशास्त्रीय नियम आहे. त्यामुळे गुन्हेगारी व भ्रष्टाचार या दोन्ही बाबतीत ज्यांनी महारत प्राप्त केली त्यांच्याकडेच देशाच्या प्रमुख जबाबदाऱ्या देणे हेही या विकृत मनोवृत्तीशी सुसंगतच मानावे लागेल. भाजपचे केंद्रीय नेतृत्व या विकृत चाळ्यात धन्यता मानत आहे तर त्यांचे राज्याराज्यांमधले झिलकरी त्यांची री ओढत व त्यांचे भ्रष्ट अनुकरण करीत हास्यास्पद नकलाकार होत चालले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी जो मोठा आव आणून विरोधी पक्षांना ठोकून काढण्याचा जो आदेश त्यांच्या कार्यकर्त्यांना दिला आहे त्यांची प्रेरणा हे त्यांच्या पक्षाच्या सुमारबुध्दी व विकृत नेतृत्वाचीच आहे. परंतु केंद्रीय नेत्यांची नक्कल करताना ते केविलवाणे व हास्यास्पद दिसतात. असे करुन ते स्वतःच्या प्रतिमेचे हनन करीतच आहेत परंतु पक्षाच्या निवडणुकीतील संभाव्य यशावरही प्रतिकूल परिणाम करीत आहेत.

एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मदतीने विधानसभा निवडणुका जिंकणे शक्य नाही हेही भाजपला समजून चुकले आहे. परंतु आता त्यांच्यापासून सुटका करुन घेणे अवघड झाले आहे. भाजप व संघपरिवाराच्या कार्यकर्त्यांचे एकच म्हणणे आहे. ज्यांना कालपर्यंत तुही भ्रष्टाचारी म्हणून हिणवत होता त्यांनाच आज तुम्ही मते द्यायला सांगत आहात हे आमच्या गळी उतरेनासे झाले आहे आणि त्यांचा प्रचार आम्हाला शक्य नाही. पण आता शिंदे-पवारांचा बाहुपाश भाजप व फडणवीसांसाठी गळफास होऊ लागला आहे. याची जाणीव त्यांना झालेली आहे. परंतु आपण फारमोठे महाराष्ट्रातले चाणक्य असल्याचा आव आणणारे फडणवीस आता आगतिक व केविलवाणे होऊ लागले आहेत. त्यात अमित शहांसारखी मंडळी महाराष्ट्रात येऊन आणि बेताल वक्तव्ये करुन भाजपच्या अपयशाचा पाया घालत सुटली आहेत. अजित पवार हे भाजपला शरणागत असले तरी त्यांचे आमदार व कार्यकर्ते यांनी भाजपला स्वतःला समर्पित केलेले नाही. त्यामुळेच शरद पवारांबद्दल आजही आदर बाळगून असलेल्या अजित पवार गटाच्या आमदारांनी अमित शहा व भाजपला असले प्रकार सहन न करण्याचा स्पष्ट इशारा दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमित शहांचेच घनिष्ट मित्र चंद्रकांत पाटील यांनी बारामतीत जाऊन शरद पवारांना संपविण्याची व हरविण्याची भाषा केली होती. त्याचे परिणाम अजित पवारांनी ओळखले आणि त्यांनी चंद्रकांत पाटील यांना तसे न करण्यास सांगितले होते. आता चंद्रकांत पाटलांचे दिल्लीतले मित्र अमित शहा यांनी हा प्रकार केला आहे. बारामतीत काय घडले हे सर्वांना माहिती आहे. आता अमित शहांच्या बेताल बडबडीमुळे विधानसभेत काय होईल याचा अंदाज बांधायला भविष्यवेत्त्याची गरज नाही.

राजकारणात मतभेद अनिवार्य असतात. परंतु पातळी सोडून कमरेखाली वार करणे ही राजकीय संस्कृती कधीच नव्हती आणि महाराष्ट्रात तर ती कधीच नव्हती. परंतु देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे दिल्लीतले कर्तेकरविते यांनी ही विकृती महाराष्ट्रात आणली आहे. याचे एकच कारण आहे. ज्यांनी राजकारणाचे अपराध व गुन्हेगारीकरण केले व ज्यांनी भ्रष्टाचाराला पाठीशी घातले ते आज सत्ताधीश आहेत. ते सत्तेत असेपर्यंत हेच घडणार. त्यांना सत्तेवरुन घालविण्याचे काम जनताच करणार आहे.

# सरकार मधील लोकांची विधाने समाजात तेढ निर्माण करणारी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी जुलै महिन्यात राज्यात केलेल्या दौऱ्यांदरम्यान पुण्यासह विविध ठिकाणी पत्रकारांशी संवाद साधताना लोकसभेतील देदिप्यमान यश, पक्षफुटीमुळे महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणावर झालेला परिणाम, राज्यातली सामाजिक अस्थिरता, आरक्षणविषयक प्रश्नांनी जनमानसांत असलेली अस्वस्थता, नुकतीच पार पडलेली विधान परिषद निवडणूक अशा प्रश्नांना मनमोकळी उत्तरे दिली. त्याचा हा संक्षिप्त आढावा....




**शरद पवार**

**प्रश्न : राज्यातील राजकीय आणि सामाजिक अस्थिरता किती काळ सुरू  राहील?**

**शरद पवार :** नागरिकांना राज्यात बदल हवा आहे, हे राज्यात फिरताना जाणवत आहे. राजकीय अस्थिरता दूर करून राज्य चांगल्या पद्धतीने चालले पाहिजे. महाविकास आघाडी पाच वर्षे उत्तमपणे सरकार चालवून दाखवेल. महाविकास आघाडी विधानसभा निवडणुकीला नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे आणि कार्यक्रम घेऊन सामोरी जाणार आहे. लोकहिताची भूमिका मांडावी, ही आमची स्वच्छ भूमिका आहे.

लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान आक्रमकपणे देशभर फिरले. राज्यात १८ ते १९ ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या. त्यापैकी चार जागा सोडल्या, तर इतर ठिकाणी आम्हाला यश मिळाले. विधानसभा निवडणुकीतही त्यांनी महाराष्ट्रात फिरून मार्गदर्शन करावे, अशी आमची इच्छा आहे. जनता योग्य तो विचार करते.

**प्रश्न : अजित पवार यांना पक्षात परत घेतले जाईल का?**

**शरद पवार :** पक्षातून गेलेल्या अनेक जणांच्या घरवापसीची चर्चा सुरू  असली, तरी त्यांना घरात घेण्यासंदर्भातील निर्णय संघर्षाच्या काळात सोबत असणारे सहकारी आणि पक्ष घेईल. मी एकटा कोणताही निर्णय घेणार नाही.

**प्रश्न : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार वेगवेगळ्या योजना आणत आहे. त्यासंबंधी काय सांगाल?**

**शरद पवार :** प्रगतीच्या बाबतीत देशात महाराष्ट्र पहिल्या दोन-तीन राज्यांमध्ये होता. नियोजन मंडळाने जाहीर केलेल्या यादीत महाराष्ट्र अकराव्या स्थानी पोहचला आहे. ही चिंता करण्यासारखी परिस्थिती आहे. राज्यावर ८ लाख कोटींचे कर्ज आहे. महसुली तूट वाढली आहे. दरडोई उत्पन्न घटले आहे. एकेकाळचे शक्तिशाली आणि समृद्ध राज्य या महाराष्ट्राच्या लौकिकाचा जाणकारांनी फेरविचार करावा, अशी स्थिती आहे. लोकसभा निवडणुकीत लोकांनी जागा दाखविल्यामुळे त्यांना लाडकी बहीण, लाडका भाऊ आठवत आहे. राज्यकर्ते कोणी असो, राज्य आर्थिकदृष्ट्या सावरले पाहिजे. पण सरकार नवनवीन योजनांबरोबरच ९५ हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्या सादर करते हे आश्चर्याचं आहे.

**प्रश्न : विधानपरिषदेच्या निवडणुकीत नेमकं काय झालं? फसवणूक झाली का?**

**शरद पवार :** लोकसभा निवडणुकीवेळी शेतकरी कामगार पक्षाने जागा मागितल्या होत्या. पण, त्या वेळी जागा देण्याच्या स्थितीत आम्ही नव्हतो. आगामी निवडणुकीत डाव्या पक्षांचा विचार करू, असे ठरले होते. त्यानुसार विधानपरिषदेच्या निवडणुकीत आमच्या पक्षाने सर्व बारा मते देऊन शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील यांना पाठिंबा दिला. मात्र, महाविकास आघाडी म्हणून त्यांच्या उमेदवारीचा एकत्रित निर्णय झाला नव्हता. या निवडणुकीत कुणी कुणाला फसविले नाही. धोरण ठरले नसल्याने त्यांना मित्रपक्षांची मते मिळाली नाहीत.

**प्रश्न : राज ठाकरे यांनी राज्यात दहा-पंधरा वर्षांपासून जातीय तेढ निर्माण झाल्याची पोस्ट केली आहे.**

**शरद पवार :** असे बोलणे त्यांचे वैशिष्ट्य आहे. दोन-चार, आठ-दहा दिवसांनी, महिन्याने जागे झाले की ते अशी टिप्पणी करतात.

**प्रश्न : आरक्षणाच्याबाबतच्या सर्वपक्षीय बैठकीला तुम्ही आला नाही, असं सत्ताधाऱ्यांचं म्हणणं आहे.**

**शरद पवार :** सर्वपक्षीय बैठकीला मी गेलो नाही. त्याची दोन कारणे होती. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली. मनोज जरांगेंचं उपोषण सुरू होतं, तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली. त्यांचा संवाद काय झाला हे माहीत नाही. त्यानंतर उपोषण सुटलं. त्यानंतर जरांगे पाटील यांचा नवी मुंबईत एक संयुक्त कार्यक्रम पाहिला. याचा अर्थ, काही तरी त्यांच्यात संवाद होता. तो आम्हाला माहीत नव्हता. दुसरीकडं ओबीसी नेत्यांचं उपोषण सुरू होतं. तिथं राज्य सरकारचे मंत्री गेले. त्यांचं काय बोलणं झालं, माहीत नव्हतं. त्यांच्यातला सुसंवाद माहीत नव्हता. त्यामुळं मिटिंगला न जाण्याचं एकच कारण होतं, की सरकार जरांगे आणि ओबीसी नेत्यांशी बोलत आहेत. त्यानंतर नेते काही विधानं करीत आहेत. पण, संवाद काय झाला आणि प्रस्ताव काय होता हे पब्लिकला आणि आम्हाला माहीत नव्हतं. त्यामुळं जरांगे यांना सरकारनं काय आश्वासन दिलं याचं वास्तव चित्र आपल्याकडं येत नाही आणि दुसऱ्या बाजूनं ओबीसींना जी कमिटमेंट केली, त्याची माहिती येत नाही, तोपर्यंत जाऊन चर्चा करण्यात काय अर्थ नाही. त्यांनी आम्हाला माहिती दिली तरच आम्ही जाऊ शकतो असं ठरलं. त्यांनी ४०-५० लोकांना बोलावलं आणि चर्चा केली. तिथं मत मांडावं असं योग्य वाटलं नाही.

**प्रश्न : छगन भुजबळ यांनीही आरक्षणाच्या प्रश्नावर तुमची भेट घेतली.**

**शरद पवार :** आंदोलकांना सरकारकडून कोणता शब्द देण्यात आला तसेच कोणता प्रस्ताव आंदोलकांसमोर ठेवण्यात आला, याची कसलीच कल्पना विरोधकांना नाही. सरकारमधीलच काही लोकांची विधाने समाजात तेढ निर्माण करणारी होती. आता तेच लोक आज आरक्षणाबाबत विरोधकांनी भूमिका जाहीर करावी, शांतता निर्माण करण्यास मदत करावी, असे म्हणत आहेत.

**प्रश्न : लोकसभेत ज्याप्रमाणे काका-पुतण्याचा संघर्ष सुरू झाला. विधानसभेला नव्या पिढीतील काका-पुतण्याचा**

**संघर्ष दिसणार का? तसेच एकाच घरात ३ संसद सदस्य, २ विधानसभा सदस्य, त्यात एक उपमुख्यमंत्री आहेत. यावरुन टीका होते, त्याकडे तुम्ही कसं बघता**

**शरद पवार :** मतदारांनी त्याचा विचार करावा.

**प्रश्न : अजित पवार यांचे बारामतीतील विकासाचे मॉडेल राज्यात चर्चेचा विषय आहे. पण असे असतानाही बारामती लोकसभेच्या मतदारांनी त्यांना नाकारून सुप्रिया सुळे पर्यायाने तुमच्या नेतृत्वावर का विश्वास ठेवला असावा?**

**शरद पवार :** अरे, ती बारामती आहे बाबा...लोकशाही प्रक्रियेत संवाद सगळ्यात जास्त महत्त्वाचा असतो. गेल्या दोन पिढ्यांशी माझा उत्तम संवाद होता. मतदारसंघातील अनेक लोकांना मी नावानिशी ओळखत होतो. त्यातील अनेक माणसं आता हयात नाहीत. परंतु माझा बऱ्याच लोकांशी संवाद होतो. मला खात्री होती की लोक सुप्रिया सुळे यांनाच मतदान करतील.

**प्रश्न : छगन भुजबळांच्या भेटीविषयी काय सांगाल.**

**शरद पवार :** छगन भुजबळ यांची हल्ली दोन-तीन भाषणं फार चांगली झाली. मला भेटण्याच्या आधी एक दिवस ते बारामतीला गेले होते आणि बऱ्याच गोष्टी ते बोलले. त्याआधी ते बीडला गेले होते. तिथेही छगन भुजबळांनी चांगल्या प्रकारचं भाषण केलं. बीड आणि बारामती येथील दोन्हीही भाषणामध्ये त्यांनी माझ्याबद्दल प्रचंड आस्था व्यक्त केली आणि कौतुक व्यक्त केलं. बारामतीमधील त्यांच्या भाषणानंतर दुसऱ्या दिवशी ते मला भेटायला आले. मला थोडं बर वाटत नव्हतं. थोडा ताप होता म्हणून मी दोन दिवस सुट्टी काढली होती. मला झोपेतून उठवलं आणि सांगितलं की छगन भुजबळ आले आहेत. मी विचारलं की कधी आलेत, तर मला सांगण्यात आलं की एक तास झाला. मी म्हटलं एक तास? मग मला सांगितलं की ते बोलले की भेटल्याशिवाय जायचंच नाही. त्यानंतर छगन भुजबळ आले आणि मला त्यांनी काही गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले की या-या गोष्टी केल्या पाहिजेत. तरच महाराष्ट्राचं हित आहे. आता शांतता प्रस्थापित करण्यासाठी शरद पवारांची गरज आहे, असं मार्गदर्शन मला छगन भुजबळांनी केलं. ही गोष्ट नाकारता येत नाही.

**प्रश्न : सध्याच्या पत्रकारितेत बदल होत आहे का?**

**शरद पवार :** मला तुमची काळजी वाटते. दिल्लीत थंडीत प्रचंड थंडी. उन्हाळ्यात प्रचंड ऊन. काही घडलं मी दिल्लीत गेलो तर माझ्या घरासमोर ३० ते ४० कॅमेरे असतात. मला वाईट वाटतं. ते तासन्तास उभे असतात. ओझं डोक्यावर घेऊन आमच्या मागे उभं असतात. ते चित्र कसं बदलायचं हे कळत नाही. पण दक्षिणेत वेगळं चित्र आहे. तिथल्या पत्रकारांची संख्या जास्त असते. ते यातना सहन करून बातमी मिळवण्याचं काम करत असतात. काही लोक गंभीर पत्रकारिता करतात. तुम्ही सर्व्हे करतात तेव्हा तुम्ही तो गांभीर्याने केला तर त्याचा परिणाम मतदारांवर होतो. मीडियाचा आमच्या क्षेत्रात मोठा प्रभाव आहे. त्याची उपयुक्तता आहे. पण काही वेळा असं जाणवतं की, वृत्तपत्रात येणाऱ्या बातम्या किंवा लिखाण याच्या मागे कोणती तरी अदृश्य शक्ती आहे. ही अदृश्य शक्ती त्यांना लिहायला भाग पाडते. तुमच्याशी कधी तरी बोलायला संधी मिळते, तेव्हा कुठून फोन आला ते कळतं. दिल्लीत पंतप्रधान राहतात त्याचं नाव ७ रेसकोर्स असं होतं. त्या जागेशी जवळीक होती. कारण यशवंतराव चव्हाण अनेक वर्ष तिथे राहत होते. आता त्याचं नाव बदललं. लोककल्याण मार्ग ठेवलं.

पंतप्रधान निवासस्थानात आम्ही कोणी गेलो, कुणी गेलः त्या निवासात एका बंगल्यात पंतप्रधान असतात. एका बंगल्यात कुटुंबीय असतात, एका बंगल्यात १२० विभागात पेपरचे विभाग आहेत. कोणत्या पेपरमध्ये काय लिहिलंय हे बघणारी व्यवस्था आहे. ती यंत्रणा अत्यंत प्रभावी आहे. तिचा प्रभाव सरकारी गोष्ट आणि नेतृत्वावर टिकाटप्पणी झाली तर तिथं बटन दाबलं तर पेपरच्या मालकाकडे जातं. चांगलं असेल तर सांगतात आणि चांगलं नसेल तर त्यांना भूमिका सांगितली जाते. हे बदल पूर्वी नव्हते, आता झाले आहेत.

**प्रश्न : महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचे सूत्र काय असेल.**

**शरद पवार :** महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीला महाविकास आघाडी मजबुतीने सामोरे जाणार असून, काँग्रेस आणि शिवसेना नेत्यांबरोबर लवकरच बैठक घेऊन जागा वाटपाचे सूत्र ठरविले जाईल. जनतेच्या मनातील सक्षम सरकार देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्षाकडून असणाऱ्या इच्छुकांबाबत त्या त्या पक्षामध्ये चर्चा सुरू आहे. दोन-तीन आठवड्यांमध्ये आम्ही तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून जागा वाटपाबाबतचा एकत्रितपणे निर्णय घेऊ, कोणी कोणता मतदारसंघ लढवायचा? व कोणत्या घटक पक्षाला किती जागा? याबाबतचा निर्णय त्या वेळी होईल. जनतेच्या मनातील व चांगले आणि स्थिर सरकार देण्यासाठी सध्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये आम्ही फिरत आहोत. जनतेचे मत अजमावून घेत आहोत. महाविकास आघाडीमध्ये एकवाक्यता राहील, याबाबतची देखील काळजी घेत आहोत.

**प्रश्न : काही पक्षांकडून जास्त जागांची मागणी होत आहे.**

**शरद पवार :** काँग्रेस पक्षाकडून जास्त जागांची मागणी होत असली तरी कोणाची ताकद कुठे किती, हे पाहून याबाबत निर्णय होईल. लोकसभेला आम्ही दहा जागा लढविल्या आणि आठ जागांवर विजय मिळविला. आज राष्ट्रवादी काँग्रेस

महाराष्ट्रात एक नंबरला आहे. तथापि, आम्ही असा पहिला, दुसरा, तिसरा असे काही नंबर मानत नाही.

**प्रश्न : जुन्नर तसेच पुण्यात जिल्ह्यात पक्षाकडे इच्छुकांची संख्या वाढत आहे, त्याबद्दल...**

**शरद पवार :** जुन्नर तालुक्यातील कार्यकर्त्यांशी मी संवाद साधला असून, त्यांचंही मत जाणून घेतले. शिरूर लोकसभा मतदारसंघामध्ये चांगला विजय मिळाल्यामुळे साहजिकच विधानसभा इच्छुकांची संख्या अधिक आहे. आमच्यातील महाविकास आघाडीच्या प्रत्येक घटकपक्षाला वाटतेय की जागा आम्हाला मिळावी. याबाबत आम्ही सगळे एकत्र बसून योग्य निर्णय घेऊ. काही अडचण निर्माण होईल, असे मला वाटत नाही. पुणे जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादीची काँग्रेसची स्थिति चांगली असल्याने अधिकच्या जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लढेल. लोकसभा निवडणुकीला ज्यांनी आमचे काम केले ते आमचे, प्रथम त्यांचाच विचार आम्ही करणार व त्यांचे हित जोपासणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे.

**प्रश्न : आमदार अतुल बेनके आपल्याला भेटले.**

**शरद पवार :** यात नवीन काय? लोक भेटायला येत असतात. अतुलचे वडील माझे मित्र होते. माझ्या मित्राचा तो मुलगा आहे. राजकारणाचा निर्णय त्या त्या वेळेस घेऊ.

**प्रश्न : लोकसभा निवडणुकीतील यशाबद्दल...**

**शरद पवार :** लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मोदी की गॅरंटी' म्हणत सगळीकडे सभा घेतल्या, मात्र जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली. लोकसभा निवडणुकीकडे देशासह बाहेरील देशांचे देखील लक्ष लागले होते. महाराष्ट्रात मोदींनी १८ सभा घेतल्या, तेथील त्यांचे १४ उमेदवार पडले. मोदींच्या गॅरंटीची जनतेला गॅरंटी नाही. राज्यात महाविकास आघाडीचे विधानसभेच्या निवडणुकात सरकार येईल.

**प्रश्न : विधानसभेलाही यशाची खात्री आहे का.**

**शरद पवार :** लोकसभेला जनतेने आपल्याला कौल दिला असून विधानसभेलाही ते चित्र दिसणार आहे. भाजप सरकारने सत्तेचा वापर ठराविक लोकांच्या फायद्यासाठी केला. काही लोकांना त्रास देण्यासाठी सत्ता वापरली. काळ्या आईची नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांच्या विरोधात सरकारने काम केल्याने जनतेने व शेतकऱ्यांनी त्यांना त्यांची लोकसभेला जागा दाखवली. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र राज्य हातात घेऊन योग्य रस्त्यावर चालण्यासाठी काम करू, शेतकऱ्यांचे, तरुणांचे, रोजगाराचे प्रश्न सोडवू. सध्या कारखान्याचा वापर कारखान्यातील लोकांचा वापर तुमच्या विरोधात केला जात आहे, त्यामुळे सावध रहा, घराघरात जाऊन मतदारांना जागृत करा. तुम्हा सर्वांची साथ भक्कम राहू द्या. जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर तालुक्यासह राज्यातील प्रत्येक जागा जिंकायची व महाराष्ट्र राज्य देशात एक नंबर बनवण्याच्या प्रयत्न आपल्या सर्वांना करायचा आहे.

■■



**महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर**
**शरद पवार यांच्या निवासस्थानी चर्चा करताना उद्धव ठाकरे, नाना पटोले व बाळासाहेब थोरात**



# दोन वर्षांत भ्रष्टाचारात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर

जयंत पाटील

गेली दोन वर्षे भारतीय जनता पक्षप्रणित सरकार महाराष्ट्रात आल्यानंतर महाराष्ट्र सतत मागे पडत राहिलेला आहे. आपल्या सर्वांना महिती आहे, की महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा ७ लाख ८० हजार कोटी रूपयांचा आहे. त्यात यावर्षी पुन्हा १ लाख १० हजार कोटींचं वेगळं कर्ज काढायची सरकारची तयारी आहे. पण, हे महाराष्ट्रातल्या माणसावर आतापर्यंत ६५ ते ७० हजार रूपये प्रतिमाणसी कर्ज या सरकारने आता चढवून ठेवलेलं आहे. सरकारची आर्थिक परिस्थिती अतिशय दयनीय झालेली आहे. सर्वसाधारणपणानं राजकोषीय तूट ही सकल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत असायला पाहिजे. पण या सरकारने यावर्षी दोन अर्थसंकल्प आणि एक पुरवणी मागणी मांडली आणि राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या वर जाऊ नये, ती आता ४.३ टक्क्यांवर पोहोचली आहे. त्यामुळं महाराष्ट्रातली कुठलीही कमिटमेंट या सरकारला पूर्ण करता येणार नाही, अशा परिस्थितीत हे राज्य नेण्याचं काम यांनी केलंय.

राज्याच्या विकासवाढीचा दर कमी झालेला आहे आणि शेती जो आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, त्याच्यात २.६ टक्क्यांची घसरण झालेली आहे. आणि त्याचाच अर्थ महाराष्ट्र सरकारचं शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लक्ष नाहीये. पहिल्या दोन, तीन क्रमांकावर असणारा आमचा महाराष्ट्र आता जवळपास अकराव्या नंबरवर गेलाय, हे मी नाही, तर नियोजन मंडळाने आता हे आकडेवारीनं सिद्ध केलेलं आहे.

२०२४ला आपल्या राज्याला उत्तर प्रदेशपेक्षा फार कमी पैसे मिळाले. म्हणजे आपल्याला ज्यावेळी ६० हजार कोटी रूपये मिळाले, त्यावेळी उत्तर प्रदेशला १ लाख ८३ हजार कोटी रूपयांचा निधी देण्यात आला. आता हे डबल इंजिनचं सरकार म्हणतात, पण मला असं वाटतं, की हे ट्रबल इंजिनचं सरकार आहे. आज याठिकाणी महाराष्ट्र अग्रेसर होता एकेकाळी, तो यांच्या काळात अधिक मागं जाण्याची परिस्थिती यांच्या कर्तबगारीनं तयार झालेली आहे.

गेल्या दोन वर्षात शेतकऱ्यांचे किती हाल झालेत, पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत, नुकसानभरपाई वेळेत मिळत नाही, आज झालेल्या नुकसानीची भरपाई वर्षभरानं, सहा महिन्यांनी, आठ महिन्यांनी दिली जाते. आज निर्यातीचं चुकीचं धोरण केंद्रानं आखल्यामुळं महाराष्ट्रातल्या कांदा उत्पादक, संत्रा उत्पादक, केळी उत्पादक, कपास उत्पादक या सगळ्याच शेतकऱ्यांचं आतोनात नुकसान हे भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय राजवटीनं केलं आहे. योग्य हमी भाव नाहीयेत, आणि दुसऱ्या बाजूला दुधालादेखील भाव नाहीये. दुधाला भाव देण्याविषयी आमचे खासदार नीलेश लंके यांनी नगरला एक मोठं आंदोलन केलं. त्यावेळी सरकारनं वेगवेगळी आश्वासनं त्यांना दिली. पण,

त्यावरही कोणतीही उपाययोजना सरकारनं केलेली नाही.

आज महागाईमुळं शेतकऱ्यांचा खर्च वाढलेला आहे. त्यामुळं आज जी एमएसपी जाहीर करण्यात येते, त्यात शेतकऱ्याचा खर्चदेखील निघत नाही. २०२३-२४चे पीएम फसल बीमा योजनेच्या कव्हरेजमधील ४.१७ टक्क्याने घट झालेली आहे. राज्यामध्ये जानेवारी ते मे या फक्त पाच महिन्यांत महाराष्ट्रामध्ये १ हजार ७६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, हे विदारक सत्य आपल्या महाराष्ट्राला दिसतंय. आज तरूणांची परिस्थिती काय आहे, बेरोजगारी आणि उद्योगधंद्यांची परिस्थिती काय आहे? बेरोजगारी आता ११ टक्क्याच्या वर गेलेली आहे. महाराष्ट्रात १७ प्रकल्प येणार होते. ते राज्याच्या बाहेर गेले. ते जाताना राज्याच्या प्रमुख नेत्यांनी ते प्रकल्प आपल्या राज्यात राहावेत यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही. गुजरात राज्यात विशेषत: प्रकल्प गेले, तर मूग गिळून बसणारे आमचे महाराष्ट्रातले सध्याचे सत्ताधारी आहेत.

**मुंबई येथे १९ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पत्रकारांशी साधलेला संवाद**

नाही. युवक परीक्षेसाठी तयारी करतात, कष्ट करतात, गरीब घरातली मुलं प्रयत्न करतात. पेपर देतात आणि तोच पेपर फुटलेला असतो. त्यामुळं पुन्हा पेपर घेण्याचे प्रकार अलिकडे वाढलेले आहेत. या सरकारच्या काळात पेपरफुटीचे घोटाळे प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढले आणि त्यामुळं महाराष्ट्रातला युवक हा अत्यंत तणावग्रस्त परिस्थितीत आहे. १९ ते २४ या पाच वर्षांमध्ये जवळपास साडेअकरा लाख विद्यार्थ्यांच्यावर याचा दुष्परिणाम झालेला आहे. नवीन एमआयडीसी होत नाहीत, ज्या एमआयडीसी मोकळ्या आहेत, तिथं नवीन उद्योग यांना आणता आले नाहीत. प्रत्येक वेळी दावोसला जाऊन दीड लाख कोटीची गुंतवणूक आणली, चार लाख कोटीची इन्व्हेस्टमेंट आणली अशा घोषणा आम्ही सगळ्यांनी ऐकल्या. पण, इन्व्हेस्टमेंट कुठं दिसत नाही आणि दिसली तरी त्यामध्ये जो रोजगार निर्माण होणार आहे, तो रोजगार त्या प्रमाणात निर्माण होत नाही, असा अनुभव आहे. आणि म्हणून महाराष्ट्रात आज जवळपास ४० ते ४५ लाख



**'महायुतीचे काळे कारनामे' या पुस्तिकेचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे प्रकाशन करताना शेजारी सुनील गव्हाणे, डॉ. अमोल कोल्हे, वंदना चव्हाण आणि रविंद्र चव्हाण**

आज महाराष्ट्र सरकारमध्ये अडीच लाख पदं रिकामी आहेत. त्याच्यात भरतीचे काही प्रयत्न होताना दिसत नाहीत. कुठं २० हजार भरले, कुठं ८० हजार भरले अशा घोषणा आहेत. पण, प्रत्यक्ष अनुभव महाराष्ट्रातल्या तरूणांना येत

युवक बेरोजगार आहेत आणि त्यांच्या हाताला काम देण्यासाठी सरकार कोणताही प्रयत्न करत नाही.

मधल्या काळात ४२४ नमो महारोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. त्यावर कोट्यवधी रूपये उधळले.




एकेका रोजगार मेळाव्याला ५-५, ७-७ कोटी रूपये यांनी खर्च केले. आणि रोजगार किती मिळाला तर साठ. सरासरी या ४२४ नमो महारोजगार मेळाव्यात सरासरीने प्रत्येक मेळाव्यानंतर ५०-६० अशी सरासरी येते. साधारण २५ हजार लोकांना रोजगार मिळालेला आहे. त्यामुळं नवीन रोजगार निर्माण करण्याचा कोणताही ठोस प्लॅन यांच्याकडं नाही, स्टार्टअप फंडिंग ६०टक्क्याने खाली गेलेले आहे. एफडीआय इन्व्हेस्टमेंट देखील पंधरा टक्क्याने कमी झालेला आहे. आपण नेहमी म्हणतो, की महाराष्ट्रात एफडीआयमध्ये एक नंबरला महाराष्ट्र आणला. परत परत सांगायचा प्रयत्न करतो. पण, वस्तुस्थिती अशी आहे, की एफडीआयमधली गुंतवणूकदेखील पंधरा टक्क्यानं कमी झालेली आहे.

भ्रष्टाचारात तर बेसुमार वाढ झालेली आहे, हे आपण महाराष्ट्रातल्या सगळ्याच जनतेच्या लक्षात आलेलं आहे. भ्रष्टाचारात आता महाराष्ट्राचा पहिला नंबर देशात गेलेला आहे. हा परिणाम या दोन वर्षांतल्या यांच्या कामकाजानं यांनी करून दाखवलेला आहे. सहा वर्षात भ्रष्टाचाराच्या दोन तृतियांश केसेसमध्ये काहीच पुढं प्रोग्रेस झालेली नाही. अधिकारी किंवा कर्मचारी यांनी भ्रष्टाचार केला तर त्याची चौकशी करणंदेखील आता बंद झालेलं आहे. कारण, सत्ताधारी आणि अधिकारी-कर्मचारी यांची हॅन्ड अँड ग्लोव्हज् अशी परिस्थिती तयार झालेली आहे.

हल्ली महाराष्ट्रात एक म्हण सुरू झालेली आहे. भ्रष्टाचाऱ्यांचा एकच नारा, तुरूंगापेक्षा भाजप बरा. ही आज परिस्थिती आहे आणि त्यामुळं जे कोणी, आता खेडकरांच्या बाबतीत सुद्धा मी व्हॉटस्ॲपवर बघितलं, की आता त्या भाजपमध्ये गेल्यानंतर त्यांना संरक्षण मिळेल. म्हणजे एवढं जनतेच्या मनात पसरलेलं आहे, की सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना भारतीय जनता पक्ष स्वीकारतेय असा त्याचा अर्थ आहे. आणि म्हणून महाराष्ट्रात २०१४पासून आम्ही आकडेवारी काढली. पंचवीस एक नेत्यांच्यावरती आरोप केले, की ज्यांनी आरोप झाल्यानंतर पक्षांतर केलं, भाजपच्या सोबत गेले. त्यापैकी जे तिकडे गेले, त्यात २५ लोकांपैकी २३ लोकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. उदाहरणच द्यायचं झालं तर अलिकडचं लेटेस्ट उदाहरण म्हणजे खासदार रवींद्र वायकर, ज्यांनी निवडणुकीच्या काळात सांगितलं होतं, की माझ्यावर प्रचंड दबाव आला आणि मग मला तिकडं जावं लागलं. त्यामुळं लोकांना प्रश्न पडतो, की या नेत्यांच्यावरती आरोप भारतीय जनता पक्षाने केले. मग या लोकांनी भ्रष्टाचार केला नाही का? मग हे भाजपमध्ये गेल्यावर भ्रष्टाचार कॅन्सल झाला का? याचं उत्तर खरं म्हणजे भाजपनं दिलं पाहिजे. महाराष्ट्रात लोक निवडणुकीला सामोर जाण्याच्या आधी या २५ लोकांना त्यांनी

आपल्या पक्षात घेतलं, त्यांच्यावर आरोप केले, तेही त्यांनी सांगावं आणि त्यांच्यावरती काय कारवाई झाली हेही सांगावं.

महाराष्ट्रात आता मागच्या विधानसभेत आम्ही काही घोटाळे मांडण्याचा प्रयत्न केला. एक डांबर घोटाळा आहे. एक रत्नागिरी जिल्ह्यात सामंत कंस्ट्रक्शन कंपनी आहे, ही कोणाची कंपनी आहे हे मी आपल्याला सांगायला नको. एका वरिष्ठ मंत्र्यांची ही कंपनी असून, त्यात सगेसोयरे आहेत. त्या जिल्ह्यातली सगळी कामं म्हणजे सार्वजनिक बांधकाम, एमआयडीसी, नॅशनल हायवेचं जे काही काम निघेल ते या कंपनीला मिळतं आणि वापरलेल्या डांबराची एकच पावती ही या सगळ्या तीन चार वेगवेगळ्या विभागांना दिली जाते आणि डांबर वापरलं जात नाही. पण, डांबर वापरलं गेलं असं रेकॉर्ड केलं जातं. हा एक मोठा घोटाळा रत्नागिरी जिल्ह्यात सर्रास चालू आहे असं आमचं सगळ्यांचं मत आहे.

मी मेधा इंजिनिअरिंगच्या घोटाळ्याबद्दलही आज विधानसभेत विषय मांडला. मेधा इंजिनिअरिंगमध्ये दोन खनिजांचं उत्खनन केलं, तहसीलदारांनी दंड ठोठावला १०५ कोटीचा, कलेक्टरनी स्वत:कडे फाईल मागवून घेतली आणि तो दंड माफ केला. त्याच्यावर चौकशी करण्यासाठी गेले आठ महिने मी स्वत: पाठपुरावा करतोय, आयुक्त त्याच्यावर कोणती कारवाई करत नाहीत, ही कारवाई त्यांनी करावी अशी आमची अपेक्षा आहे आणि १०५ कोटीचा दंड पुन्हा ठोठवावा. पण पुणे आयुक्तांच्याकडून कोणतीही कारवाई होत नाही. कारण सगळ्यांनीच एकमेकांच्या संबंधात एकमेकाला वाचवण्याचं काम करायचं ठरलेलं दिसतंय.

देवस्थान घोटाळा मी विधानसभेत मांडला. औंध संस्थानच्या देवस्थानच्या जमिनी बळकावल्या गेल्या. हा प्रकार मी मागच्या दीड वर्षापूर्वी उघड केलेला होता. दोन महिन्यात कारवाई करू म्हणून मंत्र्यांनी सांगितलेलं. पण काही कारवाई झाली नाही. आत नागपूरमध्ये देखील, म्हणजे या सरकारनी हिंदुत्वाच्या नावाखाली सत्ता आणलेली असली, तरी महाराष्ट्रातल्या अनेक म्हणजे या औंध संस्थानचं देवस्थान जे आहे, त्याच्या जमिनी लुबाडण्याचं काम झालं, त्या वर्ग दोनच्या वर्ग एक करून प्लॉट पाडण्याचं काम झालं. नागपूरलाही असाच एक प्रकार आहे. नागपूरच्या मारूती देवस्थानची जमीन हडप करण्यात आली आणि तिथं प्लॉटिंग करून जमिनी बेकायदेशीपणाने विकण्यात आल्या. जवळपास ४०० ते ५०० कोटींचा हा घोटाळा आहे. असे अनेक जमिनीचे घोटाळे हे आम्ही सभागृहात वेळोवेळी मांडले. सार्वजनिक आरोग्य विभागातला घोटाळा अलिकडे मी मांडला. सातारा जिल्ह्यात मायणीला एक हॉस्पिटल आहे. तिथल्या भारतीय जनता पक्षाच्या आमदाराच्या ताब्यात ते आहे. तिथं मृत माणसांच्या नावानं बिलं काढण्याचं काम झालं आणि आमचं सरकार होतं, त्यावेळी राजेश टोपेंनी त्याची चौकशी केली, त्याच्यावर पुढची कारवाई करणं हे सरकार दाबण्याचं काम करतंय. त्यामुळं जवळपास पन्नास एक कोटी रूपयांचा भ्रष्टाचार आम्ही सांगूनदेखील सरकारने उत्तराच्या भाषणात त्याचा उल्लेखदेखील केला नाही.


नागपूर मेट्रो घोटाळा तर कॅगनेच काढलेला आहे. जवळपास साडेसातशे ते आठशे कोटी रूपयांचा घोटाळा आहे. यामध्ये नीट निविदा काढल्या गेल्या नाहीत, असं कॅगनं सांगितलं. आधीच बदनाम झालेल्या कंपनीला कामं दिली. पार्किंगवर मेट्रोपेक्षा जास्त खर्च झालेला दाखवलांय. आणि हा सर्व प्रकार कॅगने उघडकीला आणला. याच्यावर कोणती कारवाई सरकार करणार हे सांगण्यात आलेलं नाही. एमएसआयडीसीएल हे घोटाळ्याचं नवीन प्लॅटफॉर्म या सरकारने तयार केलेलं आहे. यामध्ये पीडब्ल्यूडीनं टेंडर काढणं, काम देणं हे आम्ही समजू शकतो. पण दोन-तीन हजार कोटी रूपयांची एमएसआयडीसीएलकडे कामे


डांबर घोटाळा


उदय सामंत

देण्यात आली आणि तिथं एकच माणूस आहे आणि दोन-तीन जणं काम करतात, ते महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या आमदार सांगतील त्याच लोकांना कामं देण्याचं काम चालू आहे. एमएसआयडीएसीएलमार्फत मोठ्या प्रमाणात इस्टिमेट कॉस्टपेक्षा जवळपास ३५ ते ४७ टक्के अधिकच्या दराने ठराविक कंपन्यांना कामं देण्यात आली, नियमबाह्य मोबलाईजरित्या ॲडव्हान्स देण्यात आला तसेच भूसंपादनाच्या अगोदर कामाचे वाटप करण्यात आले. असे वेगवेगळे प्रकार आहेत, ज्याची तपशीलवार माहिती सभागृहातदेखील मांडण्याचं काम आम्ही केलेलं आहे.


कारागृहातला सुद्धा एक घोटाळा आहे. कारागृहात जे कैदी वस्तू खरेदी करतात, त्यादेखील पुरवण्याचं काम एका विशिष्ट कंपनीला देण्यात आलेलं आहे, की ज्याच्यामुळं कारागृहातल्या वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत. वीस ते तीस रूपयांच्या वस्तू आता दीडशे ते पावणेदोनशे रूपयांना विकण्याचं काम आता कारागृहात होतंय आणि कोणतीही निविदा न काढता हे काम दिलंय. त्यात जवळपास तीनशे कोटी




रूपयांचा भ्रष्टाचार आहे.

क्राईमच्या बाबतीत देखील या सरकारनं महाराष्ट्राला एक नंबरवर नेऊन ठेवलेला आहे. एनसीआरबीच्या डेटानुसार, महाराष्ट्र दंगली घडवण्यात प्रथम क्रमांकावर आहे. मर्डरमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर रेपमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. हे आकडे बघितल्यानंतर आपल्या लक्षात येतं, की या लोकांनी कुठं महाराष्ट्र नेऊन ठेवलेला आहे. कन्व्हिक्शनचा रेट ५८ टक्के होता. आता तो ४१ टक्क्यांवर खाली आलेला आहे. बालकांवर होणाऱ्या अत्याचारातदेखील वाढ झालेली आहे. हिट ॲण्ड रनमध्ये या लोकांनी महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर नेलेलं आहे. हिट ॲण्ड रनमध्ये जे कोणी होते, ते श्रीमंतांचे होते. श्रीमंतांची पोरं सांभाळण्याचं आणि त्यांना प्रोटेक्ट करण्याचं, त्यांना तुरूंगातून बाहेर काढण्याचं काम या सरकारने मागच्या काही महिन्यांत करून दाखवलेलं आहे. महिलांच्यावर अत्याचार याच्या बाबतीतदेखील, २०१४ साली २६ हजार महिलांच्यावरती अत्याचार झालेले होते, २३मध्ये ४७ हजार महिलांवरती अत्याचार झाल्याची नोंद आहे. त्यामुळं महिलांच्या बाबतीत आज जे मोठ्या प्रमाणात मतांच्याकडं बघून हे सरकार भूमिका मांडतंय, त्या महाराष्ट्रातल्या महिला सुरक्षित नाहीत हे सिद्ध होतं.

आणि म्हणून आम्ही विकासासाठी जे निकष महत्त्वाचे असतात, त्या निकषांमध्ये आपण पहिल्या क्रमांकावर पाहिजे होतो राज्याच्या विकासासाठी. पण, मला असं दिसतंय, की ज्यात मागे क्रमांक राहिला पाहिजे होता, तिथं आपण पहिल्या क्रमांकावर आहोत आणि जिथं आपण नंबर एकला पाहिजे होतो, तिथं आपण घसरलेलो आहे. आर्थिकदृष्ट्यादेखील पूर्वी आपण शक्तीशाली राज्य म्हणून नावारूपाला आलेलो. तेही क्षेत्र आपण गमावलेलं आहे. त्यामुळं साडेसात वर्षाच्या काळात यांनी महाराष्ट्र कुठं नेऊन ठेवला हे बघण्याची वेळ आलेली आहे. आणि म्हणून महाराष्ट्र पुन्हा एक नंबरवरती आणण्यासाठी आपण काय





राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार!!



केलं पाहिजे आणि लोकांच्या, महाराष्ट्रातल्या जनतेच्या, विद्यार्थ्यांच्या, युवकांच्या, महिलांच्या, मध्यमवर्गियांच्या, या राज्यातल्या पददलितांच्या, अल्पसंख्याकांच्या, काम करणाऱ्या कष्टकरी वर्गाच्या महाराष्ट्राबद्दल काय स्वप्नं आहेत, महाराष्ट्र एक नंबरला नेण्यासाठी आपण काय केलं पाहिजे यासाठी आम्ही एक नवा उपक्रम हातात घेतलेला आहे. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र हा उपक्रम आम्ही राज्यभर राबविणार आहोत आणि आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीनं हा उपक्रम आम्ही सुरू करायचं ठरवलेलं आहे. हा उपक्रम १९ जुलैपासून सुरू होईल आणि १५ ऑगस्टपर्यंत चालेल. या अभियानाचा उद्देश, लोकांना महाराष्ट्र कसा हवा आहे किंवा सद्य परिस्थितीत महाराष्ट्रात काय बदल पाहिजेत, लोकांच्या फिडबॅकच्या आधारे आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा तयार करणार आहे आणि सत्तेत आल्यानंतर सरकारच्या माध्यमातून त्या सर्व योजना प्रभावीपणानं राबविण्याची कमिटमेंट आमची आहे.

म्हणून आम्ही आज माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र हा नवा उपक्रम महाराष्ट्रात लाँच करतोय. आम्ही महाराष्ट्रातल्या सगळ्या गोष्टी या जनतेच्या मनात काय आहे, वेगवेगळ्या वयोगटातल्या लोकांच्या अपेक्षा काय आहेत हे त्यांनी आम्हाला पुढं येऊन सांगावं यासाठी हा कार्यक्रम हातात घेतलेला आहे.

या उपक्रमाच्या निमित्तानं आज आम्ही मुद्दामहून याठिकाणी एक पुस्तक आपल्यासमोर प्रकाशित करतोय. महायुतीचे काळे कारनामे या पुस्तकाच्या माध्यमातून सरकारच्या कारनाम्यांचा फुगा फोडण्याचं काम आमची पक्ष संघटना आजपासून करेल. वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून हे पुस्तक लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याचं काम आम्ही पुढच्या काळात करणार आहोत. हे सरकार पूर्णपणानं फेल झालेलं आहे आणि घाबरलेलं सरकार वेगवेगळ्या प्रकारच्या घोषणा करत सुटलेलं आहे. भेदरल्यावर माणूस कसा करतो तशी या सरकारची अवस्था आहे. रोज सकाळी राज्याचे मुख्यमंत्री हे अनेक घोषणा करण्यात मग्न आहेत. सरकारला झोप लागत नाही. आणखीन काय केलं पाहिजे हाच विचार असतो.




कारण, लोकसभेत महाराष्ट्रातल्या जनतेनं आपला कौल दिलेला आहे आणि महाराष्ट्रातलं हे सरकार बाजूला करण्याचा निर्धार आणि संकेत लोकसभेत महाराष्ट्रातल्या जनतेनं दिलेत. त्या महाराष्ट्रातल्या जनतेचं मी मन:पूर्वक आभार मानतो.

■■




# माझ्या स्वप्नातला महाराष्ट्र स्पर्धेत सर्वांनी सहभागी व्हावे

डॉ.अमोल कोल्हे

ज्या पद्धतीनं प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेबांनी आज जे हे महायुतीचे कारनामे दाखवून दिलेत, ते पाहिल्यानंतर खरोखर प्रत्येकाला ही खात्री पटेल की ज्या पद्धतीनं केवळ दिल्लीश्वरांना खूश करण्यासाठी महाराष्ट्रातलं महायुतीचं सरकार काम करतंय आणि हे करत असताना महाराष्ट्र ज्यांचा आहे, त्या सर्वसामान्य युवकांचं, युवतींचं, महिलांचं, शेतकऱ्यांचं, कष्टकऱ्यांचं, सामान्य मध्यमवर्गियांचं नेमकं काय म्हणणं आहे, त्यांच्या स्वप्नातला हा महाराष्ट्र काय आहे हे मांडण्यासाठी माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र ही स्पर्धा आपण हे अभियान करतो आहोत आणि यामध्ये महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य जनतेला सहभागी होता येईल. केवळ दिल्लीतल्या आपल्या वरिष्ठांना खूश करण्यासाठी काही योजना राबवणं किंवा काहीही झालं तरी सत्ता हस्तगत करण्यासाठी योजना राबवणं या पलिकडं जाऊन महाराष्ट्रातल्या जनतेला काय वाटतं, त्यांच्या सरकारकडून काय अपेक्षा आहेत आणि त्या जाहीरनाम्यात येण्याच्यादृष्टिनं ही स्पर्धा आणि अभियान आपण करतो आहोत.

माझी महाराष्ट्रातल्या तमाम जनतेला ही विनंती आहे, कारण छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र रयतेचं राज्य असलेलं जे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी उभं केलं तो महाराष्ट्र आहे. असेल माझा हरी तर देईल खटल्यावरी ही गोष्ट नाकारणारा महाराष्ट्र आहे. म्हणजे दवाच्या पाण्यावरसुद्धा ज्वारीचं पीक घेणारा महाराष्ट्र जो आपण म्हणतो, तो निधड्या छातीचा आणि मजबूत मनगटाचा महाराष्ट्र आहे आणि या महाराष्ट्रातल्या जनतेच्या काय अपेक्षा आहेत हे जाणून घेण्यासाठी खरंतर माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र ही स्पर्धा आहे. माझी सर्व युवकांना, युवतींना, महाराष्ट्रातल्या तमाम जनतेला ही विनंती आहे, की आपण जास्तीत जास्त संख्येनं या स्पर्धेमध्ये सहभागी व्हा. या अभियानामध्ये सहभागी व्हा. तुमच्या काय अपेक्षा आहेत, तुमच्या स्वप्नातला महाराष्ट्र कसा असायला हवा हे महाराष्ट्रातल्या जनतेनं सांगायला हवं.

आपला महाराष्ट्र इतक्या मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असायला हवा का? आपल्या स्वप्नातला महाराष्ट्र हा इतक्या मोठ्या भ्रष्टाचाराच्या बजबजपुरीनं, हे जर काळे कारनामे पुस्तक वाचलं तर महाराष्ट्रातलं महायुतीचं सरकार कशा पद्धतीनं सर्वसामान्य करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी करतेय, कशा पद्धतीनं भ्रष्टचाराची बजबजपुरी आहे या सगळ्या गोष्टी समोर येतील. हा आपल्या स्वप्नातला महाराष्ट्र आहे का? याचं उत्तर महाराष्ट्रातली जनता नक्कीच नाही असे देईल. आणि त्यामुळं तुमच्या स्वप्नातला महाराष्ट्र कसा असायला हवा, त्या महाराष्ट्रासाठी जरूर या स्पर्धेमध्ये सहभागी व्हा.




# भविष्यातला महाराष्ट्र जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा

**सुनील गव्हाणे**

एका बाजूला महाराष्ट्रात जे विद्यमान सरकार आहे, ते कशा पद्धतीनं सरकार या राज्यामध्ये चालवतंय, आणि त्यांचे काय काळे कारनामे आहेत, हे एका बाजूला जाहीर होत असतानाच दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातल्या जनतेच्या मनात आपल्या राज्याबद्दल काय योजना आहेत, काय संकल्पना आहेत, हे कुठंतरी जाणून घेतलं पाहिजे यासाठी आज माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र हे अभियान राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातर्फे आम्ही सुरू करतोय, आणि हे अभियान दोन वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरती आम्ही घेऊन जातोय.

यासाठी एक मोबाईल क्रमांक दिलेला आहे. ७०३०१२००११ या क्रमांकावरती मिस कॉल केल्यानंतर आपल्याला एक गुगल फॉर्म येईल. हा फॉर्म भरून देता येईल. यामधून त्या व्यक्तीच्या स्वप्नातला महाराष्ट्र कसा असेल हे जाणून घेण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला या राज्यातली जी तरुण पिढी आहे, विशेषत: विद्यार्थी वर्ग आहे. त्या विद्यार्थ्यांच्या मनात काय चाललं आहे, त्यांच्या भविष्यासाठी हा महाराष्ट्र कसा पाहिजे हे जाणून घेण्यासाठी आम्ही याठिकाणी स्पर्धा जाहीर करतोय आणि या स्पर्धेच्या माध्यमातून त्यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र जाणून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. यामध्ये तीन प्रकारच्या स्पर्धा आम्ही ठेवल्या आहेत. एक रील स्पर्धा आहे आणि दुसरी पोस्टर स्पर्धा आहे. या दोन्ही स्पर्धा आम्ही ऑनलाईन स्वरूपात घेतोय. आणि तिसरी स्पर्धा ही वक्तृत्व स्पर्धा आहे, जी जिल्हास्तरावर होणार आहे. या तिन्ही स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र जाणून घेण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस येणाऱ्या काळात म्हणजे आजपासून १५ ऑगस्टपर्यंत ही स्पर्धा सबंध राज्यामध्ये होईल.

महायुतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आल्यापासून सर्वच प्रकारच्या स्पर्धापरिक्षांमध्ये जे वारंवार घोटाळे होत आहेत, त्याचा मोठा फटका विद्यार्थ्यांना बसत असून त्यांच्या आयुष्यातली महत्त्वाची वर्षे वाया चाललेली आहे. याबद्दल राज्यसरकारमधल्या मंत्र्यांना काहीही सोयरसुतक नसून त्यांचे सर्व लक्ष हाताला काही लागेल ते ओरबडून घेण्याचा आहे. सरकारमध्ये कुणाचाही कुणाला पायपोस राहिलेला नाही. प्रचंड भ्रष्टाचार सर्व खात्यांमध्ये चालू असून जनतेची कामे पैसे दिल्याशिवाय होत नाही. याचा अनुभव हा सर्वसामान्य माणूस घेतो आहे. मंत्रालयात जाणेही सामान्य माणसाला अवघड करून टाकले असून एजंट व दलालांचा मात्र प्रचंड सुळसुळाट झालेला आहे. त्यांना मंत्रालयात लगेच प्रवेश मिळतो पण जनतेला मात्र दिवसभर रांगेत उभे राहावे लागते.

■■

# सरकार वाचविण्याची हमी किंमत

**अनंत बागाईतकर**

**आजपर्यंत कोणत्याही प्रादेशिक पक्षाने केंद्रीय अर्थसंकल्पाची अशा रीतीने ओरबाडणी केली नव्हती. परंतु स्वतःला अवतारी पुरुष मानणाऱ्या नेत्याने या दोन प्रादेशिक पक्षांपुढे मात्र शरणागत होऊन त्यांना सढळ हाताने अर्थपुरवठा करुन स्वतःच्या गादीची स्थिरता सुरक्षित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला दिसतो. ही मोदी-शहा जोडगोळीची राजकीय अनिवार्यता, अपरिहार्यता म्हणजेच अगतिकता मानावी लागेल. त्यामुळे या जोडगोळीने आता कितीही शूरपणाचा व पौरुषत्वाचा आव आणला तरी तो फुसका, पोकळ आणि वांझोटा मानणे अधिक उचित ठरेल. नीतीश-नायडू या जोडगोळीपुढे मोदी-शहा जोडगोळीने नांगी टाकलेली आहे हे वास्तव आहे.**

लोकसभेच्या निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या पंगु म्हणजेच नीतीश-नायडूंच्या पाठिंब्यांच्या कुबड्यांचा आधार घेत सत्तेत आलेल्या सरकारचा पहिल्या अर्थसंकल्प सादर करण्यात आला. अपेक्षेप्रमाणे नीतीश व नायडूंनी पाठिंब्याच्या बदल्यात ज्या मागण्या त्यांच्या राज्यांसाठी केल्या होत्या त्या या अर्थसंकल्पात पूर्ण करण्यात आल्या. पाठिंब्याला हिंदीत समर्थन म्हणतात. आणि शेतकऱ्यांच्या धान्यांना सरकारतर्फे जे हमी भाव किंवा हमी किंमत दिली जाते त्याला हिंदीत ''समर्थन मूल्य'' असे म्हणतात. म्हणजेच नीतीश-नायडू या जोडगोळीने भाजपच्या मोदी-शहा जोडगोळीच्या सरकारला जो पाठिंबा म्हणजेच समर्थन दिले आहे त्याचे समर्थन मूल्य त्या दोघांनी या अर्थसंकल्पात वसूल केले असा विनोद दिल्लीच्या राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. यापूर्वीही अटलबिहारी वाजपेयी किंवा त्यांच्या नंतर आलेले मनमोहनसिंग यांचे सरकार ही आघाडीचीच सरकारे होती. त्याही पूर्वी देवेगौडा आणि गुजराल किंवा विश्वनाथ प्रतापसिंग यांचे सरकारही आघाडीचेच होते. परंतु त्यावेळी असा एकांगी आणि केवळ देशातल्या दोनच राज्यांना पूर्णपणे झुकते माप देणारा अर्थसंकल्प सादर करण्यात आला नव्हता. उलट देवेगौडा पंतप्रधान असताना पी.चिदंबरम यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा आजतागायत एक मैलाचा दगड म्हणून मानला गेलेला अर्थसंकल्प होता. ''ड्रीम बजेट'' म्हणून त्या अर्थसंकल्पाची इतिहासात नोंद झाली. ती सरकारे तर शुध्द स्वरुपातली प्रादेशिक पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेली होती परंतु त्या परिस्थितीत कुणाही प्रादेशिक पक्षाने केंद्रीय अर्थसंकल्पाची अशा रीतीने ओरबाडणी केली नव्हती. परंतु स्वतःला अवतारी पुरुष मानणाऱ्या नेत्याने या दोन प्रादेशिक पक्षांपुढे मात्र शरणागत होऊन त्यांना सढळ हाताने अर्थपुरवठा करुन स्वतःच्या गादीची स्थिरता सुरक्षित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला दिसतो. ही मोदी-शहा जोडगोळीची राजकीय अनिवार्यता, अपरिहार्यता म्हणजेच अगतिकता मानावी लागेल. त्यामुळे या जोडगोळीने आता कितीही शूरपणाचा व पौरुषत्वाचा आव आणला तरी तो फुसका, पोकळ आणि वांझोटा मानणे अधिक उचित ठरेल. नीतीश-नायडू या जोडगोळीपुढे मोदी-शहा जोडगोळीने नांगी टाकलेली आहे हे वास्तव आहे. अर्थसंकल्पात चंद्रबाबू नायडू यांच्या १६ खासदारांनी मोदी-शहा जोडगोळीच्या सरकारला दिलेल्या पाठिंब्याच्या बदल्यात आंध्र प्रदेशाच्या अमरावती या नव्या राजधानीच्या शहराच्या उभारणीसाठी १५००० (पंधरा हजार) कोटि रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राजधानीचे स्वतंत्र शहर वसविण्याची नायडू यांची महत्वाकांक्षा होती. परंतु निवडणूक हरल्याने त्यांच्या या महत्वाकांक्षी प्रकल्पात विघ्न आले. त्यांच्यानंतरचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी हा प्रकल्पच रद्द करुन टाकला

होता. आता नायडू पुन्हा मुख्यमंत्री झाल्याने त्यांनी उचल खाल्ली आणि पुन्हा हे काम सुरु केले आहे. याखेरीज विशाखापट्टणम ते चेन्नई औद्योगिक पट्टा विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने मदत जाहीर केली आहे. अतिमागास जिल्ह्यांच्या श्रेणीत प्रकाशम, रायलसीमा आणि उत्तर किनारी आंध्रसाठी विशेष आर्थिक योजना जाहीर करण्यात आली आहे. पोलावरम विद्युत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भरीव आर्थिक मदतही देण्याचे अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळेच




# अर्थसंकल्प २०२४

एवढी मदत पदरात पाडून घेतल्यानंतर नायडू यांनी हॅपी डेज आर हियर अगेन अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली. बिहारवरही अशीच मेहेरबानी करण्यात आली आहे. बिहार विकास योजनेखाली वार्षिक एक लाख कोटि रुपयांची विशेष मदत जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये गया येथे औद्योगिक केंद्राची उभारणी, द्रुतगति महामार्गांचे नवे प्रकल्प (२४ हजार कोटि रुपये) तर २४०० मेगावॅटच्या वीज प्रकल्पासाठी २२ हजार ४०० कोटि रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पूर नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी स्वतंत्र ११५०० कोटि रुपयांची विशेष मदतही देण्यात आलेली आहे. हा  तपशील पाहूनच मोदी-शहा जोडगोळीने आपले सरकार वाचविण्याची किंमत या दोन राज्यांना मोजलेली आहे. ही लूट तर आहेच परंतु देशाने स्वीकारलेल्या व राज्यघटनेने पुरस्कृत केलेल्या संघराज्य व्यवस्थेचे बारा वाजविणाऱ्या या तरतुदी आहेत. जणूकाही देशात ही दोन राज्ये सोडून इतर राज्ये नाहीत आणि त्या राज्यांनाही विकासाची गरज नसावी अशा थाटात मोदी सरकारने या दोन राज्यांचे लाड केलेले दिसतात. केवळ स्वतःची सत्ता अबाधित राहण्यासाठी पत्करलेली ही ५६ इंची शरणागति आहे. या भेदभावाची किंमत अवतारी पुरुषांना मोजावी लागणार आहे.

२०२४-२५चा अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांनी सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी काही चमकदार योजना व कार्यक्रमांची घोषणा केली. विशेषतः सुशिक्षित युवकांच्या

कौशल्यविकासासाठी ॲप्रेंटिसशिपची संधी उपलब्ध करुन देतानाच त्यापोटी त्यांना स्टायपेंड देण्याची योजना त्यांनी या अर्थसंकल्पात जाहीर केली. या योजनेनुसार पुढील पाच वर्षांच्या कालावधीत एक कोटि युवकांना (२१ ते २४ वर्षे वयोगटाच्या) पाचशे मोठ्या (टॉप) कंपन्यांमध्ये एक वर्षासाठी म्हणजेच बारा महिन्यांसाठी ॲप्रेंटिसशिपची संधी दिली जाईल. त्यांना दरमहा पाच हजार रुपयांचा स्टायपेंड दिला जाईल. यातून या युवकांना त्यांच्या क्षेत्रातील कौशल्याविकासाच्या दृष्टीने प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेणे शक्य होणार आहे. पुढील पाच वर्षात एक कोटि युवकांना या योजनेचा लाभ द्यावयाचा असेल तर दरवर्षी वीस लाख युवकांना ही संधी मिळणार आहे हे गृहीत धरावे लागेल. आता या ज्या पाचशे कंपन्या निवडण्यात येणार आहेत त्यांची या वीस लाख युवकांना सामावून घेण्याची क्षमता आहे की नाही हेही तपासून पहावे लागणार आहे. साधे सरळ गणित मांडल्यास एका कंपनीला दरवर्षी चार हजार युवकांना कौशल्यविकासासाठी कंपनीमध्ये काम द्यावे लागणार आहे. ही योजना पाच वर्षांसाठी असली तरी कितपत व्यवहार्य आहे ही बाबही ध्यानात घ्यावी लागणार आहे. त्याचप्रमाणे वर्षभरात कौशल्यसंपादनानंतर त्या युवकाच्या नोकरीच्या हमी बद्दलचे प्रश्नचिन्ह कायम राहणार आहे. म्हणजेच अग्निवीर योजनेसारखीच ही योजना आहे. युवकांना प्रत्यक्ष कंपनीमधील कामाचा अनुभव एका मर्यादित काळापुरता घेऊ द्यायचा आणि नंतर त्यांना वाऱ्यावर सोडायचे असा हा प्रकार होऊ शकतो. या योजनेचे आणखी तपशील स्पष्ट होणे आवश्यक आहे. परंतु अद्याप तरी तिच्या स्वरुपाबाबत गोंधळ दिसून येतो. थोडक्यात कौशल्य संपादनानंतर पुढे काय हा प्रश्न युवकांसमोर कायम राहणार आहे. या योजनेत बारा महिन्यांच्या ॲप्रेंटिसशिपनंतर युवकांनी करायचे काय याबाबतचा गोंधळ लवकरात लवकर दूर होणे आवश्यक आहे. तसेच पाच हजार रुपयांचा स्टायपेंड हा कायदेशीर किमान वेतनापेक्षा कमी आहे. याचा अर्थ सरकारने पूर्ण विचार न करता केवळ युवकांना लालूच दाखविण्यासाठी ही योजना प्रस्तावित केली आहे.

रोजगारनिर्मिती किंवा बेकारी निर्मूलनासाठी काही उत्तेजनपर योजना अर्थमंत्र्यांनी जाहीर केल्या आहेत. त्यांचे स्वरुपही काहीसे किचकट, क्लिष्ट व गुंतागुंतीचे आहे. यापैकी एका योजनेनुसार प्रथमच नोकरी करणाऱ्यांना वर्षाला पंधरा हजार रुपये त्यांच्या भविष्यनिर्वाहनिधीत भरले जाणार आहेत. यासाठी पगाराची मर्यादा दरमहा एक लाख रुपये ठेवण्यात आली आहे. जर या नोकरदाराची नोकरी एक वर्षाच्या आतच संपुष्टात आली तर संबंधित कंपनीकडून ही रक्कम रिफंड म्हणून द्यावी लागणार आहे. याचा जवळपास दोन कोटि नोकरदारांना (प्रथमच नोकरी करणाऱ्यांना) फायदा होईल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

दुसऱ्या योजनेनुसार अतिरिक्त रोजगारनिर्मितीला चालना देण्याच्या हेतुने नोकरदार आणि त्याची कंपनी या दोघांनाही लाभ देण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे. कंपनीच्या तीन वर्षांच्या भविष्यनिर्वाह निधी योजनेतील रेकॉर्ड तपासून ते सरकारच्या निकषात बसणारे असेल तर पुढील चार वर्षांत कर्मचारी व त्याची कंपनी यांना ८ ते २४ टक्के या प्रमाणात टप्प्याटप्प्याने आर्थिक लाभ देण्यात येईल. याचा ३० लाख युवकांना फायदा होणे अपेक्षित आहे.




तिसऱ्या योजनेत अतिरिक्त रोजगार निर्मिती करणाऱ्या कंपनीला कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाहनिधीतील काही भाग सरकारकडून परत देण्याचा प्रस्ताव आहे. ही योजना एक लाख रुपयांपर्यंत पगार असणाऱ्यांसाठी आहे. तसेच कंपनीतर्फे संबंधित कर्मचाऱ्याच्या भविष्यनिर्वाहनिधीत जो वाटा भरण्यात येतो त्यातील तीन हजार रुपयांचा वाटा सरकार त्या कंपनीला देणार आहे. यातून ५० लाख नव्या नोकऱ्यांची निर्मिती होईल असा अर्थमंत्र्यांचा दावा आहे.

अत्यंत सोप्या भाषेत या योजनांचे स्वरुप मांडण्याचा हा प्रयत्न आहे. या सर्व योजना संघटित क्षेत्रातील आहेत.

अधिकृत आकडेवारीनुसार भारतीय अर्थव्यवस्थेतील संघटित क्षेत्राची व्याप्ती वीस ते तीस टक्क्यांपर्यंतच आहे. भारतात असंघटित क्षेत्राची म्हणजेच अनौपचारिक क्षेत्राची व्याप्ती मोठी आहे आणि खऱ्या अर्थाने रोजगारांची उपलब्धता या सत्तर टक्क्यांच्या आसपास असलेल्या लघु, अतिलघु आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग व्यवसायात आहे. या क्षेत्रासाठी सरकारने अर्थसंकल्पात काही ठोस योजना प्रस्तावित केलेली आढळत नाही. मुळातच रोजगारनिर्मिती होत नसल्याने अशा अप्रत्यक्ष मार्गांनी रोजगारनिर्मिती होणार आहे काय, ते शक्य आहे काय याचा विचार झालेला दिसत नाही. तसेच केवळ संघटित क्षेत्राचाच यामध्ये विचार केलेला दिसत असल्यानेही सरकारच्या या योजनांना असलेल्या मर्यादा स्पष्ट होत आहेत. दुसरीकडे संघटित क्षेत्रातील उद्योगांमध्ये यांत्रिकीकरण आणि





ऑटोमेशन आणि आता पुढच्या टप्प्यात कृत्रिम बौध्दिकता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स)चे तंत्रज्ञान या क्षेत्रात येत असल्याने तशाही या क्षेत्रातील रोजगार संधीची उपलब्धता मर्यादित आहे आणि यापुढील काळात ती आणखी कमी होत जाणार असल्याने या बेकार युवकांना कोणत्या उद्योगांमध्ये सामावले जाणार हे भलेमोठे कोडे व प्रश्नचिन्ह आहे. रोजगार निर्मितीसाठी नवीन उद्योग, नवीन प्रकल्प आणि त्यामध्ये भांडवली गुंतवणूक करणे अपेक्षित असते. गेल्या दहा वर्षात बड्या कंपन्यांनी भांडवल गुंतवणूक करण्यामध्ये फारसा उत्साह दाखविलेला नाही. परिणामी खुद्द सरकारने रस्ते बांधणी आणि तत्सम पायाभूत प्रकल्पांमध्ये अंशतः भांडवल गुंतवणूक करुन खासगी भांडवल गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. हा प्रकार म्हणजे सरकारने प्रकल्प सुरु करायचा, तो पूर्णत्वाला नेण्यासाठी सर्व ते प्रयत्न करायचे आणि सरतेशेवटी तो खासगी भांडवलदारांच्या घशात घालायचा असा प्रकार चालू आहे. याला पीपीपी म्हणजे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप असे गोंडस नाव दिले गेले असले तरी प्रत्यक्षात सरकारने सर्व मेहनत करायची आणि नंतर तो प्रकल्प खासगी कंपनीकडे सुपुर्द करायचा असा हा प्रकार चालू आहे. रस्ते बांधणी प्रकल्पांमध्ये तर हाच प्रकार आहे. यामुळेच जेव्हा खासगी भांडवलदाराकडे प्रकल्प हस्तांतरित केल्यानंतर रस्त्यांची जी वाताहात होते त्यावेळी सरकार संबंध नसल्यासारखे वागत



राहते. यामध्ये रोजगारनिर्मिती होत नाही किंवा लोकांना चांगल्या दर्ज्याची पायाभूत सुविधाही मिळत नाही. त्यामुळेच सरकारचे रोजगारनिर्मितीचे धोरण हे सदोष किंवा वरवरच्या मलमपट्टीसारखे वाटते. बेकार युवकांना केवळ स्टायपेंड किंवा तत्सम भत्ते देऊन किती काळ गप्प ठेवणार हा प्रश्न आहे. यासाठी रोजगार निर्मितीची काही नवी क्षेत्रे धुंडाळण्याचे काम सरकारकडून अपेक्षित आहे आणि ते काम सरकार करीत नसून मलमपट्टीचे काम करीत असल्याने बेकारीच्या संकटाबाबत या अर्थसंकल्पात तरी कोणतीही ठोस योजना आढळून येत नाही असेच म्हणावे लागेल. अलीकडेच पोलिस भरती असेल, रेल्वेमध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या वेळी पदांच्या संख्येच्या दसपट, वीसपट उमेदवारांनी गर्दी केली होती आणि त्यातून भरती केंद्राच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन भरती स्थगित करावी लागली होती. कनिष्ठ पदांसाठी देखील

उच्चशिक्षित उमेदवारांनी अर्ज केल्याचे निदर्शनाला आलेले आहे. सीएमआयइ (सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकनॉमी) या अग्रगण्य आर्थिक अध्ययन संस्थेने देशातील बेकारीचे प्रमाण ९.२ टक्के असल्याचे नमूद करुन त्यात वाढ होत असल्याचे म्हटले आहे. ही स्थिती पाहता या अर्थसंकल्पात या अक्राळविक्राळ समस्येच्या निराकरणासाठी सरकारने केलेले उपाय तुटपुंजे, अपुरे व किरकोळ दिसून येत आहेत. त्या उपायांनी ही समस्या सुटणे अशक्य आहे.

महागाईच्या मुद्याबाबतही अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात जवळपास मौनच बाळगलेले आढळले. केवळ एका वाक्यात




किंवा दहा शब्दांमध्ये त्यांच्या भाषणात महागाईचा उल्लेख आहे. यावरुनच हे सरकार सामान्यजनांना रोज चटके देणाऱ्या महागाईबाबत किती असंवेदनशील किंवा संवेदनाशून्य आहे हे दिसून येते. ताज्या उपलब्ध आकडेवारीनुसार घाऊक किंमत निर्देशांक(डब्ल्यूपीआय) ३.४ टक्के तर किरकोळ किंमत निर्देशांक(सीपीआय) ५.१ टक्के आहे. परंतु अन्नधान्यखाद्य महागाई निर्देशांक ९.४ टक्के आहे. एका बाजुला सरकार जीडीपी ग्रोथ किंवा अर्थव्यवस्थेचा विकासदर ८.२ टक्के (२०२३-२४) असल्याचा दावा करीत असताना दुसऱ्या बाजुला महागाईने जनता त्रस्त कशी होते हे कोडे न उलगडणारे आहे. याचे कारण विकासदर मोजण्यासाठी वर्तमान सरकारतर्फे जी पध्दत वापरली जाते ती सदोष असल्याची टीका नामवंत अर्थतज्ञांनी केलेली आहे. त्यामुळे चुकीच्या किंवा सदोष पध्दतीने विकासदर हा आकर्षक दाखविण्याचा प्रकार केला जात असेल तर सरकारच्या त्या दाव्यावर विश्वास ठेवणे अवघड आहे अशी टीका केली जात आहे. यातही अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालाने चलनवाढ किंवा इन्फ्लेशनचा मुद्दा आणि अन्नधान्यखाद्य महागाई यांचा स्वतंत्रपणे विचार केला गेला पाहिजे अशी संकल्पना मांडली आहे. याचे कारण महागाईचा संबंध मागणी व पुरवठ्यातील तफावतीशी असतो. परंतु अर्थव्यवस्थेतील इतर निकष किंवा मापदंड हे चालना देणारे असतील तर त्या आधारे विकासदराचे मोजमाप केल्यास चित्र वेगळे आणि चांगले दिसू शकते. दुर्दैवाने या तांत्रिक अर्थशास्त्रीय चर्विचर्वणाशी जनतेला काहीही देणेघेणे नाही. त्यांना जीवनावश्यक वस्तुंची खरेदी करताना डोळ्यात पाणी येत असेल तर असल्या चर्चा त्यांच्या दृष्टीने अर्थहीन ठरतील. मागणी व पुरवठ्यातील तफावतीमुळे महागाई होते तर मग पुरवठा सुरळीत व पुरेसा राखण्यासाठी सरकारने कोणते उपाय केलेले आहेत याचा लेखाजोखा सरकारने सामान्यजनांसमोर मांडणे आवश्यक आहे. ते न करता केवळ बौध्दिक व तांत्रिक कल्पनांवर चर्चा करुन सामान्यजनांना महागाईपासून दिलासा मिळणार नाही. म्हणूनच सरकारने ज्या बेपर्वाईने महागाईच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले आहे आणि सामान्यजनांना महागाईपासून दिलासा देण्याबाबत कोणत्या उपाययोजनांचा साधा उल्लेख करण्याचे सौजन्यही दाखविलेले नाही त्याची किंमत त्यांना आगामी काळात मोजावी लागणार आहे. अर्थतज्ञ प्रा. अरुणकुमार यांच्या मते सरकारने अप्रत्यक्ष करांमध्ये कपात केल्यास महागाई कमी होऊ शकते. परंतु सरकार त्यासाठी तयार नसल्याचे दिसून येते व त्यामुळेत महागाई टिकून राहिलेली दिसते.

कृषि किंवा शेतीच्या क्षेत्राबाबत अवतारी पुरुष आणि त्यांचे सरकार हे नेहमीच उदासीन राहिले आहे. ते प्रामुख्याने उद्योगधार्जिणे आहेत. त्यामुळेच शेतीबाबतचे निर्णय करताना देखील त्याचा फायदा जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा उद्योगधंदे आणि ते चालविणाऱ्या उद्योगपतींना कसा होईल यावरच अवतारी पुरुषांचा भर राहिलेला आहे. २०१४ मध्ये हे अवतारी पुरुष सत्तारूढ झाल्यानंतर त्यांनी केलेल्या जुमलेबाजीतला एक जुमला म्हणजे २०२२ पर्यंत भारतीय शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ करण्याबद्दल होता. २०२२ पर्यंत भारतातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु अशी गगनभेदी घोषणा त्यांनी केली होती आणि प्रत्यक्षात ती देखील




जुमला ठरली, नेहमीप्रमाणेच फुसकी ठरली. या अविवेकी सरकारने गेल्या सरकारमध्ये शेतकरी व शेतीसाठी तीन कायदे संसदेचे नियम धाब्यावर बसवून मंजूर करवून घेतले होते. त्या कायद्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी अभूतपूर्व असे आंदोलन केले होते. दिल्लीला घेराओ केला होता. त्या दबावाखाली अवतारी पुरुषांना नाईलाजाने माघार घेऊन हे कायदे रद्द करावे लागले होते. परंतु हे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी ज्या मागण्या केल्या होत्या त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकारने कोणतीही पावले टाकलेली आढळत नाहीत. अन्नधान्याला दिल्या जाणाऱ्या किमान आधारभूत किमतीला (एमएसपी) कायदेशीर पाठबळ असावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती. यामुळे शेतकऱ्यांना जी किंमत मिळते ती हमखास मिळेलच परंतु कायदेशीर पाठबळ मिळाल्याने त्यात गडबड करणाऱ्यांना शिक्षा होऊ शकेल व शेतकऱ्यांची फसवणूक टाळली जाईल असा हेतु या मागणीमागे होता. सरकारने त्याबाबत कोणतेही पाऊल उचललेले आढळत नाही. मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षात शेतीक्षेत्राची सातत्याने पीछेहाट झालेली आढळते. त्यावर कोणतेही उपाय करण्यात आलेले नाहीत. कृषिक्षेत्राची वाढ २०२४ आर्थिक वर्षाअखेरीला १.४ टक्क्यांपर्यंत खाली घसरलेली आहे आणि ती आधीच्या टक्केवारीपेक्षा ३.३ टक्क्यांनी खालावलेली आहे हे नमूद करणे महत्वाचे ठरेल. कृषि संशोधन, उत्पादनवाढ यासाठी गेल्या वर्षी ९८.८ अब्ज रुपयांची तरतूद करण्यात आली होती. ताज्या अर्थसंकल्पात त्यामध्ये एक टक्क्याहूनही कमी (०.७ टक्के) वाढ करण्यात आली आहे. याचाच अर्थ सरकार कृषि क्षेत्राबाबत गंभीर नाही असे निरीक्षण शेतीतज्ञांनी नोंदविले आहे. सरकारने कृषि क्षेत्रातील सब्सिडीचे प्रमाण कमी केले आहे. २.१२ लाख कोटि रुपयांवरुन २.०५ लाख कोटिपर्यंत सब्सिडी कमी करण्यात आली आहे. परंतु तज्ञांच्या म्हणण्यानुसार याचा फायदा शेतकऱ्यांना होण्याऐवजी शेतीमाल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना अधिक झालेला दिसून येतो. म्हणजेच शेतकऱ्याची नागवणूक ही कायम राहिलेली आहे आणि याची कोणतीही दखल अर्थसंकल्पात घेतलेली आढळत नाही. २०४७पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले आहे. त्यामध्ये कृषि क्षेत्राच्या पीछेहाटीकडे दुर्लक्ष करणे






सरकारने चालू ठेवल्यास ते उद्दिष्ट प्राप्त करणे शक्य होणार नाही. या अर्थसंकल्पात कृषिक्षेत्राच्या विकासवाढीसाठी कोणतीही विशेष तसेच गेल्यावर्षीपेक्षा उल्लेखनीय अशी आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही व त्यात अक्षरशः किरकोळ व नावापुरती वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळेच कृषिक्षेत्राच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प निराशाजनक मानला जात आहे.

शिक्षणाचे क्षेत्रही महत्वाचे आहे. या क्षेत्रातही नीट परीक्षेच्या माध्यमातून सरकारने शैक्षणिक केंद्रीकरणाचा अट्टाहास चालविलेला आहे. अनेक राज्यांनी हे केंद्रीकरण बंद करुन राज्यांना या स्वरुपाची परीक्षा घेण्याची स्वायत्तता द्यावी अशी मागणी केलेली आहे. परंतु मोदी सरकारने हट्ट सोडलेला नाही. संघराज्य प्रणालीवरील हा आणखी एक आघात मानला जातो. दुसरीकडे सरकारने शिक्षणावर केलेल्या तरतुदीचा पूर्ण विनियोग केलेला आढळत नाही. गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात शिक्षणासाठी १ लाख १६ हजार ४१७ कोटि रुपयांची तरतूद होती. सरकारने त्यापैकी १ लाख ८ हजार ८७८ कोटि रुपयेच खर्च केल्याचे दिसून येते. वैद्यकीयसेवाक्षेत्रातही वेगळे चित्र नाही. हेल्थकेअर किंवा वैद्यकीयसेवाक्षेत्रासाठी गेल्या अर्थसंकल्पात ८८ हजार ९५६ कोटि रुपयांची तरतूद होती परंतु सरकारने त्यापैकी ७९ हजार २२१ कोटि रुपयेच खर्च केल्याचे निष्पन्न झाले आहे. याचाच अर्थ केलेल्या तरतुदीचा पूर्ण विनियोग करण्याची इच्छाशक्ति देखील सरकारकडे राहिलेली दिसत नाही. याचे कारण सरकारचा सर्व भर हा खासगीकरणावर आहे आणि जनसामान्यांच्या मूलभूत सेवासुविधाही खासगी हातांमध्ये सोपवून स्वतः नामानिराळे राहण्याच्या दिशेने मोदीसरकारची पावले पडत आहेत. कारण मोदींच्या विचारसरणीमध्ये सरकारचे काम केवळ नियमनाचे असले पाहिजे. हा विचार भारतासाठी घातक आहे. विशेषतः अद्याप गरीब व वंचित समाज मोठा असल्याने सरकारला स्वतःच्या जबाबदारीपासून पळता येणार नाही. दुर्दैवाने मोदी सरकार ही जबाबदारी पार पाडताना आढळत नाही.

काही तज्ज्ञांनी वित्तीय तूट किंवा राजकोषीय तुटीवर या सरकारने नियंत्रण आणण्यासाठी जी पावले उचलली त्याबद्दल



विशेष प्रशंसा केली आहे. करोनाच्या काळात वित्तीय तूट वाढलेली होती. परंतु सरकारने विविध उपाययोजना करुन ती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हे करताना काय घडत आहे याचीही माहिती घेणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेला पुरेसा उठाव नसल्याने सरकारच्या मिळकतीमध्ये चमकदार भर पडेनाशी झालेली आहे. त्यामुळे जनतेला दिलेल्या वारेमाप आश्वासनांच्या पूर्ततेसाठी कर्जे घेण्यात वाढ झालेली आहे. परंतु यामुळे राजकोषीय तूट ही वाढलेली दिसली असती. यावर उपाय म्हणून सरकारने रिझर्व बँकेच्या राखीव मुद्रासाठ्यावर डल्ला मारण्याचे धोरण अवलंबिले आहे. यासाठी रिझर्व बँकेने ते किती चलनसाठा ठेवू शकतात याबाबतचे पूर्वीचे काटेकोर नियम चक्क शिथिल केलेले आढळतात. दुसऱ्या बाजुला कर्मचाऱ्यांचे पगारही वाढण्यावर नियंत्रण आणले गेले आहे. गेल्या दहा वर्षात कर्मचारी वेतनमान जवळपास गोठलेल्या अवस्थेत आहे. यामुळेही वित्तीय तूट आटोक्यात असल्याचा भास होत असतो.




अलीकडेच रिझर्व बँकेने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी सरकारला २.११ लाख कोटि रुपयांचा लाभांश (डिव्हिडंड) देण्याबद्दलची बातमी वाचनात आली असेलच. ही विक्रमी रक्कम मानली जाते. गेल्यावर्षी रिझर्व बँकेने केवळ ८७ हजार ४१६ कोटि रुपयांचा लाभांश सरकारला दिला होता. परंतु यावेळी ही रक्कम महाकाय आहे. २.११ लाख कोटि रुपयांचा लाभांश हा जीडीपीच्या ०.६४ टक्के इतका होतो. असे यापूर्वी घडलेले नाही. यामुळे सरकारने अनुमानित केलेल्या ५.१ टक्के वित्तीय तुटीमध्ये मोठी घट होणार आहे. ज्यामुळे सरकारने वित्तीय तुटीवर नियंत्रण मिळविल्याचे चित्र निर्माण होणार आहे किंवा झालेले आहे. २०१८-१९ मध्येही मोदी सरकारला वित्तीय तूट आटोक्यात आणण्यासाठी रिझर्व बँकेची मदत हवी होती. त्यावेळी बँकेतर्फे १.७६ लाख कोटि रुपये सरकारकडे हस्तांतरित करण्यात आले होते. हा निर्णय वादग्रस्त ठरला कारण रिझर्व बँकेचे त्यावेळचे गव्हर्नर उर्जित पटेल यांनी त्यास विरोध केला होता आणि अखेर त्यांनी या मुद्यावरुनच गव्हर्नरपदाचा राजीनामाही दिला होता. त्यानंतरच पात्रता नसताना शक्तिकांत दास या नोकरशहांना गव्हर्नरपदी नेमण्यात आले. हे मोदी सरकारच्या विशेष मर्जीतले मानले जातात. सरकारला अशा महाकाय रकमा लाभांशापोटी देण्याचा परिणाम काय होऊ शकतो या प्रश्नावर तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की यामुळे रिझर्व बँकेतर्फे ज्या बँकांना अर्थपुरवठा केला जातो त्यावर ताण येईल. परिणामी बँकांना ठेवी आकर्षित करण्यासाठी व्याजदर वाढवावे लागतील आणि मग पुन्हा कर्जाचेही व्याजदर वाढल्याने गुंतवणूकदारांसाठी ती बाब अडचणीची ठरुन गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम होईल. यातूनच अर्थव्यवस्थेला गुंतवणुकीच्या माध्यमातून जी चालना मिळत असते ती मिळणार नाही. म्हणजेच मंदगतीच्या चक्रात अर्थव्यवस्था पुन्हा अडकून पडू शकते.

अर्थसंकल्पाचे असे अनेक पैलू आहेत जे जनसामान्यांच्या जीवनमानावर परिणाम करणारे आहेत. त्यातील काही प्रमुख मुद्यांचा आढावा असला तरी यावरुन सरकारच्या मनोवृत्तीवर प्रकाश पडतो. हे सरकार केवळ सत्तेत राहण्यासाठी आवश्यक अशा आर्थिक तडजोडी करीत सुटले आहे. जोपर्यंत सत्तेत रहायचे तोपर्यंत तग धरण्याची ही धडपड आहे. परंतु जेव्हा या समस्या अक्राळविक्राळ स्वरुप धारण करतील तेव्हा हे सरकार तर मोडीत निघेलच परंतु देशाची व अर्थव्यवस्थेची अपरिमित हानि होणार आहे. यापूर्वी कोणत्याही सरकारने किंवा पंतप्रधानाने असा पक्षपाती व भेदभावपूर्ण अर्थसंकल्प सादर केलेला नव्हता. या अर्थसंकल्पाने समाजात असंतोष निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही कारण जनसामान्य ज्या समस्यांनी होरपळले जात आहेत त्यावर या अर्थसंकल्पात कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही. महाराष्ट्र व इतर राज्यांना काहीतरी भरपूर मदत देऊ केल्याचा दावा सत्ताधाऱ्यांनी केलेली असला तरी तो हवेतला आहे. पुढील पाच वर्षात सरकार काय करु इच्छिते याचा निव्वळ प्रस्ताव सांगून महाराष्ट्राचे तोंड बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु जनता वेडी नाही. प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थितीत फरक पडत नसल्याचे पाहिल्यानंतर जनता आक्रमक झाल्याखेरीज राहणार नाही.

■■

**प्रश्न : सुप्रियाताई, आपण राजकारणात जावं, राजकारण करावं याच्याबद्दल पवार साहेबांना तुम्ही फॉर्मल कधी विचारलं होतं का?**

**सुप्रिया सुळे :** माझे आई आणि वडील पूर्ण अपोझिट आहेत. म्हणजे माझ्या आईला राजकारण अजिबातच आवडत नाही आणि माझ्या वडिलांनी फक्त राजकारण आवडतं. त्याच्यामुळे मी माझं पूर्ण आयुष्य विरोधाभासात जगले आहे. म्हणजे तुम्हाला जर वाटत असेल, की आमच्या डायनिंग टेबलवर बाबा असे सांगत असतील की खासदारकी कशी लढायची, आमदारकी कशी लढायची असं केलं असतं तर माझ्या आईने हातातला चमचा काढून घेतला असता. त्यामुळं आमच्या डायनिंग टेबलवर कधीच राजकारणाची चर्चा होत नाही. बाळकडू वगैरे कॉन्सेप्ट आमच्या घराला लागू होत नाही. त्यामुळं लोक जेव्हा आमच्याबद्दल असं बोलतात, तेव्हा त्यांना कौतुक वाटत असतं, की आम्ही डायनिंग टेबलवर काय बोलतो, आता राज्य कसं आणायचं, निवडणूक कशी लढायची, कारखाना कसा लढायचा, जिल्हा परिषद, पंचायत समिती कशी लढायची, असं काही नसतं हो.

**प्रश्न : मग गप्पा काय होतात. विषय काय असतात.**

**सुप्रिया सुळे :** एकतर ते ऐकतात आणि मी बोलते.

**शरद पवार :** काहीही असू शकतं. हिच्या वाचनात काय आलं किंवा माझ्या वाचनात काय आलं, त्यासंबंधी चर्चा होऊ शकते.

**सुप्रिया सुळे :** एकतर बाबा खूप लवकर उठतात. ते सहा-साडेसहाला उठतात. मी सात वाजता उठते. दिवसातलं पहिलं संभाषण, आम्ही काही भेटल्यानंतर लगेच गुड मॉर्निंग वगैरे काही म्हणत नाही, पण पहिलं संभाषण असतं, तोपर्यंत बाबांचा पहिला पेपर वाचून झालेला असतो. त्याच्यामुळं त्यांच्या इथं गेल्यानंतर तो पेपर माझ्या हातात देतात. आणि मग दोन-तीन पत्रकार असे आहेत, ज्यांना आम्ही दररोज फॉलो करतो. त्यामुळं जर मी वाचून गेलेले असेन त्यांच्या खोलीत, तर पटकन त्या अग्रलेखाची चर्चा. साधारणपणे सकाळची जी आमची भेट होते रोज, म्हणजे जेव्हा केव्हा भेटतो, म्हणजे नगरला, कोल्हापूरला किंवा दिल्लीला असलो तरी तसंच, कुठंही असलो तरी वर्तमानपत्र हा आमचा दोघांचा सकाळचा कनेक्टिंग पॉईंट आहे.

**प्रश्न : आई म्हणजे राजकारण नको आणि बाबा म्हणतात राजकारण, मग तुमचं कन्व्हिक्शन कसं, कोणत्या बाजूला जाता.**

**सुप्रिया सुळे :** सकाळचा काही विषयच नसतो. कारण,



# गप्प बसण्यात ताकद हे बाबांकडून शिकले

सुप्रिया सुळे

**एबीपी माझा या वृत्तवाहिनीने २७ जुलै रोजी माझा महाकट्टा या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि त्यांची कन्या तसेच पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची घेतलेली मुलाखत प्रत्येक बाप–लेकीसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. राजकारणाच्या पलिकडं नातं उलगडणाऱ्या या मुलाखतीचा हा वृत्तांत...**

# अस्वस्थ वाटलं की पुस्तकं वाचतो

**शरद पवार**

सकाळचे पहिले तीन तास माझ्या आईला बोललेलंच आवडत नाही. त्याच्यामुळं ७ ते १० आम्ही दोघंच बोलतो. त्यात आईचा काही रोल नसतो. त्यामुळे सकाळी पटकन आम्ही आमचं राजकारण उरकून घेतो.


**प्रश्न : वर्तमानपत्रांमध्ये सामना असतो का.**

**सुप्रिया सुळे :** आम्ही सगळी वर्तमानपत्रे वाचतो. पण, आमच्या दोघांचं एक मराठी वर्तमानपत्र कॉमन आहे.

**शरद पवार :** हल्ली अग्रलेखात फारसं लक्ष द्यावं असं वाटत नाही. त्याचं कारण, माझ्या आयुष्यातला एक काळ असा येऊन गेला, की द्वा. भ. कर्णिक, गोविंद तळवलकर, पां. वा. गाडगीळ, म्हणजे काही घडलं, की आज गोविंदरावांनी काय लिहिलं हे वाचण्याची उत्सुकता असायची.

**प्रश्न : एक काळ असा होता ९०च्या दशकातला, की तेव्हा गोविंदराव सातत्यानं तुमच्या विरोधात लिहित राहिले. मुद्दा काहीही असला तरी शेवटी ते तुमच्यावर टीका करायचे. त्यावेळी कुटुंबामध्ये त्याला कसं घेतलं जात होतं.**

**शरद पवार :** काही नाही. त्यांच्याबद्दलची आस्था, औत्सुक्य जे कुटुंबाप्रमाणं होतं, ते शेवटपर्यंत राहिलं. हे खरं आहे, की त्यांनी माझ्यावर प्रेमदेखील केलं आणि मला धरून ठोकता येईल तेवढं जास्तीत जास्त ठोकलं सुद्धा. पण,



त्याशिवाय अन्य विषयांवरचं त्यांचं लिखाण हे नक्की वाचनीय असायचं आणि त्याचं एक समाधान असायचं. त्यामुळं त्यांनी कधी काही लिहिलं, तरी त्याची फारशी चिंता कधी असायची नाही.

**प्रश्न : सुप्रियाताई, तुम्ही त्यावेळी तरूण होता आणि अशी टीका झाल्यानंतर तुम्हाला कधी राग यायचा का.**

**सुप्रिया सुळे :** माझं बरंचसं आयुष्य तसंच गेलं. पण मला वाटतं, की त्याचं थोडंसं क्रेडिट माझ्या आईला पण गेलं पाहिजे, की आपल्या वडिलांवरती टीका केली आहे म्हणून आपण काय त्याचं वाईट वाटून घ्यायचं नाही. कारण आपले वडील पब्लिक फिगर आहेत. त्यामुळं चांगलं आणि वाईट दोन्ही लोकं देत राहणार. आणि तेव्हा सोशल मीडिया वगैरे नव्हतं. त्यामुळं एवढा इम्पॅक्ट नसायचा. सकाळी एक पेपर वाचला, की तो विषय संपायचा. दिवसभर हॅमर होत राहायचं नाही, की असं असं झालं. त्यामुळं तो काळ वेगळा होता. ठीक आहे, एक छोटी गोष्ट झाली, झाली. पुढं जायचं. मला असं वाटतं, त्याकाळी समाजही वेगळा होता. शाळा-कॉलेजमध्ये आत्ता जशा कमेंट्स येतात पटकन, तसं काहीच नव्हतं.



**प्रश्न : साहेब, आता तुम्हाला एकच मुलगी आणि ज्यावेळी असं एकच मूल असतं, तेव्हा त्यावेळी आई आणि बाप या दोघांच्याही सगळ्या इच्छा, आकांक्षा त्या मुलावरती केंद्रीत होतात. मग तुमची मुलगी दहाव्या वर्षी जेव्हा वादविवाद करत होती, त्यावेळी तिनं वकील व्हावं, आयपीएस किंवा आयएएस व्हावं, असं तुम्हाला काय वाटत होतं, की काय व्हावं आपल्या मुलीनं.**

**शरद पवार :** तिला जे हवं आहे, तिला जे आवडतं ते तिनं करावं असं आम्हाला वाटत होतं. आपल्या मुलीनं काहीतरी व्हावं असं कधी वाटलं नाही आणि तिनं वाटूनही दिलं नाही.

**सुप्रिया सुळे :** ते अगदी खरं बोलतायंत. कालच मी माझ्या बजेटच्या भाषणाची तयारी करीत होते. आईला म्हटलं, की मी एवढा अभ्यास केला असता तर आज मी हॉवर्डला असते. ती म्हणाली, की जेव्हा करायचा होता, तेव्हा केला नाही आणि आता डबल अभ्यास चाललांय. मग मी म्हटलं, की तू का नाही सांगितलंस. मी प्रयत्न केले. पण नाही होत. म्हणजे आई-वडील इतके मॅटर ऑफ लाईट आहेत, की मला वाटतं, की मराठी कुटुंब असंच असतं. असा माझा समज आहे. म्हणजे भाषण केल्यानंतर जर चूक काढली नाही, तर समजायचं की भाषण चांगलं झालं. कधीही माझ्या आई-वडिलांनी सांगितलं नाही, की आजचं भाषण ना चांगलं झालं. असं मी कधीच इतक्या वर्षात ऐकलं नाही. चूक झाली तर एक पाय घरात आणि दुसरा गाडीत असला तरी पटकन, तो शब्द चुकला. अरे, आत तर येऊ दे घरात. आल्या आल्या लगेच सुरू.

**प्रश्न : साहेबांचा ओरडा पहिला कधी खाल्ला होता आणि कोणत्या कारणासाठी.**

**सुप्रिया सुळे :** नाही, नाही. बाबा नाहीत ओरडत. हे सगळं डिपार्टमेंट आमच्या आईकडे आहे. आई ओरडायचीच आणि तिचे हातही चालायचे. तिथे काय सायकॉलॉजी वगैरे काही नव्हतं. म्हणजे मुलांच्या कलेकलेने घ्या, पण तिथं कला वगैरे काही नव्हती. रट्टा बसायचा व्यवस्थित. बाबा घरात असतील तर वाचवायला येतील. पण बाबा घरी कुठे असायचे.

**प्रश्न : बाबा जर २४ तास राजकारणी असतील, तर तुम्ही किती तास राजकारणी असता.**

**सुप्रिया सुळे :** आता मी पण बाबांसारखीच झालेय. आता फूल टाईम. आता नो चॉईस.

**प्रश्न : तुमच्या बाबतीत जे आई-वडिलांनी वाढविण्यासाठी केलं, तोच फॉर्म्युला तुम्ही रेवती आणि विजयसाठी लागू करता का.**

**सुप्रिया सुळे :** नक्कीच नाही. म्हणजे माझ्या आई वडिलांच्या माझ्याकडून काही अपेक्षाच नाहीयेत जन्मापासून. मी आईला विचारलं, म्हणजे ती तुम्हाला गंमत म्हणून एक गोष्ट सांगते,

एकदा मी म्हणाले होते, की जर मी अभ्यास केला असता तर असं असं झालं असतं. ते म्हणाले, की हे बघ जेवढी बुद्धिमत्ता असते ना, तेवढंच माणूस जातो. म्हटलं, ठीक आहे म्हणजे आपली बुद्धिमत्ता तेवढीच आहे. तो विषय संपला. पण ती गोष्ट माझ्या मनात राहिली. आमच्याकडं काय सायकॉलॉजी वगैरे काही नसतं, म्हणजे मुलीला वाईट वाटलं असेल वगैरे. म्हणजे त्यांनाही वाटलं नाही आणि मलाही वाटलं नाही. त्याच्यानंतर अनेक वर्षे गेली आणि एकदा पार्लमेंटमध्ये माझा नंबर पहिला आला. मी घरी येऊन हे सांगितलं, तर म्हणाले, की अर्थातच मुलगी कुणाची आहे. म्हणजे मग मी हुशार आहे की नाही, याचं उत्तर ज्यावेळी विचारलं तेव्हा त्यांनी काही उत्तरच दिलं नाही.



**प्रश्न : मग आता काय वाटतं, आहेत की नाहीत हुशार, आता तर तुमचं मन कौतुकानं, समाधानानं भरून येत असेल ना.**

**शरद पवार :** मन बीन काय भरून येत नाही. पण, हे खरं आहे, की आस्था असलेल्या विषयात ती सखोल जाते आणि त्याची जास्तीत जास्त माहिती घेऊन त्याची मांडणी संसदेत करते, त्याचा आनंद आहे.

**प्रश्न : आता इतक्या वेळा संसदरत्न झाल्यानंतर त्या अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात.**

**शरद पवार :** नाही, अजिबात नाही. दोन्ही बाजूंनी नाही.

**सुप्रिया सुळे :** म्हणजे मी आणि ते दोघेही नाही.

**प्रश्न : रेवती आणि विजयकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत. त्यांनी काय व्हावं असं तुम्हाला वाटतं आणि पवार साहेबांचाही त्याच्यामध्ये रोल असतो का.**

**सुप्रिया सुळे :** ते अतिशय उत्कृष्ट आजोबा आहेत. म्हणजे माझी मुलगी जर कुठून फिरणार असेल, तर माझ्यापेक्षा त्यांना लोकेशन जास्त माहिती असते. म्हणजे रेवतीची फ्लाईट किती वाजता लँड होणार आहे, गाडी गेली की नाही, ती समजा दिल्लीला गेली तर दिल्लीचा फेअर काय आहे, ते पण त्यांना माहिती असतं. नातवांनी काय व्हावं याच्याबद्दल त्यांच्या काही अपेक्षा नाहीत. पण ते गाईड करतात. म्हणजे रेवती लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला गेली. मग ते तिच्याशी बोलतील, की तुला काय करायचंय. विजयला सुद्धा गाईड करतात. ते असं कधीच सांगत नाहीत, की माझी इच्छा आहे, की तुम्ही हे करावं. ते स्वत:चं स्वत: जगतात.

**प्रश्न : आपले वडील शरद पवार आहेत याचा अभिमान वाटावा असे अनेक प्रसंग तुमच्या आयुष्यात सातत्याने आले असतील. पण, साहेब असं केव्हा झालं, की सुप्रिया ही माझी मुलगी आहे हे अभिमानानं सांगावं असा पहिला प्रसंग केव्हा आला आयुष्यात.**

**शरद पवार :** जेव्हा पार्लमेंटमध्ये रेकिग्नेशन मिळतं, नॅशनल लेव्हलला, विशेष कॉन्ट्रिब्यूशन असलेल्यांनाच ते मिळतं, जेव्हा ते मिळतं तेव्हा नक्कीच मानसिक समाधान मिळतं.

**प्रश्न : पहिलं भाषण केव्हा केलं होतं.**

**सुप्रिया सुळे :** अठरा वर्षांपूर्वी प्रेसिडेन्सियल ॲड्रेस. भाषण करायला जाताना ते काय मदत करीत नाहीत आणि मी सुद्धा विचारायला जात नाही.

**प्रश्न : बाबांचा कोणता गुण तुम्हाला जास्त भावतो.**

**सुप्रिया सुळे :** कमी बोलणे. म्हणजे मोजकं बोलणं.

**प्रश्न :** आपले वडील राजकारणात आहेत किंवा मुख्यमंत्री आहेत याबाबतची पहिली आठवण कोणती.

**सुप्रिया सुळे :** माझं लग्न झाल्यावरच मला कळलं, की ते कोण आहेत. कारण का, तर मुंबईमध्ये आपले वडील मुख्यमंत्री आहेत, याचा एकतर एवढा गाजावाजा नव्हता. सिक्युरिटी नाही काही नाही. मुंबई खूप नॉर्मल आहे. माझ्या फ्रेंड्स् सर्कलनीच मला सोडून दिलं असतं, जर आजच्यासारखं वातावरण असतं तर. आमच्या जनरेशनमध्ये हे सगळं नव्हतं. शाळेनंही मला कधीच जाणवू दिलं नाही. पेरेंट-टिचर मिटिंगला आले तरी ते लाईनीत उभे राहणार, कधी आमचा कॉन्सर्ट असेल तरी मागे बसणार. मुख्यमंत्री आहेत म्हणून कधीही त्यांना पहिल्या रांगेत


बसवले नाही. त्यामुळे त्या शाळेला क्रेडिट. म्हणजे शाळेनं आमच्यासाठी काहीतरी वेगळं वगैरे केलं असं कधीच नाही. म्हणजे त्या शाळेचं, शिक्षकांचं, विल्सन इन्स्टिट्यूटचं क्रेडिट आहे.

**प्रश्न : सुप्रियाताईंच्या लग्नात तुमची काय भूमिका होती.**

**सुप्रिया सुळे :** त्यांचा झिरो रोल होता. माझी आई आणि बाळासाहेब ठाकरेंचा जास्त रोल असेल बाबांपेक्षा.

**शरद पवार :** तिच्या लग्नात प्रॅक्टिकली काही रोल नव्हता. आमच्या काही जवळच्या मित्रांनी सजेस्ट केलं. मग त्यात बाळासाहेब ठाकरे असतील किंवा माधव आपटे असतील, माधव आपटे म्हणजे उद्योजक, तर या दोघांनी हे सजेस्ट केलं. त्याचं कारण कदाचित माझ्या जावयांचे वडील आणि ते मित्र होते. मित्रांनी सजेशन केलं. मग हे दोघे भेटले आणि ठरवलं. साधारणत: जवळचे लोक सुचवतील तो जावई.







**प्रश्न : घरात नातवंडांना तुम्ही गाईड करताच, पण त्यांना राजकारणाचंही तुम्ही कशा पद्धतीनं मार्गदर्शन करता.**

**शरद पवार :** असं आहे, की त्यांना इंटरेस्ट असला तरच तो विषय निघेल. बऱ्याचदा त्यांना या सगळ्या राजकीय गोष्टींमध्ये अजिबात इंटरेस्ट नाही. त्यांच्या इंटरेस्टची क्षेत्रं वेगळी आहेत.



**प्रश्न : दिवाळीत चार दिवस पवार कुटुंबीय एकत्र जमतं. त्यावेळी काय चर्चा होते आणि त्यामध्ये सुप्रियाताई असतात का.**

**शरद पवार :** नाही सगळे असतात. त्याच्यात वर्गवारी आहे. यंगस्टर्सचा साधारण चौदा, पंधरा, सोळा या वयातील, त्यांचा एक वेगळा ग्रुप असतो. त्यांचं वेगळं जाणं-येणं, गप्पा-गोष्टी, त्यांचे कार्यक्रम वेगळे. आमची सीनिअर जनरेशन जी आहे, ती नवीन काही करायचं का किंवा तुम्ही काही करताय का. कशात काही सुधारणा करायची गरज आहे का अशा विषयांवर चर्चा होत असते.

**सुप्रिया सुळे :** तुम्हाला आश्चर्य वाटेल, यामध्ये बाबा आणि आई फुलटाईम आजी-आजोबा असतात. मला माझ्या मुलांच्या आयुष्यात काय चाललंय हे माहिती नसतं, पण त्यांना माहिती असतं. ते त्यांच्या नातीशी रोज म्हणजे रोज बोलतात. तिला माहिती असतं, की आज आजोबा कुठे आहेत.

**प्रश्न : प्रत्येक वडिलांना मुलीच्या हाताचा एखादा पदार्थ आवडत असतो आणि तो तिनेच बनवावा अशी त्यांची इच्छा असते. तुमचा असा कोणता पदार्थ आहे जो त्यांना आवडतो.**

**शरद पवार :** मी तर कधी ऐकलेलं नाही.

**सुप्रिया सुळे :** काही पदार्थ करायला येत होते. पण आता नाही येत. म्हणजे आता संबंधच नाही येत. चंद्रकांतदादा माझ्याबद्दल बोलले होते, की इथं काय करताय, घरी जा आणि स्वयंपाक करा. मी घरी गेल्यावर सर्वजण बसले होते. माझा मुलगा म्हणतो, की मला चंद्रकांतदादांचा नंबर पाहिजे. म्हटलं, कशासाठी? तर म्हणाला, की मला त्यांना फोन करायचांय, मी त्यांना सांगणार आहे, की अहो आमच्या आईला स्वयंपाक येत नाही, दुसरं काहीतरी सजेस्ट करा. आमच्या घरात असं वातावरण आहे. त्यामुळं एवढं कुणी फार मनाला लाऊन घेत नाही.

**प्रश्न : पवार साहेब, गेल्या सहा दशकापासून तुमचं आणि महाराष्ट्राचं एक वेगळं नातं आहे. आज समाजात जे काही सुरू आहे, म्हणजे मतं मिळतात, पण मनं दुभंगतात. तर हे बघून तुम्हाला अस्वस्थता येत नाही का.**

**शरद पवार :** आत्ताची महाराष्ट्राची जी स्थिती आहे, विशेषत: काही जिल्ह्यांची, त्यामध्ये जालना, बीड, परभणी, तिथलं वातावरण, तिथं अतिशय अस्वस्थता आहे. इन्फॅक्ट हे सेशन संपल्यावर मी शांतपणे जाऊन तिथल्या लोकांशी बोलणार आहे. कटुता, गैरविश्वास हे चित्र दिसतंय ते भयावह आहे. मी कधीही महाराष्ट्रात असं ऐकलं नाही, की एका समाजाचं हॉटेल असेल तर दुसऱ्या समाजाचे लोक तिथं चहा घ्यायलाही जात नाहीत. हे अतिशय भयावह चित्र आहे. हे काहीही करून

बदललं पाहिजे. लोकांच्यात विश्वास वाढवला पाहिजे. डायलॉग वाढला पाहिजे आणि आमच्यासारख्या लोकांनी यात जीव ओतून काम केलं पाहिजे.

**प्रश्न : याच्यासारखे महाराष्ट्रात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, ज्यामुळं आपल्या राज्याची अधोगती झाली आहे. याबद्दल काय वाटतं.**

**शरद पवार :** कारणं सांगता येत नाहीत, पण, ज्याच्यावर



जबाबदारी आहे, त्यांची बांधिलकी कमी वाटते. इनव्हॉलमेंट कमी वाटते. त्याच्यामुळं अनेक गोष्टी घडत असतात. पण हे जरी खरं असलं तरी महाराष्ट्रामध्ये फार मोठा वर्ग असा आहे, जो या गोष्टींना यत्किंचीतही समर्थन देत नाही. हे दुरूस्त झालं पाहिजे, त्यासाठी कष्ट करण्याचीही त्यांची तयारी आहे. हा वर्ग मोठा आहे आणि ही जमेची बाजू आहे.

**प्रश्न : काही दिवसांपूर्वी तुम्ही मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. समाजासमाजातील वाद थांबला पाहिजे यासाठी कशा पद्धतीनं आता प्रयत्न करण्यात येणार आहेत.**

**शरद पवार :** बेसिकली डायलॉग. तुम्ही जास्तीत जास्त संवाद ठेवलाच पाहिजे. आज संवाद संपलेला आहे. सार्वजनिक जीवनामध्ये किंवा राजकारणामध्ये जेव्हा संवाद थांबतो तेव्हा चुकीच्या समजुती वाढत असतात. त्यामुळं आज डायलॉग अत्यंत गरजेचा आहे. आणि त्यासाठी आमच्यासारख्या लोकांनी अधिक लक्ष द्यायला हवं.

**प्रश्न : आरक्षणाच्या प्रश्नात तुमची नक्की भूमिका काय आहे हे जाणून घेण्यासाठी महाराष्ट्रात उत्सुकता आहे.**

**शरद पवार :** गंमत अशी आहे, की पहिल्यांदाच दुर्दैवानं दोन वेगळे वर्ग पडले आहेत आणि त्या वर्गांना कुणी काहीतरी सांगितलं आहे. आजचे जे राज्यकर्ते आहेत, त्यांनी दोन वेगळ्या बाजू घेतल्या आहेत. एका गटाने ओबीसींची बाजू घेतलीय आणि दुसऱ्या गटानं मराठा आंदोलकांची बाजू घेतलीय. हे योग्य नाहीये. आपण सामंजस्य कसं निर्माण करू शकू यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. आणि मघाशी सांगितल्याप्रमाणं त्यांनी डायलॉग वाढवणं गरजेचं आहे.

**प्रश्न : महाराष्ट्रातला हा गुंता वाढत असताना केंद्र त्यांची भूमिका बजावतेय असं वाटतंय का तुम्हाला.**

**शरद पवार :** अजिबात नाही. केंद्रानं याच्यात लक्षसुद्धा घातलंय असं दिसत नाही.

**प्रश्न : सुप्रियाताई, साहेब तुम्हाला कोणत्या क्षणी जास्त अस्वस्थ वाटले.**

**सुप्रिया सुळे :** एकतर क्रायसेसमध्ये ते कधीच अस्वस्थ नसतात. सर्व काही स्थिर असतं, त्यावेळी ते अधिक अस्वस्थ असतात. उद्धवजी आम्हाला नेहमी चिडवतात. बाबा कुठे आहेत असं त्यांनी विचारल्यानंतर आम्ही दौऱ्यावर गेलेत असं सांगितल्यानंतर तुम्ही घरात नीट वागत नसल्यामुळं ते सारखं दौऱ्यावर जातात असा उद्धवजींचा आरोप आहे माझ्यावर आणि आईवर.

**प्रश्न : साहेबांच्या आयुष्यात सगळ्यात मोठा संघर्षाचा काळ कोणता तुम्ही पाहिलांय.**

**सुप्रिया सुळे :** आता जेव्हा मी मागं वळून पाहते, तेव्हा हे एक वर्ष त्यांच्यासाठी संकटच नव्हतं असं मला वाटतं. कारण, त्यांनी असा कुठलाच सिग्नल दिला नाही मला तरी किंवा घरात किंवा पब्लिकली, की त्यांना असं वाटलं, की अरे बापरे, आता मी काय करू. मला असं वाटतं, की तो त्यांचा स्वभाव आहे. त्यांना जितकं कोणी जास्त प्रेशरराईज करतं, तेवढी त्यांना मजा येते, असं मला वाटायला लागलंय. कारण, मी अनेकवेळा अशा गोष्टी बघितल्यात, ते एक्स्ट्रा शांत असतात आणि मी

नेहमी सगळ्यांना सांगते, की ते गॅम्बलिंग नेचर दिसते. कुठं क्रायसेस आलं, की चला आता पुढचे काही दिवस मजा करूया असं त्यांचं टेम्परेमेंट असतं. कारण, त्यांना कधीच पराभवाची भीती वाटत नाही, असा मी काढलेला निष्कर्ष आहे. त्यांना अपयशाची भीतीच नाहीये. त्यामुळे त्यांना काही वाटतच नाही.

**प्रश्न : साहेब, महाराष्ट्रानं तुमच्यावर आलेली अनेक संकट बघितली आहेत. त्या संकटांना तुम्ही कशी टांग मारलीत आणि त्यावर स्वार झालात तेही बघितलंय. अडचणीच्या प्रसंगाला सामोरे जाण्याची तुमची पद्धत काय आहे.**

**शरद पवार :** कसंय, त्यात दोन–तीन प्रकारच्या पद्धती असतात. उदाहरणार्थ लातूर. त्या दिवशी गणपती विसर्जनाचा शेवटचा दिवस होता आणि झोपायला गेल्यानंतर अर्ध्या तासात माझ्या घराच्या खिडक्या वाजल्या, हलल्या. आणि माझ्या लक्षात आलं, की बहुतेक भूकंप झाला असावा असं मला वाटलं. मी ताबडतोब झोपेतून उठलो. कोयना हे एक भूकंपाचं एपिक सेंटर असल्याचं माहिती होतं. तिथं मी फोन केला. तर ते म्हणाले, की काही नाही. मग मी म्हटलं, आहे काहीतरी. मी तर ऐकलेलं आहे. अधिकाऱ्यांना उठवलं. विमान तयार ठेवलं. साडेसात वाजता मी किल्लारीला जाऊन पोहोचलो. हजारो घरं उद्ध्वस्त झालेली. अनेक माणसं जखमी झालेली, काही जण गेलेली. भीषण परिस्थिती होती. आता हे एवढं मोठं संकट आल्यानंतर नथिंग डुईंग. आता टाईम नाही, याच्यासाठी झोकूनच द्यायचं आणि त्या दिवसापासून चौदा दिवस मी तिथं राहिलो. घरी गेलो नाही. अखंड लोकांना भेटत राहिलो. त्यांना धीर दिला. हा जो क्रायसेस आहे, त्या क्रायसेसच्या वेळेला यत्किंचितही थांबता कामा नये, त्यासाठी पडतील ते कष्ट केले पाहिजेत आणि ती तुमची स्टाईल असेल तर कोणत्याही संकटातून तुम्ही पुढं जाऊ शकता.





**प्रश्न : एखाद्या वेळेस राजकीयदृष्ट्या तुम्ही अडचणीत आला आहात, अशा वेळी तुम्ही काहीतरी असे करता की त्यातून तुम्ही सहीसलामत बाहेर पडता. हे तुम्हाला अपेक्षित असतं, की तो योगायोग असतो.**

**शरद पवार :** काही गोष्टी घडलेल्या असतात आणि त्यातनं मार्ग काढायचा असतो.

**प्रश्न : सुप्रियाताई, साहेबांच्या आयुष्यातला असा कोणता प्रसंग होता, ज्यामुळे तुम्हाला त्यांची काळजी वाटली. सरकार पडलं किंवा पडण्याच्या प्रयत्नात आहे किंवा बंड वगैरे.**

**सुप्रिया सुळे :** असं काही नाही. काळजीचे अनेक प्रसंग

येतात. म्हणजे तुमचा डॉक्टर पॅनिक झाला तर कसं चालणार. नाही चालणार. तुमचा वकील म्हणाला, की नाही ही खूप डिफिकल्ट केस आहे, तर ते कसं चालेल. त्यामुळं पब्लिक लाईफ ही तशीच असते. सरकार पडणं वगैरे गोष्टींचं काहीच नाही. सरकार असू दे किंवा नसू दे आमच्या आयुष्यात काहीच बदल झाला नाही. त्याच्यामुळं पोलिटिलिक हालचालींचा आमच्या आयुष्यात, माझ्या आयुष्यात तरी ५५ वर्षांत कधीच फरक पडला नाही. माझं आयुष्य सत्तेत आणि विरोधातही सेम होतं.

**प्रश्न : किल्लारीला भूकंप झाला, त्यावेळी पवार साहेब चौदा दिवस तिकडे राहिले आणि त्यानंतरही आणखी भूकंप होण्याची शक्यता असताना तुम्हाला भीती नाही वाटली.**

**सुप्रिया सुळे :** माझी आई त्याबाबतीत खूप शार्प आहे. माझी आई म्हणाली, की काही होणार नाही. काही नाही होणार म्हणजे नाही होणार.

**प्रश्न : ज्यावेळी पक्षात फूट पडली आणि त्यावेळी तुम्ही जी कविता सादर केली दा. सू. वैद्यांची की श्रमलेल्या बापासाठी लेक नारळाचं पाणी. आम्ही पवार साहेबांना गहिवरून आलेलं पाहिलं. त्यावेळी तुम्हा दोघांच्या मनात काय भावना होत्या.**

**सुप्रिया सुळे :** त्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं की नाही, मला जरा डाऊट आहे. ते मास्टर ऑफ माईंड आहेत. स्वत:च्या इमोशन्स कधीच दाखवत नाहीत.

**शरद पवार :** त्यावेळेला या अडचणीतून बाहेर पडायला काही अडचण येणार नाही. तिने जो काही पुढाकार घेतलांय, त्याच्यात यशच येईल याची नक्की खात्री होती.

**प्रश्न : साहेब, तुम्ही कोणतं चॅलेंज सगळ्यात जास्त एन्जॉय केलंय.**

**शरद पवार :** पहिल्यांदा मुख्यमंत्रिपद गेलं तेव्हा त्याचा काहीच परिणाम झाला नाही. मला आठवतंय, की आमचा एक मित्रांचा ग्रुप होता. मी, माधव आपटे, एक डहाणूकर म्हणून होते, ते वारले, नस्ली वाडिया असे एक पाच-सहा जण आणि मला आठवतंय, ज्या दिवशी माझं सरकार बरखास्त झालं, त्याच्या आदल्या दिवशी आम्ही सगळीजणं आरे कॉलनीत होतो. सुट्टीचा दिवस असल्यामुळे गप्पा-गोष्टी होत होत्या. ते करून परत आलो, तर रात्री साडेबारा वाजता माझ्याकडं भालचंद्र देशमुख आले. त्यावेळी ते मुख्य सचिव होते. मी म्हटलं, बारा वाजता काय? क्रायसेस? ते म्हणाले, की तुमचं सरकार बरखास्त झालंय आणि मला ती यादी दिली. पत्र दाखवलं. सरकार बरखास्त झालं हे समजल्यावर बाकी घरात जागेच होते. रात्रभर सगळं सामान आवरलं आणि सकाळी सात वाजता रामटेक बंगला सोडून आम्ही खासगी फ्लॅटवर गेलोसुद्धा. मॅचला जाचयं होतं. साडे नऊ वाजता खासगी गाडी घेऊन मी आणि माझी बायको मॅच बघायला गेलो. तिथं जेव्हा जाहीर केलं, की हे दोघे मॅच बघायला आले आहेत, तर लोकांनी स्टँडिंग ओव्हिएशन दिलं. पॉईंट असा आहे, की क्रायसेस येतात, बट यू हॅव टू एन्जॉय इट.

**प्रश्न : अजितदादांनी पहाटेची शपथ घेतली आणि त्यानंतर बंड केलं, हे दोन प्रसंग कसे एन्जॉय केले.**

**शरद पवार :** पहाटेची शपथ घेतली त्यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या लोकांना मी बोलावलं. त्यांनी माघार घेतली. त्यांनी माघार घेतल्याच्यानंतर अजितनेही माघार घेतली. काही कटकटी राहिल्या नाहीत. आत्ताचं चित्र थोडं वेगळं आहे. आत्ता सरळसरळ भारतीय जनता पार्टी, त्यांचे सहकारी आणि आमच्या पक्षाचा मोठा वर्ग हे दोघेही एकत्र आले आणि त्यांनी सत्ता स्थापन केली. ठीक आहे, या गोष्टी होत असतात. योग्य वेळी लोकांच्यात जायचं आणि याला उत्तरही द्यायचं असतं.

**प्रश्न : लोकसभा निवडणुकीत बारामतीकडं सगळ्या देशाचं लक्ष लागलं होतं. तुम्हाला खात्री होती का, की असाच निकाल लागणार. आणि सुप्रियाताई तुम्हालाही वाटत होतं का.**

**शरद पवार :** हंड्रेड पर्सेंट.

**सुप्रिया सुळे :** माझी मुलाखत घेतली होती, त्यावेळी सांगितलं होतं, की बारामती लोकसभा मतदारसंघ एकाच माणसाला कळतो, ते म्हणजे पवार साहेब. ना अजित पवारला कळतो, ना मला. अजित पवार ओव्हर कॉन्फिडंट आणि मी अंडर कॉन्फिडंट असं कॉम्बिनेशन होतं आणि हे स्थिर होते पहिल्यापासून.

**प्रश्न : साहेब, तुम्ही बारामतीतील लोकांमध्ये खूप पूर्वी होता. मधल्या काळात हे दोघे आले, हे सगळं बघत होते. मग तुम्हाला एवढा कॉन्फिडन्स, लोकांची नाडी कशी माहीत होती. हे कशाच्या जोरावर.**

**शरद पवार :** यात दोन गोष्टी आहेत. एकतर माझा मतदारांशी संवाद असतो. व्यक्तिगत संबंध असतात. राजकारणामध्ये तुमच्या कार्यक्षेत्रातल्या घटकांशी तुमचे संबंध चांगले असले, की मग चिंता करण्याचं कारण नाही. बारामती हा एक गंमतीचा मतदारसंघ आहे. तो माझ्यावर, म्हणणं योग्य नाही, पण प्रचंड प्रेम करतो. आणि माझ्यामार्फत उभ्या आयुष्यात त्यांच्यासाठी जे जे काही करता आलं ते केलं. दुसरी गोष्ट अशी, माझा व्यक्तिगत संबंध मतदारांशी डायरेक्ट आहे. एक काळ असा होता, की रस्त्यावरून मी चाललो की समोरच्याला विचारणार, की काय सदाशिव कुठं चाललांय? किंवा मी मुख्यमंत्री असताना मतदारसंघातली एक बाई भेटायला आली. मी विचारलं, की काय गं सुलोचना काय काढलंस तू आज? गावाकडं साहेबांनी मला सुलोचना म्हणून हाक मारली, काम होवो अथवा न होवो याचा जो एक आनंद त्या बाईला असतो, तो आयुष्यभर पुरतो.

प्रश्न : सुप्रियाताई, मतदान झालं, त्यावेळी तुम्हाला फिफ्टी-फिफ्टी वाटत होतं. त्यावेळी तुम्ही साहेबांनी बोलत होतात का आणि त्यांनी तुम्हाला काही काळजी करू नको असं सांगितलं होतं.

**सुप्रिया सुळे :** एकतर एकच विषय त्यांना दहावेळा काढलेला आवडतच नाही. एकदा बोलणं झाल्यावर परत तो विषय काढायचाच नाही. कारण का तर त्यांनी निर्णय घेतलेला असतो. परत काय विचारायचं त्याच्यात आणि त्यांना एखादा विषय निग्लेक्ट करायला खूप सहजपणे येतं.

**प्रश्न : राष्ट्रवादीच्या अनेक कार्यकर्त्यांना आजही राष्ट्रवादी एकच आहे, काही फाटाफूट झालेली नाही असं वाटतं. भाजपला अंधारात ठेवून राष्ट्रवादीनं पूर्वीएवढेच खासदार निवडून आणलेत असं मतदारांनाही वाटतं.**

**शरद पवार :** पण, त्याच्यात आमचे आठ आले आणि दुसऱ्या बाजूचं कोणी आलं नाही. एकच आला. आणि तोही एक आला म्हणजे आम्ही पाहिजे तसं लक्ष दिलं नाही म्हणून आला. नाहीतर तेही येणं शक्य नव्हतं.

**प्रश्न : पवार साहेब, आपण उत्तम बुद्धिबळ खेळता आणि त्याचा वापर राजकारणात कसा केला. आणि तुम्हाला पटावरील कोण जास्त आवडतं.**

**शरद पवार :** असं आहे, की मी बुद्धिबळ फार भारी खेळतो असं नाही. गंमतीनं कधी वेळ मिळाला तर बसतो. याच्यात दोन-तीन गोष्टी असतात. उंट हा तिरकाच चालतो. राजकारणात कोण उंट हे लक्षात ठेवावं लागतं. घोडा हा अडीच घरं चालतो, तर अडीच घरं चालणारा घोडा आपल्या आजूबाजूला कोण आहे ते बघावं लागतं. मला वजीर घेऊन खेळायला जास्त आवडतं.

**प्रश्न : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी लेक लाडकी, लाडकी बहीण अशा सगळ्या योजना आणत आहे. महाराष्ट्राला अशी शक्यता वाटत आहे, की या निवडणुकीत महाराष्ट्राला एक महिला मुख्यमंत्री मिळेल. सगळं गणित बसलं तर सुप्रिया सुळे या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री होतील अशी चर्चा आहे. तुम्हाला एक बाप म्हणून किंवा पक्षाचा प्रमुख म्हणून असं व्हावं असं वाटतं का.**

**शरद पवार :** पहिल्यांदा तर मला इथं काहीही झालं तरी राज्य सरकार आमच्या लोकांच्या हातात आलं पाहिजे आणि आम्ही ते घेणारच. आणि एकदा राज्य सरकार आल्याच्यानंतर बाकीचे निर्णय घेतले जातील. आणि एकदा हे ठरवलं, की अ, ब, क ही व्यक्ती महत्त्वाची नाही. तो सामुदायिक निर्णय होतो. अर्जुनाला जसं सांगितलं होती, की माशाचा डोळा तसं आज आमच्या मनात महाराष्ट्राचं राज्य. बाकी काही नाही.

**प्रश्न : सुप्रियाताई, तुम्हाला काय वाटतं, तुम्ही स्वत:साठी काही स्वप्न बघता की नाही बघत.**

**सुप्रिया सुळे :** मला महाराष्ट्राचा मधु दंडवते व्हायची इच्छा आहे पार्लमेंटमध्ये. नेहमी मला असं वाटतं, की आपलं नाव त्या बोर्डावर लागलं पाहिजे, जिथे त्यांचं नाव आहे. पार्लमेंटमध्ये ज्यावेळी चर्चा असते, त्यावेळी आम्ही दंडवते, पवार साहेबांची भाषणे आजही रेफरन्स म्हणून वापरतो.

**प्रश्न : सुप्रियाताई, पवार साहेबांची कोणती कामे तुम्हाला चांगली वाटतात, ज्याचा तुम्हाला अभिमान वाटतो.**

**सुप्रिया सुळे :** त्यांनी केलेलं कम्प्लिट सोशल इम्पॅक्ट. इन्फ्रास्ट्रक्चर वगैरे कोणीही करतं. आम्ही प्रशासकीय इमारत बांधली, तर कोणीही बांधू शकतं. पण एक सोशल इम्पॅक्ट, ज्याचा पूर्ण समाजावर इम्पॅक्ट होतो ते करण्यात खरी गंमत आहे. म्हणजे आरक्षण. जेव्हा मी सरपंचापासून महापौरापर्यंत एक महिला मी निर्णय प्रक्रियेत बघते तो किती मोठा सोशल इम्पॅक्ट आहे किंवा जेव्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव युनिव्हर्सिटीला देणं, सगळ्या संघर्षातून ते नाव देणं, ज्या घटना त्याच्यातून झाल्या, त्याच्यातून जाणं, दॅट इज अ हिस्ट्री ऑफ लीडरशीप.

**प्रश्न : साहेब, तुम्हाला अतिशय भावलेला निर्णय किंवा आवडलेलं काम कोणतं आहे. आणि तुमच्यावर होणाऱ्या आरोपांबाबत काय वाटतं.**

**शरद पवार :** महिला धोरण. पॉईंट असा आहे, की त्या आरोपाचं स्वरूप काय आहे त्याच्यावर आहे. उथळपणाने केलेल्या आरोपांकडे दुर्लक्ष करायचं.

**प्रश्न : अस्वस्थेवर मात करण्याची तुमची काय पद्धत आहे.**

**शरद पवार :** त्याचा फारसा विचार करायचा नाही. आणि एखादं पुस्तक असेल तर ते वाचायचं. आत्ता मी सरहद्द गांधींच्यावरचं एक पुस्तक वाचतो आहे. अशी काही पुस्तक शोधून ती वाचायची. आठ-दहा दिवसांपूर्वी एका गावात काही प्रकार झाला. काही स्त्रियांना त्रास दिला गेला. त्यानं अस्वस्थ होतो. पण, माझ्या नजरेसमोर एक पुस्तक आलं, रूक्मिणीबाई. त्या पहिल्या महिला डॉक्टर झाल्या. वसईच्या जवळचं त्यांचं गाव. फार सुरेख पुस्तक आहे. म्हणजे तुमचे सगळे विषय निघून जातात.

**प्रश्न : पण अशावेळेला बरेच जण अध्यात्म, देव-धर्म अशाकडं जातात. तर तुम्हाला असं कधीच वाटलं नाही का. आणि सुप्रियाताईंना काय वाटतं.**

**शरद पवार :** अजिबात नाही. मी दोन मंदिरात जातो. एक पंढरपूरला आणि एक बारामतीत कण्हेरी म्हणून गाव आहे. देवाकडं काहीतरी मागावं असं कधी वाटलं नाही.

**सुप्रिया सुळे :** नाही, माझी श्रद्धा आहे, अंधश्रद्धा नाही. एकतर मी मागायला जात नाही. तो सर्वेसर्वा आहे. आपण काय

मागणार? त्याला सगळंच माहिती आहे आपल्याबद्दल.

**प्रश्न : राजकारणातल्या सगळ्या मुली त्यांच्या वडिलांच्या आडनावावरून ओळखल्या जातात. पण, सुप्रियाताईंनी स्वत:ला सुप्रिया सुळे नावानं प्रस्थापित केलं. त्याकडं आपण कसं बघता.**

**शरद पवार :** आनंद आहे.

**सुप्रिया सुळे :** मी कधी पवार-सुळे वगैरेचा विचारच केला नाही. माझ्या आईनं नाव बदललं. माझ्या बहिणींना नाव बदललं. मीही बदललं. आणि तुम्ही एवढंच विचारतांय, की पवार काही लावलं तर त्याच्यापुढं शरद आहे.

**प्रश्न : शरद पवारांचा त्यांच्या भावनांवर जास्त कंट्रोल आहे असं तुम्ही म्हणालात, पण प्रत्येक वडिलांच्या आयुष्यात एक प्रसंग असा येतो जिथे ते खूप भावनिक होतात. तुमच्या लग्नात तरी त्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं का.**

**सुप्रिया सुळे :** हो, असं माझी आई म्हणते. पण मी नाही पाहिलं.

**शरद पवार :** हो.

**प्रश्न : सुप्रियाताई, तुम्ही मघाशी त्यांचा आवडता गुण मोजकं बोलणं हा सांगितला आणि न आवडणारा गुण.**

**सुप्रिया सुळे :** नाही, असं काही नाही. त्यांच्या दौऱ्यांविषयी म्हणाल, तर ते बाहेर गेले की चांगले असतात. लोक हे त्यांचं टॉनिक आहेत. पहिलं आम्हाला वाटायचं, की ते स्वत:ला डिफेन्ड करत नाही. पण आता माझ्या तरी लक्षात आलंय, की गप्प बसण्यात जास्त ताकद आहे. वय आणि अनुभवाप्रमाणं आई-वडील आपल्यासाठी बदलत असतात. नात्यांचा विचार केला, तर ते आदर्श वडिलांपेक्षा आदर्श आजोबा जास्त आहेत. मला आईनं पहिल्यापासून सांगितलं, की वडील कामासाठी आहेत आणि बाकी सगळं करायला मी आहे.

**प्रश्न : साहेब, तुम्हाला सुप्रियाताईंचा कोणता गुण जास्त आवडतो. आणि काय आवडत नाही.**

**शरद पवार :** कोणत्याही विषयामध्ये डेप्थमध्ये जाणं आणि त्या विषयासंबंधीची माहिती घेणं आणि नंतरच भाष्य करणं. आवडत नाही म्हणजे, सकाळी सकाळी मला छळतात कधी कधी, ते आवडत नाही. सकाळी साडेसहा, सातला माझ्या दारावरती टिकटिक. लवकर का उठला.



**प्रश्न : सुप्रिया हे नाव कुणाला सुचलं होतं.**

**शरद पवार :** माझा होता. प्रिय या अर्थानं.

**सुप्रिया सुळे :** बाबा खरंच मोजकं बोलतात. मी आणि आई बोलत असतो, त्यावेळी ते म्हणतात, की तुम्हाला काही विषय नाहीत का बोलायला, तर गप्प बसा. वायफळ चर्चा करत जावू नका. मला एक दिवस आठवतो, म्हणजे ते एक टिपिकल बाबा कसे आहेत त्याची अनेक उदाहरणे आहेत. आम्ही कोणतीही ॲक्टिव्हिटी करायला गेलो तर बाबा कशालाच नाही म्हणत नाहीत. एका पातळीवर ते अतिशय स्ट्रिक्ट आहेत. म्हणजे जसं मराठी कुटुंब असतं, तसंच आजही त्यांची जडणघडण, म्हणजे कपड्यांबद्दल आणि इतर सगळ्यांबद्दल. वेळेवर घरी येणं. म्हणजे कुठल्याही मराठी कुटुंबात जे नियम असतात, तेच आमच्याही कुटुंबात आहेत. मला अजूनही आठवतं, की मला मुलगी झाल्यानंतर दुसऱ्या वेळी जेव्हा दिवस गेले, आणि बाबांना सांगायला गेले, की मी प्रेग्नंट आहे. साधारणपणे आई-वडिलांना आनंद होतो, की अरे व्वा, आपल्याला दुसरी नात-नातू येणार. पण ते म्हणाले, की अरे बापरे अजून एक मूल. म्हणजे त्यांना असं वाटलं, की हे कशासाठी. म्हणजे कुणी त्यांना सांगायला आलं की अहो शरदराव मी आज्जी होणार आहे. तर ते म्हणतात, की त्याला फार अक्कल लागत नाही. मग मी आणि आई कव्हर करतो, की अरे व्वा, किती छान.

■■




- वेगवेगळ्या टप्प्यावर व्हायरस इंडेक्सींग करून अस्सल, रोगमुक्त व दर्जेदार रोपे निर्मित करणारी जैन टिश्यूकल्चर ही एकमेव कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चर केळींच्या रोपांची निर्मिती रोगमुक्त, उत्कृष्ट, उच्चतम गुणवत्ता व निवडक मातृवृक्षापासून केली जाते.
- वातावरण नियंत्रित ग्रीनहाऊस व पॉलीहाऊस मध्ये शास्त्रोक्त पद्धतीने हार्डनिंग करणारी एकमेव कंपनी.
- जैन टिश्यूकल्चरच्या रोपांची वाढ पोषक तत्वांनीयुक्त असणाऱ्या, निर्जंतुक व विशेषरित्या आयात केलेल्या मातीविरहीत मिडीयामध्ये होते. अशा रितीने वाढ झालेल्या रोपांमध्ये मातीतून पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होत नाही व रोपे रोगमुक्त असण्याची खात्री असते.
- जैन टिश्यूकल्चर रोपांचा पुरवठा रूट ट्रेनर ट्रे मधून केला जातो, त्यामुळे मुळांचा विकास व वाढ योग्यरित्या होते व हाताळणी करतांना मुळांना नुकसान होत नाही.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानानेच शेतामध्ये रोपांची झिरो-डे सेटींगची खात्री.
- जैन टिश्यूकल्चर केळीची रोपे म्हणजे विक्रमी उत्पादनाची हमी.
- जैन टिश्यूकल्चर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार एकात्मिक पॅकेज प्रदान करून त्यांना हायटेक लागवड पद्धती, अत्याधुनिक सुक्ष्म सिंचन, त्यातून खते देण्याच्या तंत्रज्ञानाचे वैज्ञानिकदृष्ट्या मार्गदर्शन करते.

- जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या केळीची रोपे निर्मित करणारी जगातील नंबर १ ची कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चरच्या केळी रोपांना १९९४ पासून शेतकऱ्यांची पहिली पसंती.
- या वर्षी जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या ९.५ कोटी केळी रोपांची लागवड करून शेतकऱ्यांनी उच्चांकी उत्पादन घेतले आहे.
- शेतकऱ्यांच्या वाढत्या मागणीनुसार आता पूवन, इलाकी, रेड बनाना, नेन्द्रन, सुपर नेन्द्रन व बन्थल या लोकप्रिय भारतीय जातींचे जैन टिश्यूकल्चर केळी रोपे उपलब्ध.
- सदैव वाढणाऱ्या जैन टिश्यूकल्चर कुटुंबात त्वरित सामील होऊन फायदा घ्या.



| जैन टिश्यूकल्चर - इलाकी रूपये २०/रोप | जैन टिश्यूकल्चर - पूवन रूपये १६/रोप | जैन टिश्यूकल्चर - बन्थल/ मोन्थन रूपये २०/रोप | जैन टिश्यूकल्चर - नेन्द्रन रूपये १८/रोप | जैन टिश्यूकल्चर - रेड बनाना रूपये २०/रोप |
|---|---|---|---|---|

त्वरित बुकिंग करा व निराशा टाळा

जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन – अधिकाधिक नफा.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन हाईटेक प्लॅन्ट फॅक्टरी
अधिक उत्पादन – अधिक नफा.

वाहतूक खर्च वेगळा लागेल.

# बुकिंगसाठी संपर्क: (महाराष्ट्र) अकलूज: ९४२२७७४९३७; चोपडा: ९४२२७७3394, जळगाव: ९४२२७७६७१८, ९४२२७७६७४८, ९४०४९५५३१७,९४२२७७३७६८
अंजनगाव सुर्जी: ९४२२७७५९२८; मालेगाव: ९४०३०८०१३८; नांदेड: ९४०३६९५८९३, ९४०३६९५८४६; नंदुरबार: ९४२२७७४३७५; मुक्ताईनगर: ९४०३६९५९०८;
पुणे: ९४२२७७४९३३; रावेर: ९४२२७७४९३१; टेंभूर्णी: ९४२२७७४९३२; सांगली: ९४०३०८०१७२, कोकण व गोवा: ९४२२७७४९३१, ९८७०९९०७५४, ९४२२७७४९३३; ९४२२७७३७६८,

टिप - जैन टिश्यूकल्चर केळी रोप रोगमुक्त असली तरी शेतात लागवड केल्यानंतर त्यावर रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो.
त्यामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची व त्यानंतर येणाऱ्या उत्पादनाची हमी कंपनी घेऊ शकत नाही.



# तरुणांच्या सामुहिक शक्तीतून महाराष्ट्राचे राजकारण बदलू

**शरद पवार**

**अहिल्यानगरच्या अकोले येथे १९ जुलै रोजी आयोजित स्व. अशोक भांगरे यांचा जयंती सोहळा व शेतकरी मेळाव्यात सहभागी होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी उपस्थितांना केलेले मार्गदर्शन....**

आजचा हा कार्यक्रम स्व. यशवंतराव भांगरे यांच्या ६१ व्या जयंतीच्या निमित्ताने आहे. हा कार्यक्रम कौटुंबिक जसा आहे तसा अत्यंत महत्वाचा कार्यक्रम आहे. अकोला तालुका हा महाराष्ट्राचा आदिवासीबहुल तालुका, अतिवृष्टी असलेला तालुका, भंडारदरा सारखं प्रचंड धरण असणारा हा तालुका आणि महाराष्ट्राच्या एकेकाळच्या दुष्काळी नगर जिल्ह्याला पाणी देण्यासंबंधीची भूमिका घेणारा हा तालुका आणि या तालुक्यामध्ये लोकांच्या हिताची जपणूक करणार नेतृत्व हे जन्माला आलं ज्याच्यामध्ये यशवंतराव भांगरेंच नाव घ्यावं लागेल. महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मी ज्यावेळेस पहिल्यांदा गेलो त्यावेळेला लोकांचे आणि आदिवासींचे प्रश्न प्रामाणिकपणाने मांडणारे जे विधानसभेचे सभासद होते त्याच्यामध्ये यशवंतरावांचा उल्लेख हा आम्हा सगळ्यांना करावा लागेल. नंतरच्या काळामध्ये ती जबाबदारी अशोकरावांनी घेतली. दुर्दैवाने नियतीच सांगणं काही वेगळं होतं आणि ते तुम्हा-आम्हा सगळ्यांच्यातून लवकर निघून गेले. पण त्यांचा विचार हा होता की, नवीन पिढी तयार करायची आणि त्या पिढीच्या मार्फत अकोला तालुक्यातल्या सर्वसामान्य जनतेचे प्रश्न कसे सुटतील? याची खबरदारी घ्यायची आणि त्यासंबंधीची आस्था त्यांच्या मनात होती.




मला आठवतंय एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मी आलो होतो, त्याठिकाणी अशोकराव होते. भाषणाला उभे राहिले आणि अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेची एकच गोष्ट सांगितली मला की पवारसाहेब, आमचं तुमच्याकडून काही मागणं नाही फक्त एकच काम करा 'माझ्या मुलावर लक्ष ठेवा' अमितच्यावर लक्ष ठेवा. अमितवर लक्ष ठेवा हा शब्द त्यांनी जाहीर सभेतून माझ्याकडून घेतला. अशोकरावांच्या डोळ्यात पाणी होतं पण चिंता नुसती अमितची नव्हती तर अकोल्याच्या गोरगरीब जनतेची होती आणि त्या जनतेची, त्यासाठी कष्ट करणार, त्याच्यासाठी बांधिलकी ठेवणार, त्याच्यासाठी आयुष्य झोकून देणार ही त्यांची अपेक्षा अमित आणि सुनिता ताईंकडून होती. मला आनंद आहे की, आज त्यांचा शब्द आज तुम्ही लोकांनी सुद्धा पाळला.

आधीच्या वक्त्यांनी शेती, शेतकरी अशा अनेक प्रश्नांच्या संबंधीचे विचार मांडले. आज देश एका संकटातून जातोय, कष्ट करणारा काळ्या आईशी इमान राखणारा जो माझा बळीराजा आहे त्याच्यासाठी सत्ता वापरणं हे सूत्र राज्यकर्त्यांनी लक्षात ठेवलं पाहिजे. पण आजचे राज्यकर्ते यासंदर्भात कधी लक्ष देत नाहीत. आपण बघितले गेल्या काही दिवसांमध्ये शेतीमालाची किंमत ज्याचा उल्लेख या ठिकाणी केला गेला. काही कुणी जास्त मागत नाही. पण शेतीमाल पिकवण्याच्यासाठी लागणारा उत्पादन खर्च आहे तेवढं तरी पदरात त्या बळीराजाच्या पडलं पाहिजे, एवढी एकमेव मागणी त्या ठिकाणी आहे.

आत्ताच या ठिकाणी अमित रावांच्या नेतृत्वाखाली दूध उत्पादक शेतकऱ्यांच दुखणं एका निवेदनाच्या माध्यमातून या ठिकाणी मांडलं. एक जोडधंदा, शेतीला जोडधंदा आणि म्हणून दुधाची किंमत ही रास्त मिळाली पाहिजे यासाठी संघर्ष करण्याची वेळ येते आज त्याच्यात लक्ष देण्याची गरज आहे. कांदा हे पीक, जिरायत शेतकऱ्याचं पिक, महाराष्ट्र आणि देशाला शेजारचा नाशिक जिल्हा असेल, अहमदनगर जिल्हा असेल, सातारा असेल, सांगली असेल, सोलापूर असेल, पुणे असेल, धुळे असेल त्या भागातला शेतकरी त्याचा काही विचार न करता कांद्याचं पीक घेतो आणि त्या कांद्याला रास्त किंमत मिळाली पाहिजे, एवढं एकच मागणं त्यांचं आहे. घडतंय काय? घडतंय की त्या कांदा उत्पादकाला न्याय देण्यासाठी आजच्या सरकारची तयारी नाही. मध्यंतरी देशाचे प्रधानमंत्री नाशिकला आले, त्यांची सभा होती. त्या दिवशी मी ही नाशिकला होतो आणि त्यांच्यासमोर एक कोणीतरी शेतकरी तरुण उठला आणि एवढं सांगायला लागला तुम्ही जगाच्या गोष्टी सांगताय, माझ्या कांद्याला तेवढी किंमत द्या. एवढी साधी मागणी त्या ठिकाणी केली. पोलिसांनी त्याला पकडलं आणि आत नेऊन टाकलं कुठेतरी. कांद्याची किंमत मागणाऱ्या शेतकऱ्याला आपली मागणी करण्याचा अधिकार या देशात नाही हे मोदींच्या राज्यात नाशिकमध्ये तुम्ही- आम्ही लोकांनी पाहिलं.

उसाची शेती आज तुम्ही लोक करता, साखर तयार करतो, देशाची गरज भागवतो आणि अधिक साखर जी असते ही दुनियेच्या बाजारपेठेमध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला जातो. आजच्या मोदी सरकारने आम्हाला परदेशात पाठवायला बंदी घातली, आवर घातला आणि ऊस उत्पादकांना त्याची किंमत चांगली देण्यासाठी मागणी जी आहे त्याची पूर्तता या ठिकाणी केली जात नाही. या सगळ्या गोष्टीचा अर्थ हा आहे की या राज्यकर्त्यांना शेती आणि शेतकरी याच्या संबंधीची आस्था नाही. म्हणून तुमची- माझी सगळ्यांची जबाबदारी आहे. आज लोकसभेच्या निवडणुका आपण केल्या आणि तुम्ही उत्तम काम केलं याचा उल्लेख या ठिकाणी केला. कॉम्रेड ढवळे यांनी की पाच वर्षांच्यापूर्वी ज्यावेळेला निवडणुका झाल्या तेव्हा महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाला एक जागा मिळाली, राष्ट्रवादीला चार जागा मिळाल्या आणि ही अवस्था या ठिकाणी होती. या निवडणुकीच्या वेळेला तुम्ही आम्ही सगळ्यांनी निर्धार केला आणि मला अभिमान आहे तुमचा ४८ खासदारांच्या जागांपैकी





३१ ठिकाणी खासदार तुम्ही निवडून दिले. तुमच्या नगर जिल्ह्याच्या या दोन्ही जागा मोठ्या मतांनी तुम्ही विजयी केल्या आणि एक नवीन दिशा आज संपूर्ण देशाला तुम्ही दाखवलेली आहे, आता इथे थांबायचं नाही. आजपासून ७० दिवसांनी विधानसभेची निवडणूक येत आहे. त्यावेळेला तुमच्या सगळ्यांची एकी मजबूत असेल तर कोणी त्यांना धक्का लावू शकत नाही. हे राज्य तुमच्या हातात आल्याशिवाय राहत नाही.

आम्ही लोकांनी ठरवलंय की आता काही मागायचं नाही. आता माझ्यासारख्याला तुम्ही कितीदा निवडून दिलं? कितींदा निवडून तुम्हाला माहिति आहे? मला आत्तापर्यंत लोकांनी ५६ वर्ष निवडून दिलं. त्यामुळे आता काही मागायचं नाही एकच मागायचं की महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्य माणसाची सत्ता येईल आणि आज शेतकरी, कष्टकरी, तरुण माणूस, आया-बहिणी या सगळ्यांच्या हिताची जपणूक करणारं एक मजबूत अशा प्रकारचं एक सरकार आज या ठिकाणी आणायचे आहे आणि ते करण्याच्यासाठी तुमच्या सर्वांची सामुदायिक शक्ती ही या ठिकाणी हवी आहे त्यापेक्षा दुसरं काही मागायचं नाही. आम्ही ठरवलंय, माणसं साधी द्यायची.

आता बघा निलेश लंके निवडणुकीला उभे राहिले त्यांच्याविरुद्ध एक मोठे नेते होते आणि त्या मोठया नेत्यांनी जाहीर केलं की हा गृहस्थ पार्लमेंटमध्ये जाणार, याला इंग्रजी येत नाही आणि हा तिथे जाऊन काय करणार? पार्लमेंटमध्ये इंग्रजी यावे लागतं असं नाही. पार्लमेंटमध्ये हिंदीत बोलता येतं, मराठीत बोलता येतं, तुमच्या मातृभाषेत बोलता येतं. ते गेले पार्लमेंटमध्ये, मलाही काळजी होती. म्हणलं आमचा गडी पार्लमेंटमध्ये जातोय, काय बोलतोय माहित नाही. शपथ घ्यायला उभा राहिला धाड धाड धाड धाड इंग्रजी..!! गाडी जी सुटली ती गाडी मधीआधी नाहीच, सगळं पार्लमेंट बघायला लागलं कोण ह्यो गडी आला? थांबायला तयार नाही आणि भाषण काय केलं? भाषण हेच केलं की माझ्या शेतकऱ्याच्या हिताची जपवणूक इथं होत नसेल तर इथलं मी काम चालूनच देणार नाही. तिथं मांडणी जी केली, ती कष्टकऱ्याची, शेतकऱ्याची मांडणी त्याठिकाणी केली आणि असा एक नाही. आज असे ३१ खासदार त्या ठिकाणी जाऊन बसले. मी त्या सगळ्यांच्या वतीने तुम्हाला खात्री देतो की, ३१ खासदार महाराष्ट्राच्या कष्टकऱ्यांची भूमिका मांडण्याच्यासाठी प्रयत्नांची पराकष्टा त्या ठिकाणी करतील आणि एक प्रकारचं देशामध्ये राजकारण बदलण्याची आज जी आवश्यकता आहे त्याच्यामध्ये यश संपादन करतील, याचा सार्थ अभिमान तुम्हा सगळ्यांना वाटेल एवढंच या ठिकाणी मी सांगू इच्छितो.

मला आणखी दोन ठिकाणी जायचं आहे. मी काय अधिक बोलून वेळ घेऊ इच्छित नाही. पण अमित आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तुम्ही शक्ती द्या, तुम्ही पाठीमागे रहा आणि तुमच्या या प्रयत्नाला पूर्ण ताकतीने आम्हा लोकांची मदत असेल आणि मी तुम्हाला तुमच्या मदतीने खात्री या ठिकाणी देतो की, अकोला तालुक्यात बदल झाल्याशिवाय राहणार नाही. तो निकाल आम्ही घेतला आहे ५ वर्षांपूर्वी एका डॉक्टरला निवडून दिलं, मीच तुम्हाला सांगितलं निवडून द्यायला. मला असं वाटलं साधा माणूस आहे शब्दाला किंमत देईल, लोकांना पाठिंबा देईल, लोकांची साथ सोडणार नाही इथे भाषण केलं काही झालं तर पवार साहेबांची साथ सोडणार नाही. मुंबईत गेला भलतीकडेच जाऊन बसला. आता कुठे बसायचं? हे ज्याला कळत नाही त्याला योग्य ठिकाणी बसवायचं हे उद्याच्या विधानसभेमध्ये तुम्हाला आणि मला या ठिकाणी ठरवायचं आणि हे काम तुम्ही करा आणि या तरुणाच्या पाठीशी शक्ती उभी करून मी तुम्हाला सांगतो या अकोल्याचा विकास या जनतेच्या तुमच्या तरुणांच्या ताकतीवर महाराष्ट्राचे राजकारण या तरुणाच्या सामूहिक शक्तीतून आम्ही बदलल्याशिवाय राहणार नाही हाच विश्वास आज या ठिकाणी देतो आणि माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र..!




# मर्यादित अर्थ आणि चाचपडता संकल्प


**अभय टिळक**

प्रगतीसाठी केवळ प्रवासाची दिशा उमजून पुरत नसते. मुख्य म्हणजे प्रगतीची प्रबळ इच्छा असणे गरजेचे. परंतु, तेदेखील पुरेसे ठरत नाही. त्यासाठी दिशेला जोड लागते गतीची. प्रवासाची साधनेच बरोबर नसली तर गतीदेखील हतबल ठरते. मग उरतात त्या केवळ वाटचालीच्या चर्चा. नीतीशकुमार आणि चंद्राबाबू या दोघांच्या टेकूवर का होईना परंतु तिस-यांदा देशाच्या कारभाराची सूत्रे हाती घेतलेल्या केंद्रातील मोदीप्रणीत सरकारच्या पहिल्यावहिल्या पूर्ण अंदाजपत्रकाकडून देशाच्या अर्थकारणाच्या वाटचालीची दिशा, प्रवासाची प्रबळ इच्छाशक्ती, प्रवासाची साधने आणि प्रवासाची रूपरेषा अशा सगळ्या आराखड्याचे स्पष्ट सूचन अपेक्षित होते. परंतु, केंद्रीय अर्थमंत्र्यांनी त्यांच्या विवेचनामध्ये केवळ पुढील प्रवासाच्या दिशेचेच काय ते दिशादर्शन घडवले. त्यांमुळे, भविष्यकालीन वाटचालीची दिशा योग्य असली तरी प्रवास वेगवान आणि खरोखरच अर्थपूर्ण होणार किंवा नाही, याची उत्कंठावजा चिंता कोणाच्याही मनी दाटून यावी, हे स्वाभाविक ठरते. कारण, तिस-या वेळी सत्ता हाती पेलताना जो आत्मविश्वास कोणत्याही सरकारच्या ठायी दिसावयास हवा तो तितक्या ठोसपणे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये कोठे दिसत नाही. सरकार बिचकते आहे, अति जपून पावले उचलते आहे, असा ग्रह त्यांमुळे बळकट होतो.

अर्थसंकल्पाच्या अंतरंगाबाबतचा पूर्वापार जपलेला परिपाठ मात्र माननीय अर्थमंत्र्यांनी याही वेळी मनोमन जपला. अंदाजपत्रकामध्ये देशाच्या वित्तीय परिस्थितीबाबत कमीत कमी आकडेवारी सादर करावयाची हा या सरकारच्या कार्यपद्धतीचा जणू हुकुमी खाक्याच ठरून गेलेला आहे. त्यांनुसार, सन २०२४- २५ या चालू वित्तीय वर्षादरम्यान केंद्रसरकारचे अंदाजित एकंदर उत्पन्न ३२ लाख ७ हजार कोटी रुपये इतके तर सरकारचा अंदाजित एकंदर खर्च ४८ लाख २१ हजार कोटी रुपये इतका असेल, एवढीच काय वित्तीय चित्रासंदर्भातील ती ठोस आकडेवारी आपल्या भाषणाच्या अंतिम चरणात अर्थमंत्र्यांनी सादर केली. त्याच बरोबर, सरकारने जारी राखलेल्या उपायांपायी केंद्र सरकारची २०२४- २५ या वित्तीय वर्षासाठीची अंदाजित वित्तीय तूट देशी ठोकळ उत्पादनाच्या ४.९ टक्क्यांपर्यंत असेल, असा अंदाज वर्तवत वित्तीय दृढीकरणासंदर्भातील (फिस्कल कन्सॉलिडेशन) ध्येय सरकार शाबूत राखते आहे, यांबाबत तुम्हाआम्हांला त्यांनी आश्वस्तदेखील केले. देशी ठोकळ उत्पादिताशी टक्केवारी काढली तर वित्तीय तूट देशी ठोकळ उत्पादिताच्या केवळ ४.९ टक्के भरते हे ठीक. परंतु, वित्तीय तुटीची वास्तवातील रक्कम तब्बल १६ लाख १४ हजार कोटींची भरते, ही सामान्य बाब नाही.




याचा व्यवहारातील अर्थ सोपा आहे. ही वित्तीय तूट भरून काढण्यासाठी केंद्र सरकार सन २०२४- २५ या वित्तीय वर्षामध्ये १६ लाख १४ हजार कोटी रुपयांची कर्जउभारणी करणार, हा याचा अर्थ. म्हणजेच, ही रक्कम खासगी उद्योगक्षेत्राला गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणार नाही. एका मुठीने केंद्र सरकारच ती रक्कम उचलणार. म्हणजेच, खासगी उद्योगक्षेत्राशी कर्जउभारणीच्याबाबतीत केंद्र सरकार भांडवलबाजारात स्पर्धा करणार. ही रक्कम सरकारच्या खर्चासाठी वापरली जाणार असल्याने भांडवलबाजारात, वस्तुतः, खासगी क्षेत्राला भांडवलाच्या तौलनिक तुटवड्याचा सामना करावा लागणार. व्यवहारात मग कर्जांसाठी तुलनेने चढे व्याजदर सोसणे खासगी उद्योगक्षेत्राला यंदाही भाग पडनार. मुळात, भारतीय अर्थव्यवस्था 'कोविड- १९' च्या दणक्यामधून सावरली असतानादेखील गुंतवणुकीच्याबाबतीत देशातील खासगी उद्योगक्षेत्र अजूनदेखील उभारीच्या मनःस्थितीमध्ये नाही. अशा परिस्थितीत, खुद्द केंद्र सरकारच कर्जाऊ निधींचा एक हक्कदार म्हणून स्पर्धेत उतरणार असल्याने वाढीव अथवा चढ्या व्याजदराने कर्जे उचलून भांडवली गुंतवणूक करण्यास खासगी उद्योगक्षेत्र हिरिरीने पुढे येईल, असा



आशावाद कशाच्या भरवशावर जोपासायचा, हा प्रश्न कोणालाही पडणे स्वाभाविक ठरते.

हे एवढ्यावरच संपत नाही. अर्थशास्त्रातील अगदी पायाभूत सूत्रानुसार, वित्तीय तूट एकवेळ परवडते परंतु महसुली तूट मात्र अर्थव्यवस्थेच्या लेखी अधिक हानीकारक शाबीत होते. सरकारची महसूली जमा आणि महसूली खर्च या दोहोंतील तफावत म्हणजे महसूली तूट. सन २०२४–२५ या वित्तीय वर्षादरम्यान देशाची अंदाजित महसूली तूट किती असेल, यांबद्दल अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणादरम्यान सोयीस्कर मौनच बाळगले. महसूली तूट किती आहे याची आकडेवारी अर्थमंत्र्यांनी जर प्रगट केली असती तर, वित्तीय दृढीकरणाबाबतचे या सरकारचे दावे खरोखरच किती अर्थपूर्ण आहेत, हे जोखण्याचे काही एक साधन तरी उपलब्ध झाले असते. कारण, महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी जे प्रमाण भरते त्या प्रमाणात सरकार नव्याने करणार असलेल्या कर्जउभारणीची गुणवत्ता स्पष्ट होते. महसुली तुटीचे वित्तीय तुटीशी भरणारे प्रमाण जितके अधिक तितके सरकार नव्याने करणार असलेल्या कर्जउभारणीपैकी महसुली तुटीचा भरणा करण्याकरता वापरल्या जाणाऱ्या कर्जाऊ रकमेचे प्रमाण अधिक, असे हे साधे व सोपे समीकरण होय. महसुली खर्चाद्वारे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेची निर्मिती अर्थव्यवस्थेत होत नसते. परिणामी, महसुली तूट भरून काढण्यासाठी वापरल्या गेलेल्या कर्जाऊ रकमेची वर्गवारी अनुत्पादक कर्ज या प्रकारात होते. म्हणजेच, या अशा अनुत्पादक कर्जाचा सव्याज भरणा करण्याचा बोजा पुन्हा सरकारच्या तिजोरीवरच पडत राहतो.

दुस–या भाषेत सांगायचे तर, महसुली तूट अधिक असेल तर साहजिकच एक तर एकंदर तुटीचे भगदाड रुंदावते आणि दुसरे म्हणजे कर्जाऊ घेतलेल्या रकमेपैकीदेखील मोठा हिस्सा अनुत्पादक शाबीत होतो. त्यांमुळे सरकारच्या वित्तीय तुटीइतकाच सरकारच्या महसुली तुटीचा आकडा किती मोठा आहे याचा अदमास येऊन वित्तीय दृढीकरणासंदर्भातील दावे करण्याबाबत सरकार खरोखरच किती खोल पाण्यात उभे आहे, हे स्पष्ट होते. आता, महसुली तुटीबाबतच्या अंदाजित आकडेवारीला अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान संपूर्ण फाटा देऊन अर्थमंत्र्यांनी तो मुद्दाच पार निकालात काढला ! त्यांमुळे, सन २०२४– २५ या वित्तीय वर्षात केंद्र सरकार करणार असलेल्या १६ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या कर्जउभारणीपैकी महसुली तुटीचा खड्डा भरण्यास नेमकी किती रक्कम खर्ची पडणार याचा काहीच अंदाज अर्थमंत्र्यांच्या भाषणावरून तरी आला नाही. दुस–या शब्दांत सांगायचे तर, महसुली तूट भरून जी काही कर्जाऊ रक्कम सरकारपाशी उरेल तिच्यातून किती भांडवली गुंतवणूक देशी अर्थव्यवस्थेमध्ये येत्या वित्तीय वर्षात साकारेल, याचा काहीही पत्ता लागत नाही.

वित्तीय तुटीची भरपाई करण्यासाठी सरकार करत असलेल्या कर्जउभारणीसंदर्भात हा मुद्दा कळीचा ठरतो. कर्जाऊ घेतलेल्या



रकमा, समजा, सरकारने देशी अर्थव्यवस्थेमध्ये भांडवली मालमत्ता करण्यासाठी वापरली तर पर्यायाने अर्थव्यवस्थेच्या उत्पादकतेचे भरणपोषण त्यांद्वारे घडून येते. साहजिकच, अर्थव्यवस्थेतील सर्वच घटकांना वाढीव उत्पादकतेचे लाभ मिळत राहतात. रस्ते, दळणवळण, वीजनिर्मिती, सिंचन, शैक्षणिक सुविधा, आरोग्याच्या सोयी यांसारख्या पायाभूत सेवांच्या निर्मितीसाठी कर्जाऊ रकमा वापरल्या गेल्याने खासगी उद्योगक्षेत्राची उत्पादकता उंचावण्यास हातभार लागतो. आज मुख्यतः गरज आहे ती नेमकी याचीच. कारण, खासगी उद्योगक्षेत्राच्या सरासरी उत्पादकतेची पातळी उंचावल्याखेरीज त्याच्या नफाप्रदतेमध्ये सुधारणा घडून येणे अशक्य. आणि जोवर खासगी उद्योगक्षेत्राची उत्पादकता उंचावणार नाही तोवर नव्याने भांडवली गुंतवणूक करण्याबाबत त्या क्षेत्राचा

हुरूपदेखील वाढणार नाही. याचा व्यवहारातील अर्थ असा होतो की, भारतीय अर्थव्यवस्थेची भविष्यकालीन प्रगती सातत्यशील राखण्यासाठी सरकारलाच गुंतवणुकीचे इंजेक्शन सतत तयार ठेवावे लागेल. म्हणजेच, देशी अर्थकारणातील मागणी टिकवून धरण्यासाठी सरकारलाच खर्चाकडे हात सैल सोडावा लागेल. आता, अशा पद्धतीने वाढीव खर्चच करणे भाग पडणार असेल तर वित्तीय तुटीवर नियंत्रण राखणे अवघड ठरत राहील हे ओघानेच आले. त्यांमुळे, सन २०२४- २५ या वित्तीय वर्षामध्ये केंद्र सरकारच्या वित्तीय तुटीचे प्रमाण देशी ठोकळ उत्पादनाच्या केवळ ४.९ टक्के इतकेच राहील, या अर्थमंत्र्यांच्या निवेदनामुळे एकदम दिलासा मिळावा, हे काही सर्वस्वी खरे नाही.



येत्या वित्तीय वर्षात, आणि पर्यायाने येत्या काळात, सरकार अर्थव्यवहारातील एकंदर नऊघटकांवर लक्ष केंद्रीत करील, असे अर्थमंत्र्यांचे विवेचन सांगते. वाटचालीच्या या नऊ दिशा योग्य असल्या तरी त्यांवर नेटाने पावले दमदारपणे टाकण्याचा पुरेसा हुरूप सरकारपाशी आहे अथवा नाही याची आशंका त्या संदर्भातील तरतुदींबाबत जो बिचकता पवित्रा सूचित होतो त्यांमुळे येत राहते. दुसरे म्हणजे, या नऊ घटकांपैकी काही महत्त्वाचे घटक तर असे आहेत की, त्या घटकांमध्ये भरीव कामगिरी साकारण्यासाठी राज्य सरकारांचे पुरेपूर सहकार्य अनिवार्य ठरते. इथे प्रश्न मग येतो तो केंद्र सरकार राज्यांशी कशा प्रकारचा संवाद प्रस्थापित राखते हा. या नऊ घटकांमध्ये पहिलाच घटक जो शेतीसंदर्भातील आहे त्याचे उदाहरण या संदर्भात अतिशय बोलके ठरावे. भारतीय शेतीक्षेत्राची दीर्घकालची कुंठितावस्था दूर करण्याच्या प्रयत्नांचा एक मोठा भाग म्हणून शेतीमधील संशोधनावर जोर देण्याचा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीने देशभरातील विविध संस्थांमध्ये कृषिविषयक जे संशोधन सध्या केले जाते आहे त्याचा सर्वंकष आढावा घेण्याचा सरकारचा मानस आहे. आता, शेती हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय आहे. महाराष्ट्रासारख्या राज्याचा विचार केला तर, राज्यातील एकंदर चार कृषी विद्यापीठांमध्ये शेतीविषयक संशोधकांची जी पदे आहेत ती बहुतांश आजमितीस रिकामी आहेत. तिथे नव्याने भरतीच होत नाही. सरकारी कर्मचा-यांवरील खर्चाचा बोजा तिजोरीवर वाढत असल्याचे कारण देत राज्य सरकारांनी नोकरभरतीवर जी पाबंदी जारी केलेली आहे तिचा हा परिणाम. दुसरे म्हणजे, कृषी विद्यापीठांमध्ये जे काही संशोधन जसे काही होते ते शेतक-यांच्या बांधापर्यंत नेऊन पोहोचविण्यासाठी तालुका पातळीवर जी विस्तार यंत्रणा कार्यक्षमपणे सक्रिय असणे क्रमप्राप्त ठरते ती आज बव्हंशी पुरती विस्कटल्याने गलितगात्र बनलेली आहे. आता, शेतीमधील संशोधनास बढावा देण्यासाठी केंद्र सरकारचे कृषी खाते कितीही कर्तव्यतत्पर बनले तरी त्या संशोधनाचे फलित व्यवहारात उतरण्यासाठी आवश्यक असणारी कार्यकारी यंत्रणा राज्यांच्या स्तरावर दुबळीच राहिली तर संशोधन व्यवस्थेच्या सक्षमीकरणाचा व्यवहारातील उपयोग शून्यच. केवळ डोके मोठे व कल्पक असून भागत नाही. शरीराचे हात आणि पाय हे कार्यकारी अवयवच दुबळे असतील तर शरीराने काम तरी कसे करावे?

जागतिक स्तरावर ज्या वेगाने व ज्या सघनतेने पर्यावरणीय बदल घडून येत आहेत व विशेषतः मॉन्सूनच्या पर्जन्यचक्रावर त्यांचे जे सखोल असे प्रतिकूल परिणाम घडून येत असल्याचे आपण अनुभवतो आहोत ते ध्यानात घेऊन, अशा आकस्मिक वातावरणीय बदलांना तोंड देत तगून राहण्याची क्षमता राखणा-या निरनिराळ्या ३२ पिकांचे अधिक उत्पादन देणारे एकंदर १०९ नवीन वाण शेतक-यांना उपलब्ध करून देण्याचा मानस अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात व्यक्त केला. ही कल्पना चांगलीच आहे. परंतु, हे सगळे व्यवहारात उतरून त्यांचे अपेक्षित असे सुभग परिणाम अनुभवण्यास बराच दीर्घ काळ लागेल, हेही तितकेच खरे. हे नवीन वाण बाजारात येणार, ते शेतकरी खरेदी करणार, त्यांची लावणी-पेरणी होणार, मग ते उत्पादन बाजारात येऊन शेतकरी व ग्राहक या

दोघांनाही त्याचे गोमटे लाभ मिळणार ही बरीच वेळखाऊ प्रक्रिया ठरेल. मुख्य म्हणजे, नवीन वाणांची लावणी-पेरणी अंगीकारण्यासाठी शेतकरी वर्गांचे व्यापक स्तरावर प्रशिक्षण हाती घेतले जाणे अगत्याचे ठरते. कोणताही शेतकरी त्याने तावून-सुलाखून घेतलेले वाण व त्यांचे अनुभवांच्या कसोटीस उतरलेले बी-बियाणे एकाएकी बदलत नसतो. दुसरे म्हणजे, नवीन वाणांच्या वाढीसाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा पोत, सिंचन, औषधे व खते यांसारख्या आनुषंगीक बाबींच्या पुरवठ्याची यंत्रणा गावपातळीपर्यंत सिद्ध होण्यावर नवीन वाणांचा स्वीकार व वापर अवलंबून राहील. यासाठीदेखील गावपातळीपर्यंतची विस्तार यंत्रणा मजबूत करणे आणि शेतक-यांच्या प्रशिक्षणाची यंत्रणा कार्यान्वित करणे अगत्याचे ठरते. सन २०२२ सालापर्यंत शेतकरी वर्गाचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन याच सरकारने २०१४ साली पहिल्यांदा सत्ता हाती घेतली तेव्हा दिले होते. आता, या १०९ नवीन वाणांद्वारे शेतक-यांच्या उत्पन्नात नेमकी किती भर आणि तीदेखील केव्हा पडणार हे सरकारच जाणे !



ज्या प्रकारे आपल्या देशात नागरी वाढविस्तार घडून येतो आहे त्यांपायी मोठ्या शहरांना भाजीपाला, दूधदुभते, फळफळावळ यांचा पुरवठा दूर अंतरावरून करणे अनिवार्य ठरते. ही बाब ध्यानात घेऊन, मोठ्या शहरांच्यामध्ये भाजीपाल्याच्या उत्पादनाची केंद्रे (क्लस्टर्स) निर्माण करण्याचा मानस आहे. वास्तविक पाहता, ही कल्पना शरद पवार यांनी त्यांच्या कृषिमंत्रिपदाच्या काळात मांडलेली होती. वस्तुतः, ही कल्पना अतिशय उपयुक्त व ग्राहक आणि शेतकरी या उभयतांच्या हिताचे रक्षण करणारी असली तरी ती व्यवहारात आणावयाची तर तिची सांगड नागरी विस्ताराच्या सुबद्ध नियोजनाशी घातली जाणे अगत्याचे ठरते. आजमितीस, मोठ्या शहरांच्या झालर क्षेत्रातील खेड्यांचे नागरी वस्तींमध्ये अतिशय वेगाने रूपांतर घडून येते आहे. महानगरांच्या परीघावरील गावांमधील लागवडीखालील क्षेत्रे अत्यंत झपाट्याने बांधकामांखाली येत आहेत. शहरांच्या लोकसंख्येमध्ये अवास्तव भर अव्याहतपणे पडत राहण्याचा हा अपरिहार्य परिणाम होय. अशा वेळी, महानगरांच्या नजीक भाजीपाल्याच्या उत्पादनाची संकुले प्रवर्तित करण्याच्या संकल्पनेची व्यवहार्यता तरी व्यवस्थितपणे तपासली आहे किंवा नाही, याचीच शंका येते. त्याऐवजी, मोठ्या नगरा-महानगरांना ज्या ग्रामीण उत्पादन केंद्रांमधून भाजीपाला व फळफळावळे, दूधदुभते यांचा पुरवठा होतो त्या क्षेत्रांमध्ये वाहतूक, दळणवळण, साठवणूक, प्रक्रिया, शीतकरण, वातानुकुलीत वाहनांद्वारे वाहतुकीच्या सुविधा यांसारख्या आनुषंगीक बाबींमध्ये गुंतवणूक घडत राहावी या दृष्टीने ठोस पावले उचलली जाणे अधिक संयुक्तिक ठरले असते.

जगाच्या पाठीवरील सर्वांत तरूण लोकशाही असा लौकिक व महिमा असणा-या आपल्या देशात आज ज्वलंत समस्या आहे ती बेरोजगारीची. देशातील एकंदर रोजगारापैकी जवळपास ७० ते ७५ टक्के रोजगार हा अल्प उत्पादकता, अल्प मेहेनताना व अल्पकौशल्ये या तीन वैगुण्यांनी व्यापलेल्या असंघटित क्षेत्रामध्ये एकवटलेला आहे. संघटित उद्योगांच्या क्षेत्रामध्ये रोजगारनिर्मिती नव्याने होण्याचा वेग एकतर अतिशय कमी आहे आणि दुसरे म्हणजे जो काही रोजगार तिथे निर्माण होतो तो प्राप्त करून घेण्यासाठी विविक्षित अशा उच्च शिक्षण-प्रशिक्षणाने होतकरू उमेदवार सक्षम बनलेला असणे आवश्यक असते. संघटित उद्योगांमध्ये रोजगार संधी वाढाव्यात यासाठी या अर्थसंकल्पात कामगार आणि कारखानदार या दोघांना प्रोत्साहन मिळेल अशा एकंदर पाच योजनांचे ऐलान केलेले आहे. या योजना आणि त्यांतून सूचित होणारी दिशा योग्य असली तरी देशातील बेरोजगारीच्या समस्येची मुळे ज्या वास्तवात रुजलेली आहेत त्या समस्येची काहीच तड त्यांद्वारे लागत नाही. ज्या योजना अर्थमंत्र्यांनी प्रस्तावित केलेल्या आहेत त्या मुख्यतः उद्योगांच्या संघटित क्षेत्रात ज्यांना पहिलावहिली नोकरी अथवा नियुक्ती मिळालेली आहे अशा नवनियुक्त होतकरूंची ती नोकरी टिकून राहण्यासाठी निकडीच्या असणा-या क्षमतावर्धनाला हातभार लावणा-या आहेत. परंतु, आपल्या देशात सर्वांत गंभीर समस्या आहे ती श्रमदलातील सर्वाधिक मोठ्या तरूण होतकरूंच्या निकृष्ट आणि/किंवा पुरत्या हरपलेल्या रोजगारक्षमतेचीच. अशा तरूण-तरूणींचा उद्योगांच्या संघटित क्षेत्रातील प्रवेशच

उद्योगांच्या प्रशिक्षणविषयक गरजांशी विसंगत शिक्षण व कारखान्यांमध्ये आवश्यक असणा-या कौशल्यांचा पूर्ण अभाव यांपायी असंभव ठरतो.

दुस-या शब्दांत सांगायचे तर, रोजगाराच्या शोधात आणि विवंचनेत असलेल्या तरूण-तरूणींच्याबाबतीत आजघडीची मुख्य समस्या आहे ती चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार पदरात पाडून घेण्याची आणि मिळालेला रोजगार टिकवून धरण्याची. तांत्रिक परिभाषा वापरायची तर ही समस्या आहे अनुरूप असे ' एन्ट्री लेव्हल' दर्जेदार शिक्षण-



प्रशिक्षण रोजगाराच्या शोधात असणा-या तरूण-तरूणींना न मिळण्याची ही समस्या दूर करायची तर आजघडीला नितांत गरज आहे ती उद्योगव्यवसायांचे क्षेत्र आणि उच्च शिक्षणाचे क्षेत्र यांच्यादरम्यानच्या आज पूर्णतः हरपलेला सांधा नीट पूर्ववत जुळवण्याची. म्हणजेच, आज खरी गरज आहे ती उद्योगांच्या प्रशिक्षित मनुष्यबळविषयक गरजा ध्यानात घेऊन आपल्या देशातील उच्च शिक्षण-प्रशिक्षणाच्या व्यवस्थेत योग्य ते बदल घडवून आणण्याची. त्या दिशेने या अर्थसंकल्पात काहीच विचार दिसत नाही. या संदर्भात एकमात्र काय तो उल्लेख या अर्थसंकल्पात आहे तो देशभरातील एक हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सक्षमीकरणाचा आणि त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याबाबतचा. पुन्हा ती तरतूदही 'जखम घोट्याला आणि मलम नाकाला' या धाटणीचीच आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडणा-या उमेदवारांची रोजगारक्षमता मुख्यतः अवलंबून राहते ती त्यांना तिथे शिकवलेला अभ्यासक्रम कितपत अद्ययावत आहे आणि प्रशिक्षित मनुष्यबळविषयक अशा उद्योगांच्या ज्या गरजा आहेत त्यांची पूर्तता तो अभ्यासक्रम कितपत करतो त्यांवर. पुन्हा, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केल्या जाणा-या शिक्षणप्रणालीमध्ये प्रत्यक्ष कार्यानुभवाला किती महत्व दिले जाते आणि असे प्रत्यक्षानुभवाधारित प्रशिक्षण तिथे शिकणारे छात्र ज्या यंत्रसामग्रीवर प्राप्त करून घेतात ती यंत्रसामग्री कितपत अद्ययावत आहे, हा यातील सर्वांत कळीचा भाग शाबूत होतो. आज व्यापक अनुभव असा आहे की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रत्यक्ष अनुभवाधारित प्रशिक्षणादरम्यान वापरली जाणारी यंत्रसामग्री व अभ्यासक्रमाचा भाग असणारे तंत्रज्ञान व प्रत्यक्ष उद्योगांमध्ये प्रस्थापित असणारी यंत्रसामग्री व उपयोगात आणले जाणारे तंत्रज्ञान यांत प्रचंड दरी नांदताना दिसते. परिणामी, अगदी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून बाहेर पडलेले होतकरू कारखान्यात नियुक्त करून घेण्याबाबत उद्योजक नाखूषच असतात. कारण, उमेदवारांनी कमावलेली कौशल्ये आणि कारखान्यांत प्रत्यक्ष यंत्रे हाताळण्यासाठी आवश्यक असणारी क्षमता यांचाच मेळ बसत नाही. अशा उमेदवारांना शिकाऊ कामगार म्हणून घेण्यासाठी, सरकारने अगदी शिष्यवृत्या दिल्या तरी, उद्योगधंदे अनुत्सुक असतात कारण शिकाऊ उमदेवार त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान नाना प्रकारचे खर्च उद्योगाच्या पुढ्यात मांडून ठेवतात. एक तर शिकणा-या कामगाराच्या कामाचा वेग निष्णात कामगाराच्या तुलनेत अतिशय कमी भरतो. दुसरे म्हणजे, प्रत्यक्ष यंत्रावर काम शिकत असताना उत्पादनासाठी लागणा-या कच्च्या मालाची शिकाऊ कामगाराकडून नासाडी होत राहते. ते अपरिहार्यच असते.

हे सगळे बघता औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या सक्षमीकरणामध्ये सर्वाधिक भर दिला जाणे अगत्याचे ठरते ते अशा संस्थांमधील यंत्रसामग्री, उपकरणे, औजारे अद्ययावत बनवण्यावर. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील केवळ अभ्यासक्रम सुधारत बसण्याने फारसे काही हसील होणार नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षण सुविधांचे, प्रयोगशाळांचे, त्यांतील उपकरणांचे, अन्य सुविधांचे अद्ययावतीकरण आणि तेथील शिक्षक प्रशिक्षकांचेदेखील सक्षमीकरण याला सर्वोच्च महत्व दिले जाणे गरजेचे ठरते. हे करत असतानाही या प्रत्येक टप्प्यावर उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांचा सक्रिय सहभाग असणे अतिशय आवश्यक ठरते. परंतु, गंमत

म्हणजे अर्थसंकल्पातील तपशीलानुसार या तरतुदीचा मुख्य व एकमात्र भर राहणार आहे तो औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यावर. हे आवश्यक असले तरी पुरेसे मात्र अजिबातच नाही. भरीव वित्तीय तरतूद निकडीची आहे ती औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या इमारती, प्रशिक्षण सुविधा, प्रशिक्षणासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री, प्रयोगशाळा यांचे सर्वांगीण सक्षमीकरण व सुधारणा घडवून आणण्यासाठी. याबाबत मात्र अर्थसंकल्पात अवाक्षरही नाही !

देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्जाच्या एका योजनेचे ऐलान या अर्थसंकल्पात आहे. हीदेखील मोठी गंमत वाटावी अशीच बाब. मुळात, तरूणांची रोजगारक्षमताच उच्च शिक्षणाच्या प्रचलीत व्यवस्थेद्वारे सक्षम बनत नसल्याने नोकरी पदरात पाडून घेतानाच त्यांची दमछाक होते. अशा तरूणांनी




शैक्षणिक कर्जाची जोखीम, भले अगदी सवलतीच्या व्याजदराने कर्जे उपलब्ध करून दिली तरी, कशाच्या बळावर घ्यावी ? शिक्षित तरूणांची रोजगारक्षमता दर्जेदार आणि उद्योगघटकांच्या प्रशिक्षणविषयक गरजांशी सुसंगत पद्धतीने बुलंद बनत नाही तोवर शैक्षणिक कर्जाच्या सुविधेची व्यवहारातील उपयुक्तता मर्यादितच राहील. दुसरे म्हणजे, समजा, उद्या अनेक तरूण-तरूणींनी या योजनेचा लाभ घेतला आणि त्यांना पुरेसे उत्पादक व दर्जेदार रोजगार दुर्दैवाने उपलब्ध नाही झाले तर अशा उमेदवारांनी ही कर्जे फेडावी तरी कशी ? परिणामी, न फिटलेल्या त्या थकित कर्जांच्या समस्येचा सामना करण्याचा अनवस्था प्रसंग बँका व कर्जदार उमेदवार या दोघांच्याही पुढ्यात उभा ठाकेल. त्याची वाट काय ? एकंदरीनेच बेरोजगारी आणि तिला कारणभूत ठरणारा रोजगारक्षमतेचा घाऊक अभाव अशा दोहोंसंदर्भातील या अनेक पैलूंबाबत अर्थसंकल्पाच्या रचनेदरम्यान पुरेसे सखोल व संवदेनशील चिंतन-मनन झालेले नाही, असे म्हणणेच क्रमप्राप्त ठरते. 'विश्वगुरू ' होण्याचे स्वप्न बघणा-या मानसिकतेला ही बाब भूषणावह नक्कीच नाही.

नागरीकरणाच्याबाबतीत केवळ आशिया खंडातच नव्हे तर एकंदर जगभरातच अतिशय वेगाने प्रगतिपथावर असणारा एक देश म्हणून भारताचे नाव आज घेतले जाते. आर्थिक विकासाची सर्वसाधारण प्रक्रिया आणि नागरीकरणाचा विस्तार या दोन बाबी परस्परांच्या हातात हात घालून गतिमान होत असतात. निकोप पद्धतीने आगेकूच करणारे नागरीकरण दमदार आर्थिक वाढविकासाला हातभारच लावते. त्यांमुळे, वेगाने अवतरत असलेल्या नागरी वाढविस्ताराचे व्यवस्थापन आपण किती कार्यक्षमपणे करतो त्यांवर भविष्यातील विकासाचे रंगरूप अवलंबून राहील यात शंकाच नाही. शहरांना आर्थिक विकासाची इंजिने असे संबोधले जाते. ते खरेही आहे. परंतु, घडून येणारी नागरी वाढ कशा प्रकारे आकार व रंगरूप धारण करते त्यांवर उद्याची शहरे ही विकासाची इंजिने ठरणार की समस्यांची आगरे बनणार हे सर्वस्वी अवलंबून राहते. आणि नेमक्या याचबाबतीत सन २०२४- २५ या वित्तीय वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात सूचित झालेली धोरणदृष्टी पूर्णतः हुकलेली आहे. नागरीकरणासंदर्भात अर्थसंकल्पीय विवेचनात प्रगट झालेल्या धोरणदृष्टीवर 'नापास' हाच एकमात्र शिक्का शोभून दिसावा.

येत्या काळातील नागरीकरणाच्या वाढविस्ताराचे व्यवस्थापन करण्यासंदर्भात अर्थसंकल्पीय भाषणामध्ये 'ब्राउनफिल्ड अर्बनायझेशन' आणि 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेन्ट' या दोन संज्ञा-संकल्पनांचा करण्यात आलेला निर्देश केवळ धडकी भरवणारा असाच आहे. नागरीकरणाचा

विकास व त्या विकासाचे व्यवस्थापन अस्तित्वातील शहरांच्या पुनर्निर्माणाद्वारे घडवून आणणे याला 'ब्राउनफिल्ड अर्बनायझेशन' असे संबोधतात. अस्तित्वात असलेल्या शहरी जमिनींचा अधिक सघन वापर, हा 'ब्राउनफिल्ड अर्बनायझेशन' या संकल्पनेचा वास्तवातील अर्थ. ज्या ठिकाणी पूर्वी बंगले होते त्यांचे रूपांतर प्रथम अपार्टमेन्ट्स्मध्ये आणि त्याच अपार्टमेन्ट्स्चे रूपांतर कालांतराने अनेक मजल्यांच्या टॉवर्समध्ये घडून येणे अथवा आणले जाणे, हा 'ब्राउनफिल्ड अर्बनायझेशन' या संकल्पनेचा दृश्य परिणाम होय. या प्रकारच्या नागरी विकासाद्वारे निष्पन्न होणा-या लाभ-हानीचे वाटप समाजाच्या विविध घटकांमध्ये बहुतांश विषम पद्धतीने होत राहते. मुदलात उखळ पांढरे होते ते बांधकाम व्यावसायिकांचे. महागड्या टॉवर्समध्ये निवासी गाळे खरेदी करणे ज्या शहरी घटकांना






परवडते त्यांच्या आनंदाला उधाण येते. तर, शहरी जमिनींच्या अशा सघन वापरापायी निवासी घरांच्या शहरी बाजारपेठांमध्ये एकंदरीनेच घरांच्या किमती वाढण्याने घरे खरेदी करणे आवाक्याबाहेर गेलेल्या समूहांच्या तोंडाला पार पाने पुसली जातात. याहीपेक्षा अधिक कळीचा मुद्दा म्हणजे भविष्यकालीन नागरी विकासाची ही दृष्टी गर्दी, गोंगाट, हवा-पाणी- आवाज यांचे भयानक प्रदूषण, वाहतूक कोंडी, घनकच-याचे साचलेले ढीग, प्रचंड गर्दी... यांपायी आजची जिकीरीचे बनलेले नागरी वास्तव अधिक भयाण बनवणारी अशीच आहे. आज खरी गरज आहे ती येत्या काळातील नागरी वाढविस्तार विकेंद्रीत पद्धतीने घडवून आणण्यावर भर देण्याची. मोठ्या शहरांवरच विकासाचा सारा भर एकवटण्यापेक्षा आपल्या देशातील लहान आकाराच्या नागरी केंद्रांचे सक्षमीकरण घडवून आणण्यावर शहरविकासाच्या धोरणाचा झोत, वास्तविक पाहता, राखला जाणे अत्यावश्यक ठरते आहे. या सगळ्याबाबत मात्र हा अर्थसंकल्प पुरता बधीर आहे, असे म्हणण्याखेरीज अन्य पर्यायच नाही.

जी बाब 'ब्राउनफिल्ड अर्बनायझेशन' संलग्न धोरणदृष्टीची तीच बाब 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेन्ट' संलग्न धोरणदृष्टीबाबतची. विकसित अर्थव्यवस्थांमध्ये आजकाल चर्चा आहे ती 'कॉम्पॅक्ट सिटीज्' या संकल्पनेची. एकेकाळी, विकसित देशांमध्ये नागरी विकासाचे जे 'मॉडेल' हिरिरीने राबविले गेले त्याचा भर होता उपनगरीय वाढविस्तारावर. मात्र, इंधनांच्या किमतींमध्ये सतत वाढ होऊलागली आणि हळूहळू पश्चिमी राष्ट्रांना तिथवर भुरळ पाडणा-या आडव्या, उपनगरीय वाढविस्तारावर भर देणा-या नागरी विकासाचे आकर्षण तिथे एकदम उतरणीला लागले. मग सगळे भाषा बोलायला लागले ते आकाराने आटोपशीर भासणा-या, अधिक एकात्म व संमिश्र भू-वापराचा अंगीकार - पुरस्कार करणा-या 'कॉम्पॅक्ट' शहरांच्या विकासाचा. 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेन्ट' ही नेमकी तीच संकल्पना. या संकल्पनेचे आजच्या स्थितीतील मोठ्या शहरांमध्ये उपयोजन घडवून आणणे म्हणजे आजच लोकसंख्येच्या हाताबाहेर गेलेल्या घनतेमध्ये अधिक भर घालणे. पदपथांवरून चालताना जिथे कसरत करावी लागते अशा आपल्या मोठ्या शहरांची 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेन्ट' या संकल्पनेच्या अंमलबजावणीद्वारे उद्या काय अवस्था होईल याची केवळ कल्पना केली तरी अंगावर काटा उभा राहतो...! एकूण काय तर, मर्यादित अर्थ आणि चाचपडता, अपरिपक्व संकल्प असे केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या या ताज्या दस्तऐवजाचे स्वरूप झाले आहे!!

■■

# मोदी सरकार आगीतून फुफाट्यात!

व्यंकटेश केसरी



लोकसभा निवडणुकीत लागलेला झटका, त्यानंतर विधानसभा पोटनिवडणुकीत बसलेला फटका आणि आता केंद्रीय अर्थसंकल्पात दिसून आलेली सरकारची मजबुरी ही लक्षणे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या भाजपची कमजोरी दाखविणारी आहेत. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले खरे पण त्यांची मांड बसली नाही,सरकार स्थिर नाही हे या अर्थसंकल्पाने दाखवून दिले आहे. बिहार आणि आंध्रप्रदेशावर तिजोरी ओतणे याचा अर्थ नितीश कुमार यांचा जनता दल ( युनाइटेड) आणि चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देशम पक्षाशिवाय मोदी सरकार चालू शकत नाही असा संदेश पूर्ण देशाला नाही तर आंतरराष्ट्रीय जगतात गेला आहे. म्हणजे मोदी सरकारच्या किल्ल्या सत्तारूढ आघाडीतील प्रादेशिक पक्षाच्या हाती आहेत हे लपून राहिले नाही. नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू हे राजकारणातले कसलेले खेळाडू आहेत. राजकारणातील निर्णयाचे त्यांचे 'टायमिंग' सहसा चुकत नाही. आघाड्या बदलण्याचा त्यांचा अनुभवही मोठा आहे . म्हणून नरेंद्र मोदी अति सावध आहेत. नरेंद्र मोदी यांचा जम बसू द्यायचा नाही यासाठी भाजप विरोधक जेवढे प्रयत्नशील आहेत तेवढेच नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू हे सुद्धा आहेत. कारण ज्या क्षणी नरेन्द्र मोदी यांच्या हाती नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू यांच्याशिवाय सरकार चालविण्याची कुंजी लागेल त्याक्षणी नितीश कुमार,चंद्राबाबू नायडू यांची उपयुक्तता संपेल. बिजू जनता दल, शिवसेना (उद्धव ठाकरे),शिरोमणी अकाली दल यांना मोदी यांनी कसा झटका दिला, अन्ना डी.एम.के., जगमोहन रेड्डी यांच्या वाय,एस, आर. काँग्रेस पार्टीला भाजपने कसे झटकले हे ताजे आहे.

नरेंद मोदी यांच्या तिसऱ्या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पाने केंद्र आणि राज्यातील तणाव वाढणार हे स्पष्ट झाले आहे. भाजपविरोधी सरकार असणाऱ्या राज्यांना अर्थसाह्य करण्यात मोदी सरकार किती पक्षपाती आहे हे संसदेच्या दोन्ही सभागृहात झालेल्या चर्चेत दिसून आले. केंद्र आणि राज्यात असे तणाव असणे,त्याला खतपाणी घालणे याचा अर्थ सरकार आगीशी खेळत आहे असा होतो. याचे गंभीर परिणाम पुढे होतील याची जाणीव स्वतः मोदी अथवा भाजपला असण्याचे काही कारण नाही. कारण त्यांना परिस्थितीचे गांभीर्य नाही. विरोधकांवर ई.डी.,, सी,बी.आय., इन्कम टॅक्सचा वापर करणे, सूडबुद्धीने सरकार चालविणे, भ्रष्टाचारांना भाजपत घेऊन अभय देणे,मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकण्याने देशातले वातावरण तसेही स्फोटक बनले आहे.



या सरकारकडे आर्थिक कार्यक्रम नाही, हे सरकार रोजगार निर्माण करू शकत नाही,महागाई रोखू शकत नाही हे साऱ्या देशाला कळून चुकले आहे. डॉ मनमोहन सिंग यांच्या पहिल्या अर्थसंकल्पाने (१९९१ सालच्या ) देशाचे अर्थकारण बदलले. पी.व्ही नरसिम्हराव यांच्या अल्पमतातील सरकारने विकासाचे वारे खेळवले. तशी दूरदृष्टी, प्रश्नांची जाण, सहमतीचे राजकारण करणे लोकसभेत पूर्ण बहुमत असूनही नरेंद्र मोदी यांना गेल्या दहा वर्षात जमले नाही आणि जमणारही नव्हते. त्यामुळे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे त्यावेळेचे बजेट उठले नाही. बिहार, आंध्र प्रदेशाला झुकते माप मिळाले याबद्दल आकस नाही पण आमच्यासाठी हात आखडता का ? हा इतर राज्यातून विचारलेल्या प्रश्नांना सरकार समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. या बजेटमुळे मोदी सरकारची अवस्था "आगीतून फुफाट्यात " पडल्यासारखी झाली आहे. महाराष्ट्र,हरियाणा .झारखंड विधानसभेच्या निवडणुका ऐन तोंडावर आहेत. या बजेटच्या आधारे या तीन राज्यात मत मागण्याची हिम्मत भाजपमध्ये नाही. महाराष्ट्रातले उदयोग गुजरात मध्ये पळवल्याने नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्रात आधीच

बदनाम झाले आहेत,हरियाणामध्ये भाजपला आधीच झटका बसला आहे तर झारखंड,बिहार मध्ये मोदी यांच्या हिंदुत्वाचे कार्ड चालत नाही. तेथे निवडणुकीत जात चालते आणि ते नाणे मोदी यांच्याकडे नाही.

संसदेच्या ताज्या अधिवेशनात भाजप, त्याचे नेते,केंद्रीय मंत्री काळवंडलेले दिसले. ते कशामुळे ? याचे उत्तर त्यांना माहित आहे. खाजगी क्षेत्रात गुंतवणूक होत नाही कारण ती केल्याने फायदा होणार नाही हे कॉर्पोरेट क्षेत्राला कळले आहे. मोदी सरकारचे मंत्री मंडळ 'जैसे थे' आहे, ते बोल्ड निर्णय घेऊ शकत नाही आणि परिस्थितीच्या दडपणाखाली ते घेतले तरी त्याला संपूर्ण देशातून पाठिंबा मिळणार नाही कारण नरेंद्र मोदी यांची संकुचित दृष्टी,सूडबुद्धीने वागण्याची वृत्ती. २००१ पासून (गुजरातचे मुख्यमंत्री ते देशाचे पंतप्रधान) २०२४ पर्यंत निरंकुश सत्ता राबविणाऱ्या नरेंद्र मोदी यांना त्यांची भाषा, कार्यशैली बदलावी लागत आहे. संसदेत त्यांना अमित शहा यांच्याशिवाय कोणावर विसंबून राहता येत नाही कारण त्यांचा कोणावर विश्वास नाही. पण अमित शहा हे विरोधी पक्षांशी संवाद करू शकत नाहीत कारण त्यांची उग्र प्रकृती, तोडफोडीचे राजकारण,आक्रमक भाषा यामुळे त्यांच्याशी बोलणार कोण ? राजनाथ सिंग, नितीन गडकरी यांचा विरोधी पक्षांशी संवाद आहे पण त्यांच्यावर नरेंद्र मोदी यांचा विश्वास नाही .

हे मोदी सरकार नाही तर एन.डी.ए.चे सरकार आहे असा मेसेज सत्तारूढ आघाडीतून सध्यातरी दिला जात आहे. याचा अर्थ आघाडीतील घटक पक्षांना खुश ठेवणे, विरोधी पक्षांशी संवादाचे चॅनल सुरु करणे असा होतो. कारण आघाड्याची सरकार चालविण्यासाठी हेच कामाला येते. फ्लोअर मॅनेजमेंट महत्वाचे असते. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, जसवंत सिंग, यशवंत सिन्हा ,प्रमोद महाजन, व्यंकय्या नायडू, सुषमा स्वराज, अरुण जेटली असे नेते होते. हे सर्व संघटनेच्या मुशीतून तयार झालेले,संसदीय राजकारण, प्रथा, परंपरा यांच्याशी परिचित होते. मोदी आणि शहा यांच्यात राष्ट्रीय दृष्टिकोन,कार्यशैलीचा अभाव दहा वर्षांनंतरही दिसून येतो.याचे कारण त्यांचे राष्ट्रीय स्तरावरील राजकारण, संसदीय जीवनच मुळी २०१४ सुरु होते. आपल्यातला न्यूनगंड लपविण्यासाठी ते अधिकाधिक आक्रमक होताना दिसतात.

नरेंद्र मोदी यांच्या समोरची आव्हाने भविष्यात अधिक उग्र होण्याची चिन्हे आहेत. लोकसभेत बहुमत राखणे याचा अर्थ तडजोड, घेवाण -देवाण करणे,विरोधकांशी संवाद साधणे, विरोधी पक्षांच्या राज्य सरकारांना विश्वासात घेणे,पक्षांतर्गत विरोधक कमी करणे असा होतो. पण सर्वात



# सहन होत नाही आणि सांगताही येत नाही...

**सत्तेत येऊन इतके दिवस लोटले तरी नरेंद मोदी सरकारला नवी नवलाई येत नाही, सारे कसे जुने-पुराणे दिसत आहे. त्यांचे मंत्री मंडळ जुन्या भांड्यांना कलई केल्यासारखे आहे तर अर्थसंकल्प गुळगुळीत झालेल्या नाण्यासारखा.सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झालेल्या नरेंद मोदी यांचे सरकार 'काळजीवाहू' वाटते, दिसते. या सरकारचा लगाम कुणाच्या हाती आहे ते निर्मला सीतारामन यांच्या अर्थ संकल्पाने दाखविले.लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालने भाजपला हिसका दाखविला. उत्तर प्रदेश मध्ये मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या एकट्यावर पराजयाचे खापर फोडता येत नाही आणि पराभवाची सामूहिक जबाबदारी असेल तर सरकार आणि संघटनेत आमूलाग्र बदल करावे लागतील पण ते केले तर खुद्द नरेंद्र मोदी आणि त्यांचे विश्वासू केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याकडे ही बोट दाखविले जाईल. कारण या पराभवात त्यांचाही वाटा आहे. प्रचार यंत्रणा ,उमेदवाराची निवड यात केंद्रीय नेतृत्वाचा वाटा मोठा. म्हणजे मोदी शहा यांची अवस्था ' सहन होत नाही आणि सांगताही येत नाही ' अशी झाली आहे. आणि महाराष्ट्रात तर हरलेल्या टीमला घेऊन त्यांना विधान सभेची निवडणूक लढवावी लागणार आहे. भाजपकडे नवा चेहरा नाही, नवी टीम नाही , नवे मुद्दे नाहीत. महायुतीतील घटक पक्षांना सत्ता, संपत्तीची चटक लागली आहे. निवडणुकीनंतर ते कुणाशीही घरोबा करतील ही भीती नरेंद्र मोदी-अमित शहा यांना आहे. या पूर्वी त्यांना तीन पक्षांच्या - राष्टवादी काँग्रेस (शरदच्चन्द्र पवार), काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) --महाविकास आघाडीशी लढावे लागत होते पण आता एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी भाजपच्या पायात पाय घालत आहे. पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने दिलेला जमाल गोटा भाजप विसरू शकत नाही. भाजपला जे .पी .नड्डा यांच्या जागी नवा अध्यक्ष निवडायचा आहे. मोदी आणि शहा यांना या पदावर त्यांचा 'होयबा' पाहिजे पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून त्याला हिरवा झेंडा दाखविला जात नाही. येत्या काही महिन्यांनी होणाऱ्या महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड विधानसभा निवडणुकात भाजप हरली तर पक्षात बंडाचे वारे वाहू लागेल काय ? मोदी-शहा यांना उघडपणे आव्हान मिळेल काय ? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाल्या आहेत.**



महत्वाचे म्हणजे स्थायी स्वरूपात रोजगार निर्मिती करणे आणि महागाई नियंत्रित करणे हे आहे. मोदी सरकार नोकऱ्या कोठून देणार, कधी देणार? हे जर स्पष्ट झाले नाही तर त्यांचे सरकार कोसळायला वेळ लागणार नाही. कारण देश आता हिंदू-मुस्लिम मानसिकतेतून बाहेर येत आहे.आरक्षण देण्यासाठी अर्थव्यवस्था मजबूत पाहिजे,सोई-सवलतीने सरकार फार काळ चालविता येणार नाही.

तिसऱ्यांदा सत्तेत येऊनही मोदी सरकारची दिशा स्पष्ट नाही, इच्छाशक्ती दिसत नाही, रेल्वे अपघातात वाढ होत आहे,बिहार मध्ये दणादण पूल कोसळत आहेत, काश्मीर खोरे शांत नाही,मणिपूर धुमसत आहे, नरेंद्र मोदी संसदेत येतात पण लोकसभा, राज्य सभेत दिसत नाहीत. मागच्या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला आणि या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या कार्यशैलीतील फरक स्पष्ट दिसू लागला आहे . विरोधी पक्ष घाईत नाहीत. जो पर्यंत सत्तारूढ आघाडीतील अंतर्विरोध बाहेर येणार नाहीत तो पर्यंत आम्ही काहीही करणार नाही, आम्हाला घाई नाही. मोदी सरकारची विश्वासार्हता जशीजशी कमी होईल तसे तसे देशाचे राजकारण बदलत जाईल. पण आजच्या घडीला सरकारवर दबाव आहे.. तो जसा प्रबळ विरोधी पक्षांचा आहे तसाच तो उग्र होणाऱ्या आर्थिक प्रश्नांचं,

सामाजिक तणावाचाही आहे.

## भाजपत अस्वस्थ शांतता

पंतप्रधान नरेंद मोदी यांना खरा धोका कोणाकडून? तो विरोधी पक्षांकडून नाही कारण त्यांच्याकडे सरकार बदलण्यासाठी लागणारे संख्या बळ नाही , तो सत्तारूढ आघाडीतील घटक पक्षांकडून नाही कारण सत्तेत जे मिळते ते बाहेर पडून मिळण्याची ग्यारंटी त्यांना नाही पण मोदी यांना भविष्यातून आव्हान मिळेल ते त्यांच्या भाजप मधून. मोदी यांच्या नावावर मत मिळत नाही , सत्ता येत नाही हे एकदा स्पष्ट झाले की त्यांच्यावर कोण उलटेल, केंव्हा उलटेल हे मोदी यांना कळणार ही नाही.लोकसभा निवडणुकीत दणका बसल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने इशारे देण्यास सुरुवात केली आहे. कधी ते 'ऑर्गनायझर', 'पांचजन्य ' मधून दिले जातात तर कधी संघ नेत्यांच्या भाषणातून. पण महाराष्ट्र, झारखंड,



हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत मोदी यांचे नाणे चालले नाही तर ...? मोदी यांच्या कारकिर्दीत भाजपच्या दुसऱ्या, तिसऱ्या फळीतील नेत्यांना चेहराच नाही आणि तशा नेत्यांना पदे देऊन मोठे करण्यात आले आहे. भाजपचे मध्य प्रदेश, छत्तीसगड,राजस्थान, गुजरात,हरियाणा,उत्तराखंड या राज्यातील मुख्यमंत्र्यांना चेहराच नाही. आसामचे मुख्यमंत्री कॉंग्रेस मधून फुटून आले आहेत तर उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना आवरणे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना कठीण जात आहे.शिवराजसिंग चौहान हे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री असताना लोकप्रिय झाले.त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने विधानसभा जिंकली,लोकसभा जिंकली आणि त्यानंतर मोदी यांनी त्यांची मध्य प्रदेशातून उचलबांगडी केली. देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर भाजप महाराष्ट्रात निवडणूक लढू शकत नाही.

अटल बिहारी वाजपेयी-लालकृष्ण आडवाणी यांच्या



काळात भैरोसिंग शेखावत, कल्याणसिंग, शांताकुमार, रमण सिंग, वसुंधरा राजे, मदनलाल खुराणा, येदियुरप्पा, शिवराजसिंग चौहान, केशूभाई पटेल असे प्रभावी मुख्यमंत्री होते तर संघटनेत सुंदरसिंग भंडारी, कुशाभाऊ ठाकरे, प्रमोद महाजन, सुषमा स्वराज, के.एन.गोविंदाचार्य, अनंतकुमार, व्यंकय्या नायडू, उमा भारती आदी नेते होते. नवे नेतृत्व तयार करण्याचे स्ट्रक्चर मोदी यांनी हेतुपुरस्सर तोडले कारण अशा नेत्यातून आपणाला आव्हान मिळू शकते, प्रतिस्पर्धी तयार होतात हे त्यांना माहिती होते. म्हणजे आता भाजप मध्ये मोदी-शहा यांच्याशिवाय दुसरा तालेवार नेता नाही. जे आहेत ,ते सारे 'एस सर' म्हणणारे आहेत.

लोकसभा निवडणुकीत भाजपला झटका बसताच पक्षातील नेतृत्वाची दिवाळखोरी देशासमोर आली. मोदी यांचे राजकीय उत्तराधिकारी अमित शहा आहेत आणि त्यांनाच मोदी




# भाजपच्या खेळ्या चुकल्या

**लोकसभा निवडणुकीत भाजपच्या हातून अयोध्या निसटली, विधानसभा पोटनिवडणुकीत बद्रीनाथ गेले, वाराणसीतून नरेंद्र मोदी यांचे मताधिक्य घसरले ,मोदी यांचे बजरंगबलीचे नाणे कर्नाटक विधान सभा निवडणुकीत साफ आपटले आणि लोकसभा निवणुकीसाठी त्यांच्यावर एच.डी.देवेगोवडा यांच्या जनता दलाशी (सेक्युलर ) युती करण्याची पाळी आली. भाजपच्या खेळ्या चुकू लागल्या आहेत आणि या पुढच्या काळात त्या आणखी चुकतील .कारण आपण कुठे चुकलो याचे आत्मपरीक्षण करण्याची सवय मोदी -शहा यांना नाही. आपण सत्तेत पूर्ण पाच वर्षे राहू असे जरी भाजप म्हणत असला तरी त्याची ग्यारंटी स्वतः मोदी देऊ शकत नाहीत हे बजेट मध्ये दिसले आणि त्याची झलक संसदेच्या अधिवेशनातही पाह्यला मिळाली. लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्य सभेचे सभापती यांच्या कार्यशैलीत ही बदल जाणवत आहे.**

यांना पंतप्रधान करायचे आहे असे जाहीररीत्या सांगून 'आप' चे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी भाजपत संशयाचे मायाजाल फैलावले आहे. त्याचे प्रभावीपणे खंडन भाजपकडून झाले नाही .आणि आता तर अमित शहाच पक्ष चालवत आहेत आणि सरकार मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे नेते झाले आहेत.

भाजपत अस्वस्थ शांतता आहे. पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी भाजपला संघाची गरज नाही,भाजप आपल्या पायावर उभा आहे, आपल्या बळावर निवडणुका जिंकतो असे विधान करून संघाला डिवचले आहे. जो भाजप 'दुहेरी सदस्यत्व' या मुद्द्यावरून जन्माला, जनता पार्टीतून फुटला तो आता मोदी राजवटीत स्वतःला संघापेक्षा मोठा मानू लागला आहे. याबद्दल कोणी जाहीरपणे बोलत नाही याचा अर्थ भाजपत सगळे आलबेल आहे असे नाही.





# पीठासीन अधिकाऱ्यांच्या नि:पक्षतेवर प्रश्नचिन्ह

विरुपाक्ष दास

सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर १८वी लोकसभा अस्तित्वात आली. लोकसभा निवडणुकीत स्वबळाचे बहुमत प्राप्त न झाल्याने भाजपला आघाडीचे संयुक्त सरकार स्थापन करावे लागले. संयुक्त जनता दल आणि तेलगु देशमच्या निर्णायक पाठिंब्याने सरकार स्थापन झाले. स्वघोषित परमेश्वरी अवतार तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. या गोष्टीचाही त्यांनी गवगवा करण्यास मागेपुढे पाहिलेले नाही. त्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या मंत्रिमंडळात काही किरकोळ बदल म्हणजेच तेलगु देशम व संयुक्त जनता दलाच्या मंत्र्यांचा समावेश वगळता फार मोठे बदल दिसून आले नाहीत. त्यांच्या गेल्या मंत्रिमंडळातीलच प्रमुख चेहरे जसेच्या तसे कायम राखण्यात आले. नावीन्याचा अभाव असलेले मंत्रिमंडळ त्यांनी स्थापन केले. यानंतर त्यांच्या सरकारने कामकाजही सुरु केले. परंतु एकंदर मंत्रिमंडळाचे स्वरुप लक्षात घेता अवतार पुरुषांनी यथास्थिती (स्टेटस को) कायम राखणे पसंत केले. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या धोरण, नीती आणि कार्यपध्दतीतही पडणे अपरिहार्य आहे. याचप्रमाणे त्यांनी सतराव्या लोकसभेचे संचालन करणारे लोकसभा अध्यक्ष ओम बिडला यांचीच १८व्या लोकसभेचे अध्यक्ष म्हणून फेरनिवड केली. यापूर्वी बलराम जाखड यांनी सलग दोनवेळा लोकसभेचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यानंतर ओम बिडला हे देखील लागोपाठ दुसऱ्यांदा लोकसभेचे अध्यक्ष झालेले आहेत.

ओम बिडला यांनी १७व्या लोकसभेचे संचालन केले. त्यावेळी भाजपकडे स्वबळाचे बहुमत (३०३) होते आणि त्यामुळे त्याचे अपरिहार्य प्रतिबिंब ओम बिडला यांच्या सभागृहाच्या संचालनात पडणे स्वाभाविक होते. त्यामुळेच अनेक वेळेस त्यांचे निर्णय वादग्रस्त ठरले आणि त्यांची ती कारकिर्दही विवादास्पद ठरली होती असे निरीक्षण अनेक तज्ज्ञांनी नोंदविले आहे. त्यामुळेच ओम बिडला यांची लोकसभेच्या अध्यक्षपदी म्हणजेच पीठासीन प्रमुख म्हणून झालेली फेरनिवडही यथास्थितीच दर्शविते. त्याचाच दुसरा अर्थ हाही होतो की त्यांच्या सभागृह संचालनाच्या शैलीत किंवा पध्दतीतही त्या यथास्थितीचे प्रतिबिंब असणेही अपरिहार्यच होणार आहे. याचा पुरावा त्यांच्या फेरनिवडीच्या दिवशीच सर्वांना मिळाला.

लोकसभेच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर प्रथेप्रमाणे सभाहातील सर्वपक्षीय नेत्यांतर्फे त्यांच्या गौरवपर भाषणे झाली. त्या गौरवपर भाषणांना त्यांनी उत्तरही दिले. सर्वसाधारण पध्दतीप्रमाणे यानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब होणे अपेक्षित होते. परंतु अचानक बिडला यांनी उभे राहून एक ठराव वाचण्यास सुरुवात केली. हा पन्नास वर्षांपूर्वी देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती त्यासंदर्भातील ठराव होता आणि त्या काळात नागरी स्वातंत्र्यांची गळचेपी झाली होती व राज्यघटनेचे उल्लंघन करण्यात आले असल्याचे उल्लेख त्या ठरावात करण्यात आले होते आणि आणीबाणीचा त्यात निषेध करण्यात आला होता. हे सर्व अचानक, अकस्मात घडले होते. त्यामुळे विरोधी पक्षही काहीसे हतबुध्द झाले होते. बेसावध अवस्थेत असताना एखादा हल्ला अकस्मात व्हावा तसाच हा प्रकार होता. या ठरावात आणीबाणी लागू करणाऱ्या त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा उल्लेख होता आणि त्यांचा निषेधही करण्यात आलेला होता. हा ठराव थेट अध्यक्षांकडून मांडला गेला असल्याने काँग्रेसची अवस्था विलक्षण अडचणीची झाली होती. तरीही त्यांनी ठरावाला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. काँग्रेसची अवघडलेली अवस्था पाहून सत्तापक्षाला विलक्षण असुरी आनंद होणेही स्वाभाविक होते. परंतु मुळात लोकसभा अध्यक्षांची ही कृति संसदीय औचित्याला धरुन होती काय हा स्वाभाविक प्रश्न या प्रकरणात निर्माण होतो. संसदीय कामकाज आणि प्रक्रिया यांचे अध्ययन करणाऱ्या अनेक तज्ज्ञांनी

लोकसभा अध्यक्षांची ही कृति पूर्वग्रहाने प्रेरित असल्याचे मत नोंदविले आहे. याला काही कारणे आहेत. लोकसभा अध्यक्षांना सभागृहाच्या संचालनाबाबत निर्विवाद असे अधिकार असले तरी जेव्हा एखादा ठराव सभागृहात मांडायचा असतो त्याआधी त्या ठरावावर सर्वपक्षीय गटनेत्यांना त्याची पूर्वकल्पना दिली जाते. कारण सभागृह केवळ सत्तापक्षाचे नसते किंवा सभागृहावर केवळ सत्तापक्षाचे वर्चस्व नसते. सभागृह हे सर्वपक्षीय असते आणि प्रत्येक सदस्य हा सभागृहाचा घटक असल्याने त्याच्याशी संबंधित प्रक्रियांबाबत त्याला माहिती अनिवार्य असते. हा ठराव ज्या गनिमी काव्याने मांडला गेला तो सर्वच प्रकार संशयास्पद, अनुचित आणि अतिआक्षेपार्ह होता. कारण असा ठराव मांडण्याबाबत ओम बिडला यांनी सर्वपक्षीय नेत्यांबरोबर कोणतीही चर्चा केलेली नव्हती किंवा तशी पूर्वकल्पना देखील दिलेली नव्हती. ही त्यांची एकतर्फी कृतीच संसदीय सभ्यता, शिष्टाचार आणि संकेतांशी सुसंगत नव्हती. त्यामुळे ओम बिडला यांच्या अध्यक्षपदाची दुसरी कारकिर्द ही अशा कडवट व अतिअनुचित कृतीने झालेली आहे हे येथे नमूद करावे लागेल. आता ही कृति त्यांनी स्वतः होऊन केली की कुणाच्या सांगण्यावरुन किंवा प्रेरणेवरुन व हेतुपुरस्सरपणे केली याचा उलगडा ते स्वतःच करु शकतील. परंतु या त्यांच्या कृतिमागे कुणाची प्रेरणा असली तरी तांत्रिकदृष्ट्या त्याची जबाबदारी सर्वस्वी त्यांच्यावरच जाते. त्यामुळे या अनुचित गोष्टीमागे कुणाची प्रेरणा असो वा नसो याचा ठपका सर्वस्वी ओम बिडला यांच्यावरच ठेवावा लागेल.

ओम बिडला यांच्या गौरवपर भाषणांमध्ये विशेषतः विरोधी पक्षांच्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना या आता जगजाहीर झालेल्या आहेत. जवळपास प्रत्येक विरोधी नेत्याने त्यांच्या गेल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या अधिवेशनात त्यांनी एका झटक्यात विरोधी पक्षांच्या सदस्यांना निलंबित केले त्या कारवाईचा उल्लेख केला. नुसता उल्लेख केला नाही तर ती कारवाई अयोग्य होती हेही स्पष्टपणे सांगून त्याची पुनरावृत्ती या नव्याने सुरु झालेल्या त्यांच्या दुसऱ्या कारकिर्दीत होणार नाही अशी अपेक्षाही व्यक्त केली.

वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांची पहिली कारकिर्द ही विवादास्पद ठरली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांनी विरोधी पक्ष आणि सत्तापक्षाच्या सदस्यांबाबत वेगवेगळे व भिन्न मापदंड अवलंबिले त्याचा उल्लेख करावा लागेल. सत्तापक्षाच्या सदस्यांना एक वागणूक आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांबाबत मात्र अतिकठोर वागणूक असे प्रकार या काळात घडले. त्याचबरोबर एका महत्वाच्या घटनात्मक बंधनाचे पालनही त्यांच्या पहिल्या कारकिर्दीत झाले नव्हते आणि कदाचित त्याचीच पुनरावृत्ती या वेळेस म्हणजे १८व्या लोकसभेतही होते की काय अशी शंका आता येऊ लागली आहे. कारण राज्यघटनेचे सर्रास उल्लंघन करण्यात वर्तमान राज्यकर्त्यांचा हात कुणीच धरु शकणार नाही. टोकाचा कोडगेपणा असलेले हे राज्यकर्ते आहेत. राज्यघटनेतील कलम ९३ नुसार लोकसभेच्या अध्यक्षांच्या निवडीनंतर लवकरात लवकर उपाध्यक्षांची (डेप्युटी स्पीकर) निवड करण्याचे बंधन नमूद करण्यात आले आहे. यात खऱ्या संसदीय लोकशाही संकेतानुसार अध्यक्षपद सत्तापक्षाकडे तर उपाध्यक्षपद विरोधी पक्षांकडे देण्याची प्रथा, परंपरा किंवा शिष्टाचार असतो. परंतु १७व्या लोकसभेत उपाध्यक्षपदच पाच वर्षे न भरता रिकामे ठेवण्याचा उच्चांक करण्यात आला. याबद्दल अध्यक्ष या नात्याने ओम बिडला यांनी कधी निवदेन केलेले नव्हते. त्यांनी देखील याबाबत भूमिका घेतली नाही. स्वघोषित अवतारी पुरुषांनी संसदेत संविधान किंवा राज्यघटनेची मूळ प्रत कपाळाला लावून त्यास अभिवादन करण्याचे सरस नाटक वठविले होते परंतु ज्या राज्यघटनेने लोकसभेला उपाध्यक्ष असला पाहिजे अशी तरतूद केलेली आहे तिची पूर्तता मात्र न करता विशुध्द निगरगट्टपणाचा परिचय त्यांनी दिलाच. परंतु लोकसभेच्या अध्यक्षांनी देखील त्याबाबत मौन बाळगून त्या निगरगट्टपणावर शिक्कामोर्तबच केले असे म्हणावे लागते. आता हीच भूमिका या नव्या म्हणजे १८व्या लोकसभेतही पुढे कायम चालू राहणार की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण अर्थसंकल्पी अधिवेशन पूर्ण होऊनही उपाध्यक्षांच्या निवडीबद्दल कुणीच काही बोलताना आढळत नाही.

ओम बिडला यांच्या पहिल्या कारकिर्दीत काही अनिष्ट प्रथांना प्रारंभ झाल्याचे मानले जाते. विशेषतः विरोधी पक्षांचे सदस्य किंवा नेते बोलत असताना त्यांचे माईक म्हणजे ध्वनिक्षेपकच बंद करण्याची एक अत्यंत अभद्र प्रथा सुरु करण्यात आली. लोकसभेत कोणाही सदस्याला भाषण करण्याची मुभा असली तरी त्याला त्यासाठी विशिष्ट वेळ दिलेली असते आणि तेवढ्या वेळेत किंवा मिनिटांमध्ये त्याने त्याचे भाषण पूर्ण करणे अपेक्षित असते. परंतु अनेकवेळेस सदस्यांना दिलेल्या वेळेपेक्षा काही वेळ अधिक लागू शकतो. तेवढा अधिक वेळ देणे लोकसभा अध्यक्षांकडून अपेक्षित असते. परंतु गेल्या लोकसभेत विरोधी सदस्यांना दिलेली वेळेची मर्यादा संपल्यानंतर त्यांचे माईक म्हणजेच ध्वनिक्षेपक त्वरित बंद केले जात असत. या प्रकाराचा विरोधी पक्षांनी अनेक वेळेस निषेध केला परंतु यामध्ये ना बदल झाला ना सुधारणा. एवढेच नव्हे तर विरोधी पक्षांचे सदस्य बोलत असताना संसद टीव्हीवर त्या सदस्याला न दाखविता कॅमेऱ्याचा फोकस केवळ लोकसभा अध्यक्षांवरच कसा राहील आणि त्यांचीच छबी संसद टीव्हीवर कशी दिसेल हे पाहिले जात असे.

आणखीही काही वादग्रस्त गोष्टी त्यांच्या पहिल्या कारकिर्दीत झाल्या. बहुजन समाज पक्षाचे सदस्य असलेले दानिश अलि यांना भाजपचे एक सदस्य रमेश बिधुडी यांनी त्यांच्या धर्माचा उल्लेख करुन काही अत्यंत प्रक्षोभक आणि अभद्र अशी टिप्पणी केली होती. या प्रकरणी विरोधी सदस्यांनी आरडाओरडा करुनही बिडला यांनी रमेश बिधुडी यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. बिधुडी यांनी पुन्हा अशा अभद्र टिप्पण्या केल्यास त्यांना कडक कारवाईला तोंड द्यावे लागेल अशी केवळ तोंडी समज देऊन बिडला यांनी हे प्रकरण मिटविले. त्यामुळेच वर उल्लेख केल्याप्रमाणे सत्तापक्षा म्हणजेच भाजपच्या सदस्यांसाठी त्यांच्या लेखी एक नियम होता तर विरोधी सदस्यांबद्दल मात्र ते अत्यंत अनुदार, ताठर व कठोर अशी भूमिका घेत.


सतराव्या लोकसभेत त्यांच्या अध्यक्षतेखाली पाच वर्षात २२१ विधेयके लोकसभेत मंजूर करण्यात आली. परंतु उपलब्ध

माहितीनुसार त्यातील एक तृतीयांश विधेयके ही एक तासापेक्षा कमी वेळ चर्चा होऊन संमत करण्यात आली होती. तेरा टक्के विधेयकांवर केवळ एक ते दोन तास चर्चा झाली होती. तर बावीस टक्के विधेयकांवर दोन ते तीन तास चर्चा करण्यात आली होती. केवळ सोळा टक्के विधेयके संबंधित मंत्रालयाशी संलग्न संसदीय स्थायी समित्यांकडे छाननीसाठी पाठविण्यात आली होती. युपीए म्हणजे मनमोहनसिंग सरकारच्या काळात विधेयके संसदीय स्थायी समित्याकडे छाननी करण्याची प्रमाणे साठ ते सत्तर टक्के होते व त्या तुलनेत बिडला यांच्या काळात हे प्रमाण पाचपटीने खालावले हे विशेषत्वाने लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. बिडला यांच्या प्रमाणेच त्यांच्या आधीच्या लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांनी केवळ २८ टक्के विधेयके पाच वर्षात संसदीय स्थायी समित्यांकडे छाननीसाठी पाठवली होती. ज्याप्रमाणे सुमित्रा महाजन यांनी त्यांच्या कारकिर्दीत एकाही स्थगन प्रस्तावाला मंजुरी दिली नव्हती त्याचाच कित्ता बिडला यांनी गिरवत त्यांच्या पाच वर्षांच्या ाकरकिर्दीत विरोधी पक्षांच्या एकाही स्थगन प्रस्तावाला मंजुरी दिली नाही आणि सरकारला पेचात धरण्यासाठीचे एक महत्वाची संसदीय हत्यार पार नष्ट करुन टाकले. त्यामुळेच बिडला यांचे त्यांच्या दुसऱ्या कारकिर्दीतील प्रारंभीचे आचरण पाहता ते पूर्वीपेक्षा वेगळे आचरण करतील अशी अपेक्षा करणे काहीसे धाडसाचे ठरेल.

ओम बिडला हे फारसे बदललेले नसले तरी लोकसभेचे स्वरुप मात्र आता बदलले आहे. या लोकसभेत विरोधी पक्ष चांगलाच सशक्त आहे आणि त्याची चुणुक या पहिल्या अधिवेशनात मिळालेली आहे. आता बिडला यांना विरोधी पक्षांवर वरवंटा चालविणे फारसे सोपे जाणार नाही. आता त्यांना आक्रमक विरोधी पक्षांना झेलावे लागणार आहे. त्याचबरोबर त्यांच्या पक्षपाती धोरणामुळेही त्यांच्याबद्दल विरोधी पक्षांच्या मनात अढी निर्माण झालेली आहे व ती कायम आहे. अर्थसंकल्पी अधिवेशनातच आणखी दोन घटना किंवा प्रसंगांचा उल्लेख करता येईल ज्यावरुन बिडला यांच्या आचरणात फरक पडलेला नसल्याचे आढळून आले. मात्र आता विरोधी पक्ष कमजोर व दुर्बळ राहिलेले नाहीत. मतदारांनी विरोधी पक्षांना सत्तापक्षाच्या तुल्यबळ केले आहे. त्यामुळे बिडला यांना देखील आता त्यांच्या आक्रमकपणाला लगाम घालावा लागत आहे. त्यांनी थोडा जरी पक्षपातीपणा केला की विरोधी सदस्य त्यांना स्पष्टपणे त्याची जाणीव देताना दिसतात. तृणमूल काँग्रेसचे सदस्य अभिषेक बॅनर्जी हे अर्थसंकल्पावर बोलत होते. त्या भाषणात त्यांनी नोटाबंदीचा उल्लेख केला. नोटबंदीमुळे झालेल्या अर्थव्यवस्थेच्या अपरिमित हानिबद्दल ते बोलू लागताच बिडला यांनी त्यांना मध्येच हटकले आणि २०१६ मध्ये घडलेल्या या गोष्टीचा ताज्या अर्थसंकल्पाशी काय संबंध आहे आणि वर्तमान अर्थसंकल्पावर बोला असे त्यांना सांगू लागले. त्याबरोबर बॅनर्जी यांनी बिडला यांना उलटे सुनावले. जेव्हा सत्तापक्षाचे म्हणजेच भाजपचे सदस्य साठ सत्तर वर्षापूर्वीच्या नेहरूंबद्दल वाटेल ते बोलत असतात तेव्हा तुम्ही त्यांना रोखत नाही आणि आम्हाला २०१६च्या नोटाबंदीवर बोलताना रोखत आहात असा पक्षपात करु नका असे सुनावताच बिडला यांचा चेहरा पाहण्यासारखा झाला. काही सदस्यांनी त्यांना पन्नास वर्षांपूर्वीच्या आणीबाणीविरुध्दच्या ठरावाबद्दलही विचारणा केली. बिडला यांना बदललेल्या आणि सशक्त विरोधी पक्षांची चुणुक यानिमित्ताने मिळाली. राहूल गांधी यांनी देखील त्यांच्या भाषणाच्या वेळी त्यांचा माईक बंद केला जात असल्याची तक्रार केली असता बिडला यांनी माईकचे बटण त्यांच्याकडे नाही असे सांगून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. परंतु लोकसभेतील कोणत्याही गोष्टीला लोकसभा अध्यक्ष जबाबदार असतात आणि त्यांच्या परवानगीविना माईक बंद होत असेल तर ती बाब अत्यंत गंभीर अशा हक्कभंगाची होऊ शकते याचे भान बिडला यांना राहिले नाही. बिडला यांना त्यांच्या कार्यपध्दतीत बदल करावा लागणार आहे हे स्पष्ट आहे अन्यथा एक नवाच संसदीय संघर्ष निर्माण होऊ शकतो.

राज्यशेबतही काही वेगळे चित्र नाही. राज्यसभेचे सभापति जगदीप धनखड यांनीही विरोधी पक्षांकडे दुर्लक्ष करण्याचा उच्चांक केला आहे. केवळ सत्तापक्षाला झुकते माप देणे, सत्तापक्षाच्या सदस्यांनी काहीही केले तरी त्याची दखल न घेणे मात्र विरोधी सदस्यांच्या हातून किंचितशी जरी चूक झाली की त्यावर त्यांना समज द्यायची असले प्रकार तेही करीत आहेत. उपराष्ट्रपति हा राज्यसभेचा पदसिध्द सभापति असतो. याआधी ते पश्चिम बंगालचे राज्यपाल होते आणि त्या कारकिर्दीत त्यांनी तेथील मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना अक्षरशः छळून काढले होते. हे त्यांनी मोदी–शहा जोडगोळीच्या केंद्र सरकारच्या पाठबळाने केले होते हे उघड आहे. त्यांनी हा छळ कार्यक्रम इतका व्यवस्थित पार पाडला होता की त्या कामगिरीने समाधानी झालेल्या स्वघोषित परमेश्वरी अवताराने त्यांना थेट उपराष्ट्रपतिपदासाठी निवडले आणि त्यामुळे त्यांच्याकडे राज्यसभेची धुरा आली. विरोधी सदस्यांना बोलू न देण्याचा त्यांनी चंगच बांधला असावा असे वाटते. सर्वसाधारणपणे पीठासीन प्रमुख किंवा अध्यक्ष म्हणजेच सभापति हे कमीतकमी बोलणारे असतात आणि आवश्यकता निर्माण होईल तेव्हाच ते बोलतात असा संसदीय प्रघात आहे. परंतु धनखड हे स्वतःच इतके बोलतात की सत्तापक्षाच्या सदस्यांना वेगळे बोलण्याची आवश्यकता भासत नाही. धनखड स्वतःच विरोधी पक्षांच्या भाषणांमध्ये अडथळे आणताना दिसतात. त्यांच्या सवयीमुळेच अलीकडेच काही विरोधी सदस्यांनी सभापतीच सभागृहात अवाजवी बोलत असतात अशी तक्रार केली. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि त्यांच्यातील शाब्दिक चकमकी व खटके नेहमीच होतात. खर्गे यांचा विधिमंडळ आणि संसदीय कामाचा अनुभव प्रदीर्घ आहे. परंतु त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असूनही धनखड हे खर्गे यांच्यावर सतत टिप्पणी करीत राहतात. नीट परीक्षांमधील गैरव्यवहारावर सभागृहात चर्चा करण्याची मागणी खर्गे यांनी केली होती. खर्गे उभे राहून धनखड यांचे लक्ष वेधू पहात होते आणि तरीही धनखड यांनी सोयीस्करपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने खर्गे संतप्त झाले आणि त्यांनी सहकारी विरोधी सदस्यांसह सभागृहाच्या मध्यभागी म्हणजे सभापतींच्या आसनासमोर जाऊन ओरडून त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर धनखड यांनी खर्गे यांच्या

कृतीचा निषेध करुन सभागृहाच्या आणि संसदीय इतिहासात खुद्द विरोधी पक्षनेत्याने त्याची जागा सोडून सभापतींच्या आसनापुढे येऊन आरडाओरडा करण्याचा प्रसंग घडला नव्हता. ही तुमची कृति निषेधार्ह आहे वगैरे वगैरे तोंडसुख घेतले. खर्गे यांनीही मग त्यांना सुनावले की तुम्ही विरोधी पक्षनेता उठून तुमचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत असताना जाणूनबुजून दुर्लक्ष करीत होता मग आमच्याकडेही असे करण्याखेरीज पर्याय राहिला नव्हता. धनखड यांना त्यांच्या उमेदीच्या काळापासून पाहिले आहे. मोठ्या नेत्यांच्या समोर ते किती पुढेपुढे करीत असत याचा अनुभव अनेक जुन्या पत्रकारांना आहे. मोठ्या नेत्यांसमोर नको इतके झुकण्याची त्यांची सवय वादग्रस्त ठरली. पंतप्रधानांच्या समोर ते अशा रीतीने झुकतात की त्याची टिंगल होऊ लागली. गेल्या लोकसभेत सदस्यांच्या सरसकट निलंबनाच्या विरोधात विरोधी पक्षांचे सदस्य जेव्हा संसदेच्या आवारात निदर्शने करीत होते तेव्हा तृणमूल काँग्रेसचे आक्रमक खासदार कल्याण



बॅनर्जी यांनी धनखड यांच्या नेत्यांसमोर अतिझुकण्याच्या सवयीची चक्क नक्कल केली होती. हा प्रकार संसदेच्या आवारात होता पण सभागृहात नव्हता. अर्थात हे थोडे अतीच झाले होते. धनखड यांची अशा रीतीने टिंगल करण्याबद्दल बॅनर्जी. तृणमूल काँग्रेसचा आणि सर्व विरोधी पक्षांचा भाजपने तर निषेध केलाच परंतु खुद्द राष्ट्रपतींनीही त्याबद्दल खेद व्यक्त केला होता. असे असले तरी ही पाळी का यावी याचे आत्मचिंतन धनखड यांनीही करायला हवे होते. आपण कुणाच्या टिंगलीचा विषय होऊ नये याची खबरदारी त्या व्यक्तीने स्वतः घेणे आवश्यक असते. उपराष्ट्रपतिपद हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे पद आहे. ज्येष्ठतेमध्ये ते पंतप्रधानांच्या देखील वर असताना त्या पदाच्या प्रतिष्ठेला शोभेल असेच आचरण ते पद भूषविणाऱ्या व्यक्तीकडून अपेक्षित असते. परंतु ते न करता काहीतरी अवाजवी आणि अनैसर्गिक अशा पध्दतीचे आचरण कुणी करीत असेल तर त्याची टिंगल ही होणारच. अगदी ताजे उदाहरण म्हणजे त्यांनी रा.स्व.संघाची केलेली जाहीर वारेमाप स्तुति हे आहे. केंद्र सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना संघाच्या कामात सहभागी होण्याची मुभा दिली. म्हणजे त्यावर असलेली बंदी उठवली. हा निर्णयही एकप्रकारे आक्षेपार्ह आहे. परंतु धनखड यांनी एका समारंभात या निर्णयाचे समर्थन करतानाच संघ ही एक निर्विवाद सचोटीची संघटना असल्याचे प्रमाणपत्रही देऊन टाकले. धनखड यांची नजर राष्ट्रपतिपदावर आहे. त्यामुळे त्यांना असे वाटत आहे की भाजप नेतृत्वाच्या पुढेपुढे केले, संघाटी भलावण केली तर ते पद आपल्याला मिळू शकते. परंतु ते भ्रमात आहेत.

लोकसभेचे अध्यक्षपद किंवा राज्यसभेचे सभापतीपद यापूर्वी खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि अनुभवसंपन्न व्यक्तींनी भूषविले होते. यातील सर्वचजण विद्वान होते असे नाही किंवा त्यांच्या हातून चुका झाल्या नाहीत असेही नाही. परंतु २०१४ नंतर संसदेत पक्षपातीपणा आणि भेदभाव करण्याचा जो उघड आणि कोडगा प्रकार सुरु झाला आहे तो चिंताजनक आहे. विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचे होणारे प्रकार म्हणजे संसदीय लोकशाहीचा गळा घोटण्याचाच प्रकार आहे. त्यातच पत्रकारांना संसदेत मज्जाव करण्याचा प्रकार तर घटनेच्या आणि लोकशाहीच्या विरुध्द आहे. एखादी व्यवस्था आतूनच कशी निकामी करायची आणि त्यासाठी त्या व्यवस्था किंवा यंत्रणेतीलच कच्च्या दुव्यांचा वापर किंवा गैरवापर कसा करयाचा याचा आदर्श वस्तुपाठ गेल्या दहा वर्षात पाहण्यास मिळत आहे. लोकशाहीचे सोंग पांघरायचे आणि आपण लोकशाही मानतो असे ढोंग करायचे असा हा प्रकार आहे. परंतु मतदार आणि जनता समजूतदार आहे. तिला ही सर्व सोंगढोंग कळून चुकलेली आहेत. याचा जेव्हा अतिरेक होतो तेव्हा जनता न्याय करते आणि तो न्याय निष्ठूर असतो हे बहुधा या मंडळींना ताज्या निवडणूक निकालांनी देखील लक्षात आलेले दिसत नाही. संवाद, सामंजस्य, सहकार्य, समन्वय, संयम, सर्वसंमती या मूल्यांच्या आधारे संसदीय लोकशाही सुरळीतपणे चालते. चर्चा व ती देखील खुली चर्चा हा या व्यवस्थेचा आत्मा असतो. परंतु सरकारवर टीका करता येणार नाही, पंतप्रधानांवरील टीका चालणार नाही अशा एकांगी आणि एखाधिकार पध्दतीने संसदेचे संचालन करणे हे या लोकशाहीचे अधःपतन ठरेल. त्या दिशेने वाटचाल सुरु आहे की काय अशी शंका भेडसावू लागली आहे.

■■

शरद पवार याचे उद्गार

# नवीन पिढी कर्तृत्ववान



आजचा हा सोहळा अतिशय महत्त्वाचा सोहळा आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती आहे. पुढचं वर्ष हे सबंध देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये लोकांनी दिलेली सत्ता ही लोकांच्या भल्यासाठी कशी वापरायची याचा आदर्श ज्या महामातेने आपल्या सगळ्यांच्या समोर दिला त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा सन्मान आणि स्मरण करण्याचा हा प्रसंग असणार आहे.

या देशामध्ये राजे-रजवाडे अनेक होऊन गेले. पण फार थोडे राजे-रजवाडे असे आहेत जे जाऊन शंभर-दोनशे-तीनशे-चारशे वर्ष झाली तरी सामान्य माणसांच्या अंत:करणातून त्यांच्या बद्दलची आस्था कधी कमी होत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करता येईल. देशात राजे अनेक होऊन गेले. पण तीनशे वर्ष होऊन गेल्यानंतरही जर कुणी सामान्य माणसाचं राज्य प्रस्थापित केलं असेल आणि ते राज्य कधी भोसल्यांचं राज्य म्हणून सांगितलं नाही, तर ते राज्य रयतेचं राज्य म्हणून सांगितलं... असा राजा कोणता असेल तर त्यांचं नाव युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आहे.

हा इतिहास आहे या देशाचा आणि असंच की या देशामध्ये अनेक कर्तृत्ववान महिला जन्माला आल्या. संकटं आली, त्या संकटावर मात करून आपल्या हातामध्ये नेत्याने जी सत्ता दिली आहे ती सत्ता, ते राज्य 'रयतेचं राज्य' म्हणून चालवण्याचा आदर्श कोणत्या महाकर्तृत्ववान महिलेनं या देशामध्ये केला असेल तर पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. हे काम उभ्या आयुष्यभर अहिल्यादेवींनी केलं. व्यक्तिगत संकटं आली, त्याची चिंता कधी केली नाही, राज्य हातात घेतलं, समर्थपणानं चालवलं. विकास नावाचं चित्र देशासमोर मांडलं. आज आपण काय सांगतो? काय हवं असतं लोकांना? अन्न, पाणी आणि तत्सम गोष्टी. देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये कष्ट करणाऱ्या, मेहनत करणाऱ्या माणसाला कुठंही जायचं असेल आणि वेळप्रसंगी तहान लागली... पिण्याचं पाणी हवं असेल तर देशाच्या कानाकोपऱ्यात जलसाठे, पाण्याच्या विहिरी निर्माण करून उपेक्षिताना सबंध पाणी पुरवण्याचं काम एक जबाबदार राज्यकर्ते म्हणून अहिल्यादेवींनी अग्रक्रमाने केलं. रयतेच्या

# बनविण्यावर लक्ष देऊया



हाताला काम पाहिजे आणि म्हणून वस्त्रोद्योगाचा व्यवसाय कसा करता येईल यामध्ये त्यांनी लक्ष घातलं. त्याचबरोबर कर्तृत्व दाखवलं, शौर्य दाखवलं आणि त्यामुळे आज आपण अभिमानाने अहिल्यादेवींचं स्मरण करत असतो.

मला स्वतःला अतिशय आनंद आहे की आज बारामतीत हा सोहळा दिमाखाने साजरा करण्यासाठी तुम्ही सर्वांनी विशेष कष्ट घेतलेत आणि नव्या पिढीला एक आदर्शवत व्यक्तीच्या जीवनातून प्रेरणा घेण्याची औचित्य निर्माण केलंत त्याबद्दल मी तुम्हा सर्वांना अंतःकरणापासून धन्यवाद देतो.

आज धनगर समाज हा देशातला एक अत्यंत कष्टाळू, महत्त्वाचा आणि देशासाठी खस्ता खाणारा हा समाज आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात धनगर समाजाचं योगदान मोठं होतं. बारामतीचा तुम्ही अभ्यास करा. या बारामतीमध्ये स्वातंत्र्याची चळवळ झाली त्या स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये अनेक लोक सहभागी झाले. त्याची मालिका जर बघितली तर आजही मला आठवतं कि इथे जे ॲड. मोरे साहेब उपस्थित आहेत त्यांचे सासरे जगन्नाथराव कोकरे स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये तुरुंगात गेले होते आणि या देशाचं स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी त्यांनी खस्ता खाल्या आहेत. अशी अनेकांची नाव सांगता येतील.

आज तुम्ही लोकांनी मला राजकारणामध्ये गेले ५०- ६० वर्ष साथ दिलीत. माझ्या सुरुवातीच्या काळामध्ये मोठ्यांशी संघर्ष होता पण त्यावेळेला सामान्य कुटुंबातले अनेक लोक माझ्या पाठीशी मजबुतीने उभे राहिले. पणदऱ्याला गेलो तर गुलाबबापूंचं नाव, विठ्ठलराव कोकरेंच

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त बारामती येथे १८ जुलै रोजी आयोजित 'अभिवादन मेळाव्यात' राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी उपस्थितांशी साधलेला संवाद...**




नाव, खोमणेंच नाव अशी अनेकांची नावं सांगता येतील त्या सगळ्या लोकांनी जिवाभावाचे सहकारी म्हणून त्या माझ्या सुरुवातीच्या काळामध्ये पूर्ण शक्ती, ताकद ही माझ्यामागे उभी केली आणि त्याचमुळे मी राज्यात आणि देशात योगदान देऊ शकलो.

अहिल्यादेवींनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक गोष्टी केल्या त्याचाच आदर्श आज पुढे ठेवला पाहिजे. स्मारकाची चर्चा याठिकाणी केली गेली. जरूर प्रमुख लोकांना बसवून त्याचा काय विचार करायचा हा विचार करू. पण एक गोष्ट लक्षात घ्या, आज तुम्ही बारामतीमध्ये मेडिकल कॉलेज पाहिलंय? या ठिकाणी मेडिकल कॉलेज ५०० कोटी रुपये खर्च करून आज उभं केलेलं आहे आणि ते अहिल्यादेवींच्या नावाने उभं केलंय, हा त्यांच्या कर्तृत्वास शोभेल असा लोकोपयोगी कार्यक्रम राबवला गेला आहे. अनेक संस्था आपण उभ्या केल्या. शेतीच्या क्षेत्रामध्ये काम करणारी कृषी प्रतिष्ठान नावाची संस्था आपण उभी केली. आज मी त्या संस्थेमध्ये जातो तर लहान समाजाची शेकडो मुलं-मुली, अहिल्यादेवींनी ज्यांच्या हिताची जपवणूक करण्यासाठी सातत्याने कष्ट केले त्या समाजाची मुलं- मुली उत्कृष्ट शिकून आज पुढे गेलेली आहेत. माळेगावच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधून अनेक मुलं-मुली शिक्षित होऊन बाहेर पडली. विद्याप्रतिष्ठानमधून हजारो मुलं-मुली आज शिक्षित होऊन बाहेर पडलेली आहेत.

आज खऱ्या अर्थानं अहिल्यादेवींचे स्मरण करायचं असेल तर ही नवीन पिढी कर्तृत्ववान ही कशी होईल आणि ती जीवनामध्ये यशस्वी कशी होईल यामध्ये अधिक लक्ष केंद्रित करणं हेच खऱ्या अर्थाने अहिल्यादेवींचं स्मरण करण्यासारखं आहे. आणि म्हणून त्या कामाला आपण मिळून सतत प्रयत्न करूया, सगळ्यांना बरोबर घेऊया, आदर्श विचार जतन करूया एवढंच याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■





एका जागी राहून देशभर विकासाचे काम कसे करता येते याचा आदर्श देशात जर कुणी उभा केला असेल तर त्यांचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी असे आहे. मध्यप्रदेशातील महेश्वर येथे ३६ वर्षे राहून त्यांनी देशभर विकासाची असंख्य कामे केली. या सर्व कामांची यादी इंदोरच्या राजवाड्यात लावलेली आहे. ही यादी वाचताना आणि पाहताना माणूस थक्क होऊन जातो. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत देशभर त्यांनी समाजोपयोगी असंख्य कामे स्वतःच्या व संस्थानाच्या निधीतून केली आहेत. त्यांनी २७० वर्षापूर्वी नर्मदा नदीला जो घाट बांधला आहे तो आजही जसाच्या तसा आहे. त्याचा एक टवकाही उडालेली नाही. काम निष्ठापूर्वक आणि गुणवत्तेचे केले तर ते किती उत्तम व चिरकाल टिकणारे होऊ शकते याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी नर्मदा नदीला बांधलेला दगडी घाट हे उत्तम उदाहरण आहे. आजच्या राज्यकर्त्यांनी हा काम करण्याचा अहिल्याबाईंचा गुण आवर्जून उचलला पाहिजे. नर्मदा प्रदक्षिणा करणाऱ्या पुरूषाला धोतर व उपरणे आणि महिलेला साडी-चोळी देऊन अहिल्यादेवी त्यांचा सत्कार करीत. या नर्मदा प्रदक्षिणा करणाऱ्या व्यक्तींची सगळी विचारपूस करताना त्याच्या गावात कोणत्या सुविधा नाहीत हे अहिल्यादेवी आवर्जून विचारीत व तो माणूस गावी पोहोचण्यापूर्वी आपली माणसे पाठवून त्या गावातील विकासाचे काम करून टाकीत. अशी राणी कुठेही झालेली नाही.


# ३६ वर्ष एका जागी राहून अहिल्याबाईंचं देशभर काम



# बांगलादेशातील आरक्षण विरोधी आंदोलन

जतीन देसाई

गेल्या महिन्यात (जुलै) बांगलादेशात आरक्षणाच्या विरोधात प्रचंड आंदोलन झालं. भारत आणि बांगलादेशच्या आरक्षणात खूप फरक आहे. जातीच्या आधारे तिथे आरक्षण नाही. बांगलादेशात सरकारी नोकऱ्यात एकूण ५६ टक्के आरक्षण होतं आणि त्यातले ३० टक्के बांगलादेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या वंशजांसाठी आरक्षित होतं. या ३० टक्केच्या विरोधात ढाका, चितागाँग, रंगपुर व इतर शहरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरले. बांगलादेशात शांततापूर्ण चालणाऱ्या आंदोलनाला लवकरच हिंसक स्वरूप मिळत असल्याचा इतिहास आहे. या आंदोलनात देखील तसंच झालं. १५० हून अधिक लोक त्यात मारली गेली. त्यात तीन पत्रकारांचा देखील समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाने पुढाकार घेऊन स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांना मिळणार ३० टक्के आरक्षण कमी करून पाच टक्क्यावर आणलं. इतर वर्गांना मिळणार आरक्षण देखील सर्वोच्च न्यायालयाने कमी केलं आहे. आता स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांसाठी पाच टक्के, वांशिक अल्पसंख्याकांसाठी एक टक्का आणि अपंगासाठी एक टक्का आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने ठेवलं. ९३ टक्के नोकऱ्यात कुठलेही आरक्षण नसणार. सर्वोच्च न्यायालय याचिकेवर ७ ऑगस्टला सुनावणी करणार होते. पण तणाव आणि हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर २१ जुलैलाच सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी केली आणि निकाल पण त्याच दिवशी दिला. पंतप्रधान शेख हसीना आंदोलन सुरू होण्यापूर्वी चीनच्या



दौऱ्याहून नुकत्याच परत आल्या होत्या. विद्यार्थी आणि इतरांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्याऐवजी शेख हसीना यांनी विद्यार्थ्यांची टीका केली व त्यांचा अपमान केला.

१९७१ मध्ये बांगलादेशला मिळालेल्या स्वातंत्र्यात ढाका विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा मोठा वाटा होता. आता त्याच प्रतिष्ठित विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसदारांना सरकारी नोकऱ्यात देण्यात येणाऱ्या आरक्षणाचा विरोध केला. सत्ताधारी अवामी लीगची विद्यार्थी संघटना अवामी छात्र लीगच्या कार्यकर्त्यांनी आरक्षणाला विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर सुरुवातीला हल्ले केले. आंदोलनाला हिंसक स्वरूप मिळालं. बांगलादेशात घडणाऱ्या घटनांची, साहजिकच, भारतात लगेच प्रतिक्रिया उमटते. भारत सरकारने ही बाब बांगलादेशची अंतर्गत आहे, असे स्पष्ट केलं. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हिंसाचारामुळे पळून येणाऱ्या लोकांना आश्रय दिले जाईल, असं म्हटलं. बांगलादेशने ममता बॅनर्जी यांच्या निवेदनाला विरोध केला. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने दुसऱ्या दिवशी कुठल्याही देशाशी असलेल्या संबंधाबद्दल बोलण्याचा अधिकार मात्र केंद्र सरकारला आहे असं सांगितलं. "मला शिकवू नका" अशी प्रतिक्रिया त्यावर ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केली. हे लक्षात ठेवलं पाहिजे की बांगलादेशाच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळात पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील काही राज्यात एकूण जवळपास एक कोटी निर्वासित आले होते. बंगाली भाषा, संस्कृती आणि बंगाली अस्मितेमुळे पश्चिम बंगाल व बांगलादेशच्या लोकांमध्ये एकमेकांबद्दल प्रचंड आपुलकी आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान बंगबंधू शेख मुजीबुर रेहमान सरकारने स्वातंत्रसैनिक आणि काही इतर वर्गासाठी नोकऱ्यात आरक्षणाची तरतूद केली होती. १९७५ मध्ये मुजीबुर रेहमान यांच्या हत्येनंतर आरक्षण स्थगित करण्यात आलं आणि १९९६ मध्ये शेख हसीना पंतप्रधान झाल्यानंतर आरक्षण परत सुरु करण्यात आलं. २०१८ मध्ये या आरक्षणाच्या विरोधात लोक रस्त्यावर उतरली. शेवटी शेख हसीना यांनी आरक्षण रद्द केलं. स्वातंत्र्यसैनिकांच्या काही वारसदारांनी या निर्णयाचा विरोध केला आणि उच्च न्यायालयात याचिका केली. उच्च न्यायालयाने सरकारचा निर्णय रद्द केला आणि म्हटलं की सरकारच्या निर्णयामुळे आधी न्यायालयाने दिलेल्या निकालाचं उल्लंघन होत आहे. याचिकाकर्त्यांची मागणी उच्च न्यायालयाने मान्य केली. त्यानंतर एक जुलै पासून विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केल. बांगलादेशात सरकारी नोकऱ्या मिळणं कठीण झालं आहे. दरवर्षी काही लाख विद्यार्थी पदवीधर होत आहेत आणि साधारण ३,००० सरकारी नोकऱ्या उपलब्ध असतात. अवामी लीगशी संबंधित लोकांना नोकऱ्यात अधिक संधी मिळत असल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या तिसऱ्या पिढ्यांना आरक्षण देता कामा नये ही त्याची भूमिका आहे. जगातल्या सर्व स्वातंत्र्य आंदोलनात सहसा मध्यमवर्गीय पुढे राहिले असल्याचा इतिहास आहे. बांगलादेशात पण मध्यमवर्गीय पुढे होते. स्वातंत्र्यसैनिकांनी








मोठा त्याग केला असल्याची वस्तुस्थिती आहे. परंतु त्यांच्या तिसरा पिढ्यांना आरक्षण देणं कितपत योग्य, असा प्रश्न आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांचा आहे आणि त्यात तथ्य आहे. भारतातल्या आरक्षणाशी म्हणून बांगलादेशच्या आरक्षणाची तुलना होऊ शकत नाही.

शेख हसीना यांची १४ जुलैला एक पत्रकार-परिषद झाली. त्यात त्यांना विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर त्या म्हटल्या," विद्यार्थी स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांना देण्यात येणाऱ्या आरक्षणाचा का विरोध करत आहेत? रझाकारांच्या वंशजांना सगळ्या सवलती मिळाव्यात असं त्यांना वाटत आहे की काय?" रझाकारांचा उल्लेख करून शेख हसीना आंदोलनाला बदनाम करू पाहत होत्या. स्वातंत्र्य युद्धात रझाकारांनी पाकिस्तानच्या लष्कराला बंगाली लोकांवर अत्याचार करण्यात मदत केली होती. पाकिस्तानच्या लष्कराने रझाकार आणि जमात-ए-इस्लामीच्या मदतीने जवळपास ३० लाख बंगाली लोकांची हत्या केली असल्याचं म्हटलं जातं. सुमारे दोन लाख महिलांवर बलात्कार करण्यात आला होता. रझाकार शब्द ऐकून विद्यार्थी अधिक खवळले. त्याच रात्री त्यांनी मोठ्या प्रमाणात निदर्शने केली. विद्यार्थी रझाकारांचे समर्थक नव्हते. पण, सत्ताधारी पक्षाला चिडवण्यासाठी त्यांनी "तुम्ही कोण आहात? मी कोण आहे? रझाकार रझाकार!" अश्या घोषणा दिल्या. आपण रझाकारांच्या विरोधात आहोत, असं विद्यार्थी नेत्यांनी नंतर स्पष्ट केलं. १९७१ च्या स्वातंत्र्य आंदोलनात "आम्ही कोण? बंगाली, बंगाली!" ही घोषणा अतिशय लोकप्रिय झाली होती. बांगलादेशात मध्यमवर्ग मोठा नाही. बहुतेक लोक गरीब आहेत. विद्यार्थ्यांची इच्छा आपला मध्यमवर्गात समावेश व्हावा, ही आहे. त्यासाठी सरकारी नोकऱ्या त्यांना महत्त्वाच्या वाटतात. गारमेंट उद्योगात बांगलादेशने प्रचंड प्रगती केली आहे. तिथले तयार कपडे जगभर मिळतात. मात्र त्यात काम करणाऱ्या कामगारांचे प्रचंड शोषण होत आहे. स्वस्त मजुरीमुळे बांगलादेशच्या तयार कपड्याने मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय बाजारात स्थान मिळवलं आहे. आंदोलनाच्या मागे माजी पंतप्रधान खालेदा झिया यांची बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी (बीएनपी) आणि जमात-ए-इस्लामी असल्याचा आरोप केला गेला. जगाच्या सर्व देशात चालत असलेल्या आंदोलनाचा फायदा घेण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष नेहमी करत असतात. बांगलादेशात या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अवामी लीगचा प्रचंड विजय झालेला. शेख हसीना सलग चौथ्यांदा पंतप्रधान झाल्या. निवडणुकीत विरोधी पक्षाचे उमेदवार जवळपास नव्हते. विरोधी पक्षांच अस्तित्व कुठेही दिसत नव्हतं. खालेदा झिया अनेक वर्ष तुरुंगात होत्या. आता त्या नजरकैदेत आहेत. त्यांचा मुलगा तारिक रेहमान पक्षाचा नेता आहे. तो लंडनला राहतो. बांगलादेशात त्याच्या विरोधात भ्रष्टाचाराचे खटले असल्यामुळे तो पळून गेला आहे. बांगलादेशाच्या परराष्ट्र मंत्रालयाने विद्यार्थ्यांच्या एका वर्गाला बीएनपी आणि जमात चिथावणी देत असल्याचं म्हणणं होत. "युद्धसदृश्य" परिस्थितीत पत्रकारांसाठी काम करणं अवघड असतं. बांगलादेशात या आंदोलनाच्या काळात तीन पत्रकार मारले गेले. बऱ्याचदा निदर्शक आणि पोलिसांमध्ये होणाऱ्या दगडफेकीत व गोळीबारात पत्रकार सापडतात. १८ जुलैला हसन मेहंदी नावाचा ढाका टाइम्स या पोर्टलचा पत्रकार ढाकाच्या जत्राबारी भागात बातमीसाठी गेला असताना त्याच्या छातीवर पोलिसाची गोळी लागली. त्यात त्याचं मृत्यू झालं. १९ जुलैला सिलहट शहरात पोलिसाच्या गोळीबारात अबू ताहेर मोहम्मद तुराब नावाचा पत्रकार मारला गेला. तो नया दिगंत नावाच्या वर्तमानपत्रासाठी काम करायचा. कमिटी फोर द प्रोटेक्शन ऑफ जर्नलिस्टने मोहम्मद शकील हुसेन नावाचा पत्रकार गाजीपुर शहरात मारला गेला, असं म्हटलं आहे. मुख्तादिर रशीद नावाच्या पत्रकारावर गोळी चालवण्यात आलेली पण त्यातून तो वाचला. तो जखमी आहे. अश्या परिस्थितीत बातम्या आणणे सोपे नसते, हे परत एकदा सिद्ध झालं आहे. पत्रकारांमध्ये प्रचंड संताप आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे.

ढाका विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बांगलादेशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात महत्त्वाची भूमिका पार पाडलेली. त्याची सुरुवात एका अर्थाने १९४८ मध्ये झाली होती. पाकिस्तानने उर्दू राष्ट्रभाषा





करण्याचा निर्णय घेतलेला. पाकिस्तानात बंगाली बहुसंख्येने होते. खरंतर पश्चिम पाकिस्तानने घेतलेला हा निर्णय पूर्व पाकिस्तानातील बंगाली लोकांना मान्य नव्हता. तिथे आंदोलन सुरू झालं. त्यांची मागणी बंगाली भाषेला समान दर्जा देण्याची होती. ढाका विद्यापीठातील विद्यार्थी त्यात पुढे होते. २१ मार्च १९४८ ला मोहम्मद अली जिना यांनी ढाका येथे केलेल्या एका भाषणात "उर्दू आणि एक मात्र उर्दू पाकिस्तानची अधिकृत राष्ट्रभाषा असणार आणि उर्दूला विरोध करणारे राष्ट्रविरोधी आहेत," असं म्हटलेलं. पाकिस्तानचे दुसरे पंतप्रधान ख्वाजा नजीमुद्दीन बंगाली होते. पण २७ जानेवारी १९५२ ला त्यांनी ढाका येथे "राष्ट्रीय एकात्मतेसाठी एकमात्र उर्दू राष्ट्रभाषा असणं आवश्यक" असल्याचे सांगितलेले. एका बंगालीने केलेल्या या निवेदनामुळे पूर्व पाकिस्तानातील लोकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. २१ फेब्रुवारी १९५२ ला ढाका विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी बंगालीला समान दर्जा देण्याच्या मागणीसाठी मोर्चा काढला. त्यावर करण्यात आलेल्या गोळीबारात चार विद्यार्थी मारले गेले. यूनेस्कोनी २००० पासून दरवर्षी २१ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. १९७१ च्या बांगलादेशच्या लढ्यात पण ढाका विद्यापीठातील विद्यार्थी पुढे होते. असे हे ढाका विद्यापीठ. आता तिथल्याच विद्यार्थ्यांनी १९७१ च्या लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांना देण्यात येणारे आरक्षण रद्द करण्याची मागणी केली. आपण इतर आरक्षणाच्या विरोधात नाही, असा खुलासा आंदोलनातील विद्यार्थी आणि इतरांनी केला आहे. मानवाधिकाराच्या प्रश्नावर सक्रिय असलेल्या ढाका विद्यापीठाच्या प्रा. आसिफ नजरूल यांनी म्हटलं, "ढाका यूनिव्हर्सिटीचा कुठलाही विद्यार्थी स्वतःला रझाकार म्हणून घेणार नाही." सरकार पोलिसचा उपयोग करून आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. ढाका विद्यापीठ नेहमी पुरोगामी विचारांच्या बाजूने उभा राहिला आहे. येथील अनेक प्राध्यापक विद्यार्थ्यांवर करण्यात येत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात आहेत.

भारत सरकारने ढाका आणि बांगलादेशच्या अन्य शहरात राहणाऱ्या भारतीयांना आवश्यकता नसल्यास घराच्या बाहेर न निघण्याचा सल्ला दिला होता. ८,५०० हून अधिक भारतीय विद्यार्थी बांगलादेशात शिक्षण घेत आहेत. त्यातले बहुतेक हिंसाचारामुळे परत आले आहेत. अनेक भारतीयांचा संबंध तिथल्या टेक्स्टाईल व्यवसायाशी आहे. ते बांगलादेशात राहतात. तयार कपड्यासाठी बांगलादेश प्रसिद्ध आहे. वेगवेगळ्या सामाजिक निर्देशांकात दक्षिण आशियातील बऱ्याच राष्ट्रांच्या पुढे बांगलादेश आहे. भारत आणि बांगलादेशात अतिशय जवळचे संबंध आहेत. बांगलादेशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात भारताची महत्त्वाची भूमिका होती. बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या देशात परत जाण्यापूर्वी १० जानेवारी १९७२ ला शेख मुजीबुर रेहमान काही तास दिल्लीत थांबले होते. तेव्हाचे राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी, पंतप्रधान इंदिरा गांधी इत्यादींनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं होतं. बांगलादेश भारताचा अतिशय विश्वासू आणि जवळचा सहकारी आहे. शेख हसीना अलीकडे दोनदा भारतात येऊन गेल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीसाठी त्या उपस्थित होत्या. त्यानंतर द्विपक्षीय चर्चेसाठी त्या २१-२२ जूनला नवी दिल्ली येथे आल्या होत्या. बांगलादेशाच्या या आंदोलनाकडे भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांचे लक्ष आहे. या आंदोलनाचा फायदा विरोधी पक्षाला होणार नाही त्या दृष्टीने अवामी लीगमध्ये विचार सुरू आहे. ११ जानेवारीला पाचव्यांदा शेख हसीना यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतलेली. विरोधी पक्षाने बहिष्कार केलेल्या निवडणुकीत त्यांच्या प्रचंड विजय झाला होता. बांगलादेशातील मुख्य विरोधी पक्ष त्यांच्या राजकारणात धर्माचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे अल्पसंख्याकांच्या विरोधात अनेकदा त्यांची भूमिका असते. बीएनपी आणि जमातची भूमिका भारताच्या विरोधातही असते. तिथे अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारावरच्या विरोधात शेख हसीना स्पष्ट भूमिका घेतांना दिसतात. मात्र, शेख हसीना यांचं धोरण सर्वसमावेशक असलं तरी त्या हुकूमशहा सारख्या वागताना दिसतात. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद केला पाहिजे.

■■

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा व खासदार सुप्रिया सुळे यांनी जुलै महिन्यात वेगवेगळ्या ठिकाणी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना विविध विषयांवर आपली मते मांडली, त्याचा हा वृत्तांत...



# भ्रष्टाचाराच्या आरोपांवर महायुतीने उत्तर दिले पाहिजे

## खासदार सुप्रिया सुळे यांची पत्रकार परिषदेत मागणी

शरद पवारांमुळे विरोधकांनी आरक्षणाच्या सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार टाकल्याचा आरोप भुजबळांनी केला. पण, त्याचा काही पुरावा आहे का त्यांच्याकडे. सीडीआर काढून बघू कोणी कोणाला फोन केला ते. ते काढणं काही फार अवघड नाही, मी गेली १० वर्षे आरक्षणावर बोलते आहे. हे सर्वजण आत्ता बोलत आहेत. आरक्षणाबद्दल संसदेत बोललं पाहीजे, तुम्ही सर्व माहिती काढून पाहा मी संसदेत धनगर, मराठा, लिंगायत, मुस्लीम आणि भटक्या-विमुक्त जातींच्या आरक्षणावर सातत्याने प्रस्ताव आणा, आम्हाला प्रस्ताव पाठवा, आम्ही ताकदीने तुमच्यासोबत उभं राहू असं म्हटलं आहे. पण, प्रस्ताव तर हातात आला पाहिजे, गेल्या १० वर्षांमध्ये मोदी सरकारने अनेक आरक्षणाची बिलं आणली. त्या प्रत्येक बिलावर मी बोलले आहे.

महाराष्ट्रासह बिहारमध्ये, राजस्थानमध्ये आरक्षणाचा




विषय आहे, एक बिल आणा त्यावर ३,४ दिवस चर्चा करू. एक काय तो निर्णय घेऊ. पण सरकारने त्यावर प्रस्ताव तर दिला पाहिजे. कोणत्याही सर्वपक्षीय बैठकीचा प्रस्ताव आम्हाला पाठवण्यात आलेला नव्हता. प्रस्ताव आल्याशिवाय अजेंडा कसा समजणार. चर्चेसाठी त्यांनी आमंत्रण कोणाला दिलं ते मला माहिती नाही. जर या सरकारला खरंच आरक्षण द्यायचं असेल तर, मुख्यमंत्र्यांनी कोणालाही एक फोन करावा आणि बैठक करावी. त्यांनी बोलवावं आणि त्यांनी अजेंडा सांगावा. आम्ही त्यासाठी उपस्थित राहू.

मुंबई दौऱ्यात मोदींनी भाषण तर चांगलं केलं. भाषण अशीच करायची असतात, मुंबई बद्दल चांगले बोलले हे चांगलं झालं. मुंबईला दूर करू नका. महाराष्ट्रापासून तोडू नका. मेरिट मुलांच्या हक्काच्या जागा घालवू नका. खोके वाले मतदान करायला लागेल आहेत. पण सर्वसामान्य माणूस भुलथापांना बळी पडत नाही. काहीही झालं तरी केंद्रबिंदू पवार. ६० वर्ष सत्तेत राहिले आहेत. काही तरी क्रेडिट द्या.

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात राज्य सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. यामध्ये लाडकी बहीण योजनेचीही घोषणा केली आहे. विधानसभेची निवडणूक दोन ते तीन महिन्यांवर आली आहे. त्यामुळे सरकार जुमल्यांचा पाऊस पाडत आहे.

भाजप जुमला पार्टी आहे. अजून दोन महिने आहेत. काय काय करतील, सगळ्या महिलांनी लाडकी बहिण योजना फॉर्म भरला पाहिजे. एवढा वेळ देऊन अजित दादा योजना पोहचवत असतील तर चांगलं आहे. राज्यातील बेरोजगारी, भ्रष्टाचार महागाई एवढी




झाली की मला दुसरं कळत नाही.

सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे? याचा विचार सरकारने केला पाहिजे. ज्या प्रकारे सरकार कर्ज घेत आहे, निवडणूक समोर असल्याने सरकार फक्त जुमल्यांचा पाऊस पाडत आहे. निवडणुका जिंकण्यासाठी सरकारी यंत्रणा आणि पैसे वापरायचे, सत्तेत यायचे असे सुरु आहे. सरकारने गरीबांची मदत केली पाहिजे. पण किती कर्ज घ्यावे? आता बुलेट ट्रेन प्रोजेक्ट पाहा. बुलेट ट्रेन कोणीही मागितली नव्हती. या सर्वांचा विचार व्हायलाच पाहिजे. मला तरी हा अर्थसंकल्प पाहून काहीही आश्चर्य वाटलं नाही.

दिंडोरीचे खासदार, बीडचे खासदार बजरंग सोनवणे आणि मी (सुप्रिया सुळे) आम्ही सर्वांनी मंत्री पियूष गोयल यांची भेट घेतली आहे. यावेळी पियूष गोयल यांच्याशी आम्ही दूध, साखर आणि कांद्याच्या निर्यातीबाबत आणि आयातीसंदर्भात सरकारचं धोरण नेमकं काय आहे? याबाबत माहिती घेतली. मात्र, सरकारचा एखादा निर्णय आणि त्याचा परिणाम हा एक दिवसाचा नसतो. ग्रामीण भागातील जनतेनं एनडीए सरकारला पूर्णपणे नाकारलं आहे.

अजित पवार यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपावर महाविकास आघाडी उत्तर देऊ शकत नाही, तर महायुतीने उत्तर दिलं पाहिजे. कारण अजित पवार यांच्यावर आरोप हे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वांनी अजित पवारांवर आरोप केले. त्यामुळे याचं उत्तर त्यांनाच विचारलं पाहिजे.



अमित शहा यांनी पुण्यात पवार साहेबांवर टीका केली. कारण, शरद पवार यांच्यावर टीका करत नाही, तोपर्यंत हेडलाईन होत नाही, हे अमित शाह यांना माहिती आहे. अमित शाहांनी टीका केली, त्याबद्दल मला थोडं आश्चर्य वाटलं आणि हास्यास्पदही वाटलं. कारण असं की, आधी ते मोदी सरकार होतं. आता ते एनडीए सरकार आहे. पण, जेव्हा मोदी सरकार होतं, त्याच मोदी सरकारने शरद पवारांचा पद्म विभूषण देऊन गेली सहा दशकं, देशाची आणि महाराष्ट्राची उत्तम सेवा केल्याबद्दल सन्मान केला. त्यामुळे शरद पवार कोण आहेत, हे एकदा भाजपने ठरवावं. अमित शाह हे त्याच सरकारमध्ये मंत्री होते. मात्र, हे सर्व ते विसरले असतील, त्यामुळे त्यांनी टीका केली. कदाचित अमित शाहांना त्याचा विसर पडला असेल आणि ते ज्या वास्तूमध्ये बोलत होते, ती वास्तूही शरद पवार मुख्यमंत्री असतानाच बालेवाडी झालेली आहे. कदाचित त्यांना ते कुणी सांगितले नसेल.

एका सशक्त लोकशाहीमध्ये आमच्या विरोधकांनाही टीका करायचा अधिकार आहे. अरे विरोधकही दिलदार असला पाहिजे. तसंच आम्ही लोकशाही वाले लोक आहोत, दडपशाही वाले नाही. अमित शाह यांची टीका ऐकून मला हसू आलं. शेवटी ते आमचे विरोधक आहेत. ते आमचे गुणगान गाणार नाहीत. आमच्यावर टीकाच करणार आहेत.

९० टक्के लोक आज वॉशिंग मशीनमुळं भाजपात आहेत. अमित शाह यांना मी आठवण करून देऊ इच्छिते की, त्यांच्याच मोदी सरकारनं पद्मविभूषण पुरस्कारानं शरद



पवारांना सन्मानित केलंय. ज्या लोकांवर भाजपानं भ्रष्टाचाराचे आरोप केले होते ते आता अमित शाहांच्या भाजपाचे राज्याचे मंत्री आणि पदाधिकारी आहेत. आमच्या सोबत काम केलेले अशोक चव्हाण हे तर मंचावर अमित शाहांच्या मागे बसलेले दिसले. त्यांच्यावर याच भाजपानं भ्रष्टाचाराचे कितीतरी आरोप केले होते. त्यामुळं भाजपानं भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्यांपैकी ९० टक्के लोक आज वॉशिंग मशीनमुळं भाजपात आहेत.

अमित शहा यांनी उद्धव ठाकरेंवरही टीका केली. उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यासाठी भाजपाकडे मुद्दे नाहीत. त्यांनी त्यांचा पक्ष फोडला. त्यांचे नेते पळवून नेले, त्यांच्यावर इतका अन्याय झाला. आता त्यांच्यावर बोलण्यासारखं काहीही नाही. त्यामुळे अमित शाह यांच्याकडून अशाप्रकारे टीका केली




जात आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केलेल्या केंद्राच्या बजेटमध्ये नवीन काहीच नाही. सर्वसामान्यांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही. काँग्रेसच्याच योजना या अर्थसंकल्पात कॉपी करण्यात आल्या आहेत. भारत सरकार म्हणजे प्रत्येक राज्याचा मोठा भाऊ आहे. फक्त महाराष्ट्र नाही, इतर राज्यांना पण काहीही मिळालेलं नाही. बंगाल आणि झारखंडला काय मिळालं. आपला लाडका बिहार आणि आपला लाडका आंध्रप्रदेश इतकंच या अर्थसंकल्पात होतं. महाराष्ट्र आणि इतर राज्य परके आहेत का?

काहीही टॅक्स रिफॉर्म नाही. फक्त फॉरेन कंपनीचा टॅक्स ३० वरुन २५ वर आला आहे. नवीन काहीही नाही या बजेटमध्ये. अर्थमंत्री म्हणाल्या की, आम्ही शेतकऱ्यांचं ५० टक्के उत्पन्न वाढवणार. त्यांनी १० वर्षात दुप्पट करणार असल्याचं म्हटलं होतं. दुसरं मला खटकलं ते लँड रिफॉर्म. जमीन हा राज्याचा विषय आहे. आम्ही सगळे लँड रिफॉर्म हे डिजीटलायजेशन करु असं त्यांनी म्हटलं. पण हा राज्याचा विषय आहे यात केंद्र का हस्तक्षेप करतंय. राज्याच्या योजना या कॉपी करुन घेतल्या आहेत. काँग्रेसचीच योजना कॉपी पेस्ट केली आहे.

बजेट मध्ये २-४ चांगल्या गोष्टी आहेत पण त्या चांगल्या गोष्टी काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या घोषणा पत्रातील आहेत. अनेक गोष्टी त्यातील बजेटमध्ये आहेत. देशाच्या बजेटकडून आमच्या अपेक्षा होत्या की सगळ्या राज्याला सारखा निधी मिळावा. बिहार, आंध्रला निधी दिला त्याच दुःख नाही पण महाराष्ट्रावर अन्याय का ?

आंध्र प्रदेश आणि बिहारला जास्त दिल्याचे दुःख नाही. पण हे देशाचं बजेट आहे. दोन राज्यांचं नाही. स्वत:ची खुर्ची वाचवण्यासाठी आणि सत्ता टिकवण्यासाठी भाजपने असं केलं आहे. याआधीही २०१४मध्ये चंद्राबाबूंनी या गोष्टी मागितल्या होत्या. मात्र तेव्हा सरकारने दिल्या नाही. मात्र आता ३०० वरुन २४० वर आले तेव्हा भाजपला लहान राज्ये दिसायला लागली आहेत. जे आता आंध्र प्रदेश आणि बिहारला मिळालं आहे, याचं श्रेय जनतेला जातं. एनडीए सरकारमधील महाराष्ट्रातील खासदारांना मला विचारायचं आहे, मित्रपक्ष असून तुमच्या पदरात काहीच का पडलं नाही.

सर्वाधिक क्राईम पुण्यात होत आहेत, पुणे क्राईम कॅपिटल होत आहे. सगळं पुण्यात होत आहे. कोयता गँग, ड्रग्ज, कार अपघात हे सर्व पुण्यात घडत आहे. पूजा खेडकर प्रकरणात संपूर्ण चौकशी झाली पाहिजे. त्यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. त्याचे पुरावे सादर करावे आणि पारदर्शक चौकशी करावी.

चॅनलने दाखवल्याशिवाय या राज्यात मदत मिळत नाही. पुण्यातील पुराबाबत मोहोळ यांची आणि माझी सविस्तर चर्चा झाली. ही राजकारण करायची वेळ नाही. त्यांनी जे स्टेटमेंट केलं ते पाहिलं. पुणे महापालिका आणि जलसंपदा विभाग यांचा विस्कळीत कारभार असल्यामुळे एवढं मोठं संकट स्थानिकांवर आलं आहे. काल अनेक गोष्टी ते करू शकले असते.

अनेकांची आयुष्य उद्धवस्त झाली. महिला रडत आहेत. लोकांनी लोन काढून फर्निचर केलं, त्यांचा पूर्ण संसार उद्धवस्त झाला आहे. याला महाराष्ट्र सरकार जबाबदार आहे. थोडावेळ घर फोडणं, पक्ष फोडणं बाजूला ठेवा, माणुसकी दाखवा.

अतिशय असंवेदनशील सरकार आहे. या संपूर्ण भागासाठी वेगळं पॅकेज द्या. सफाई, तातडीने टाक्या साफ झाल्या पाहिजेत, दिवसातून दोन-तीनवेळा फवारणी झाली पाहिजे. स्वच्छ पाणी, वीज, पहिल्या टप्प्यात झालं पाहिजे. आर्थिक मदत प्रत्येकाला झाली पाहिजे. एक महिन्यांचा धान्याचा पुरवठा झाला पाहिजे.

सरकार अपयशी ठरलं आहे, युद्धपातळीवर काम झालं पाहिजे पण तसं झालं नाही. पुढच्या आठ दिवसात कॅम्प लावला जाईल, मुलांना ॲडमिशनची अडचण झाली आहे, ती सोडवू. हे परत होता कामा नये यासाठी लक्ष घालणं गरजेचं आहे. प्रशासन व्हॉट्सॲपवरच चाललं असेल तर पुढच्या इलेक्शनमध्ये आम्हीही दाखवू





व्हॉट्सॅपवर कसं आयुष्य चालतं ते.

नाले सगळे बंद आहेत, पाणी न विचारता सोडलं आहे. अनेक गोष्टी आहेत. या सरकारला मोठी प्रोजेक्ट लागतात, ब्रीज बनवा, खोदून ठेवा. आधी आमचा फूटपाथ करा आणि गटारं साफ करा, त्यानंतर मोठी प्रोजेक्ट करा, आमचं काहीही म्हणणं नाही, आमचं सहकार्य नाही. गटार नाही, नाला साफ नाही, फुटपाथ नाही.

भुजबळांनी पवार साहेबांची भेट घेतली यात काही नवीन नाही. महाराष्ट्राच्या विकासासाठी शरद पवार काम करत आहेत. आम्हाला मायबाप जनतेने साथ दिली आहे. जनता त्यांच्यावर विश्वास दाखवते, तसंच विरोधकही शरद पवारांकडे येत आहेत, अपेक्षेने बघतात. यातच सगळ्या प्रश्नांची उत्तरं आहेत.

पक्ष आणि चिन्हाबाबत शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर अन्याय झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आमचा युक्तिवाद ऐकून घेतला. आम्हाला आता ऑगस्ट महिन्यातली तारीख दिली आहे. नागालँड येथील आमदारांचं निलंबन, महाराष्ट्रातल्या आमदारांचा प्रश्न आणि चिन्ह आणि पक्ष चुकीच्या पद्धतीने काढून घेतला. त्याबाबतची ही केस आहे. सर्वोच्च न्यायालयात मी उपस्थित होते. बाकी ज्यांच्या मागे अदृश्य शक्ती आहे त्यांच्यापैकी कुणी आम्हाला तिथे भेटत नाही. त्यांचे वकील आम्हाला जरुर भेटतात. कारण त्यांचे जे वकील आहेत त्यापैकी अनेकांशी आमचे घरोब्याचे संबंध आहेत. अदृश्य शक्तीकडून ही सगळी यंत्रणा चालवली जाते.

मी आशाकाकींना भेटले, त्यांचा आशीर्वाद घेतला, कारण कौटुंबिक नाती ही आयुष्यात महत्त्वाची असतात. यश, अपयश, सत्ता, पैसा येत असतो जात असतो शेवटी नातीच राहतात, मात्र सुनेत्रा पवार जेव्हा शरद पवार यांच्या भेटल्या तेव्हा त्यांनी आशीर्वाद का घेतला नाही? याचं उत्तर त्याच देऊ शकतात.

भाजपा पक्ष जनसंवाद यात्रा काढून कधीतरी खरं बोलणार असेल तर मी त्यांचं स्वागत करते. भाजपाच्या लोकांना माझे हे काही प्रश्न आहेत, त्याची उत्तरं त्यांनी त्यांच्या मित्रपक्षांनी द्यावीत. भाजपाची भ्रष्टाचार या विषयावर काय भूमिका आहे याबद्दल खरं सांगावं. ज्यांच्यावर आरोप-प्रत्यारोप केले त्यांचं नक्की काय झालं? ते भ्रष्टाचारी होते की नाही? दूध, कांदा आणि हमीभावावर भाजपाची भूमिका काय? ती त्यांनी स्पष्ट करावी. महागाईबाबत त्यांचं काय मत आहे? जगातलं अर्थकारण,

राज्याचं अर्थकारण, महाराष्ट्राने काढलेलं कर्ज याबद्दल भूमिका मांडावी. ज्या घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत त्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे निधी आहे का? का जुमलेबाजी आहे? बेरोजगारीवर भाजपाची आणि सरकारची भूमिका काय? मित्र पक्षांनीही याबाबत बोलावं.

नक्की या सरकारमध्ये काय चाललं आहे? आरएसएसने दोन आरोप केले आहेत तो म्हणजे १८० कोटींचा भ्रष्टाचार शेती मंत्रालयात झाला आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस आणि भाजपा बोलणार का? संघाने जो प्रश्न देवेंद्र फडणवीसांकडे मांडला त्याचं पुढे काय झालं? हे सांगावं. आज एका मोठ्या आणि महत्त्वाच्या विवेक नावाचं मासिक आहे त्यातल्या लेखांवरची उत्तर भाजपाने पारदर्शकपणे द्यावीत. महाराष्ट्रापुढे पारदर्शक योजना मांडावी.

अजित पवार म्हणाले, की सत्तेत सहभागी होण्यापूर्वी अमित शाह यांच्या भेटीसाठी ते दिल्लीला दहा वेळा वेश बदलून गेले होते, आज अजित पवारांनी असं केलं, उद्या एखादा दहशतवादी वेश आणि नाव बदलून येईल, याची जबाबदारी कोण घेणार? हा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषय आहे. या प्रकरणात मुंबई आणि दिल्ली विमानतळाची चौकशी झाली पाहिजे, की अजित पवार वेश आणि नाव बदलून कसे गेले? एअरलाईनचीही चौकशी झाली पाहिजे, की नाव आणि चेहरा जुळत नसताना तुम्ही उड्डाण प्रवासाची परवानगी कशी दिलीत? एअरलाईन सातत्याने आमचं आधार कार्ड मागत असते, आम्ही दाखवलं की आमचं चेकिंग होतं, तेव्हा आम्ही विमानात बसतो, तुम्हाला नाही का विचारलं?






नागरी उड्डाण मंत्रालयाने उत्तर दिलं पाहिजे, की सुरक्षेत एवढी हलगर्जी झाली कशी? आज अजित पवार अमित शाह यांना भेटायला येत होते, उद्या एखादा दहशतवादी येईल, सगळ्यांची कुटुंबं विमानाने फिरत असतात, कोणी जबाबदारी घेणार की नाही? मुळात, माझा एक प्रश्न आहे, की अजित पवार चोरुन का भेटायला येत होते? असं काय शिजत होतं? दोन जुलैला अजित पवार यांनी सरकारमध्ये सहभागी होत शपथ घेतली. त्याच्या पाच दिवस आधीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्यावर एका बँकेत भ्रष्टाचाराचा आरोप केला होता. म्हणजे एकीकडे पाच दिवस आधी आरोप सुरु होते आणि दुसरीकडे दहा वेळा अजित पवार अमित शाहांना भेटत होते, नेगोशिएट करत होते. मग ना खाऊंगा ना खाने दुंगा कुठे गेलं? हे वॉशिंग मशीन नाही का? सगळे म्हणतात भाजप म्हणजे भ्रष्ट जुमला पार्टी झालीय. आता देवेंद्र फडणवीस आणि मोदीच याचं उत्तर देतील.

अजित पवार आणि अमित शहांच्या भेटीची जर शरद पवारांना माहिती असती, तर चोरुन जायची काही गरजच नव्हती. अजित पवार ताठ मानेने ऑफिशिअल बुकींग करुन विमानाने गेले असते. कोणी विचारलं, कशाला दिल्लीला चाललात... सहा जनपथ आहे... त्यांच्या काकांचं तर घर आहे, चोरी कसली. हे आपले संस्कार आहेत का? पुढची पिढी काय म्हणेल? त्यावेळी जे विरोधीपक्ष नेते होते, जे आज उपमुख्यमंत्री आहेत, ते नाव बदलून जातात, हे या महाराष्ट्राचं आणि देशाचं राजकारण आहे का? जिथे देशाचे गृहमंत्री नियम कायदे बनवतात, त्यांना भेटायलाच चुकीचं नाव लावून जाता, संविधानाच्या चौकटीत याला जागा नाही.

■■

# रक्तलांछित अमेरिकेची

## कमला हॅरिसचा

प्रभाकर खोले



रोज कुठे ना कुठे गोळीबार, खून आणि दंगलीच्या घटना नित्यनियमाच्या असणाऱ्या अमेरिकेमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पत्राचे यंदाच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर १३ जुलै रोजी खुनी हल्ला झाला. गोळी कानाला चाटून जाऊन ते थोडक्यात बचावले. पण आक्रस्ताळी आणि बेधडक विधाने करणाऱ्या ट्रम्प यांच्याबरोबर जाहीर चर्चेत विद्यमान अध्यक्ष व डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार जो बायडेन

# अध्यक्षीय निवडणूक



अगदीच निष्प्रभ ठरले. इतके की, पक्षश्रेष्ठी व जनमताच्या रेट्याने त्यांना मधेच माघार घ्यायला लागली आणि सध्याच्या उपाध्यक्ष अन् उपाध्यक्षपदाच्या उमेदवार, भारतीय-आफ्रिकन मिश्रवंशाच्या कमला हॅरिस यांना पक्षाने अध्यक्षपदाची उमेदवारी दिली. प्रचार युद्धाच्या ऐन मध्यामध्ये आणि आता येत्या नोव्हेंबरात मतदानाच्या दिवशी अमेरिकन अध्यक्षपदासाठी सामना कमला हॅरिस विरुद्ध डोनाल्ड ट्रम्प असाच होईल !

## सामना ट्रम्पशी

मराठीमध्ये एक प्रसिद्ध म्हण आहे, ''शिंक्याचे तुटले आणि बोक्याचे फावले!' अशीच काहीशी गत अमेरिकेच्या सत्तारुढ डेमोक्रॅटिक पक्षाची झाली आहे. चारच वर्षांपूर्वी म्हणजे नोव्हेंबर २०२० मध्ये तेव्हाचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा पराभव करून अध्यक्षपदी निवडून आलेले जो बायडेन यांची कारकिर्द निष्प्रभ असली तरी इतर गोष्टींमुळेच फार गाजली. त्यामध्ये निवडणुकीनंतर ट्रम्प यांचे 'समर्थक' किंवा चिथावणीखोर निदर्शकांनी अमेरिकन काँग्रेसवर (संसद) केलेली चाल व रक्तरंजित झटापटी, त्यानंतर आलेली करोनाची जागतिक महामारी, ट्रम्प व बायडेन यांच्या मुलावरील फौजदारी खटले, रशियाचे युक्रेनवरील आक्रमण तर इस्रायलकडून होत असलेला



पॅलेस्टाईन-गाझामधील जनसंहार या सगळ्या घडामोडींनी बायडेन यांना घेरून टाकले होते. जगातील एकमेव आर्थिक, तांत्रिक व लष्करी महासत्तेचा हा प्रमुख जागतिक (किंवा अमेरिकनही) राजकारणावर आपला कोणताही ठसा उमटवू शकला नाही.

त्यातच दर चार वर्षांनी होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी जो बायडेन यांनी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे पुन्हा उमेदवारी जाहीर करून उपाध्यक्ष कमला हॅरीस यांनाच आपले उपाध्यक्षपदाच्या फेर उमेदवार बनवले खरे पण २७ जूनला डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर झालेल्या जाहीर चर्चेमध्ये बायडेन पार निष्प्रभ ठरले पदोपदी गोंधळणारे आपले मुद्दे विसरणारे, ऐकूही येणार नाही असे काही बाही पुटपुटणारे थकलेले, असंबद्ध आणि वयापेक्षा (८१ वर्षे) कितीतरी वृद्ध वाटणारे बायडेन हे ७८ वर्षांच्या आक्रमक आक्रस्ताळी आणि कित्येकदा धडधडीत खोटी पण रेटून देणारी विधाने करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्पसमोर अगदीच तोंडावर आपटले. आणि त्यांच्याबरोबरच त्यांच्या डेमोक्रॅटिक पक्षाची निवडणूक मोहिमही!

बायडेन यांची ही फजिती अमेरिकन दूरचित्रवाणीवरून कोट्यावधी अमेरिकन मतदार आणि जगातील प्रेक्षक या सर्वांनीच पाहिली. त्यातच नंतर लगेचच आलेल्या नाटो या संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीच्या वेळेलाही जो बायडेन यांची अवस्था तशीच होती. ते आपल्या सहकारी कमला हॅरीस यांचे नाव विसरत होते, तर युक्रेनचे अध्यक्ष लेविन्स्की यांचा उल्लेख पुतिन (रशियाचे अध्यक्ष) म्हणून करत होते. याही वेळाला बायडेन यांची फजिती सारेजण पहात होते.

## पक्षामधून माघारीचा आग्रह

अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक ही मुख्यत्वे प्रसारमाध्यमे आणि आता समाजमाध्यमे यांवर लढली जाणारी लढाई आहे. दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, केबल, ओटीटी तसेच यू-ट्युब, एक्स, फेसबुक वगैरेवर तुम्ही (प्रत्यक्ष कसे आहात यापेक्षा) किती चांगले, प्रभावशाली, निर्णयक्षम आणि कर्तृत्ववान दिसता याला जास्त महत्व असते कारण प्रत्यक्षात तुमच्या संपर्कात न येता या (इलेक्ट्रॉनिक) प्रतिमेवरून तुमच्याबद्दल मत बनवणाऱ्या कोट्यावधी दर्शकांसमोर तुम्ही येत असता. आणि नेमके इथेच बायडेन कमी-फार फार कमी पडले !

जोरदार विधाने करणारे, तंदुरुस्त दिसणारे आणि ठाम वाटणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर जो बायडेन फारच फिके वाटत होते. तरीही ते आपल्या अध्यक्षपदीय उमेदवारीवर ठाम होते. निदान काही दिवसांपर्यंत. पण त्यातच त्यांना सर्दी व इतर दुखणी सुरू झाली तर त्यांना करोना झाल्याच्याही बातम्या येऊ लागल्या.

## ट्रम्प यांच्यावरील हल्ल्याने कलाटणी !

त्यातच १३ जुलै २०२४ रोजी पेनसिल्व्हेनिया राज्यातील बटलर येथे प्रचारसभेमध्ये भाषणासाठी उभे असताना डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर एका मारेकऱ्याने झाडलेली गोळी नशीबाने चुकून ट्रम्प वाचले, पण त्यांच्या उजव्या कानाला जखम होऊन रक्त वाहू लागले. सुरक्षारक्षक भोवती कडे करून त्यांना घेऊन जात असतानाही ट्रम्प यांनी आपला रक्ताळलेला हात वर उंचावून विजयाची खूण केली आणि आपली लढण्याची जिद्द दाखवली. दुर्घटनेतही प्रसंगावधान दाखवण्याची त्यांची हुशारी अन् जिद्द करोडोंनी टीव्हीवर पाहिली आणि तिथेच बायडेन यांच्या उमेदवारीचीही उरली सुरली आशा संपुष्टात आली.

ट्रम्प यांचे धाडस आणि जिद्द जगाने पाहिली व तिचे कौतुकही केले. अमेरिका तर सोडाच, पण चीनसारखा (विरोधी) देशातही

ट्रम्प यांचा रक्ताळलेला चेहरा व विजयहस्त दाखवणारे टी-शर्ट विक्रीला आले. अमेरिकेत तर ट्रम्प यांना लोकांनी डोक्यावर घेतले. त्यांच्या लोकप्रियतेतील वाढ ही त्यांना दोन दिवसांनंतर झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या (ग्रँड ओल्ड पार्टी जी.ओ.पी) प्रतिनिधींच्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये राष्ट्राध्यक्षपदासाठी पक्षातर्फे निवड व उमेदवारी अगदी सहज मिळवून गेली. लगेचच ट्रम्प यांनी आपले उपाध्यक्षपदाचे सह उमेदवार (रनिंग मेट) म्हणून आपले एकेकाळचे पक्षातील कट्टर विरोधक जेडी व्हॅन्स यांची निवड केली.

''आपल्या इराणविरोधी भूमिकेमुळे इराणी अतिरेक्यांनी आपल्याला मारण्याचा केलेला कट म्हणजे आपल्यावर झालेला



गोळीबार'' अशी भूमिका ट्रम्प यांनी घेतली. त्याचबरोबर त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी सरकार आपल्याला (माजी राष्ट्राध्यक्ष म्हणून) सुरक्षा देण्यात कमी पडले असाही जोरदार प्रचार सुरु केला. परिणामस्वरुपी अमेरिकन गुप्तहेर संस्थेच्या (सिक्रेट सर्व्हिस) संचालिका किंबर्ली चिटल यांना राजीनामा देणे भाग पडले. (आपल्याला हे सर्व जणू भारतातच घडते आहे असे वाटले... गोळीबार, हत्येचा प्रयत्न, आरोप-प्रत्यारोप, राजकीय भांडवलदारी आणि अखेर कुणाचा तरी बळी! शेवटी हे सारे राजकारणच आहे, इकडे काय आणि तिकडे काय!)

## डेमोक्रॅटिक समर्थक अस्वस्थ !

अमेरिकेतील डेमोक्रॅटिक पक्षाचे समर्थक हे पारंपारिकरित्या तेथील कृष्णवर्णीय, आशियाई, स्थलांतरित तसेच हिस्पॅनिक म्हणून ओळखले जाणारे स्पॅनिश-दक्षिण अमेरिकन वंशाचे लोक त्याचबरोबर अमेरिकेचे मूलनिवासी (रेड इंडियन्स) आणि अल्पसंख्यांक हे राहिलेले आहेत. त्याचबरोबर अमेरिकेतील कलाकार, डावे-समाजवादी विचारवंत पक्षकार, कामगार वगैरेही त्या पक्षाच्या पाठिराख्यांमध्ये आहेत. ही मंडळी तसेच पक्षाला अर्थपुरवठा करणारा वर्ग आणि पक्षनेतृत्व हे डोनाल्ड ट्रम्प यांचा वाढता प्रभाव जो बायडेन यांचे उघडउघड वाढते अकर्तृत्व, निष्क्रीयपणा आणि झपाट्याने घसरती लोकप्रियता यामुळे चिंतीत झाल्यास नवल नाही, पक्षाचे राष्ट्राध्यक्ष निवडणुकीतील आव्हान टिकवायचे असेल तर जो बायडेन हा पक्षाच्या अध्यक्षपदाचा उमेदवार व चेहरा म्हणून बिलकुल दाखवता कामा नये, अशीच त्यांची धारणा झाली.

बायडेन यांनी वेळीच माघार घ्यावी अशी सूचना पक्षाच्या थोड्याथोडक्या नव्हे तर तब्बल ३७ लोकप्रतिनिधींनी (काँग्रेसमेन) आधीच केली होती, पण ती बायडेन यांनी धुडकावून लावली



होती. आता मात्र दोन वेळा अध्यक्ष असलेले, पक्षावर मजबूत पकड असणारे बराक ओबामा, माजी अध्यक्ष बिल क्लिंटन आणि माजी मंत्री हिलरी क्लिंटन तसेच एकेकाळच्या बायडेन समर्थक पण आता गंभीर धोका लक्षात आलेल्या प्रभावी नेत्या नॅन्सी पेलोली वगैरे वजनदार नेत्यांनी बायडेन यांच्याकडे माघारीचा आग्रह धरला. नव्हे ''माघार न घेतल्यास ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्ष प्रतिनिधींच्या राष्ट्रीय अधिवेशनात तुमच्या विरोधी ठराव संमत करू'' अशी प्रच्छन्न धमकीही दिली. त्याचवेळी पक्षाला मोठ्या प्रमाणात देणग्या देणाऱ्या हॉलिवूडच्या अब्जाधीश कलाकारांनीही बायडेन यांच्या माघारीचा आग्रह धरला. त्यामध्ये कॉर्डीबी, एलन जीडनरेस, मार्क हॅमिल, जॉर्ज ताकेई, मार्क सफालो, लिझ्झो, जिमी किमेल, जेमीली कर्टीस आणि मान्यवरांचा समावेश आहे.

अमेरिकेच्या विद्यमान उपाध्यक्ष आणि जो बायडेन यांच्या उपाध्यक्षपदाच्या उमेदवार कमला हॅरिस यांची या सर्वच बाबतीमध्ये इकडे आड, तिकडे विहीर अशी पंचाईत झाली होती. एकीकडे बायडेन यांच्याबद्दल एकनिष्ठा जाहीर

करतानाच त्यांना अध्यक्षपदाची उमेदवारी नाकारूनही चालणार नव्हते. अखेर २० तारखेपर्यंत ''मीच उमेदवार'' असे ठासून सांगण्याचा अट्टाहास ठेवणाऱ्या बायडेन यांनी २१ जुलै २०२४ ला दुपारी ''मी राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेत असून नव्या पिढीला संधी देत आहे आणि मी माझ्या उरलेल्या (साडेतीन महिन्यांच्या) कार्यकालावर लक्ष केंद्रीत करणार आहे.'' अशी घोषणा करून कमला हॅरिस यांना राष्ट्राध्यक्षपदासाठी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उमेदवारीला पाठिंबा जाहीर केला. लगोलग बराक ओबामा व इतर नेत्यांनीही हॅरीस यांना पाठिंबा दिल्याने पक्षात उत्साहाची लहर संचारली आणि उरलेल्या वेळामध्ये जोरदार प्रचार करून कमला हॅरिस यांनाच निवडून आणण्यासाठी डेमोक्रॅटिक कार्यकर्त्यांनी कंबर कसली.



डेमोक्रॅटिक पक्षाचे अमेरिकेतील उभरते युवा नेतृत्व

## निवडणूक : एक गुंतागुंतीची प्रक्रिया

दर चार वर्षांनी होणारी अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक ही एक दीर्घकाळ चालणारी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या वर्षी म्हणजे ५ नोव्हेंबर २०२४ साठी मतदान होणारी अध्यक्षीय निवडणूक ही साठावी चतुर्वर्षीय अध्यक्षीय निवडणूक असेल. यावेळी अमेरिकन राज्यघटनेच्या कलम २ मध्ये निर्देशिल्याप्रमाणे अमेरिकन निवड मंडळाचे ५३८ निवडकर्ते सदस्य अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडण्यासाठी मतदान करतील आणि त्यापैकी किमान २७० निवडणुक मते मिळवणारा उमेदवार अध्यक्ष म्हणून निवडून येईल व त्याचा (पक्षाचा) सहउमेदवार उपाध्यक्ष निवडला जाईल. यावेळच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षातर्फे कॅलिफोर्निया राज्याच्या, सध्याच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस या अध्यक्षपदाच्या उमेदवार आहेत तर रिपब्लिकन पक्षातर्फे माजी राष्ट्राध्यक्ष फ्लॉरिडा राज्याचे डोनाल्ड ट्रम्प उभे आहेत. ट्रम्प यांचे उपराष्ट्राध्यक्षपदाचे सहउमेदवार आहेत, जे.डी.व्हॅन्स.

राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक ही दर चार वर्षांनी ज्याच्या आधी सोमवार आहे, अशा नोव्हेंबरमधल्या पहिल्या मंगळवारी होते. उमेदवार हा अमेरिकेत जन्मलेला, किमान ३५ वर्ष वयाचा आणि किमान १४ वर्षे अमेरिकेत वास्तव्य केलेला असा असावा लागतो. बावीसाव्या घटनादुरुस्तीनुसार कुणालाही दोनपेक्षा जास्त वेळा (८ वर्षे) अधिक काळ राष्ट्राध्यक्षपदी राहाता येत नाही. अमेरिकेत डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन हे दोन प्रमुख पक्ष असून राष्ट्राध्यक्षपद साधारणपणे आलटून-पालटून त्यांच्याकडेच जात राहिले आहे.

ही निवडप्रक्रिया जवळजवळ वर्षभर आधी सुरू होते. प्रत्येक पक्षाच्या राज्यनिहाय संमेलनातून (प्रायमरी व कॉकस) पक्षाचे प्रतिनिधी अध्यक्षपदांच्या निवडकर्त्यांची (इलेक्टर) निवड करतात. हे निवडकर्ते पक्षाच्या राष्ट्रीय



कमला हॅरिस

राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार!!



रिपब्लिकन पक्षाचे अमेरिकेतील उभरते युवा नेतृत्व

अधिवेशनात अध्यक्षपदाच्या उमेदवारावर शिक्कामोर्तब करतात व तो नंतर आपल्या उपाध्यक्षपदाचा सहकारी (रनिंग मेट) निवडतो. अनेकदा पक्षांतर्गत प्रचारात परस्परांचे विरोधक असलेलेच पुढे एकमेकांचे रनिंग मेट झाल्याची उदाहरणे आहेत.

राष्ट्रीय अधिवेशनात पक्षाचे उमेदवार म्हणून निवड झालेले नंतर एकमेकांविरुद्ध देशभर प्रचार करत फिरतात, त्यांच्यात चर्चासत्रे झडतात आणि मतदानाच्या दिवशी सर्वसाधारण मतदार हे त्यांच्या पसंतीच्या उमेदवारासाठी त्याच्या निवडकर्त्यांना मतदान करतात, जे त्यानुसार थेट मतदानात राष्ट्राध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करतात. नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष, उपाध्यक्ष हे त्यांच्या पक्षातील / पसंतीच्या व्यक्तींची मंत्रीमंडळ व अधिकार पदांसाठी निवड करतात आणि पुढच्या जानेवारीत सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडून शपथग्रहण करून त्यांचा कारभार सुरु होतो, पावणेचार वर्षांनी येणाऱ्या पुढच्या निवडणुकीपर्यंत!

## हॅरिस-ट्रम्पपेक्षा आघाडीवर

भारतीय व कृष्णवर्णीय अमेरिकन अशा मिश्रवंशीय अमेरिकन असलेल्या कमला हॅरिस यांना उमेदवारी मिळण्यास उशीर झाला असला तरी त्यांनी वेळ मात्र मुळीच दवडलेली नाही. पहिल्या तीनच दिवसांत त्यांनी पंचवीस कोटी डॉलर्सच्या (सुमारे २०८ अब्ज रूपये) देणग्या जमा केल्या. त्यांच्या उमेदवारीमुळे मतदारांत उत्साह संचारला असून प्राथमिक लोकप्रियता अंदाजांमध्ये त्या ट्रम्प यांच्यापेक्षा २ टक्के जास्त (४४%) मतांनी आघाडीवर आहेत.


हॅरिस यांना भारताविषयी किती प्रेम आहे याबद्दल अनिश्चितता असली तरी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांची मते उदार व प्रामाणिक आहेत. महिलांच्या ॲबॉर्शनचा हक्क, पर्यावरणसुधारणा, वांशिक समानता याबद्दल त्या आग्रही आहेत. अमेरिकेत होणारे बेकायदेशीर स्थलांतर थांबविण्यासाठी फक्त कुंपणे घालणे आणि गस्त वाढवणे एवढेच चालणार नसून लोकांच्या स्थलांतराच्या गरजेच्या मूळाशी जाऊन ती कारणे नाहिशी करायला हवीत असे त्यांचे प्रतिपादन आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीत व त्यांच्या समर्थकांकडून होणारे निवडणूक निकाल बदलणे, संसदेवर सशस्त्र हल्ला करणे यासारखे लोकशाहीवरील आघात कायमचे थांबवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज त्या प्रतिपादन करतात. तर पायाभूत सोयीसुविधा, निम्न व मध्यम वर्गाला मदत करणाऱ्या आर्थिक सुधारणा राबवण्यावर त्यांचा भर असेल. इस्त्रायल व पॅलेस्टाइन ही दोन स्वतंत्र राष्ट्रे व्हावीत व गाझा येथील मानवसंहारी युद्ध थांबावे, असेच त्यांचे मत आहे.

याउलट डोनाल्ड ट्रम्प यांचे म्हणणे इस्त्रायलने हमासचे निर्दालन करावे. युक्रेनची मदत बंद करावी तसेच अमेरिकेत स्थलांतरितांपैकी स्थानिकांना (गोऱ्या) प्राधान्य द्यावे असे आहे आणि येत्या ५ नोव्हेंबरला अमेरिकन मतदारांना उदारमतवाद हवा की विभाजनवाद याचा निवाडा करायचा आहे !

■■



डोनाल्ड ट्रम्प



छत्रपती संभाजीनगर येथे ज्येष्ठ विचारवंत श्री. शेषराव चव्हाण यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा २८ जुलै रोजी पार पडला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी उपस्थितांशी साधलेला संवाद....


# समाजकारणाच्या उभारणीत शेषराव यांच्या ग्रंथांचे योगदान

**शरद पवार**

मला आज सकाळी हे ग्रंथ मिळाले आणि ग्रंथ मिळाल्याच्यानंतर मी वाचू तर शकलो नाही, पण चाळायचा प्रयत्न केला. सकाळपासून अनेक सहकारी मला भेटायला त्याठिकाणी आले आणि त्यामुळे त्या ग्रंथाचा आणि माझा संपर्कच आला नाही. शेषरावजी हे सतत काही ना काहीतरी लिहित असतात, त्यांनी माझ्यावर लिहिलं, विविध विषयांच्यावर लिहिलं. एखाद्या व्यक्तीच्या संबंधी विशेषतः राजकीय क्षेत्रातील व्यक्तीच्या संबंधी अनेकजण लिखाण करून ठेवत असतात. पण शेषराव यांचे लिखाण विविध विषयांवर असतात. त्यांनी कश्मीरवर लिहिलेलं पुस्तक मला आठवतंय. सबंध काश्मीरचे चित्र, त्याची पार्श्वभूमी, तिचं सत्तांतर या सगळ्या संबंधी वास्तव लिखाण त्यांनी केलं होतं.

पक्षांच्या संबंधी आस्था असलेली व्यक्ती म्हणजे सलीम अली, त्यांच्यावरही लिखाण शेषराव यांनी केलं. कधी कधी मला गंमत वाटते की मराठवाड्यातील सामान्य शिक्षकाच्या कुटुंबामध्ये वाढलेले, जन्मलेले शेषराव हे सलीम अलीवर कसे लिहू शकतात? त्यांचं विविध पक्षांच्या संबंधीचं लिखाण आणि अभ्यास आहे. त्याच्यावर कसे उत्तमरितीने भाष्य करू शकतात? याचा अर्थ एवढा एकच आहे की विविध विषयाच्या संबंधीचं अखंड वाचन करण्यासंबंधीची भूमिका ही शेषरावांकडून केली जात असते. त्याच्यामुळे आपले निष्कर्ष मुक्तपणाने लिहिण्याची त्यांची मनापासूनची इच्छा ही लेखणीच्या माध्यमातून उतरते आणि ती पुस्तकाच्या व ग्रंथाच्या स्वरूपामध्ये आपल्या सगळ्यांना बघायला मिळते.

आज इथे 'नाईन्टी नॉट आऊट', 'नेहरू –पटेल रिलेशन्स : मिथ अँड रिॲलिटी', 'डॉ. बी. आर. आंबेडकर



: डीसअपॉईंटेड अँड डिसइल्यूजन इन द इव्हनिंग ऑफ हिज लाईफ' आणि 'कलप्रिट्स ऑफ पार्टीशन' या चारही ग्रंथाचं इथं प्रकाशन पार पडलंय. यातील प्रत्येक ग्रंथ आणि त्या व्यक्तींची या देशातील समाजकारणामध्ये, उभारणीमध्ये प्रचंड प्रमाणाचं योगदान आहे ही गोष्ट आपण मान्य केली पाहिजे. नेहरू की पटेल, यांच्यासंबंधीचं बरंच लिखाण केलं गेलंय, वादही झालेत. अलीकडच्या काळात या दोन्ही नेत्यांवर आजची काही नेतृत्व भाषण करतात, त्यात ऐकायला मिळतं... त्यात पटेलांच्या कर्तृत्वासंबंधी काही वाद असायचा कारण नाही. हा देश एकसंध राहण्यासाठी पटेलांनी टाकलेली पावलं हा ह्या देशाच्या ऐक्याच्या विचाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. एकेकाळी हैदराबादसारखं राज्य भारताचा हिस्सा बनविण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यामुळे त्याचा परिणाम मराठवाड्याच्या भूमीवर काय झाला ह्याची कल्पना आपणा सर्वांना आहेच. यामध्ये खरं योगदान सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचं होतं, हे सांगणं अतिशयोक्ती होणार नाही.

एक कालखंड असा होता, 'नेहरू का पटेल?' हा जो विषय होता, त्यामध्ये महात्मा गांधींनी जाणीवपूर्वक व विचारपूर्वक जवाहरलाल नेहरूंचे व्यक्तिमत्व हे या देशाच्या एकजुटीला आणि उभारणीला उपयुक्त पडेल या प्रकारचा दृष्टिकोन स्वीकारलेला होता. गांधींनी या संबंधीची भूमिका घेतली आणि त्याच्यामध्ये हा देश एकसंघ ठेवायचा असेल, पुढे न्यायचा असेल तर आधुनिक विज्ञान याच्यावर लक्ष केंद्रित करणारे व्यक्तिमत्व याची आज देशामध्ये आवश्यकता आहे ही भूमिका त्यांनी घेतली. नुसती घेतलीच नाही तर सरदार पटेल यांच्यासमोरही त्यांनी आपली भूमिका मांडली आणि या दोघांचा एका विचाराने झालेला निर्णय हा म्हणजे या देशाचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंच्या माध्यमातून झाला.

पटेल हे कर्तृत्ववान गृहस्थ होते. देशातील शेतकरी असेल, कष्टकरी असेल त्यांच्या हिताची जपणूक करणारा आणि त्यांच्याबद्दल आस्था असणारा असं एक नेतृत्व होतं. जवाहरलाल नेहरू सगळ्या विश्वामध्ये भारताचे एक स्थान

जनमानसामध्ये निर्माण करण्यासाठी आणि हे करत असताना उद्याचा भारत हा आधुनिक भारत कसा होईल? यासंबंधीची अखंड विचारधारा स्वीकारणारं असं एक ते व्यक्तिमत्व होतं.

आंबेडकरांच्या संबंधित सुद्धा लिखाण या ठिकाणी खूप झालं. अनेक गोष्टी बाबासाहेबांबद्दलच्या सांगता येतील. सर्वसामान्य लोकांमध्ये आंबेडकर म्हटल्यानंतर साहजिकच संविधानाचं स्मरण होते. संविधानाच्या संबंधित डॉ. आंबेडकरांचे योगदान याच्या संबंधी काही वेगळी चर्चा करण्याची आवश्यकता नाही. एक प्रचंड मोलाची कामगिरी ही त्यांनी करून ठेवली. आज जगातल्या अनेक देशांमध्ये आपण बघतो की त्या ठिकाणी भारतासारखा खंडप्राय देश असून विविध भाषांचे, धर्मांचे, विविध राज्यांचे अनेक घटक असताना सुद्धा या सगळ्यांना एकसंघ ठेवून त्यांचा एकंदर संविधानाच्या माध्यमातून एकवाक्यता निर्माण करण्यासंबंधीची कामगिरी ही बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून केली. यासंबंधी कुणाच्याही मनामध्ये यत्किंचितही मतभेद नाही. बाबासाहेबांची दुसरी एक आयुष्याची बाजू आहे आणि ती बाजू फार कमी प्रमाणात लोकांच्या समोर येते. बाबासाहेब हे जवाहरलाल नेहरू जसे आधुनिकतेचा विचार करत होते तसं बाबासाहेबांनी सुद्धा आधुनिकता हा देश खऱ्या अर्थाने संपन्न करायचा असेल तर अनेक गोष्टींच्या मध्ये 'धोरणात्मक निर्णय घेतले पाहिजे' हे सूत्र बाबासाहेबांनी अनेक वेळेला मांडलं.

अगदी उदाहरण द्यायचं झालं आज इथे आल्याच्या नंतर मराठवाड्याच्या शेतीचा प्रश्न सोडवण्यासाठी जायकवाडीचे योगदान आहे ही गोष्ट तुम्हाला मला सगळ्यांना मान्य आहे. पण स्वातंत्र्याच्या आधी पहिलं जे शासन झालं जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली आणि त्या शासनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक मंत्रिमंडळातील मंत्री होते आणि त्यांच्याकडे जो कारभार होता तो जल आणि विद्युत याच्या निर्मितीच्या संबंधीचा. आज देशामध्ये मोठी मोठी धरणं झालेली आपण बघतो, त्यामध्ये भाक्रा-नांगल, दामोदर व्हॅलीचा उल्लेख आवर्जून करावा लागेल... अशा धरणांच्या संबंधिचा मूलभूत निर्णय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेला होता. लोकांना माहित नाही हा देशातील शेतीचं, उद्योगाचं जे चित्र बदललं. त्याच्यामध्ये पाण्याचा विचार करणारा नेता त्या काळामध्ये त्या विभागाचा प्रमुख होता आणि त्याने घेतलेले निर्णय हे या देशाला समृद्धीच्या रस्त्याला नेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरले.




**शेषराव चव्हाण यांनी लिहिलेल्या चार ग्रंथांचे शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले त्यावेळी व्यासपीठावर उपस्थितांमध्ये**

कुठल्याही देशामध्ये प्रगती करायची असेल तर विद्युत निर्मिती हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. या देशामध्ये स्वातंत्र्याच्याआधी फार मर्यादित अशी विद्युत निर्मिती होत होती. या विद्युत निर्मितीसाठी पहिला महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय ज्यांनी घेतला असेल तर तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. विद्युत निर्मितीचा निर्णय त्यांनी घेतला. आज एखाद्या ठिकाणी एखाद्या राज्यामध्ये गरजेपेक्षा सुद्धा जास्त विद्युत निर्मिती होत असेल... पण सबंध देशाचा विचार करायचा झाला तर या विद्युत निर्मिती झाल्यानंतर ती विद्युत सबंध देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये पोहोचेल कशी?

त्यामधून ते राज्य किंवा विभाग संपन्नतेच्या रस्त्याने जाईल कसे? याचा विचार हा बाबासाहेबांनी केला.

आज आपण महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र विद्युत मंडळ या नावाची संस्था या राज्यात काढलेली होती. एमएसईबी म्हणून आपण त्याचा उल्लेख करत होतो आणि ती सर्वत्र वीज पुरवठ्याच्या संबंधीची कामगिरी करत होती. आज एका राज्यामध्ये वीज जास्त झाली आणि दुसऱ्या राज्यामध्ये वीज नसेल किंवा कमी असेल तर अतिरिक्त वीज कमी वीज असलेल्या राज्यांमध्ये जाईल कशी? त्यांचे एकीकरण होईल कसं ? त्याचा परिणाम त्या राज्याच्या समृद्धीवर कसं करता येईल? यासंबंधीचा विचार करून पॉवर ग्रीड कार्पोरेशन नावाची संस्था स्थापन करण्याचा निर्णय बाबासाहेबांनी घेतलेला होता. ठरवण्याच्या संबंधीचे अनेक कायदे स्वातंत्र्याच्या आधी निर्मित करण्याबद्दलची भूमिका ही बाबासाहेबांनी घेतलेली होती. त्यामुळे बाबासाहेब विविध विषयांच्या संबंधीचा राष्ट्राच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी करणारे एक अत्यंत महत्त्वाचे नेते हे आपल्या देशाला लाभले. हे देशवासीय म्हणून तुमचं माझं सगळ्यांचं भाग्य आहे.

आज या ठिकाणी जे लिखाण लिहिलं गेलं, त्याच्यामध्ये वेगवेगळे दृष्टिकोन शेषराव यांनी आपल्या सगळ्यांसमोर मांडले. माझी सूचना फक्त एकच आहे, की त्यांनी हे काम तर उत्तम केलं. पण शक्य असेल तर त्याचे प्रादेशिक भाषेमध्ये रूपांतर करण्याच्या संबंधीची कामगिरी ही त्यांनी घेतली पाहिजे. मराठी भाषा आणि ज्ञानाच्या संदर्भात



राजेश टोपे, बाबुराव कदम, शेषराव चव्हाण, कमलकिशोर कदम, कल्याण काळे आणि डॉ. पी. एम. जाधव

त्या माध्यमातून हे अतिरिक्त विद्युतचे एकीकरण आणि विद्युत जिथे कमतरता असेल त्या भागामध्ये नेऊन एक पर्याय हा उभा करण्याच्या बद्दलचा अत्यंत मोलाचा निर्णय हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेला होता. म्हणून बाबासाहेबांचं संविधानाचं काम यासंबंधीची चर्चाच होऊ शकत नाही, प्रचंड योगदान आहे. पण आधुनिक भारत उभा करण्याबद्दलचा विचार हा त्या काळामध्ये स्वातंत्र्याच्या आधी बाबासाहेबांनी मांडलेला होता.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वातंत्र्याच्या आधी बाबासाहेबांनी केली ती म्हणजे या देशातील कष्टकरी कामगार जो आहे त्या कामगाराला त्याचे अधिकार हे सांगण्यासाठी आणि त्या कामगारांच्या संबंधीची नीती व धोरणे ही समृद्धीच्या रस्त्यावर न्यायची असेल तर यातील प्रत्येक ग्रंथ हा शक्यतो मराठीमध्ये आणि अन्य भाषांमध्ये लिखित करण्याच्या संबंधीची भूमिका या ठिकाणी शेषरावांनी घ्यावी. माझी खात्री आहे की नवी पिढी त्यामुळे एक प्रकारचं ज्ञान संपादन करण्यासाठी यशस्वी होतील आणि त्या कामासाठी मी शेषरावांना अंतःकरणापासून शुभेच्छा देतो. हे काम त्यांनी हातामध्ये घेतलं, त्याची पूर्तता केली, अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले, अखंडपणाने लिखाणाचं काम त्यांनी चालू ठेवलं. ते इथून पुढेही चालू ठेवावं अशाच प्रकारची अपेक्षा आज मी या ठिकाणी करतो आणि या ग्रंथाचं विमोचन झालं असं जाहीर करून मी माझे दोन शब्द संपवतो.

■■

जाता जाता
फिरस्ता

# भाजपविरोधी हिंदू नाहीत?

विरोधी पक्षांच्या आणि विशेषत- काँग्रेस आणि राहूल गांधी यांच्या विरोधातील भाजपचा विखार इतका टोकाचा वाढत चालला आहे की राहूल गांधी हे अपघाती हिंदू (ॲक्सिडेंटल हिंदू) आहेत असे विषारी व विकृत उद्‌गार भाजपचे लोकसभा सदस्य अनुराग ठाकूर यांनी संसदेत काढले. त्यांच्या भाषणात त्यांनी राहूल गांधींना त्यांची जात काय म्हणूनही विचारणा केली.

अशा विकृत उद्‌गारांमुळे संसदेत गोंधळ होणे स्वाभाविकच होते. गोंधळ झालाही.

हे उद्गार केवळ असंसदीय नव्हते तर अनुराग ठाकूर ज्या विकृत संस्कारात वाढलेले आहेत त्या विकृतीचे निदर्शक होते. ही विकृती अनुराग ठाकूर यांच्यात निर्माण होणे हा त्यांचा दोष नाही तर ते ज्या राजकीय विकृतीचे आणि विकृत व विखारी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात तिचा आहे. त्यामुळे अनुराग ठाकूर हे त्यांच्या संस्काराला जागले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

राहूल गांधी आता भाजपला त्रासदायक ठरु लागले आहेत. एकतर त्यांना अधिकृत विरोधी पक्षनेते म्हणून भाजपला स्वीकारावे नव्हे तर सहन करावे लागत आहे. ते भाजपला पचविणे अवघड होतेच आहे पण असह्यही होत आहे.

त्यात राहूल गांधी यांनी हिंदुत्वाची व विशेषतः उदारमतवादी हिंदुत्वाची परिभाषा करीत काँग्रेस आणि इंडिया आघाडीतले पक्ष हे भारतातील उदारमतवादी व सर्वसमावेशक विचारसरणीचे प्रतिनिधित्व करीत असल्याचे सांगण्यास सुरुवात केली आहे.

भाजप व संघ परिवार हा कट्टरपंथी आणि अल्पसंख्यक समाजाला दुय्यम स्थान देणाऱ्या वर्चस्ववादी बहुसंख्यकवादी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करीत आहे आणि त्यांच्या विचारसरणीत इतरांना स्थान नाकारण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी मोदी-शहा जोडगोळी प्रणित संकुचित व विकृत हिंदुत्ववादाचे पितळ उघडे पाडले आहे.

त्यामुळेच मोदी-शहा पिसाळून उठले आहेत. कारण त्यांच्या या विकृतीचा पर्दाफाश होत चालल्यानेच मतदारांनी त्यांना शहाणे होण्यासाठी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत काठावरचे यश देऊन व आघाडीत परावलंबी करुन इशारा दिला आहे.

अर्थात शहाणपण आले तर जोडगोळी कुठली.

त्यांनी विरोधी





पक्षांना डिवचण्याचा जणू चंगच बांधला आहे. या आक्रमकतेमुळे आपल्याला पुन्हा जनता डोक्यावर घेईल अशा भ्रमात ते आहेत.

अनुराग ठाकूर हे मोदींच्या गेल्या मंत्रिमंडळात मंत्री होते.

परंतु त्यांनी कोणते दिवे लावले माहिती नाही. त्यांना या नव्या मंत्रिमंडळात स्थान नाकारण्यात आले. आता ते साधे लोकसभा सदस्य आहेत. बहुधा मोदींची पुन्हा मर्जी संपादन करण्यासाठी ते असली विखारी भाषणे संसदेत करुन प्रकाशझोतात राहण्याचा व मोदींच्या नजरेत भरण्याचा प्रयत्न करीत असावेत असे वाटते.

त्यांच्या या विखारी भाषणातील वादग्रस्त भाग लोकसभा अध्यक्षांनी लोकसभेच्या नोंदीतून काढून टाकला आहे. परंतु ते भाषण लोकांपर्यंत पोहोचण्याचे राहिलेले नाही.

पण भाजपचा हा विखारीपणा एवढ्यावर थांबत नाही.

या देशाचे पंतप्रधान आणि स्वघोषित परमेश्वरी अवतार यांनी अनुराग ठाकूर यांचे हे विखारी भाषण ट्वीट केले. म्हणजेच आता ट्वीटरचे जे नवे रूप एक्स या अक्षराने आहे त्यावर पोस्ट केले. परंतु संसदीय संकेत, सभ्यता, नियम यांचा गंधही नसलेल्या पंतप्रधानांना एवढेही भान राहिले नाही की अनुराग ठाकूर यांच्या भाषणातील जो वादग्रस्त भाग सभागृहाच्या नोंदीतून वगळला आहे तो देखील त्यांनी त्यांच्या या पोस्टमध्ये समाविष्ट केलेला होता.

एखाद्याच्या पराकोटीच्या द्वेषाने आंधळे होऊन भान सुटलेले लोकच असे करु शकतात.

पंतप्रधानांचे उर्फ स्वघोषित परमेश्वरी अवतारातले भान सुटलेले आहे हेच या घटनेवरुन दिसून येते.

सभागृहाच्या नोंदीतून काढलेला भाग प्रकाशित करणे हा सभागृहाचा हक्कभंग असतो. त्यामुळे जेव्हा असे भाग नोंदीतून वगळले जातात तेव्हा सर्व माध्यमांना संसदेकडून वगळलेल्या भागाची लेखी माहिती दिली जाते आणि ते भाग प्रकाशित करण्यास बंदी असते.



याठिकाणी देशाचे पंतप्रधानच सर्रास व कोडगेपणाने या नियमाचा भंग करीत आहेत.

एखाद्या माध्यमाकडून असे घडल्यास हक्कभंगाबद्दल शिक्षा केली जाते. आता पंतप्रधानांच्या विरोधात काँग्रेसने हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.

लोकसभा अध्यक्ष ती सूचना दाखल करुन हे प्रकरण हक्कभंग समितीकडे पाठविणार काय आणि तेवढे धाडस ते दाखविणार काय असे अनेक प्रश्न आता यातून निर्माण झालेले आहेत. परंतु यानिमित्ताने आता भाजपच्या विरोधात आणखी वातावरण चिघळू शकते.

अनेक वरिष्ठ लेखक, पत्रकारांनी या प्रकारच्या विद्वेषी राजकारणाबद्दल खेद व्यक्त केलेला आढळतो.

हिंदीतील एक प्रसिध्द पत्रकार व संपादक हरिशंकर व्यास यांनी त्यांच्या लेखात म्हटले आहे की, अशा प्रकारचे वक्तव्य करुन मोदी व त्यांच्या अनुयायांनी हिंदू समाजातच भेदभाव निर्माण केला आहे. २०२४ मध्ये भाजपला ३६. ६ टक्के मते मिळाली. यातील बहुतांश हिंदू असल्याचे मानले जाते. म्हणजेच भाजपला ज्या हिंदूंनी मते दिली नाहीत ते सर्व हिंदू हे अपघाती हिंदू असल्याचे मोदी व त्यांच्या अनुयायांतर्फे दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. म्हणजेच जो हिंदू मोदींना मते देईल तो

खरा हिंदू आणि मोदींना मते न देणारा हिंदूच नाही किंवा खोटा हिंदू अशी नवी वर्गवारी मोदी व त्यांच्या अनुयायांनी केलेली दिसून येते. अर्थात समाजाचे तुकडे पाडण्याची मोदींची ही सवय नवी नाही.

मोदी काय किंवा शहा काय यांना किंचितसा विरोध देखील सहन होत नाही. त्यांना विरोध करणारे तत्काळ देशद्रोही होतात.

त्यामुळेच २०१४ नंतर या जोडगोळीने या देशात एक नवी वर्गवारी तयार केली की ते फक्त हिंदूंचे राखणदार व रक्षक, बाकीचे सर्व राजकीय पक्ष हिंदू विरोधी. मोदींना, त्यांच्या धोरणांना, निर्णयांना विरोध करणारे सर्वजण देशविरोधी, देशद्रोही अशीही एक वर्गवारी त्यांनी प्रचलित केली.

हिंदूचे रक्षणकर्ते असे सांगताना या हिंदूंमध्येच भेदभाव करीत असल्याचे भान या जोडगोळीस राहिलेले नाही.

देश, समाज, निरनिराळी राज्ये यांच्यात फूट पाडून आपली सत्ता अबाधित ठेवण्याचे या जोडगोळीचे कारस्थान आता लोकांच्या लक्षात आल्यानेच त्यांची डाळ शिजेनाशी झाली आहे. तीच त्यांची खरी चिडचिड आहे. त्या नैराश्यातून हा आक्रस्ताळेपणा या जोडगोळीने आणि अनुराग ठाकूर यांच्यासारख्या त्यांच्या विखारी अनुयायांनी सुरु केलेला आहे.

अयोध्येत राममंदिर व्हावे म्हणून रामजन्मभूमि मोहिम सुरु असताना या मोहिमेच्या अग्रस्थानी असलेल्या लालकृष्ण अडवानी यांनी धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या राजकीय पक्षांना स्यूडो सेक्युलर पक्ष म्हणून हिणवायला सुरुवात केली. म्हणजे यांची धर्मनिरपेक्षता नकली आहे आणि नकली धर्मनिरपेक्ष राजकीय पक्ष म्हणून ते विरोधी पक्षांवर टीका करीत.

परंतु काँग्रेसचे त्यावेळचे प्रवक्ते विठ्ठलराव गाडगीळ यांनी जेव्हा भाजप व संघपरिवार हा स्यूडो हिंदू असल्याचे सांगायला सुरुवात केली. म्हणजेच संघ-भाजपचे हिंदुत्व हे बेगडी व नकली आहे असे सांगून त्यांनी त्याची अनेक उदाहरणे द्यायला सुरुवात केल्यानंतर भाजपच्या मंडळींना माघार घ्यावी लागली होती. परंतु त्यावेळचे राजकारण सुसंस्कृत व सभ्य होते.

आता या जोडगोळीने भारतीय राजकारणात असभ्यपणा, अभद्रता आणलेली आहे. त्यातूनच अनुराग ठाकूर यांच्यासारखे विखारी वक्ते विरोधी पक्षांवर विष ओकण्याचे प्रकार होत असतात.

भाजप व संघ परिवाराची ही अधःपतनाकडे सुरु असलेली वाटचाल आहे.

## योगी महाराजांचे दिवस भरले ?

लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपमधील अंतःस्थ खळबळ बाहेर येऊ लागली आहे.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत मोदी-शहा जोडगोळीची जादू चालू शकली नाही. त्यांना त्यांचा फाजील आत्मविश्वास नडला हे आता जगजाहीर आहे.



हिंदू-मुसलमान केले की मतदार आपल्याला मते देतील आणि काँग्रेस व राहूल गांधी यांची टिंगलटवाळी केल्यावर तर मतांमध्ये आणखी वाढ होईल अशा भ्रमात जोडगोळी राहिली.

मतदारांनी त्यांना सणसणीत चपराक लगावली.

तरीदेखील या जोडगोळीचा कोडगेपणा कमी झालेला नाही. नीतीशकुमार आणि चंद्रबाबू नायडूंच्या दयेवर आघाडीचे कुबडी सरकार स्थापन केल्यावरही जणूकाही फार मोठा विजय मिळविल्याचा खोटा आव ही जोडगोळी आणत आहे. परंतु संसदेत व विशेषतः लोकसभेत विरोधी पक्षांचे लक्षणीय संख्याबळ




हाथरसमधील दलित मुलीवर
बलात्कारप्रकरणी जनतेने केलेले आंदोलन





आता पदोपदी जाणवू लागले आहे. त्याचबरोबर विरोधी पक्षही आक्रमक झालेले असल्याने अनेक प्रसंगात बचावाचा पवित्रा घेण्याची वेळही जोडगोळीवर येत आहे.

केवळ विजयाच्या उन्मत्त नशेत राहण्याची सवय लागलेल्यांच्या दृष्टीने ही असह्य स्थिती असते. तीच नेमकी अवस्था जोडगोळीची झाली आहे. ही अवस्था का झाली याची कारणमीमांसा निवडणुकीनंतर झालेली आहे.

उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांनी जोडगोळीला हा दणका दिला.

उत्तर प्रदेशात अयोध्येत भव्य राममंदिर उभारणी आणि त्यानंतर मूर्ति प्रतिष्ठापनेचा भव्य सोहळा व त्या सर्व सोहळ्याचे नायकत्व भूषवूनही आणि सर्व वृत्तवाहिन्यांवर स्वतःच्या छब्या तासनतास झळकवूनही मतदार भुलले नाहीत आणि त्यांनी ही सर्व देखावेबाजी, नौटंकी ओळखून या जोडगोळीला त्यांची जागा दाखवून दिली. त्यामुळेच जिव्हारी लागलेल्या या पराभवाने ही जोडगोळी पिसाळलेल्या अवस्थेत आहे.

या अवस्थेला खऱ्या अर्थाने अनपेक्षित हातभार लावला तो उत्तर प्रदेशातल्या मतदारांनी आणि त्यामुळेच स्वघोषित परमेश्वरी अवतार खवळून उठले आहेत.

२०१४ मध्ये गुजरातहून मुद्दाम वाराणसीचा मतदारसंघ निवडून हिंदुत्वाची स्वघोषित ठेकेदारी प्रस्थापित करण्यासाठी मोदींनी तेथून निवडणूक लढवली आणि उत्तर प्रदेशाला आपल्या हिंदुत्ववादी राजकारणाचे नवे केंद्र बनविण्याची प्रक्रिया त्यांनी चालू केली होती.

योगी आदित्यनाथ यांच्यासारख्या भगव्या वस्त्रधारी नेत्याकडे राज्याची धुरा सोपवून त्यांनी त्या संकल्पनेवर शिक्कामोर्तबही केले.

अयोध्येत राम मंदिराची उभारणी हा त्या राजकारणातला आणखी एक निर्णायक टप्पाही त्यांनी गाठला. त्यामुळे उत्तर प्रदेशात आता आपल्याला प्रतिस्पर्धी उरलेला नाही असा भ्रम या स्वघोषित परमेश्वरी अवताराला झाला.

परंतु उत्तर प्रदेशाचे राजकारण केवळ हिंदुत्व किंवा धर्माच्या आधारावर चालत नाही. तेथे अजुनही जातीपातीचे राजकारण वर्चस्व राखून आहे. सामाजिक न्यायाच्या शक्ति आजही सशक्त आहेत. त्यामुळेच एका बाजुला सामाजिक न्याय व दुसरीकडे उत्तर प्रदेशातील स्थानिक लोकांच्या हातून आर्थिक नाड्या काढून बाहेरच्या लोकांच्या हाती सोपविण्याची बाब लोकसभा निवडणुकीत निर्णायक ठरली. परिणामी मोदी-शहा जोडगोळीचे राजकारण उत्तर प्रदेशात फसले.

सामाजिक न्यायाच्या पातळीवर राजकारण फसण्याचे प्रमुख कारण म्हणजे योगीमहाराजांची ठाकूर किंवा राजपूत जात हे ठरले.

उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री ज्या समाजाचा त्याचे वर्चस्व तत्काळ नोकरशाही, प्रशासन, पोलिस यामध्ये दिसून येऊ लागते. इतर समाजांना दुय्यम स्थान मिळू लागते.

योगीमहाराजांमुळे मूळचाच वरचष्मा असलेला ठाकूर समाज विलक्षण आक्रमक झाला. त्यामुळे त्यांनी ब्राह्मणांसह इतर समाजांना रेटायला सुरुवात केली.

हाथरसमधील दलित मुलीवरील सामूहिक बलात्कार व हत्येच्या प्रकरणात याच राजपूत समाजाचे लोक होते आणि अन्यत्रही या समाजाच्या मंडळींनी आक्रमकता धारण करायला

सुरुवात केली. परिणामी अनेक ओबीसी समाज जे भाजपबरोबर होते ते दुरावण्यास सुरुवात झाली.


उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष हा ओबीसींचे राजकारण करणारा पक्ष असल्याने या समाजांनी या पक्षाच्या छत्राखाली एकत्रित होण्यास सुरुवात केली आणि त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीत या समूहांनी समाजवादी पक्षाच्या पदरात भरघोस यश टाकून भाजपला झटका दिला.

मोदींनी ते स्वतः ओबीसी असल्याचे सांगत उत्तरेतील ओबीसी आणि हिंदुत्ववादी मंडळींना भाजपच्या छत्राखाली एकत्र आणण्याचा प्रयोग केला होता आणि दहा वर्षे तो यशस्वी झाला. परंतु हळूहळू त्यातील निरर्थकता लक्षात आल्यानंतर आणि योगी महाराजांमुळे सामाजिक न्यायाच्या समूहांना दुय्यम स्थान मिळत असल्याचे लक्षात आल्यानंतर हे समूह दुरावत गेले.

दुसरीकडे उत्तर प्रदेशातील मोठमोठे प्रकल्प. विकास योजनांमधून स्थानिकांना बाहेरचा रस्ता दाखविला गेला आणि ओबीसींना स्थान मिळत नसल्याची ही नाराजी आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत ते निष्क्रिय राहिले. आपली नाराजी दर्शविण्यासाठी ते उत्तर प्रदेश सोडून दिल्लीत येऊन मुक्काम ठोकून राहिले. निवडणुकीनंतर देखील त्यांनी उत्तर प्रदेशात जाऊन काम करण्याचे बंद केले. ते उत्तर प्रदेशाचे उपमुख्यमंत्री आहेत आणि मंत्री देखील आहेत. परंतु त्यांनी ते कामच थांबवून ते दिल्लीत मुक्काम ठोकून राहू लागले आहेत.

स्वघोषित परमेश्वरी अवतार वाराणसीतून केवळ सुमारे दीड लाखांच्या मताधिक्याने निवडून आले. ही दीड लाख मते त्यांच्यासाठी वाढवून घेतली गेली असा गौप्यस्फोट उत्तर प्रदेशाच्या एका भाजपनेत्यानेच केला आहे. आता मते कशी वाढविली जातात याच्या तपशीलात जाण्याची आवश्यकता नाही. मतदारांना ते चांगले कळते. ही बाब मोदींच्या जिव्हारी लागणे स्वाभाविक होते.

एकतर वाराणसीमधील निसटता विजय हा त्यांना



उत्तर प्रदेशातील विकास प्रकल्पाची कामे गुजरातच्या ठेकेदारांना.

मोदी-शहांच्या निकटवर्तियांना व विशेषतः गुजराती व बिगर उत्तर भारतीयांना विकास योजनांची कामे दिली जाऊ लागली.

परिणामी आर्थिक आघाडीवर देखील स्थानिक मंडळी नाराज होऊ लागली आणि त्यांनी भाजपला धडा शिकविण्याची तयारी केली.

खुद्द वारणसीत म्हणजेच स्वघोषित परमेश्वरी अवताराच्या मतदारसंघातील कामांमध्येही गुजराती व बाहेरच्या मंडळींना झुकते माप दिले गेले. अयोध्येतही हेच घडले.

थोडक्यात सामाजिक व आर्थिक आघाडीवरील जोडगोळीची गणिते चुकू लागली आणि या दुहेरी कारणांमुळे त्यांना मार पडला.

योगीमहाराजांच्या एकांगी व एककल्ली ठाकूरवादामुळे त्यांचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य नाराज होणे अपेक्षितच होते. मौर्य हे अन्य मागासवर्गीय आहेत. योगीमहाराजांच्या राजवटीत अस्वस्थ करुन गेला. त्यात योगीमहाराजांमुळे भाजपच्या मागे ज्या ओबीसी सूमहांचा जनाधार तयार झाला होता त्याला मोठ्या प्रमाणात गळती लागली व परिणामी उत्तर प्रदेशात भाजपला केवळ तेहतीस जागांवर विजय मिळू शकला. काँग्रेससारख्या जवळपास अस्तित्व गमावलेल्या पक्षाला आणि समाजवादी पक्षाला मतदारांनी भरघोस यश दिले. समाजवादी पक्ष (३७) आणि काँग्रेस (६) यांनी उत्तर प्रदेशातील ८० पैकी ४३ जागांवर कब्जा केला. हा मोदी-शहांना धक्का होता.

म्हणजेच उत्तर प्रदेशातील पराभव, मोदींचा निसटता विजय, दुखावलेले ओबीसी समूह आणि उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांचे बंड अशी योगीमहाराजांच्या विरोधातली कारणे साठायला लागली.

यातूनच योगीमहाराजांना बदलण्याच्या चर्चा सुरु झाल्या आणि विविध घडामोडींनी त्याला खतपाणी मिळू लागले.

उदाहरणार्थ नीती आयोगाच्या बैठकीला आलेल्या मुख्यमंत्र्यांना भेटताना मोदींनी योगीमहाराजांकडे केलेले दुर्लक्ष, तर योगीमहाराजांनी देखील मोदी-शहांना नमस्कार न करता नुसते उभे राहणे अशा गोष्टींना प्रसिध्दी मिळू लागली.

केशवप्रसाद मौर्य यांनी उघड बंड करुनही त्यांच्याविरुध्द कारवाई न करता उलट त्यांना दिल्लीत मुक्काम करण्यास परवानगी देण्याचा प्रकार होऊ झाल्याने उत्तर प्रदेशातील नेतृत्वबदलाच्या चर्चेला चालना मिळाली.

मोदींना एक गोष्ट कळून चुकली आहे की योगीमहाराजांच्या नेतृत्वामुळे ओबीसी समाज हा काही भाजपच्या बाजुने होणार नाही. मोदींनी अलीकडच्या काळात ओबीसींची संख्या लक्षात घेऊन त्यांचा अनुनय करण्याचे राजकारण चालविले आहे. त्यासाठी ते स्वतःच्या ओबीसी पार्श्वभूमीचाही वापर करताना दिसू लागले आहेत.


आदित्यनाथ योगी व केशवप्रसाद मौर्य यांच्यातील संघर्ष विकोपाला.

योगीमहाराजांना मुख्यमंत्रीपदी ठेवणे महागात पडणारे आहे हे मोदींना आता जाणवायला लागले आहे.त्यामुळेच त्यांना बदलण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.

परंतु योगीमहाराजांच्या जागी कुणाला मुख्यमंत्री करायचे हे मात्र ठरविणे जोडगोळीला अवघड जाऊ लागले आहे.

मुळात योगीमहाराजांना हलविणे ही बाब वाटते तेवढी सोपी नाही. कट्टर हिंदुत्ववाद्यांचे ते नेते आहेत. त्यामुळे त्यांना हलविण्याने जोडगोळीच्या हिंदुत्ववादी राजकारणाची पीछेहाट होऊ शकते.

थोडक्यात धरल तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय अशा अवस्थेत जोडगोळी आहे. परंतु सामाजिक न्याय आणि हिंदुत्व अशा दोन घोड्यांवर एकाचवेळी स्वार होण्याची कसरत ही जोडगोळी करीत आहे आणि ती बाब व्यवहार्य नाही हे त्यांच्या लक्षात येईनासे झाले आहे. त्यामुळे ओबीसी राजकारण की हिंदुत्वाचे राजकारण या द्विधा मनःस्थितीत व शृंगापत्तीमध्ये जोडगोळी सापडली आहे. त्यामुळेच योगीमहाराज अडचणीचे ठरत असूनही त्यांना हलविण्याची बाब जोडगोळीला शक्य होताना दिसत नाही.

योगीमहाराजांना हलविल्यास त्यांच्या जागी केशवप्रसाद मौर्य यांना मुख्यमंत्रीपद दिले जाईल याची खात्री कुणालाही नाही. मात्र एखाद्या फारशा माहिती नसलेल्या आणि जोडगोळीच्या तालावर नाचू शकेल अशा राजकीयदृष्ट्या वजनाने हलक्या असलेल्या नेत्याच्या शोधात जोडगोळी आहे.

ज्याप्रमाणे मध्य प्रदेशात त्यांनी नवथर अशा नेत्याकडे मुख्यमंत्रीपद देऊन शिवराजसिंग यांचे राज्यातील राजकारण संपविले व त्यांना केंद्रात आणून बसवले तसाच प्रकार त्यांना उत्तर प्रदेशात करता येईल काय याची चाचपणी सुरु आहे. याठिकाणी हेही नमूद करावे लागेल की मुळात उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदी योगीमहाराजांना नेमण्याची मोदींची इच्छा नव्हती. त्यांचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार मनोज सिन्हा हे होते. परंतु अमित शहांच्या आग्रहानंतर योगीमहाराज मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले.

मनोज सिन्हा हे जम्मू-काश्मीरचे राज्यपाल आहेत.

त्यामुळे जोडगोळीला उत्तर प्रदेशासाठी नेत्याचा शोध करावा लागत आहे. तो पूर्ण झाल्यास योगीमहाराजांची उचलबांगडी होऊ शकते. मात्र त्यासाठी वाट पहावी लागेल.

योगीमहाराजही गप्प बसणारे नाहीत. त्यांना हलविल्यास ते देखील कोणत्याही राजकीय हालचाली करु शकतात.

योगीमहाराजांच्या कट्टर हिंदुत्वाच्या राजकारणाची फळे २०१९च्या निवडणुकीत चाखल्याने जोडगोळीला त्यांच्या उपकाराचे स्मरण ठेवावे लागेल. परंतु त्यामुळेत ते डोईजड झाले आणि आता त्यांना डोक्यावरुन खाली उतरविणे अवघड होऊन बसले आहे.

थोडक्यात उत्तर प्रदेशातील घडामोडींनी जोडगोळी विवंचनेत आहे, त्रस्त आहे. त्यात महाराष्ट्र व हरयाणातूनही आगामी विधानसभेत चांगल्या यशाची शक्यता दिसत नसल्याच्या माहितीनेही ते अस्वस्थ आहेत. त्यामुळेच आगामी काळात ही जोडगोळी कोणती पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

■■




## नवीन संसद ? छे, जलमहल !

भारताच्या इतिहासात नोंद करण्याच्या ईर्ष्येने पछाडलेल्या अवतारी पुरुषाचे सोंग आता चांगलेच उघडकीस येऊ लागले आहे.

गेल्यावर्षी प्रगती मैदानातील पूर्वीच्या वास्तू मोडूनतोडून तेथे विशाल आंतरराष्ट्रीय संमेलन सभागृह उभारण्यात आले. काहीतरी नवीन नावे देण्याच्या वेडाने झपाटलेल्यांनी त्याला भारत मंडपम असे नाव दिले. पण ठीक आहे, तेही चालवून घ्यायला हरकत नाही.

याठिकाणी गेल्या वर्षीच्या अखेरीला जी-२० राष्ट्रसमूहाची शिखर परिषद झाली.

जणू काही आता अवतारी पुरुष ब्रह्मांडनायकच झाले आहेत अशा थाटात प्रसिध्दी करण्यात आली. भारत मंडपमची प्रशंसा करण्यात आली.

ही शिखर परिषद झाल्यानंतर काही दिवसातच दिल्लीत जोरदार पाऊस झाला आणि या भारत मंडपमचे रुपांतर जलमहालात झाले.

त्याचीच पुनरावृत्ती आता अवतारी पुरुषांच्या ईर्ष्येनुसार, लहरीपणानुसार बांधण्यात आलेल्या संसदेच्या नव्या इमारतीमध्ये झाली आहे.

३१ जुलैला दिल्लीत प्रचंड पाऊस झाला. दिल्लीत पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची यंत्रणा अद्याप सक्षम नाहीय थोडासा पाऊस झाला की रस्त्यांचे रुपांतर नदीनाल्यांमध्ये होते.

तसेच झाले. रस्ते जलमय झालेच. परंतु सुमारे २२०० ते २४०० कोटि रुपये खर्चुन बांधण्यात आलेली संसदेची नवी वास्तूही जलमय झाली.

या नव्या इमारतीच्या प्रवेशद्वारातच गुडघाभर पाणी साठलेले होते.




या नव्या इमारतीचे वास्तूरचनाकार बिमल पटेल नावाचे गुजराती गृहस्थ होते. ते गुजराती असल्यानेच त्यांची या कामासाठी निवड झाली हे उघड आहे.

बांधकामाचे कंत्राट या राजवटीचा आणखी एक आवडता उद्योगसमूह टाटा उद्योगसमूहाला देण्यात आले.

या इमारतीच्या बांधकामासाठी पर्यावरणीय परवानग्या तीव्र जलदगतीने देण्यात आल्या. याबाबत शंका व्यक्त झाल्यानंतर न्यायालयाने त्याबाबत हरकती .घेतल्या तथापि कोठूनतरी अशी काही चक्रे फिरली की न्यायालयाने तत्काळ हरकती मागे घेऊन या कामाला हिरवा कंदील दाखवला.



थोडक्यात काय तर गडबड घोटाळे करुन आणि निसर्गाच्या विरोधात जाऊन कामे करण्याचा अगोचरपणा कुणी केल्यास सर्वशक्तिमान निसर्ग आपले सामर्थ्य दाखवून देतो. तसेच घडले आणि या नव्या संसदीय इमारतीचे रुपांतर जलमहालात झाले.

पण केवळ येथेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी या अवतारी पुरुषांच्या राजवटीने निसर्गाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला तेथेतेथे त्यांना शिक्षा मिळाली आहे.

चारधाम यात्रेसाठी विशेष महमार्ग तयार करण्याची महत्वाकांक्षा यांनी हट्टाने पूर्ण केली परंतु त्यामुळे उत्तराखंडचा पर्यावरणीय समतोल बिघडून तेथे नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ झाली.



या प्रकल्पाला स्थानिकांनी विरोध केला होता पण तो मोडून तो करण्यात आला. जोशीमठ हे बद्रीनाथ मार्गावरील गाव इतिहासजमा झाले ही त्याचीच शिक्षा. बिहारमध्ये तर कमालच झाली.

या अवतारी राजवटीच्या हट्टानुसार जलदगतीने कामे पूर्ण करण्याच्या घाईमुळे कामचा दर्जा घसरला आणि ही कामे जीवघेणी ठरु लागली आहेत.

बिहारमध्ये पंधरा दिवसात तेरा पूल कोसळल्याची बातमी गाजली.

आपले सरकार वेगाने काम करीत असल्याची फुशारकी अवतारी पुरुष नेहमीच मारत असतात. परंतु त्यामध्ये कामाचा दर्जा घसरतो आणि कंत्राटदार घाईमध्ये दर्ज्याशी तडजोड करुन निकृष्ट प्रकारचे काम करतो व परिणामी नवे रस्ते खचणे, नवे पूल कोसळणे असले प्रकार सातत्याने घडू लागलेत. आता या सर्व प्रकारांची चौकशी कोण करणार हा प्रश्न आहे. विशेषतः संसदेची नवी इमारत जलमय होण्यामागे भ्रष्टाचार, गैरव्यवहार आहे काय याच्या चौकशीची मागणी झाल्याखेरीज राहणार नाही.

स्वतःचे नाव इतिहासात नोंदण्यासाठी किंवा कोरण्यासाठी किती हा अट्टाहास आणि धडपड ? अशी तडफड करुन इतिहासात नाव नोंदले जात नाही. त्यासाठी मनातला हेतु साफ व प्रामाणिक असावा लागतो. तो तसा नसला की मग असली फटफजिती होऊ लागते.

## बदलते नाते

काही वर्षांपूर्वी एक हिंदी सिनेमा आला होता. त्याचे शीर्षक होते बदलते रिश्ते. आता त्या सिनेमाची कथा माहिती नाही परंतु बदलत्या नातेसंबंधांवरच तो आधारित असणार हे निश्चित. सामान्य माणसांच्या जीवनात हे घडत असते. तसेच राजकारणातही होतच असते. राजकारणात तर असे म्हणण्याचा प्रघातच आहे की राजकारणात कुणीच कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रु नसतो. आता भारतीय राजकारणात तर या प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील.

नीतीशकुमार तर या खेळाचे बादशहा ठरले आहेत. त्यांचेच भाऊ चंद्राबाबू नायडू ठरले आहेत. कालचे प्रतिस्पर्धी आज गळ्यातगळे घालून हिंडताना दिसू लागले आहेत. यामध्ये आणखी एका नव्या उदाहरणाची भर पडली आहे. ओडीशाचे माजी मुख्यमंत्री आणि बिजु जनता दलाचे अध्यक्ष नवीनबाबू पटनाईक यांचा भाजपबद्दल नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर असाच भ्रमनिरास झाला आहे.









नवीनबाबूंनी ओडीशाचे मुख्यमंत्रीपद २४ वर्षे सांभाळले. हा एक विक्रमच मानला जातो. या काळात त्यांनी भाजपशी म्हणजेच मोदी-शहा जोडगोळीशी उत्तम संबंध राखले होते.

मोदींच्या नेतृत्वाखाली इतर पक्षांप्रमाणे त्यांनी अधिकृतपणे आघाडीत प्रवेश केला नव्हता. परंतु भाजपचा एक खात्रीशीर आघाडीबाहेरचा मित्रपक्ष म्हणून त्यांनी काम केले. मोदींबरोबरही त्यांचे उत्तम व मैत्रीपूर्ण संबंध राहिले.

अगदी लोकसभा निवडणुकीपूर्वीपर्यंत दोघांचे संबंध चांगलेच होते. यामुळेच ओडीशातील त्यांच्या सरकारला निर्वेधपणे राज्यकारभार करता आला हेही येथे लक्षात ठेवावे लागेल. अन्यथा त्यांची राजवटही मोदी-शहा जोडगोळीने उलथवायला कमी केले नसते.

लोकसभा निवडणुकीपूर्वी एका कार्यक्रमात मोदी व नवीनबाबू दोघेही सहभागी होते. त्या निमित्ताने मोदींनी नवीनबाबूंना भाजपबरोबर आघाडी करण्याचा प्रस्ताव ठेवला होता परंतु नवीनबाबूंनी तो मान्य केला नव्हता.

यानंतर लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्या. त्यात बिजु जनता दलाचा दारूण पराभव झाला.

नवीनबाबूंना भाजपबरोबर चांगले संबंध राखण्याचा पश्चाताप होणे स्वाभाविक होते.

कारण नवीनबाबूंबरोबर चांगले संबंध राखतानाच भाजपने ओडीशातील सर्व यंत्रणा पोखरुन टाकल्या. परिणामी बिजु जनता दलालाही खिंडारे पडली.

अखेर नवीनबाबूंचा पराभव झाला. पराभवाने त्यांचे डोळे उघडले असावेत. आता त्यांनी संसदेतील त्यांच्या पक्षाच्या खासदारांना भाजपच्या विरोधात काम करण्याचे आणि विरोधात मतदान करण्याचे आदेश दिले आहेत.

नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावरही नवीनबाबूंनी तीव्र टीका केली आहे.

ओडीशाला या अर्थसंकल्पाद्वारे काहीही मदत मिळालेली नाही असे त्यांनी म्हटले आहे. या मुद्यावरुन आता बिजु जनता दल आणि भाजपमध्ये तुंबळ शाब्दिक युध्द जुंपले आहे.

ओडीशातही भाजपचे सरकार सत्तेत आल्याने तर बिजु जनता दलाला राज्यात आणि केंद्रात म्हणजे संसदेतही भाजपच्या विरोधात भूमिका घेणे आता क्रमप्राप्त झाले आहे.

नवीनबाबूंनी भाजपबरोबर कधीच औपचारिक समझोता केला नव्हता. तरीही त्यांनी भाजपला मदत केली होती.

आता इंडिया आघाडीतही ते सदस्य नाहीत आणि होण्याची शक्यताही नाही. परंतु त्यांच्या भाजपच्या विरोधाचा लाभ इंडिया आघाडीला झाल्याखेरीज राहणार नाही. विशेषतः राज्यसभेत तर तो नक्कीच होणार आहे.

## पत्रकारांची गळचेपी सुरुच

अवतारी पुरुषांच्या राजवटीत पत्रकारांची गळचेपी सुरुच आहे.

याचे कारण अवतारी पुरुषाला प्रश्न विचारलेले आवडत नाहीत आणि पत्रकारांचा धंदाच प्रश्न विचारण्याचा






असल्याने या अवतारी पुरुषाला पत्रकारांबद्दल सक्त नफरत आहे.

अवतारी पुरुषाच्या या तऱ्हेवाईक वागण्याबद्दल भाजपचा एक वरिष्ठ नेता म्हणाला की आत्मविश्वासाच अभाव आणि निर्बुध्दपणा यामुळे ते असे वागतात. प्रश्नांना उत्तर देण्यासाठी जी स्वतःची बुध्दी लागते त्याचा अभाव असल्याने असे ते वागतात.

तर मित्रहो लोकशाहीचा दावा करणाऱ्या भारताच्या संसदेत पत्रकारांच्या प्रवेशावर निर्बंध आहेत.

करोनाचे निमित्त करुन अवतारी पुरुषांनी पत्रकारांच्या प्रवेशावर जे निर्बंध लावले ते आजतागायत कायम आहेत.

खरे तर संसदेच्या व्यवस्थापनाचे सर्वाधिकार लोकसभा अध्यक्षांकडे असतात. परंतु त्यांची देखील कोणती आगतिकता आहे की ते पत्रकारांवरील निर्बंध उठविण्यात असमर्थ ठरत असावेत. अलीकडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या पत्रकारांना संसदेच्या नव्या वास्तूत खासदारांचे बाईट घेण्यास मनाई करण्यात आली.

एवढेच नव्हे तर या पत्रकारांना एका काचेच्या खोलीत बंद करण्यात आले. त्यांनी तेथूनच त्यांचे काम करावे असे सांगण्यात आले. यावर पत्रकार खवळले.

निषेध झाला. पत्रकार संघटनांनी निषेध केले. संसदेच्या आवारातही पत्रकारांनी त्यांच्या अहिंसक व लोकशाही मार्गाने निषेध नोंदविला. प्रकरण चिघळताना पाहिल्यावर लोकसभा अध्यक्षांनी पत्रकारांना भेटायला बोलावले. अखेर पत्रकारांना काचेच्या बंदिस्त अवस्थेतून बाहेर येऊन खासदारांचे, मंत्र्यांचे बाईट घेण्यास परवानगी देण्यात आली. संसदेचे रुपांतर कडेकोट बंदोबस्तात करण्यात आल्याचा हा परिणाम आहे. लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर असलेल्या या ठिकाणी लोकांना, पत्रकारांनाच मज्जाव करण्याची ही लोकशाहीविरोधी मनोवृत्ती आहे.

यालाही आणखी कंगोरे आहेत.

संसदेची सुरक्षा व्यवस्था आता सीआयएसएफ या सुरक्षा दलाकडे देण्यात आली आहे.

पूर्वी संसदेची बाह्य सुरक्षा केंद्रीय



राखीव पोलिस दल व अन्य निमलष्करी दलांकडे होती.

संसदेच्या इमारतीची सुरक्षा व्यवस्था संसदेच्या वॉच अँड वॉर्ड विभागाकडे होती.

आता संसदेच्या वॉच अँड वॉर्ड विभागाकडूनही ही सुरक्षाव्यवस्था काढून घेण्यात आली आहे. त्यामुळे या विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये विलक्षण नाराजी, असंतोष आणि भविष्याबद्दलची अस्वस्थता आहे. ही एक नावाजलेली यंत्रणा होती. संसदेवर हल्ला झाला त्यावेळी संसदेची सुरक्षा करताना वॉच अँड वॉर्ड विभागाच्या दोन कर्मचाऱ्यांनी प्राण गमावले होते.

तर सीआरपीएफ म्हणजेच केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांनी संसदेबाहेर पहारा देताना हा हल्ला परतवून लावला होता आणि दहशतवाद्यांना मारले होते.

परंतु आपण काहीतरी नवीन, जगावेगळे करीत असल्याचा आव आणण्याची सुमारबुध्दी असलेली मंडळी हे बदल करीत असतात.

जे चांगले, सुरळीत चालले आहे त्यात खोडे घालण्याची ही अत्यंत भंपक व सुमार मनोवृत्ती आहे.

हातात सत्ता आहे म्हणून, संसदेची नवी इमारतच बांध, राजपथ आणि बोटक्लबची वाट लावून तेथे सिमेंटच्या इमारती उभ्या करा, नावे बदला असे भंपक प्रकार सुमारबुध्दीची मंडळी करीत सुटली आहेत.

राष्ट्रपति भवनातील अशोक हॉल आणि दरबार हॉलची नावेही बदलून आता अशोक मंडपम आणि गणतंत्र मंडपम अशी करण्यात आली आहेत.

मुघल गार्डनचे नाव बदलून अमृत उद्यान करण्यात आले आहे.

हातात परदेशी बनावटीची घड्याळे, परदेशी बनावटीच्या मोटारी, परदेशी बनावटीचे भारी गॉगल, परदेशी

बनावटीची भारी महागडी पेने वापरणारे ढोंगी भारतीय नामकरणाचा आग्रह धरतात हे किती सवंग आणि किळसवाणे आहे हे येथे लक्षात ठेवावे लागेल.

## रेटून खोटे बोला

कारगिल संघर्ष आणि त्यात विजय प्राप्त करण्याच्या घटनेस २५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने त्याचा गाजावाजा करण्याची आयती संधी अवतारी पुरुषांना प्राप्त झाली. प्रसिध्दी, फोटो, तामझाम, वेगळे भारी कपडे घालण्याची ही संधी सोडली तर ते अवतारी पुरुष कसले ?

नेहमी कुडता व चुडीदार मध्ये असलेले अवतारी पुरुष लष्करी खाक्याच्या पोशाखात कारगिलला गेले. डोळ्यावर भारी परदेशी गॉगलही लावला होता. आपण जणू काही लष्करी सेनानी आहोत असा त्यांचा थाट होता.

एकाधिकारवादी मनोवृत्ती असलेल्यांना या गोष्टींचे मोठे आकर्षण असते. म्हणजे त्यांना सैनिकांना दिलेली मानवंदना, मग कडक सॅल्युट या गोष्टींचे त्यांना वेडच असते. या गोष्टींना लागणारा रुबाब नसला तरी बेगडी रुबाबाचा आव आणून या गोष्टी करणाचा सवंगपणा अशा मनोवृत्तीच्या लोकांमध्ये ठासून भरलेला असतो.

तर अवतारी पुरुष हे कारगिलच्या विजयदिनाला २५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने कारगिल व लडाखला गेले होते. तेथे त्यांनी भाषण ठोकले.

भाषण ठोकले असे मुद्दाम म्हणावे लागले कारण या भाषणात त्यांनी जी ठोकाठोकी केली ती अवाक करणारी होती. या भाषणात त्यांनी अग्निवीर किंवा अग्निपथ ही योजना भारतीय लष्करानेच पुरस्कृत केली असल्याचा दावा केला. यात आणखी भर टाकताना ते म्हणाले की सेनेला तरुण ठेवण्यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेबद्दल विनाकारण चुकीच्या गोष्टी पसरवून समाजात गैरसमज निर्माण केले जात आहेत. एखादी व्यक्ती किती बेमालूमपणे किंवा निखालसपणे खोटे बोलू शकते याचा हा आदर्श नमूना मानावा लागेल.

या अग्निवीर योजनेला सेनेचा विरोध होता. त्यावेळचे सरसेनापति जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी त्यांच्या आत्मकथनपर आठवणी लिहिलेल्या पुस्तकात त्यांनी या योजनेला केलेल्या विरोधाचा उल्लेख आहे.

त्यांच्या या आठवणींचे पुस्तकच अवतारी पुरुषांच्या सरकारने प्रकाशित होऊ दिलेले नाही. याच पुस्तकात नरवणे यांनी लडाखमधील चिनी घुसखोरीबद्दलची काही टीकात्मक माहितीही लिहीली आहे. या गोष्टी अवतारी पुरुषांच्या प्रतिमेला धक्का पोहोचविणाऱ्या ठरतील या धास्तीने सरकारने हे पुस्तकच प्रकाशित होऊ दिलेले नाही. हे पुस्तक प्रकाशित होण्याच्या तारखाही जाहीर झाल्या होत्या आणि बाजारात ते कधी उपलब्ध होईल याच्याही तारखा जाहीर झाल्या होत्या.



परंतु जेव्हा त्यातील माहिती आपल्या विरोधात जाणारी असल्याचे समजल्याबरोबर अवतारी पुरुषांच्या यंत्रणांनी या पुस्तकाला खो घातला.

आता हे पुस्तक अद्याप अप्रकाशितच राहिलेले आहे.

त्यामुळे एका बाजुला पत्रकारांना मज्जाव तर दुसरीकडे पुस्तकांवर बंदी असले अघोषित आणीबाणीचे प्रकार अवतारी पुरुषांनी चालविले आहेत.

तरीही पन्नास वर्षांपूर्वी लावण्यात आलेल्या आणीबाणीच्या विरुध्द निषेध ठराव करण्याचा किळसवाणा ढोंगीपणा सुरु आहे.

## भाजपमधील वाढती अस्वस्थता

भाजपमध्ये अस्वस्थता वाढत आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालांमुळे आणि पक्षाला स्वबळाचे बहुमत न मिळाल्याने ही अस्वस्थता आहे. त्यातच आता हरयाणा व महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका आहेत. त्यानंतर झारखंडमध्ये देखील आहेत. जम्मू-काश्मीरमध्येही निवडणुका अपेक्षित आहेत. लडाखमध्ये स्थानिक निवडणुकीत भाजपने मार खाल्ल्यानंतर भाजप व संघ परिवार सावध झाला आहे. तर जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया अचानक वाढलेल्या आढळत आहेत. आता निवडणुकांची वेळ येताच या कारवाया वाढल्या याला योगायोग म्हणावे काय असे म्हणण्याची वेळ आली आहे.

अर्थात भाजपमध्ये जी अस्वस्थता आहे ही ती लोकसभेच्या निकालांमुळे सुरु झाली आहे आणि येत्या विधानसभा निवडणुकांमुळे काय होईल या धास्तीने



निर्माण झालेली आहे. याचे आणखीही कारण आहे. अवतारी पुरुषांच्या प्रतिमेभोवतीचे वलय निष्प्रभ व निस्तेज होत चालले आहे.

विशेषतः त्यांच्या भाषणांना जो प्रतिसाद मिळत असे तोही आता खालावत चालला आहे. त्यांच्या भाषणांमध्ये नव्या मुद्यांचा अभाव आहे.

हिंदु विरुध्द मुसलमान या मुद्यावर तेच नाहीत तर त्यांचे उजवे-डावे हात असलेले कोतवालसाब उर्फ केंद्रीय गृहमंत्रीही सतत बोलताना आढळतात.

महाराष्ट्रात आणि इतरत्रही त्यांनी दौरे केले त्यात त्यांनी उध्दव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे प्रमुख आहेत असे म्हटले. झारखंडमध्येही त्यांनी असलेच वक्तव्य केले. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये आणि सर्वसामान्य लोकांमध्येही आता या भाषणांमधील स्वारस्य कमी होत चाललेले आहे. त्यांचा प्रतिसादही कमी होत चालला आहे. झारखंडमध्ये गृहमंत्र्यांनी बांगला देशातून घुसखेरीचा मुद्दा उपस्थित केला.

बांगला देशातून येणारे घुसखोर झारखंडमधील आदिवासी मुलींना फूस लावतात आणि झारखंडमधील लोकसंख्येचे स्वरुपच बदलू पहात आहेत असा गंभीर आरोप त्यांनी केला.

मुळात त्यांचा हा आरोप बिनबुडाचा आहे.

बांगलादेशातून घुसखोरी ही फारशी होत नसल्याची माहिती आहे. पूर्वी घुसखोरी होत असेती रोजगारासाठी असे.

आता बांगला देशाने जी आर्थिक प्रगती केली आहे त्यामुळे ही घुसखोरी जवळपास नगण्य झाली आहे.

परंतु आता लोकांना त्यांचे हे मुद्दे पटेनासे झाले आहेत.

त्यामुळे या मंडळींची भाषणे आता सपशेल पडू लागली आहेत.

लव्ह जेहाद, बांगला देश घुसखोरी हेच मुद्दे पुन्हापुन्हा उगाळले जात आहेत.

मुद्दा हा आहे की घुसखोरी हा विषय कुणाच्या अधिकारातील आहे या प्रश्नाचे हे उत्तर आहे की ही बाब केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अधिकारातील आहे.

कारण सीमासुरक्षा दल हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अधिकारातील आहे.

घुसखोरी रोखणे ही त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. त्यामुळेच आता या जोडगोळीच्या या मुद्यांना प्रतिसाद मिळेनासा झाला आहे.



भाजपमधील अस्वस्थतेचे आणखी एक कारण म्हणजे उत्तर प्रदेशातील भाजपमध्ये सुरु झालेली सुंदोपसुंदी हे आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या विरोधात उपमुख्यमंत्री केशवप्रसाद



मौर्य यांनी बंड पुकारल्याने भाजपमध्ये नवाच पेच निर्माण झाला आहे.

मौर्य यांना मोदी-शहा जोडगोळीचा गुप्त पाठिंबा असल्याची चर्चा आहे. त्यामुळे आदित्यनाथ नाराज आहेतच परंतु या पक्षांतर्गत नव्या संघर्षामुळे भाजप कार्यकर्त्यांत मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

हा प्रकार वाढत गेल्यास त्याचे पडसाद इतरही राज्यांमध्ये उमटल्याखेरीज राहणार नाहीत अशी भीती या भाजपच्या कार्यकर्ते व नेत्यांना वाटते आहे.

मोदी-शहा जोडगोळी ही परिस्थिती कशी हाताळतात हेच आता पाहण्याची उत्सुकता आहे.

कारण अशी बंडाची परिस्थिती गेल्या दहा वर्षात उत्पन्न झाली नव्हती.

आगे आगे देखिये, होता है क्या!

■■

# घाबरलेले राज्य सरकार चंद्र-तारे देऊ म्हणेल

(पान ३ वरून) आम्ही आमची भूमिका त्यांना सांगितली आहे. त्यांनी निर्णय कसा घ्यायचा हा त्यांचा प्रश्न आहे. कारण सरकार ते चालवत आहेत.

उगाच मोकळ्या बैठका घेण्यापेक्षा सरकारने आता निर्णय घेण्याची आमची अपेक्षा आहे. सरकार त्यांचे आहे. बहुमत त्यांच्याकडे आहे. निर्णय का घेत नाही? शेवटचं अधिवेशन संपलं. संपण्याच्या आधी सभागृहात विषय मांडला जाईल, अशी अपेक्षा होती. पण तुम्ही मांडलं नाही. मराठा आणि ओबीसी समाजाच्या नेत्यांसोबत तुम्ही ज्या चर्चा केल्या आहेत त्या चर्चा लक्षात घेऊन तुम्ही निर्णय घ्या. आम्ही आमची भूमिका यापूर्वी स्पष्ट सांगितलेली आहे. त्यामुळे आता सरकारने काय तो निर्णय घ्यावा. त्यांनी टेबलवर प्रस्ताव ठेवला पाहिजे. सरकार म्हणून त्यांनी निर्णय घेतला पाहिजे.


विशाळगडावरील अतिक्रमण दूर करावं, यासाठी अनेक शिवप्रेमी हे बराच काळ मागणी करत होते. तिथलं अतिक्रमण पावसाळ्याच्या अगोदर दूर करणे गरजेचं होतं. आता ऐन पावसात तिथल्या लोकांना कुठे हलवायचं, हा एक मोठा प्रश्न आहे. यावर काही लोकांनी कोर्टातून स्टे आणला होता. त्यामुळे तिथल्या १२-१३ घरांना काढणं शक्य नव्हतं, मात्र उरलेल्यांना काढावं असे आदेश आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले आहेत. पावसाळ्यात अशा लोकांना तिथून काढून टाकणं हे योग्य नाही. मात्र अतिक्रमणाला आमचा पाठिंबा नाही.

विशाळगडावरचं अतिक्रमण हे दूर झालंच पाहिजे, याबद्दल कोणतीही शंका नाही. अतिक्रमण काढण्यासाठी जे पायथ्याशी लोक आले त्यांनी तिथल्या नजदीकच्या गावामध्ये जाऊन मुस्लिम वस्तीवर हल्ला करणं. त्यांच्या घरांची नासधूस करणं, तिजोऱ्या फोडणं आणि मालमत्ता लुटणं हे छत्रपती शिवाजी महाराजांना देखील अपेक्षित नव्हतं.

लोकांच्या घरावर हल्ला करण्याचं काम शिवप्रेमी करू शकत नाहीत. त्यामुळे त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्यावर कलम १५३ आणि अधिक कडक कलम लावली पाहिजेत. काळ सोकावू नये अशी आमची अपेक्षा आहे. पोलीस यामध्ये जनतेला संरक्षण देण्याबाबतीत अपयशी ठरले. फक्त २ ते ३ पोलीस हे तिथं उघड्या डोळ्यांनी काय होत आहे ते बघत होते. मोठी कुमक लगेच मागवून गुंडांचा हौदास सुरु असणारा पूर्णपणे थांबवता आला असता, आता आमची मागणी आहे. हा पूर्वनियोजित कट होता, तिथे जाऊन दंगा - गोंधळ करायचं हे ठरलेलं असावं. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी केली पाहिजे.

माझ्या अर्थसंकल्पीय चर्चेतील भाषणात मी राज्यात मालमत्ता निर्मिती होत नसल्याबद्दल राज्याचे लक्ष वेधले होते. नेमकी तीच बाब देशातील सर्वोच्च घटनात्मक यंत्रणा असलेल्या कॅगच्या अहवालात मांडली गेली आहे. या भाषणात मी असेही नमूद केले होते, की राज्य सरकार बेदरकार पद्धतीने उधळपट्टी करत असून, हा अर्थसंकल्प वास्तवापासून दूर आहे. अगदी तेच निरीक्षण महालेखा परिक्षकांनी नोंदवले असून, अर्थसंकल्प वास्तववादी असावा अशी सूचना केली आहे.





विशाळगडावरील काही अतिक्रमण हलविले.



**शेतमालाला, दूधाला भाव नाही म्हणून शेतकरी रस्त्यावर माल ओतून आंदोलन करताना.**

आम्ही सर्व लोक वारंवार हे सरकार अर्थसंकल्पाच्या माध्यमातून जनतेला फसवत असल्याचे गेले काही दिवस सांगत आहोत. त्यावर काल सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कॅगच्या अहवालाने शिक्कामोर्तब केले आहे. राज्य सरकार वाटत असलेली अनावश्यक अनुदाने कमी करावीत, मालमत्ता निर्मितीकडे लक्ष पुरवावे, वाढीव पुरवणी मागण्या सादर करताना त्याचे समर्थन करता यावे आणि वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्च करण्याची पद्धत थांबवावी. पुढची पिढी भिकेला लागली तरी चालेल, पण वाडवडिलांनी कष्टाने कमावलेले सर्व फुकून टाकून फक्त आजच्या दिवशी कशी मौजमजा करता येईल, असाच सध्याच्या राज्यकर्त्यांचा राज्य चालवतानाचा दृष्टिकोन आहे.

शहरी नक्षलवादाच्या नावाखाली पुरोगामी चळवळींना लक्ष्य करण्याचा सरकारचा उद्देश आहे. त्यामुळेच सरकार अध्यादेशातून महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा आणण्याचा प्रयत्न करत आहे. या कायद्याला आमचा विरोध आहे. ब्रिटिश सरकारच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील रौलट ॲक्टच्या धर्तीवर महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकार महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा अध्यादेशाद्वारे आणणार असल्याचे समजते. कोणताही कायदा तयार केला जात असताना त्यावर विधी आयोगाकडून मत घेणे, जनतेकडून व तज्ज्ञांकडून अभिप्राय घेणे आणि विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत त्यावर सखोल चर्चा होणे, अशी प्रक्रिया असताना सरकार कोणालाही न जुमानता हा पाशवी कायदा अध्यादेशाद्वारे आणत आहे.

या कायद्याने पोलिसांना अमर्यादित अधिकार दिले जाणार असून, कोणतीही कारणे उघड न करता एखाद्या संघटनेला बेकायदेशीर म्हणून घोषित करण्याचे अधिकार शासनाला या कायद्याद्वारे प्राप्त होणार आहेत. शहरी नक्षलवादाच्या नावाखाली या राज्यातील पुरोगामी चळवळींना लक्ष्य करण्याचा स्पष्ट उद्देश यातून दिसत आहे. हे विधेयक घटनेच्या कलम २१चे उल्लंघन करणारे, घटनाविरोधी असून, सर्व विरोधी पक्षांचा या विधेयकाला पूर्णपणे विरोध आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातल्या अधिवेशनात शरद पवार साहेबांवर बरेच आरोप केले. पण, हे गृहमंत्रीच बोलत आहेत. त्यामुळे त्यांनी नीट अभ्यास करून तसेच माहिती करून बोलणं अपेक्षित आहे. शरद पवार यांच्यावर आजपर्यंत कुठलाही आरोप झालेला नाही. अशा पद्धतीने हकनाक खोटे आरोप करणे आणि भाषण करणं हा त्यांचा अजेंडा दिसतोय. देशात आणि महाराष्ट्रात सर्वात जास्त भ्रष्टाचारी कोण आहे, याबाबतची वस्तुस्थिती जनतेला माहिती आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी पूर्ण ताकदीने महाराष्ट्रात निवडणूक लढणार आहे

अमित शाह यांना पूर्ण माहिती आहे. शरद पवार यांचं सरकार कधीच नव्हतं. काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांचं सरकार होतं. त्यांनी पहिल्यांदा आरक्षण दिलं. मात्र ते आरक्षण टिकवण्यात भाजप नेते देवेंद्र फडणीस यांच्या सरकार काळात काही अडचणी आल्या. आरक्षणाबाबतीत आत्ताच्या सरकारने लोकांच्या अपेक्षा पूर्ण केलेल्या दिसत नाहीत.

शरद पवार यांच्याविषयी अमित शाह यांनी केलेले वक्तव्य शरद पवार यांच्यासोबत सुरुवातीला जे होते त्यांनाही लागू होतं. मात्र ते आता भाजपसोबत जाऊन बसलेले आहेत. अमित शाहा यांना हे कळलं नाही की ज्यांच्याकडे बघून त्यांनी हा आरोप केला आता ते त्यांच्यासोबतच जाऊन बसलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस हा शरद पवारांचा सर्वात स्वच्छ पक्ष हा महाराष्ट्रातला आहे.

वाईट काळात जे सोबत राहिलेले आहेत त्यांना पुन्हा पक्षात घेण्याच्या निर्णयाबाबत शरद पवार यांनी सांगितलेलं आहे. शरद पवार यांना जे सोडून गेलेले आहेत त्यांच्या परतीबद्दल माझ्यात आणि शरद पवार यांच्यामध्ये कुठलीही चर्चा झालेली नाही. ते परत येतील असं मला वाटत नाही. मात्र आले तर त्याबद्दल चर्चा करू. मात्र परत येण्यासंदर्भात आमच्याशी कोणीही चर्चा केलेली नाही.

काहीतरी जुन्या गोष्टी करायच्या आणि काहीतरी चुकीची

विधानं करायची. बेरोजगारी, महागाई तसेच शेतमालाला भाव नाही. हे मुख्य प्रश्न बाजूला राहिले आणि हे काय नवीन स्टेटमेंट करत बसले. औरंगजेब सारखेच लोक आहेत. त्यावर जाऊन शतकोनशतके झाली. मात्र तरीही त्यांच्या नावावर राजकारण करून मत मागायची, हेच काम अमित शहा आणि भाजपने केले आहे.

मला वाटत नाही की हे योग्य आहे. मला एवढंच वाटतं की हे सरकार महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकलं नाही. पुन्हा आपण निवडून येणार नाहीत, अशी शंका असल्याने पुढच्या पंधरा दिवसात पाहिजे त्या घोषणा ते करतील. सत्ताधाऱ्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे पाहिजे तशा घोषणा त्या पुढच्या काही दिवसांत करतील. महावितरण कंपनीला डुबवून शेतकऱ्यांना वीज बिल माफ संदर्भात कितीही मोठी घोषणा केली तरी त्याचा आता उपयोग होणार नाही.

जे आरोप केले त्याला उत्तर सुद्धा सरकारमधले मंत्री देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये या महायुतीच्या सरकारला पराभूत करण्यासाठी राज्यातली जनता एकत्र येईल असे मला वाटतं.

किती भ्रष्टाचार असावा याचा आता सुमार राहिलेला नाही. मात्र भ्रष्टाचारावर कोणी बोलत नाही. आता भ्रष्टाचाऱ्यांकडून नवीन नारा दिला जात आहे. तुरुंगात जाण्यापेक्षा भाजपमध्ये गेलेलं बरंः कारण भाजपमध्ये गेलो तर सर्व चौकशा







थांबतात. त्यामुळे मागे लागलेल्या सर्व कटकटी थांबतात. आमच्या २५ नेत्यांवर तुम्हीच आरोप केलं. नंतर २३ जणांच्या चौकश्या थांबल्या. राज्यातली जनता दूध खुळी आहे का? या सरकारने गेल्या दीड ते दोन वर्षात महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. मात्र तो लोकांना जावून सांगण्याची गरज आहे. महायुतीच्या सरकारचे काळे कारनामे असे पुस्तक आम्ही प्रसिद्ध केलेले आहे. ते पुस्तक लोकांमध्ये जाऊन लोकांना वाचून दाखवा.

लोकसभेच्या निकालानंतर हे सरकार प्रचंड भेदरलेले आहेत. राज्यावर मोठे कर्ज आहे. मोठा बोजा आहे. राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा प्रचंड बोजवरा या सरकारने उडवला आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवारांची का भेट घेतली याबाबत माझी शरद पवारांसोबत चर्चा झालेली नाही. सत्तेत बसणाऱ्या लोकांनी दोन्ही बाजूला काय आश्वासन दिले त्यानुसार निर्णय घ्यावा. याच्यात कसलंही राजकारण केलं जातं नाहीय. आरक्षणाच्या प्रश्नाकडे आम्ही राजकारण म्हणून पाहत नाही. सरकारने वेगवेगळ्या समाजाला जी आश्वासने दिली आहेत ती सरकारने पाळावी एवढी आमची अपेक्षा आहे.

लाडक्या खुर्चीसाठी लाडकी बहीण आणि लाडका भाऊ यांसारख्या योजना आहेत. महाराष्ट्रातील जनतेबद्दल कुठलीही आस्था किंवा सहानुभूती महायुतीच्या सरकारला नाहीय. भ्रष्टाचाराचा कळस या सरकारने केलेला आहे. अधिवेशनामध्ये

पहिल्या, दुसऱ्या क्रमांकावर असणारं आपलं राज्य आता थेट ११व्या क्रमांकावर गेलं आहे. डबल इंजिन मुळे आम्हाला पैसे मिळतात असं सरकार सांगतात. मात्र हे डबल नाही तर लोकांना त्रास देणाऱ्या 'ट्रबल इंजिन'चं आहे.




शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम राज्यातल्या विमा कंपन्या करत नाही. निर्यातीच्या चुकीच्या धोरणाचा फटका हा आपल्याला मोठ्या प्रमाणावर बसला. पिकांना हमीभाव नाही यासह विविध समस्यांमुळे शेतकरी नाराज असल्याने त्याचा फटका सरकारला लोकसभा निवडणुकीत बसल्याचे आपण बघतो आहे. मुख्यमंत्री झाल्यावर एकनाथ शिंदे यांनी मोठ्या घोषणा केल्या मात्र आजही आपल्या राज्यातला शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहे. उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या मोदी सरकारला अपयश आलेले आहे. त्यामुळे देशात बेरोजगारीचा उच्चांक हा गाठलेला आहे.

देशात भाजपच्या विरोधात सर्व सामान्य माणसाच्या भूमिका नकारात्मक आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडून महाराष्ट्राला अपेक्षा होत्या. परंतु भाजपने तोंडाला पाने पुसली. आंध्र प्रदेश आणि बिहारचे लोकप्रतिनिधी सोबत राहावेत यासाठी त्या राज्यांना खैरात वाटण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा हे सरकार द्वेष करते आहे. आगामी विधानसभा निवडणुका दोन महिन्यांत होणार आहेत. लोकांना खूश करण्यासाठी काही घोषणा होतील. नंतर ते विसरून जातील. महाराष्ट्र हा भाजप आणि केंद्र सरकारच्या विरोधात आहे. ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.सर्व्हे केला तेव्हा राज्यात आघाडीच्या ३५ जागा येतील, असा अंदाज आला पण ३१ जागा आल्या. काही ठिकाणी पैशाचा पाऊस पडला. त्यामुळे काही जागा गेल्या. आमचं सरकार केंद्रात सत्तेत आले असते, तर निश्चितपणे जीएसटी कमी केला असता. लोकसभेत आम्हाला जे लपून छपून मदत करत होते, ते आता सोबत येत आहेत. त्यामुळे विधानसभेला आणखी चांगले चित्र राहील. 'हमारे अच्छे दिन आनेवाले हैं'.

लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव आणि विधानसभा निवडणुकीत समोर पराभव दिसू लागल्याने भारतीय जनता पक्षाची भाषाही बदलू लागली आहे. या नैराश्यातूनच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता विरोधकांना ठोका असे आदेश पक्ष कार्यकर्त्यांना दिले आहेत. विरोधकांना विरोध करण्याची विद्वत्ता संपली, शब्द संपले असल्यानेच भाजप मुद्यावरून गुद्याची भाषा करु लागला आहे. शहा यांनी शरद पवार यांच्यावर भ्रष्टाचाराचे सरदार म्हणून आरोप केले. पवार यांच्याबरोबर असलेल्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप तुम्ही केले होते. आता हे सारे नेते तुमच्याकडे आलेले आहेत. त्यामुळे भ्रष्टाचारावर बोलण्याची तुम्हाला जागा राहिलेली नाही. पवार साहेब गेल्या ५५ वर्षांपासून राजकारणात आहेत. त्यांच्यावर अनेकदा भ्रष्टाचाराचे आरोप झाले. मात्र, त्यांनी कोठेही भ्रष्टाचार केलेला नाही. लोकसभेला फटका बसल्यावर महायुतीचे विधानसभेचे वारे फिरु लागले आहे. सत्ताधारी घाबरले आहेत. मते कशी मिळवायची, यासाठी ते शर्थीचे प्रयत्न करीत आहेत. त्याकरिता सध्या मोठमोठ्या घोषणांचा पाऊस पाडला जात आहे. महायुतीला आपल्या तिजोरीत किती पैसे आहेत हे कळत नाही असे वाटते.

लाडकी बहीण योजना आणली. मात्र, राज्यात ४२ हजार महिलांवर अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत. अर्थसंकल्पात घोषणा केली म्हणजे त्याची अंमलबजावणी होईलच असे समजू नका. १७ ते १८ हजार कोटी महसूली तूट आहे, त्यात ९४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या गेल्या. महाविकास आघाडीने खोटे नरेटिव्ह पसरविल्याचा आरोप केला जातो. मात्र, तुमचेच अकरा उमेदवार भाषण करताना संविधान बदलण्यासाठी दिल्लीत पाठवा, असा प्रचार करत होते.

शरद पवार यांनी महाराष्ट्रासाठी काय केले असे अमित शहा विचारतात. पवार यांनी महाराष्ट्राला काय दिले, यापेक्षा तुम्ही गुजरातला काय दिले, ते सांगा. महाराष्ट्राच्या वाट्याचे हिरावून घेत गुजरातला देण्याचे काम सरकारने केले आहे. यामुळे गुजरात राज्य महाराष्ट्राच्या पुढे गेले आहे. महाराष्ट्रात काय-काय पळवले याची यादीच जाहीर केली जाणार आहे.

# शेवटचे पान



# गर्जा जय जयकार क्रांतीचा!

महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांना भारत देश सोडून जाण्याचा (क्विट इंडिया) नारा ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँकवर भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात दिला. इंग्रजांना हा नारा मानवणे शक्यच नव्हते. त्यांनी महात्मा गांधींसह स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतलेल्या अनेकांना अटक करून धरपकडीचे सत्र सुरू केले. या दिवसापासून स्वातंत्र्य लढ्याला प्रचंड जोर आला व १५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. या लढ्याची आठवण म्हणून ८ ऑगस्ट हा दिवस देशभर क्रांतीदिन म्हणून साजरा केला जातो आणि स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेल्या व भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण केले जाते. त्यामुळे या दिवसाला खूप महत्त्व आहे.

८ ऑगस्ट १९४२ साली कॉंग्रेसच्या मुंबई अधिवेशनात महात्मा गांधींनी 'भारत छोडो' आंदोलन सुरु केले. गांधीनी देशाला संबोधताना त्यांच्या भाषणात 'करो या मरो' चे आवाहन केले. भारतातील ब्रिटीशांची सत्ता संपवण्यासाठी ही सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली होती. भारत छोडो आंदोलनाची सुरुवात ऑगस्ट महिन्यात झाल्यामुळे याला 'ऑगस्ट चळवळ' किंवा 'ऑगस्ट क्रांती' असेही म्हणतात.

९ ऑगस्ट १९४२ रोजी चळवळीस सुरुवात झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने महात्मा गांधींसह कॉंग्रेसच्या इतर मोठ्या नेत्यांना अटक करुन चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अटकेनंतर अरुणा असफ अली यांनी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे नेतृत्व केले. हा ऐतिहासिक दिवस लक्षात ठेवण्यासाठी '९ ऑगस्ट' हा ऑगस्ट क्रांती दिवस म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्यवीरांना श्रद्धांजली वाहून तसेच देशाच्या एकतेची भाषणे आणि इतर कार्यक्रमाद्वारे हा दिवस साजरा केला जातो.

भारत छोडो आंदोलनाच्या सुरुवातीला महात्मा गांधीनी गोवालीया टॅंक येथून भाषण दिल्याने या मैदानाला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी देशाला आवाहन करण्यासाठी महात्मा गांधी आणि कॉंग्रेसचे इतर ते ८ ऑगस्ट १९४२ आणि ९ ऑगस्ट १९४२ रोजी या ठिकाणी एकत्र जमले होते. या ऐतिहासिक क्षणांची आठवण करुन देणाऱ्या स्मारकाची उभारणी या मैदानावर केली गेली आहे. मध्य मुंबईमध्ये स्थित असलेले गोवालिया मैदान गाई आणि इतर





प्राणी स्वच्छ करण्यासाठी वापरले जायचे. 'गो' म्हणजे गाई आणि 'वाला' म्हणजे त्यांचा मालक म्हणून याचे नाव गोवालिया असे पडले.

सध्या याचे रुपांतर पाच विभागणी असलेल्या मोठ्या मैदानात झाले आहे. एक विभाग हा शहीदांच्या स्मारकांचा आहे.सगळ्यात मोठा भाग म्हणजे खुले खेळाचे मैदान त्याचबरोबर जेष्ठ नागरिकांसाठी गार्डन आणि लहान मुलांसाठी छोटेसे खेळाचे मैदान आहे. गांधी ज्या मणीभवनाचा वापर मुख्यालय म्हणून करत होते त्यापासून जवळच हे मैदान आहे. हे मैदान भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील तसेच एका महत्वाच्या ऐतिहासिक क्षणाचा भाग आहे क्रांती दिन हा भारताच्या इतिहासातला एक फार महत्वाचा दिवस आहे.